- अभ्यास विषय -

‘‘सांगली व सातारा जिल्ह्यातील मानवी विकासाचा तुलनात्मक अभ्यास’’

(१९९१ ते २०११)

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे

सामाजिक शास्त्र शाखेतील अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (Ph.D)

पदवी करीता सादर करण्यात येणारा शोध प्रबंध

- संशोधक -

हाशिम गुलाब वलांडकर

Mob-9860851735 PRN.NO. 02111000843

मार्गदर्शक

प्रा.डॉ.एम.एन.शिंदे

प्रपाठक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख

कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज,इस्लामपूर

Mob - 9890114896

प्रतिज्ञाप्रत्र

''सांगली व सातारा जिल्ह्यातील मानवी विकासाचा तुलनात्मक अभ्यास (1991 ते 2011)'' या विषयावर सदर शोध प्रबंध मी टिळक महाराष्ट्र विद्यापिठाच्या पीएच.डी. (अर्थशास्त्र) पदवी परीक्षेसाठी लिहिला आहे. हा प्रबंध अथवा या प्रबंधातील कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक 16/02/2015

प्रा.हशिम गुलाब वलांडकर

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की,''सांगली व सातारा जिल्ह्यातील मानवी विकासाचा तुलनात्मकअभ्यास (1991 ते 2011)'' या विषयावर शोधप्रबंधाचे कार्य समाधानकारकरित्या पुर्ण केले आहे. प्रा.हशिम गुलाब वलांडकर यांनी माझ्या मार्गदर्शनखाली स्वतंत्ररित्या हा शोधप्रबंध लिहून तो इतर कोणत्याही अन्य परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

सदर प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. (अर्थशास्त्र) पदवी परीक्षेसाठी सादर करणेस माझो अनुमती आहे. सदर प्रबंध सामाजिकशास्त्र या अभ्यासक्षेत्रात समाविष्ट होतो.

दिनांक 16/02/2015

मार्गदर्शक

प्रा.डॉ.एम.एन.शिंदे

प्रपाठक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख

कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, इस्लामपूर

Mob - 9890114896

ऋणनिर्देश

प्रस्तुत शोध प्रबंध पुर्ण करण्यासाठी मला मित्र, सहकारी व मान्यवरांचे मार्गदर्शन व सहाय्य लाभले त्या सवाचे आभार मानणे मी माझे कर्त्तव्य समजतो.

माझे मार्गदर्शक प्रा.डॉ.एम.एन.शिंदे यांचे मी मनापासून आभार मानतो कारण संशोधन विषयाची निवड केल्यापासून संशोधनाशी संबधित घटक अभ्यासण्यासाठी त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. सांगली व सातारा जिल्ह्यातील अभ्यास घटकांशी संबधित ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देण्यासाठी माझ्या बरोबर आले. संशोधनात गुणात्मक व दर्जात्मक पातळी निर्माण करण्यासाठी मला सतत प्रेरणा व मार्गदर्शन मोलाचे ठरले.

तसे पाहिले तर संशोधनाचे कार्य अत्यंत अवघड असते. या कार्यात असंख्य लोकांच्या सहकार्या शिवाय वास्तव माहिती सांख्यिकिय आकडवारी उपलब्ध होऊशक्त नाही. सांगली जिल्हा व सातारा जिल्हा परिषदे मधील आरोग्य विभाग, महिला व बालकल्याण विभागामधील अधिकाऱ्यांनी मला वेळावेळी माहिती दिली त्यामुळे त्याचे आभार, या शिवाय विविध महाविद्यालयातील ग्रंथपाल मित्रांनी संशोधनाशी सबंधित अहवाल, पुस्तके मला उपलब्ध करुन दिली.आमच्या महाविद्यालयाचे माजी प्राचार्य एस.आर.शिंदे व प्रभारी प्राचार्या डॉ.सुषमा नायकवडी यांनी ही वरचेवर संशोधनासाठी सहकार्य केले. महाविद्यालयातील सर्वच सहकाऱ्यांनी मला संशोधनासाठी प्रेरणा दिली त्याचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. हुतात्मा शिक्षण व उद्योग समुहातील सर्वाचेच मला सहकाय मिळाले. मात्र हुतात्मा इंन्स्टीट्यूट ऑफ नर्सिंग मधील माझ्या सर्व सहकाऱ्यांनी केलेली मदत मी विसरु शकत नाही.

हुतात्मा शिक्षण व उद्योग समुहाचे मार्गदर्शक मा.वैभव नायकवडी यांनी माझ्या संपूर्ण संशोधन कार्यात मला मदत व सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. सांगली जिल्ह्यातील अर्थशास्त्र विषयातील माझ्या मित्रांनी केलेली मदत ही अनमोल आहे.

संशोधन कार्यासाठीची संगणकोय अक्षरजुळणी माझे मित्र श्री.शिवाजी पवार व श्री.प्रवीण कांबळे यांनी उत्कृष्ट व वेळवर टायपिंगचे काम करुन दिले. मी संशोधन कार्याला सुरुवात केल्या पासून मला सहकाय व मार्गदर्शन करणारे टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.प्रवीण जाधव व त्यांचे सहकारो यांचे वरचेवर मोलाचे सहकार्य लाभले.

या संशोधन कार्यात शब्दांना व्याकरणदृष्ट्या समृध्द बनवणारे प्रा.आर.एन.मुल्ला तसेच माझ्या संशोधन कार्यात उत्साहाने सामील असणारी माझी पत्नी सौ.जहिदा व कन्या कु.हिना, कु.सिमरण तसेच माझ्या संशोधनाची आस असणारे माझे बंधू श्री.शमशुद्दीन, काशीम व डॉ.मन्सुर वलांडकर यांच्या प्रेरणा मला मोलाच्या ठरल्या तसेच या संपूर्ण संशोधन कार्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या मला ज्यांनी मदत केली त्या सवांचा मी आभारी आहे.

स्थळ - वाळवा

दिनांक 16/02/2015

अनुक्रमाणिका

प्रकरण	शिर्षक	पान नं.
	प्रतिज्ञापत्र	II
	प्रमाणपत्र	III
	ऋणनिर्देश	IV-V
	अनुक्रमाणिका	VI
	तक्त्यांची यादी	VII-IX
	आलेखांची यादी	X
	नकाशाची यादी	XI
प्रकरण 1	प्रस्तावना	**1–124**
प्रकरण 2	सांगली व सातारा जिल्ह्यांची भौगोलिक वैशिष्ट्ये	**125–159**
प्रकरण 3	संदर्भ साहित्याचा आढावा	**160–213**
प्रकरण 4	मानव विकासाचे मुलभूत निर्देशांकाचा कल	**214–241**
प्रकरण 5	आरोग्य विषयक सोयींची उपलब्धता	**242–280**
प्रकरण 6	दारिद्र्य निर्देशांक व वंचन निर्देशांक	**281–302**
प्रकरण 7	निष्कर्ष व शिफारशी	**303–317**
	संदर्भग्रंथ सुची	**318–325**

तक्त्यांची यादी

तक्ता क्र.	तक्त्यांचे नांव	पान नं.
तक्ता क्र. 1.1	भारताच्या मानव विकास निर्देशांकाच्या वाढीचा कल	15
तक्ता क्र. 1.2	मानव विकास अहवाल मध्ये वापरलेले निर्देशांक व त्यातील बदल	16
तक्ता क्र. 1.3	भारतातील काही निवडक राज्यांचे मानव विकास निर्देशांक (1981 ते 2011)	17
तक्ता क्र. 1.4	आरोग्य निदशांक व राज्याची सद्यःस्थिती	74
तक्ता क्र. 1.5	सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम - 2012	77
तक्ता क्र. 1.6	लोकसंख्या तपशील	94
तक्ता क्र. 1.7	जलस्वराज्य योजनेची जून 2011 पर्यंतची प्रगती	110
तक्ता क्र. 2.1	तृणधान्य व निरनिराळ्या पीकाखालील क्षेत्र	135
तक्ता क्र. 2.2	कडधान्य पीकाखालील क्षेत्र	136
तक्ता क्र. 2.3	नगदी पीकाखालील क्षेत्र	137
तक्ता क्र. 2.4	विविध पीकाखालील क्षेत्र व उत्पादन	138
तक्ता क्र. 2.5	लोकसंख्या, साक्षरता व स्त्री-पुरुष प्रमाण	140
तक्ता क्र. 2.6	प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षणातील शाळा, विद्यार्थी संख्या	143
तक्ता क्र. 2.7	सातारा जिल्ह्यातील लागवडी खालील क्षेत्र व सिंचना बाबत माहिती.	152
तक्ता क्र. 2.8	जिल्ह्यातील पिकाखालील क्षेत्र व टक्केवारी	152
तक्ता क्र. 2.9	तालुकावार पिकाखालील प्रत्यक्ष क्षेत्र व ओलिता खालील क्षेत्र	153
तक्ता क्र.2.10	सातारा जिल्ह्यातील तालुका निहाय रेड, ऑरेंज व ग्रीन सार्वाजनिक कारखाने	157
तक्ता क्र.2.11	निरनिराळ्या उद्योगातील रोजगार बाबतची माहिती	158
तक्ता क्र.2.12	प्राथमिक माध्यमिक व उच्च शिक्षणातील शिक्षक विद्यार्थी व शाळांची संख्या	159
तक्ता क्र. 4.1	भारत व महाराष्ट्र लोकसंख्या वाढीचा कल	214
तक्ता क्र 4.2	सांगली व सातारा जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीचा कल	216
तक्ता क्र. 4.3	सांगली व सातारा जिल्ह्यातील साक्षरता	218
तक्ता क्र. 4.4	सांगली व सातारा जिल्ह्यातील स्त्री-पुरुष साक्षरता प्रमाण	219
तक्ता क्र. 4.5	भारत, महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यातील स्त्री-पुरुष प्रमाण (1991 ते 2011)	221

तक्ता क्र. 4.6	भारत, महाराष्ट्रराज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील एकूण उत्पन्न वाढीचा कल	223
तक्ता क्र. 4.7	भारत,महाराष्ट्र राज्य,सांगली व सातारा जिल्ह्याच्या दरडोई उत्पन्न वाढीचा कल(1991 ते 2011)	225
तक्ता क्र. 4.8	भारत व महाराष्ट्रतील लोकांचे सरासरी आयुर्मान	228
तक्ता क्र. 4.9	भारत, महाराष्ट्र सांगली व सातारा जिल्ह्यातील प्रौढ साक्षरता दर	230
तक्ता क्र.4.10	सांगली व सातारा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची विविध स्तरातील विद्यार्थ्यी पटसंख्या	233
तक्ता क्र. 4.11	भारत, महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यातील एकूण शहरी लोकसंख्या वाढीचा कल	236
तक्ता क्र. 4.12	सांगली व सातारा जिल्ह्यातील शहरी लोकसंख्येची घनता	239
तक्ता क्र. 4.13	सांगली व सातारा जिल्ह्यातील शिक्षणावरील खर्च	241
तक्ता क्र. 5.1	सांगली व सातारा जिल्ह्यातील आरोग्य सोई व सुविधांचो उपलब्धता (1991 ते 2011)	244
तक्ता क्र. 5.2	जन्मदर व मृत्यूदर 1991 ते 2011	247
तक्ता क्र. 5.3	भारत, महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदर	249
तक्ता क्र. 5.4	सांगली व सातारा जिल्ह्यातील मातांचा मृत्यूदर	251
तक्ता क्र. 5.5	सांगली व सातारा जिल्ह्यातील कुपोषित बालकांचे प्रमाण	252
तक्ता क्र. 5.6	सांगली व सातारा जिल्ह्यातील आरोग्य विषयक सोयींची उपलब्धता	254
तक्ता क्र. 5.7	सांगलो व सातारा जिल्ह्यात आरोग्य सेवांवरील खर्च	256
तक्ता क्र. 5.8	सांगली व सातारा जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता (2011-12)	257
तक्ता क्र. 5.9	सांगली व सातारा जिल्ह्याचा शैक्षणिक निर्देशांक	265
तक्ता क्र. 5.10	सांगली व सातारा जिल्ह्याचा उत्पन्न निर्देशांक	269
तक्ता क्र. 5.11	सांगली व सातारा जिल्ह्याचा आयुर्मान निर्देशांक	273
तक्ता क्र. 5.12	सांगली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक	275
तक्ता क्र. 5.13	सातारा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक	276
तक्ता क्र. 5.14	सांगली व सातारा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक तुलना 1991 ते 2011	277
तक्ता क्र. 5.15	महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील आर्थिक विकास व मानवी विकास	280
तक्ता क्र. 6.1	महाराष्ट्र सांगली व सातारा जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या	282
तक्ता क्र. 6.2	महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील प्रौढ निरक्षरता	283
तक्ता क्र 6.3	महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील स्त्री-पुरुष निरक्षरता (1991 ते 2011)	285
तक्ता क्र. 6.4	सांगली व सातारा जिल्ह्यातील विद्यार्थ्याचे गळतीचे प्रमाण (2011-12)	287

तक्ता क्र. 6.5	सांगली व सातारा जिल्ह्यातील विविध वर्गातील मुलां-मुलींच गुणोत्तर (2011-12)	290
तक्ता क्र. 6.6	महाराष्ट्र राज्य सांगली व सातारा जिल्ह्यातील कुपोषित बालकांचे प्रमाण.	291
तक्ता क्र. 6.7	सांगली व सातारा जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदर	292
तक्ता क्र. 6.8	सांगली व सातारा जिल्ह्यातील दारिद्य रेषेखालील बेघर कुटुंबे (2012)	293
तक्ता क्र. 6.9	पिण्याच्या पाण्याच्या सोयीपासून वंचित (लोकसंख्या) गावे व वाड्या	295
तक्ता क्र. 6.10	सांगली व सातारा जिल्ह्यातील ग्रामीण भागात शौचालयाची सोय नसलेली कुटुंबे	296
तक्ता क्र. 6.11	भारत, महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील मानव विकासाचा कल	297
तक्ता क्र. 6.12	महाराष्ट्र राज्य,सांगली व सातारा जिल्ह्यांच्या मानव विकासाचे भारताच्या मानव विकासाशी गुणोत्तर	297
तक्ता क्र. 6.13	महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यांच्या मानव विकासाची तुलना	299
तक्ता क्र. 6.14	सांगली व सातारा जिल्ह्यांच्या मानव विकासाची तौलनिक स्थिती	300

आलेखांची यादी

आकृती क्र.	आकृतीचे नांव	पान
आकती क्र. 4.1	भारत व महाराष्ट्रातील लोकसंख्या वाढीचा दर (1991-2011)	215
आकृती क्र. 4.2	सांगली व सातारा जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीचा दर (1991-2011)	217
आकृती क्र. 4.3	सांगली व सातारा जिल्ह्यातील साक्षरता वाढीचा दर (1991-2011)	218
आकृती क्र. 4.4	सांगली व सातारा जिल्ह्यातील स्त्री-पुरुष साक्षरता दर (1991 ते 2011)	220
आकृती क्र. 4.5	1991 ते 2011 या काळातील भारत, महाराष्ट्र राज्य व सांगली व सातारा जिल्ह्यातील स्त्री-पुरुष प्रमाण वाढीचा दर	222
आकृती क्र. 4.6	भारत,महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न वाढीचा कल (1991 ते 2011)	227
आकृती क्र. 4.7	भारत व महाराष्ट्र राज्यातील सरासरी आयुर्मान	229
आकृती क्र. 4.8	सन 1991 ते 2011 कालावधीत शहरीकरणाचा कल	238
आकृती क्र. 4.9	सांगली व सातारा शहरी जिल्ह्यातील शहरी लोकसंख्या घनता वाढीचा दर	240
आकृती क्र. 5.1	भारत, महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदर	251
आकृती क्र. 5.2	सांगली व सातारा जिल्ह्यातील कुपोषण दरातील प्रत्यक्ष घट	253
आकृती क्र. 5.3	सांगली व सातारा जिल्ह्यातील प्रती लाख लोकसंख्येमागील खाटा व आरोग्य केंद्रांची उपलब्धता	255
आकृती क्र. 5.4	पिण्याच्या पाण्याची उपलब्धता असणारी गांवे, वाड्या व वस्त्या	259
आकृती क्र. 5.5	सांगली व सातारा जिल्ह्यांची शैक्षणिक निर्देशांक तुलनात्मक स्थिती	266
आकृती क्र. 5.6	सांगली व सातारा जिल्ह्याचा उत्पन्न निर्देशांक	270
आकृती क्र. 5.7	सागली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक	275
आकृती क्र. 5.8	सातारा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक	277
आकृती क्र. 5.9	सांगली व सातारा जिल्ह्याच्या मानव विकासाची तुलना	279
आकृती क्र. 6.1	महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील प्रौढ निरक्षरता (1991 ते 2011)	284
आकृती क्र. 6.2	सांगली व सातारा जिल्ह्यातील बेघर कुटुंबाचे प्रमाण	294
आकृती क्र. 6.3	सांगली व सातारा जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाईग्रस्त गावे व वाड्यांची तौलनिक स्थिती	296
आकृती क्र. 6.4	भारत,महाराष्ट्र राज्य,सांगली व सातारा जिल्हयांचा मानव विकासाची तौलोनिक स्थिती	301

नकाशाची यादी

नकाशाचे क्र.	नकाशाचे नांव	पान नं.
1	महाराष्ट्र राज्य	2A
2	सांगली जिल्हा	125
3	सातारा जिल्हा	144

अर्पण पत्रिका

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील थोर क्रांतिकारक, प्रतिसरकारच्या तुफान सेनेचे सेनापती व स्वातंत्र्यानंतर समाजातील दीन, दलित, गोरगरीब, उपेक्षित, धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त यांच्या हक्कासाठी व सुखासाठी ज्यांनी विविध सामाजिक चळवळी केल्या ते **थोर स्वातंत्र्य सैनिक पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथ आण्णा नायकवडी** यांना व त्यांच्या कार्याचा वारसा पुढे अखंडित चालवणारे, हुतात्मा शिक्षण व उद्योग समुहाचे नेते **मा.वैभव (काका) नायकवडी** यांना

व

ज्यांनी आयुष्यभर कष्ट व सत्याचा मार्ग अवलंबून मला घडवले व या उंचीपर्यंत नेऊन ठेवले ती माझी माऊली **मासायबी वलांडकर** व माझे वडील **गुलाव वलांडकर**

यांना माझा शोध प्रबंध मी

सविनय अर्पण करतो.

****

प्रकरण 1 प्रस्तावना

	पान नं.
1.0 प्रस्तावना	1
1.1 लिंगाधारीत विकास निर्देशांक	9
1.2 मानवी दारिद्र्य निर्देशांक	11
1.3 मानवी विकास वंचन निर्देशांक	13
1.4 भारतातील मानवी विकास निर्देशांक	16
1.5 भारतातील मानव विकास विषयक धोरणे	18
1.6 एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम	20
1.7 वीस कलमी कार्यक्रम	21
1.8 सुवर्ण जयंती ग्राम स्वराज्य योजना	24
1.9 ग्रामीण युवकांना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण	25
1.10 ग्रामीण भागातील महिला व बालकांचा विकास	25
1.11 ग्रामीण कारांगीरासाठी योजना	25
1.12 गंगा कल्याण योजना	26
1.13 भारत सरकारचे शिक्षण विषयक धोरण	26

1.14 राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1968	27
1.15 राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986	27
1.16 सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1992	28
1.17 राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2001	29
1.18 शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपाययोजना	30
1.19 भारत सरकारच्या रोजगार निर्मितीच्या योजना.	34
1.20 ग्रामीण गृहनिर्माण	38
1.21 दळवळण	38
1.22 जलमार्ग	40
1.23 हवाईमार्ग	40
1.24 टपालसेवा	41
1.25 दूरसंचार	41
1.26 ग्रामीण पेयजल पुरवठा व स्वच्छता	43
1.27 ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम	45
1.28 केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम	45
1.29 शालेय स्वच्छता व वैयक्तिक स्वच्छता शिक्षण	45
1.30 निर्मल ग्राम पुरस्कार	46

1.31 भारताचे ग्रामीण विदयुतीकरण	46
1.32 केंद्रशासनाच्या कल्याणकारी योजना	49
1.33 इंदिरा आवास योजना	50
1.34 केंद्र शासनाच्या इतर गृहनिर्माण योजना	50
1.35 भारतातील सार्वजनिक आरोग्य विषयक धोरण	51
1.36 राष्ट्रीय रोगनियंत्रक कार्यक्रम	52
1.37 लोकसंख्या विषयक धोरण	58
1.38 राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान	59
1.39 भारत निर्माण योजना	59
1.40 ग्रामीण विकास योजना व कार्यक्रम	60
1.41 महाराष्ट्राचे मानव विकासविषयक धोरण	61
1.42 प्रौढ शिक्षण	66
1.43 आदिवासींसाठी शैक्षणिक सुविधा	67
1.44 नवोदय विद्यालय	68
1.45 माहिती तंत्रज्ञान आणि शिक्षण	69
1.46 शिक्षण सेवक योजना	69
1.47 कला शिक्षण	69
1.48 शैक्षणिक विकासासाठी महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वपूर्ण योजना	69

1.49 शिक्षण विकास निर्देशांक	73
1.50 सार्वजनिक आरोग्य	73
1.51 विविध आरोग्य योजना	74
1.52 राष्ट्रीय रोगनियंत्रण कार्यक्रम	75
1.53 महाराष्ट्रातील आधारभूत संरचना	80
1.54 रेल्वे वाहतूक	84
1.55 जल वाहतूक	86
1.56 महाराष्ट्रातील हवाई वाहतूक विषयक धोरण	87
1.57 टपाल सेवा	88
1.58 दूरध्वनी सेवा	88
1.59 इंटरनेट	89
1.60 आकाशवाणी	89
1.61 दूरदर्शन	89
1.62 दैनिके व नियतकालिके	90
1.63 राज्य शासनाचे महिला व बालविकास धोरण	90
1.64 महाराष्ट्राची लोकसंख्या व लोकसंख्या धोरण	94
1.65 महाराष्ट्रातील रोजगारासंबंधी धोरण	100
1.66 महाराष्ट्र शासन सामाजिक विकास योजना	104
1.67 ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम–	106

1.68 पाणीपुरवठा	**108**
1.69 पर्यावरण संवर्धन	**111**
1.70 वायू प्रदूषण	**111**
1.71 जल प्रदूषण	**112**
1.72 ध्वनी प्रदूषण	**112**
1.73 जमिनीचे प्रदूषण	**113**
1.74 घातक कचरा	**113**
1.75 वातावरण बदल	**115**
1.76 संशोधन समस्या : (Statement of the Problem**)**	**117**
1.77 अभ्यासाची उद्दिष्ट्ये : (Objectives of the Study**)**	**117**
1.78 गृहीतके : (Hypothesis**)**	**118**
1.79 अभ्यास विषयाचे महत्त्व (Rationale of the Study**)**	**118**
1.80 संशोधन पध्दती : (Research Methodology**)**	**119**
1.81 तथ्य संकलन व विश्लेषण : (Data Collection & analysis **)**	**119**
1.82 व्याप्ती व मर्यादा : (Scope & Limitation of the Study**)**	**120**
1.83 सैध्दांतिक पार्श्वभूमी : (Theoretical Frame Work**)**	**121**
1.84 प्रकरण नियोजन (Chapter Scheme**)**	**121**

प्रकरण 1

प्रस्तावना

1.0 प्रस्तावना

कोणत्याही विकासाचा केंद्रबिंदू हा मानव असतो. हा विचार आता जगभर सर्वांना मान्य झाला आहे. कोणत्याही देशाच्या भौतिक, आर्थिक, सामाजिक, राजकोय व आध्यात्मिक प्रगतोचा अंतोम लाभार्थी माणूसच असतो. त्यामुळे मानवी विकासाची संकल्पना पुढे आली आहे. मानवी विकास म्हणजे मानवी भांडवल अथवा मानवी साधन संपत्तीचा विकास होय. देशाचा आर्थिक विकास व मानवी साधनसंपत्तीचा विकास या दोहोत ''धन'' सहसंबंध अवलंबून असतो. त्यामुळेच आर्थिक विकास हा देशातील मानवी भांडवलाच्या विकासावर अवलंबून असतो. हे सत्य शोधले गेले तर जपान, स्विट्झलड या सारख्या देशांनी मानवी विकासाच्या प्रगतीवर देशाचा वेगवान आर्थिक विकास करुन जगाला दाखवला.

देशाच्या आर्थिक विकासाने मानवाचा विकास साधला गेला तरच आर्थिक प्रगती फलदायी झाली असे मानता येते. समजा एखादा देश आर्थिकदृष्ट्या संपन्न असूनही समाजाच्या तळागाळातील लोक अत्यंत गरीब व हलाखीचे जीवन जगत असतील तर आर्थिक विकास झाला ही केवळ भ्रामक कल्पनाच वाटेल. हा विचार डोळ्यासमोर ठेवून 1955 पासून ''संयुक्त राष्ट्र संघाच्या विकास कार्यक्रमांतर्गत'' सदस्य राष्ट्रांसाठी प्रतिवर्षी मानव विकास अहवाल प्रसिध्द केला जातो. पुढे युनोच्या महासभेने विकास कार्यक्रम संघटनेची स्थापना 1965 साली केली. त्यालाच (United Nations Development) असे म्हणतात या संघटनेचे मुख्य ऑफिस न्यूयार्क येथे आहे. या संघटनेचा उद्देश

1) मानवी विकासाचा सर्वसाधारण दर्जा प्रस्थापित करणे. 2) दारिद्र्य निर्मुलन करणे.

यु.एन.डी.पी. युनोच्या महासभेस जबाबदार असून तिच्या कार्यक्रमासंबंधीचे सर्व अहवाल युनोच्या ''आर्थिक व सामाजिक समिती माफत'' युनोच्या महासभेकडे पाठवले जातात. 'विकास कार्यक्रम संघटनेचे' कार्यकारी मंडळ हे जागतिक विविध सभासद देश व खंडातून निवडले जाते.

उदा.-आफिका खंडातून 8, आशिया खंडातून 7, पूर्व युरोपातून 4, लॅटिन अमेरिका व कॅरेबियन द्विपसमुहातून 5 आणि पश्चिम युरोप व अन्य देश येथून 12 असे एकूण 36 सभासद असतात.

जगातील सर्व विकसनशोल देशांमध्ये वेगाने आर्थिक विकास साधने व लोकांचा राहणीमानाचा दर्जा उंचावणे हे महत्वाचे कार्यक्रम या संघटनेच्या माध्यमातून 150 देशामध्ये व 40 आंतरराष्ट्रीय संस्थामध्ये राबविले जातात. यु.एन.डी.पी.च्या मध्यवर्ती निधी पैकी 87% निधी ज्या देशांचे दरडोई उत्पन्न 750 अमेरिकन डॉलर पेक्षा कमी आहे. अशा कमी उत्पन्न गटातील राष्ट्रांमध्ये राबवल्या जाणाऱ्या मानवी विकास कार्यक्रमासाठी दिला जातो. मात्र हा निधी रोख पशात न देता आंतरराष्ट्रीय किर्तीचे तज्ज्ञ लोकांचे ज्ञान, त्यांचा सल्ला, साधने आणि प्रगत शिक्षणासाठी विविध शिष्यवृत्त्यांच्या स्वरुपात देतात.

विकसनशोल व मागास देशांचा विकास व आर्थिक वृध्दीची संकल्पना मांडताना अनेक अर्थतज्ज्ञांनी विकासाच्या विविध घटकांबरोबरच आर्थिक विकास व मानवी भांडवल या घटकातील संबंधाचा शोध अनेक तज्ज्ञांनी घेतला, त्यामध्ये टी.डब्ल्यू शुल्झ, हरबिन्सन, डेनिसन, केन्ड्रीक, ॲब्रामोव्हीज, बेकर, बामन, ब्रुगर, कुन्ट, ग्रालवेथ, ॲर्थर लेवीस, मॅकलेलॅन्ड वगैरेंचा समावेश होतो. इतकेच नव्हेतर ॲडाम स्मिथ, व्हेबलेन, मार्शल यांनी देखील उत्पादनाच्या क्रियेतील मानवी भांडवलाचे महत्त्व विशद केले. मार्शल यांनी 1773 साली The Wealth of Nation "राष्ट्राचीसंपत्ती" या पुस्तकात निसर्गत : प्रत्येक व्यक्तीला स्वत:चे हित समजते. हिच मानवाजवळची निसर्ग शक्ती होय. पूर्ण स्पर्धा यांच्यामळे राष्ट्रीय संपत्तीत वाढ होत जाते. त्यांनी श्रमविभागणीला महत्त्व दिले, श्रमविभागणीमूळे श्रमिकांच्या उत्पादक शक्तीत मोठ्या प्रमाणात सुधारणा घडून येते. उच्च तंत्रज्ञानामूळे मानवी विकासाला चालना मिळते म्हणजे स्मिथ यांनी मानवाच्या अर्जित व उपयुक्त क्षमतांचा समावेश राष्ट्राच्या स्थिर भांडवलात केला.

मार्शल यांनी ''शिक्षण म्हणजे राष्ट्रीय गुंतवणूक असे सांगून मनुष्यातील गुंतवणूकोला सर्वात जास्त मौल्यवान भांडवल असे म्हंटले.'' तर जोसेफ शुंपीटर यांनी The Theory of Economic Development 1911 या पुस्तकात नव उपक्रमशिलता व नव प्रवर्तकाची भूमिका आर्थिक विकासाला

चालना देणारी असते. संयोजक भांडवलाच्या योग्य वापराचे संकेत देतो. म्हणजे मानवो भांडवलाचा विकास झाला तरच नवप्रवर्तक तयार होतात. म्हणजेच अर्थव्यवस्थेच्या विकासाला चालना मिळते. म्हणून प्रत्येक देशाने धाडसी संयोजक नवप्रवर्तक घडवावेत असा विचार मांडला तर प्रा. ऑर्थर लेविस यांनी 1954 मध्ये Economic Development With Unlimited Supplies of Labour या पुस्तकात 'अमर्यादित श्रम पुरवठ्याचा' सिध्दांत मांडला त्यांच्यामते अविकसित देशांनी उपलब्ध असणाऱ्या अतिरिक्त श्रमशक्तीच्या सहाय्याने आर्थिक विकास साधला पाहिजे अर्थव्यवस्थेतील भांडवली क्षेत्र व निर्वाह क्षेत्र यांच्यात योग्य समन्वय घडवून निर्वाहक्षेत्रातील लोकांना भांडवली क्षेत्रात रोजगार उपलब्ध करुन दिला पाहिजे म्हणजे विकास प्रक्रिया गतिमान होते. अर्थतज्ज्ञ गॉझमन आणि हेल्थमन यांच्यामते बौध्दीक भांडवलाच्या जोरावर तंत्र वैज्ञानिक प्रगती साधली जाते. त्यामुळे कोणत्याही देशाचा आर्थिक विकास त्या देशातील भांडवल व मानवी संसाधनावर अवलंबून असतो तर भांडवल संचय लोकांच्या उत्पन्नावर अवलंबून असतो. थोडक्यात आर्थिक विकास हा तांत्रिक प्रगती, बौध्दीक भांडवल, शिक्षण व संशोधन यांच्यावर अवलंबून असता.

अर्थतज्ज्ञ कैन्ड्रिन व डेनिसन या सारख्या शास्त्रज्ञांनी आर्थिक विकासाची गती वाढवण्यासाठी व्यापक व गुणवत्तापूर्ण शिक्षणाला महत्त्व दिले व त्याचा परिणाम श्रमशक्तीत गुणवत्ता वाढली तरच आर्थिक वृध्दो शक्य आहे. कारण उत्पादकता वाढ ही आर्थिक विकासासाठी आवश्यक बाब मानली गेली. अर्थतज्ज्ञ हिक्स नॉरमन व पॉल स्ट्रीटन यांनी आर्थिक विकासाचे मापन करताना राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न व आर्थिक कल्याण मोजताना अडचणी येतात असे सांगीतले, म्हणून अर्थतज्ज्ञ हॅजेन व मॉरिस मायेर यांनी ''सामाजिक निर्देशांकाची पध्दत'' सांगितली. यामध्ये विकासाची गुणात्मक बाजू विचारात घेतली. लोकांचे आरोग्य, अन्न, तांत्रिक शिक्षण, साक्षरता, कपडेलत्ते, निवाऱ्याची सोय, खेळ, सामाजिक सुरक्षितता सोयी इत्यादी निर्देशांकाचा यात समावेश केला. ही पध्दत मानवी विकासाच्या अंतिम ध्येयाशी संबंधीत असल्याने अधिक श्रेष्ठ मानली जाते. आर्थिक धोरणाची कार्यवाही करताना

सामाजिक निर्देशांक गाठले गेले तरच देशाचा आर्थिक विकास झाला असे म्हणता येईल. यासाठी अर्थतज्ज्ञ हिक्स व स्ट्रिटन यांनी सहा प्रमख निर्देशांक सांगितले आहेत.

1) आरोग्य निर्देशांक 2) स्वच्छता निर्देशांक 3) अन्न निर्देशांक
4) पाणी पुरवठा निर्देशांक 5) शैक्षणिक निर्देशांक 6) निवास निर्देशांक

यांच्या सहाय्याने या सिध्दांतात मानवी विकास व त्यातून देशाचा आर्थिक विकास साध्य करण्याला जास्त महत्त्व दिल.

19 व्या शतकाच्या मध्यात आर्थिक विकासाचे मोजमाप संख्यात्मक (Quantitative Indicators) केले जात होते. म्हणजे दुसऱ्या महायुध्दानंतर सर्वच देश आर्थिक विकासाची प्रक्रिया राबवत असताना ज्या संकल्पना वापरत होते त्या आर्थिक वृध्दीशी निगडीत होत्या, 1970 मध्ये युनोच्या सामाजिक संशोधन विभागाने आर्थिक विकासाच्या निर्देशांकाची माहिती प्रसिध्द केली त्यावेळी पारंपारिक ''झिरप'' सिध्दांत (Percolation Theory) महत्त्वाचा मानला जात होता. आर्थिक विकासाचा हा पारंपारिक दृष्टीकोन असे गहीत धरतो की, देशाचा उच्च आर्थिक विकास समाजात पाझरत जावून त्याचे फायदे समाजातील गरीब लोकांना होवून त्यांचे उत्पन्न व राहणीमानात सुधारणा घडून येते.

युनोच्या अहवालानुसार विकसीत देशातील आर्थिक वृध्दीचा दर मोठा असल्याने त्यांचा जलद आर्थिक विकास घडून येत होता, परंतु जलद आर्थिक विकासाबरोबरच त्या देशात आर्थिक विषमता देखील मोठ्या प्रमाणात वाढत होती. याकडे अनेक विचारवंतांचे लक्ष वेधले गेले ''क्लब ऑफ रोम '' मधील सामाजिक संशोधकांनी विकास निर्देशांक संकल्पनेला विरोध केला. त्यांच्या मते उच्च दर्जाचा आर्थिक विकास व एकटी बाजार व्यवस्था समतोल आर्थिक विकास व मानवी विकास घडवून आणेल हे चुकीचे आहे. आजच्या काळात अनेक देशांचा आर्थिक विकास वेगाने घडून आला आहे परंतु मानवी विकासाच्या वास्तव निर्देशांकाचा विचार करता विकसनशील देशातील आर्थिक विकासाची प्रक्रिया अपयशी झाल्यासारखी वाटते. कारण या देशांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक प्रगती साध्य केली आहे. परंतु हा आर्थिक विकास समतोल नाही तर तो विषम आहे हे दाखवून दिले.

पाकिस्तान या देशाचे अर्थतज्ज्ञ महबुब-ऊल हक यांनी 1976 साली The Poverty Curtain Choices for The Third World या पुस्तकात पारंपारिक झिरप सिध्दांताच्या विचाराला विरोध करुन मानवी विकासाची सैध्दांतिक मांडणी केली आहे. देशाच्या विकासाच्या मोजमापासाठी स्थूल राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पादन यांच्या सहाय्याने विकास मोजल्याने विकासात असमतोलपणा जाणवू लागला. विकासाबरोबर दारिद्र्य, बेकारी, नैसगिक साधन संपत्तीचा अतिरिक्त वापर, पर्यावरणातील असमतोल, मानवाच्या मुलभूत गरजा पूर्ण न होणे या सर्वांवर वाईट परिणाम झाला. यावर पर्याय शोधताना महबुब-ऊल हक यांनी असे विचार मांडले की, मानवी विकास म्हणजे ''लोकांच्या निवडी विस्तारण्याची प्रक्रिया होय'' तत्वत: या निवडी अमर्याद व कालानुरुप बदलणाऱ्या आहेत. मात्र विकासाच्या प्रत्येक पातळीवर शिक्षण, आरोग्यदायी दोर्घायुष्य जीवन जगणे व चांगल्या जीवनमानासाठी चांगले राहणीमान या सर्व निवडी उपलब्ध असतील तर मानवी विकासाला चालना मिळून देशाचा विकास घडून येता''.

महबुब-ऊल हक म्हणतात, 'आर्थिक विकासामुळे देशातील मानवी विकास आपोआप घडून येईल' हे म्हणण चुकीचे आहे. कारण आर्थिक विकास व मानवी विकासात स्वयंचलित/आपोआप (Automatic) बदल घडवून आणणारी कडी अथवा दुवा नाही. तर आर्थिक विकास व वाढ ही मानवी विकासासाठी आवश्यक बाब आहे. परंतु ती पुरेशी अट नाही त्यासाठी त्यांनी सरकारच्या हस्तक्षेपाची आवश्यकता प्रतिपादन केली. मानवी भांडवलात गुंतवणूक करावी असे म्हंटले. म्हणजे मानवी विकास ही संकल्पना आर्थिक वृध्दी व आर्थिक विकास या संकल्पनापेक्षा अधिक व्यापक असल्याचे स्पष्ट होते.

महबुब-ऊल हक 2004 साली म्हणतात की,''मानवी विकासाचे प्रारुप हे विकासाचे सर्व समावेशक प्रतिमान आहे. यामध्ये आर्थिक वृध्दी, सामाजिक गुंतवणूक, लोकांचे सबलीकरण, मुलभूत गरजा आणि सुरक्षितता यांची तरतूद राजकीय आणि सांस्कृतीक स्वातंत्र्या बरोबरच मानवी जीवनाचे इतर सर्व पैलू की, ज्यांचा विकास होवू शकेल अशा सर्वांचा या प्रारुपात समावेश होतो.''

मात्र यासाठी सरकारचा हस्तक्षेप आवश्यक आहे. कारण मानवी विकास म्हणजे मानवी कल्याणात वाढ घडवून आणणारी प्रक्रिया होय. निरक्षरता, रोगराई, उच्च मृत्यूदर, झोपडपट्टी या सारख्या मानवी कल्याणावर प्रतिकूल परिणाम घडवून आणणाऱ्या समस्यांचे निर्मूलन करण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण, आरोग्य, रोजगार, सकस आहार इत्यादी सोयी व सुविधांच्या उपलब्धतेसाठी त्यावर होणारा खर्च हा मानवी भांडवलातील गुंतवणूक ठरतो. हा खर्च शासन संस्थेने करुन समाजाला वेगवेगळ्या सामाजिक सोयी उपलब्ध करुन देणे इष्ट ठरते. त्यामध्ये सामाजिक सुरक्षितता ही समाविष्ट असते. म्हणजे आर्थिक संकटाच्या काळात मनुष्याला संरक्षणाची हमी देणे होय. त्यासाठी मनुष्याला किमान उत्पन्नाची हमी देण्यासाठी दारिद्र्य निर्मूलन, शिक्षण, आरोग्य, रोजगार, संपत्तीचे वाटप इत्यादी सारख्या सोयी सुविधा सरकारने उपलब्ध करुन देण्याच्या धोरणाचा समावेश मानवी विकासात होतो. म्हणून सामाजिक सुरक्षिततेचा पाठपुरावा सामाजिक साधनांद्वारे व्हावा असे डॉ. अमर्त्य सेन यांनी म्हंटले आहे. आपल्या Collective choice and social welfare and poverty and femines या पुस्तकात अर्थशास्त्रात कल्याण विषयक नवीन संकल्पना सांगून सामाजिक निवड, दारिद्र्याचा निर्देशांक, दुष्काळाचे विश्लेषण, सामाजिक कल्याणात शासनाची भमिका व कल्याणाचे महत्तमीकरण या बाबत आपले विचार विविध पुस्तके, लेख व मुलाखतीमधून मांडले आहेत. त्यांच्या मते प्रत्येक व्यक्तीस किमान आवश्यक मुलभूत गरजा (अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण) प्राप्त झाल्यास कल्याण साधले जाते. मात्र या मुलभूत गरजांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष झाल्यास सामाजिक समतोल ढळतो व अर्थ व्यवस्थेत कल्याणाच्या विविध समस्या निर्माण होतात. दारिद्र्य व सामाजिक कल्याण यांचा जवळचा संबंध आहे. जेव्हा समाजातील जास्तीजास्त लोकांच्या किमान मलभूत गरजा पूर्ण होत नाहीत, तेंव्हा दारिद्र्याची निर्मिती होते व कल्याणात घट होते. म्हणून दारिद्र्य निर्मूलन करून सामाजिक कल्याणात वाढ करुन आणण्याचे महत्त्वाचे कार्य शासन संस्थेने केले पाहिजे त्यांच्या मते महत्तम सामाजिक कल्याणासाठी दरडोई उत्पन्न हा एकमेव मापदंड मानता येणार नाही. तर विविध क्षेत्रात उत्पन्न मिळविण्यासाठी व्यक्तीमध्ये आवश्यक अशी क्षमता निर्माण झाली पाहिजे त्यासाठी आरोग्य व शिक्षण यांची पुर्तता झाली

पाहिजे. तर poverty and femines या ग्रंथात विविध देशातील दुष्काळांचे अनुभवनिष्ठ विवेचन त्यांनी केले आहे. मानवावर सतत नैसर्गिक आपत्ती येतात. त्यावर उपाययोजना केल्या पाहिजेत, दुष्काळ पडला असता अन्नधान्याचा तुटवडा होतो, लोकांची उपासमार होते, जीवीतहानी होते. अमर्त्यसेन म्हणतात, की ''अन्नधान्याच्या टंचाईमुळे उपासमार होत नाही तर दुष्काळाच्या काळात गरीब लोक, दारिद्र्यातील लोक, मजूर या लोकांचा रोजगार बंद झाल्याने हातातील खरेदी शक्तीत होणारी घट ही उपासमारीला कारणीभूत असते''.

अमर्त्यसेन यांनी शिक्षण व मानवी भांडवलाचा विकास यांच्यातील धनात्मक सहसंबंधाबाबत भूमिका मांडली मानवी साधन संपत्तीचा विकास, शिक्षणाच्या प्रचार व प्रसारामुळे होता आणि मानवी साधनसंपत्तीच्या विकासामुळे राष्ट्राच्या आर्थिक विकासाला चालना मिळते. हे स्पष्ट केले. याचा अर्थ देशाच्या आर्थिक विकासाचे जे विविध घटक आहेत त्यामध्ये मानवी साधनसंपत्तीचा विकास हा देखील विकासाचा महत्त्वाचा घटक आहे म्हणजे, आर्थिक विकास हे मानवी विकासाचे फलन होय.

E D = f (H.D.) - E D = Economic Development
f = Function
H.D. = Human Dvevlopment

त्यामुळेच मानवी भाडवलाचा विकास घडवून आणणे महत्त्वाचे ठरते. सहाजिकच मानवी विकास म्हणजे, मनुष्याची कार्यक्षमता व उत्पादन क्षमता वाढवणे होय. असे मत मांडले.

महेबुब-ऊल हक व डॉ.अमर्त्यसेन या दोघांच्या आर्थिक विश्लेषणातून मानवी विकास निर्देशांकाची संकल्पना पुढे आली. युनोच्या सहकार्यातून सन 1990 मध्ये ती विकसीत करुन युनोचा अहवाल तयार केला गेला.

मानवी विकास निर्देशांकाची संकल्पना सर्व प्रथम पाकिस्तान देशातील अर्थतज्ज्ञ ''महबूब-उल-हक'' यांनी युनोच्यासहाय्याने सन 1990 मध्ये विकसित केली. त्यामध्ये त्यांनी मानवी विकास निर्देशांक व मानवी विकास अहवाल या संकल्पना मांडल्या त्या संकल्पना आर्थिक विकासाशी निगडीत आहेत. आर्थिक विकासाचे समान वाटप, सामाजिक न्याय व समता या तत्वांवर त्या आधारलेल्या

आहेत. सन 1990 चा मानवी विकास अहवाल प्रतिपादन करतो की, 'देशाचे लोक हीच देशाची खरी संपत्ती आहे.' त्यानंतर मानव विकासाच्या विविध संकल्पना प्रचलित झाल्या, उदा. मानव विकास निर्देशांक (HDI), लिंगाधारीत मानव विकास निर्देशांक (GHDI), मानवी दारिद्र्य निर्देशांक (HPI) वगैरे वरील मानवी विकास निर्देशांक स्त्री-पुरुष, विविध सामाजिक वर्ग, धार्मिक वर्ग, वांशिक वर्गातील असमानता दर्शवितात. मानवी विकास संकल्पनानी आर्थिक विकासाच्या विचारात मोठी भर घातली व आर्थिक विकास संकल्पना व्यापक असल्याचे दाखवून दिले. देशाचा आर्थिक विकास झाल्यास मानवी विकास देखील घडून येईल हा समज दुसऱ्या महायुध्दानंतरच्या आर्थिक विकास प्रक्रियेने खोटा ठरविला. दुसऱ्या महायुध्दानंतर जगातील अनेक देशांचा आर्थिक विकास घडून आला, परंतु त्याबरोबरच आर्थिक विषमता देखील वाढत गेली, त्यामुळे झिरप सिध्दांताला तडा गेला. 'महेबूब-उल-हक' यांनी या पारंपारिक विकास सिध्दांताला आव्हान दिले व प्रतिपादन केले की, आर्थिक विकास व मानवी विकास दोहोंत स्वयचलित साखळी नाही. आर्थिक विकासाबरोबरच मानवी विकास होईलच असे नव्हे. म्हणून सरकारने मानवी विकासाकडे लक्ष दिले पाहिजे. आपली साधन सामग्री मानवी विकासाकडे वळवून तिचा वापर कार्यक्षमतेने केला पाहिजे. थोडक्यात, लोकांच्या गरजा व इच्छांची पूर्तता हे आर्थिक विकासाचे केंद्रीभूत उद्दीष्ट असले पाहिजे. सन 1990 च्या मानव विकास अहवालाने तीन निर्देशक सांगितले. 1) आरोग्यदायी दीर्घायुष्य 2) शिक्षण 3) उच्च राहणीमान मनुष्याच्या या तोन आवश्यक गरजा होत. या गरजा पुर्ण न झाल्यास तो अनेक संधीपासून वंचित राहतो.

दीर्घायुष्यासाठी (आयुर्मान) जन्माला आल्यापासून मनुष्य किती वर्षे जगतो हा निकष सांगितला आहे. त्यामध्ये चांगले आरोग्य, पुरेसा व सकस आहार विचारात घेतला जातो. दीर्घायुष्य व आरोग्यदायी जीवनासाठी पुन्हा तीन घटक विचारात घेतले आहेत. 1) मृत्यूदर 2) बालमृत्यूदर (1 वर्षाखालील बालके) 3 ते 5 वर्षाखालील मुलांमधील मृत्यूदर. तसेच आरोग्य सोयींची उपलब्धता, ज्यामुळे विविध प्रकारच्या रोगांचे नियंत्रण करता येते. या घटकांवर दीर्घ व आरोग्यदायी जीवन अवलंबून आहे. शिक्षणासाठी प्रौढ साक्षरता दर आणि प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणातील पटावर नोंद असलेली विद्यार्थी संख्या

निकष सांगितला आहे. तर उच्च राहणीमानासाठी दरडोई देशातंर्गत उत्पादन (अमेरिकन डॉलरच्या संदर्भात) मान्य करण्यात आला आहे. वरील तीन निकष दीर्घायुष्य (आयुर्मान), शिक्षण व उच्च राहणीमान विचारात घेऊन अल्प, मध्यम व उच्च मानव विकास निर्देशांक ठरविला जातो. या तीन घटकांना समान भारांक देऊन एकत्रित मानवी विकास निर्देशांक काढला जातो. अशा रितीने आयुर्मान शिक्षण व उत्पन्न हे तीन मानवी विकास मापनाचे महत्त्वाचे निकष मानले गेले. आंतरराष्ट्रीय पातळीवर आयुर्मान मर्यादा कमाल 85 वर्षे व किमान 25 वर्षे, साक्षरता मर्यादा 0 ते 100 टक्के, उत्पन्न मर्यादा कमाल 40,000 डॉलर (अमेरिकन डॉलर) व किमान 100 डॉलर ठरविण्यात आली आहे.

1.1 लिंगाधारीत विकास निर्देशांक Gender Devlopment Index :–

मानव विकास निर्देशांक अहवाल प्रकाशित होत असताना 1995 चा युनोचा हा अहवाल विशेष गाजला, कारण या अहवालात प्रथमच मानव विकासातील स्त्री-पुरुष विषमतेवर प्रखर प्रकाश झोत टाकला गेला. तसे पाहिले तर स्त्री-पुरुषांना समान संधी हा विचार जागतिक स्तरावर सर्वांनाच मान्य आहे. व्हिएन्ना येथे 1993 मध्ये झालेल्या मानवी हक्का वरील जागतिक परिषदे मधील हजर असणाऱ्या 171 देशांनी समान संधीचा हा जाहिरनामा स्विकारला त्यामध्ये

1) राजकीय आणि आर्थिक निर्णय प्रक्रियेतील सहभागाची समान संधी
2) समान कामासाठी समान मोबदला
3) कायदयाने सर्वांना संरक्षण
4) लिंग भेदामुळे स्त्रियांना संधी नाकारली जावू नये, स्त्रियांवर अत्याचार केला जावू नये.
5) जीवनाच्या सर्वच क्षेत्रात नागरिकांना समान अधिकार असावेत.

घरात, घराबाहेर आणि कामाच्या ठिकाणीही समानतचा हा मुद्दा गुलामगीरी इतकाच महत्त्वाचा मानला गेला, जगभरातील महिलांची अशा प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्तता व्हावी म्हणून महिला संघटीत होत आहेत. आज मानव विकास लिंगभेद विरहीत झाला नाही तर मानव विकास झाला म्हणण चुकीचे ठरेल. त्यामुळेच 1995 च्या मानव विकास अहवालात लिंगभेदाचे मापन सुरु झाले. सप्टेंबर 1995 साली

बिजिग येथे जागतिक महिला परिषद भरणार होती त्या पार्श्वभूमिवर युनोच्या अहवालात ''लिंगाधारीत विकास निर्देशांक मांडण्यास सुरुवात झाली.'' या अहवालात मानव विकासातील लिंगभेदाचे मापन करुन निर्देशांक काढला जाऊ लागला. वेगळ्या शब्दात ''स्त्रियांचा पुरुष सापेक्ष आर्थिक, सामाजिक व राजकीय विकासाची मापके विकसित करुन असा निकर्ष काढला जातो.'' कारण जगातील कोणत्याच समाजातील स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार मिळाले नसल्याचे दिसते त्यामुळे लिंगाधारीत विकास निर्देशांक (जी.डी.आय.) ही मानव विकास निर्देशांका पेक्षा वेगळी संकल्पना आहे. ही संकल्पना तीन भारतीय अर्थ तज्ज्ञांनी प्रा. अमर्त्य सेन, सुधीर आनंद, मेघनाथ देसाई यांनी विकसीत केली.

जेव्हा एकूण मानव विकासातील स्त्री-पुरुषांचा सापेक्ष वाटा आपण पाहतो तेंव्हा स्त्री-पुरुषा दरम्यानची विषमतेची दरी अधोरेखीत होते. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात जगभरात स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत विकासाच्या संधी कमीच मिळाल्या आहेत. या स्थितोचा आढावा घेण्यासाठी लिंगाधारीत विकास निर्देशांक विकसीत केला गेला आहे. या निर्देशांकाने असे दाखवून दिले की, उच्च दरडोई उत्पन्न असलेले देश स्त्री-पुरुष समानतेबाबत तितके जागृत नाहीत. पुढील तीन घटकांच्या सहाय्याने हा निर्देशांक तयार केला जातो.

1) जन्मापासूनचे स्त्री- पुरुष सापेक्ष सरासरी आर्युमान

2) सापेक्ष स्त्री- पुरुष साक्षरता प्रमाण.

3) सापेक्ष स्त्री- पुरुष अर्जित उत्पन्न.

या तिन्ही घटकांना समान भारांक देऊन त्यांच्या आधारे एकत्रित लिंगाधारीत विकास निर्देशांक काढला जातो. अलिकडच्या काळात जागतीक पातळीवर लिंग विषमतेविषयी जागृती निर्माण होत आहे. लिंग विषमता कमी करण्यासाठी विविध प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी स्त्री शिक्षणाला उत्तेजन दिले जात आहे. त्यांना कटुंबात चांगले स्थान देण्यात येत आहे. मात्र कांही देशात सांस्कृतीक पार्श्वभूमीवर स्त्रीयांना योग्य स्थान दिले जात नाही. यासाठी स्त्री चळवळीने लिंग समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होत आहे.

1.2 मानवी दारिद्र्य निर्देशांक -Human Poverty Index:-

सन 1997 मधील मानवी विकास निर्देशांक अहवालात मानवी विकास मापनाचे आणखी एक महत्वाचे परिमाण वापरले गेले. त्यालाच मानवी दारिद्र्य निर्देशांकाची संकल्पना असे म्हणतात. मानवी जीवनातील तीन आवश्यक घटकांना हानी पोहोचविण्यावर हे निर्देशांक लक्ष केंद्रित करतात. हे तीन घटक म्हणजे 1) दीर्घायुष्य 2) ज्ञान 3) सुयोग्य राहणीमान. या तीन घटकांचा विचार मानवी विकास निर्देशांकातसुध्दा करण्यात आला आहे.

1) **दीर्घायुष्य :** यातील पहिली हानी म्हणजे मृत्यूची अस्थिरता. जो सापेक्षतेने लवकर येतो.(कमी वयात येतो) जो मानवी दारिद्र्य निर्देशांकात वयाच्या 40 व्या वर्षांच्या अगोदर मृत्यूची लोक अपेक्षा करतात त्याचे प्रतिनिधित्व असते.

2) **ज्ञान:** दुसरी हानी ज्ञानाशी संबंधित असते आणि हे जे लोक निरक्षर आहेत त्या प्रौढाच्या टक्केवारीने मोजतात.

3) **सुयोग्य राहणीमान :** तिसरी हानी ही सुयोग्य राहणीमानाशी संबंधित असते. जी विशेषत्वाने सर्वंकष बदलणारी असते. जी बाब तीन चलांनी संमिश्रांचे प्रतिनिधित्व करते याची टक्केवारी असते ती चले अ) आरोग्य सेवा ब) सुरक्षित पाणी क) पाच वर्षांखालील कुपोषित बालकांचे प्रमाण मोजतात.

मात्र मानवी दारिद्र्य निर्देशांकात उत्पन्नाचा समावेश करण्यात आलेला नाही. कारण सन 1997 च्या मानवी विकास अहवालानुसार यामागे असे तर्कशास्त्र आहे की, आर्थिक तरतूदीची रचना करताना स्थूल राष्ट्रीय उत्पन्न (GNP) हे मानवी दारिद्र्य निर्देशांकात समाविष्ट केलेले असते. जे प्रत्यक्षात खाजगी व सार्वजनिक सुविधांचे मिश्रण असते. तसेच विविध देशांतील दारिद्र्य रेषेत खूपच फरक असतो. कारण उत्पन्न दारिद्र्य सार्वत्रिक असण्यासाठी एकच दारिद्र्य रेषेचा वापर करावा लागतो. पण विविध देशांच्या विविध दारिद्र्य रेषांच्या संकल्पनेमुळे निष्कर्ष चुकण्याची शक्यता असते. कारण प्रत्येक देशातील उपभोगाच्या वस्तू, कपडे, राहण्याची जागा व दळणवळणाची साधने, रेडिओ व टेलिफोन अशा अनेक सुविधा एखाद्या समाजाच्या सामाजिक सहभागासाठी आवश्यक असतात तर दुसऱ्या समाजात त्यांचा

अभाव असतो. परिणामी, किमान उत्पन्न विविध समाजासाठी गृहीत धरणे सामाजिक संबंध तुटण्यात होतो. याच कारणाने मानवी दारिद्र्य निर्देशांकात कुपोषित बालकाच्या मापनाचा वापर केला जातो. जे सापेक्षतेने मोजणे सोपे असते, ज्याचे सामग्री सहजपणे उपलब्ध होते. त्याचबरोबर आरोग्य सेवा व सुरक्षित पाणी यांचा वापर केला जातो. जी मानवी दारिद्र्याविषयी पुरेसे व विस्तृत चित्र निर्माण करण्यास मदत करतात.

(अ) मानवी दारिद्र्य निर्देशांक – 1 चे मापन (HPI-1)

यामध्ये प्रामुख्याने पुढील तीन परिमाणांचा विचार केला जातो.

1) **दीर्घायुष्य** जन्मापासून वयाच्या 40 वर्षे वयापर्यंत जोवंत राहत नाहीत अशी संभाव्यता येथे लक्षात घेतली जाते.

2) **ज्ञान** प्रौढांमधील निरक्षरता दर.

3) **सुयोग्य राहणीमान** लोकांचे योग्य राहणीमान मोजताना तीन बाबी महत्त्वाच्या मानल्या जातात. अ) आरोग्य सेवा ब) स्वच्छ व सुरक्षित पाणी उपलब्ध होणाऱ्या लोकांचे प्रमाण व क) 5 वर्षांखालील कुपोषित बालके.

मानवी विकास निर्देशांकापेक्षा मानवी दारिद्र्य निर्देशांकाची गणना अधिक योग्य व प्रामाणिक पणाची समजली जाते. दारिद्र्य निर्देशांकात वापरलेले दर्शक (Indicators) साधारणपणे 0 ते 100 या दरम्यान असतात. ते टक्केवारीत अपेक्षित असतात. म्हणून येथे मानवी विकास निर्देशांकाप्रमाणे परिमाण निर्देशांक तयार करण्याची गरज नसते. सन 1997 च्या अहवालात स्पष्ट केल्याप्रमाणे आरोग्य सेवेशी निगडित आकडेवारीचा अभाव अलीकडील वर्षात जाणवतो. यामुळे योग्य राहणीमान मोजताना तीन दर्शकांऐवजी केवळ दोनच दर्शकांचा वापर केला जातो. अ) सुरक्षित पाणी उपलब्ध होणाऱ्या लोकांचे प्रमाण आणि ब) पाच वर्षांखालील कुपोषित बालकांचे प्रमाण.

(ब) मानवी दारिद्र्य निर्देशांक – 2 चे मापन(HPI-2)

या पुढील चार दर्शकांच्या साहाय्याने दारिद्र्य निर्देशांक मोजले जातात.

१) दीर्घायुष्य जन्मापासून वयाच्या 60 वर्षे वयापर्यंत जोवंत न राहणाऱ्या लोकांच्या संभाव्यतेने दीर्घायुष्य मोजले जाते.

२) ज्ञान प्रौढामधील कार्यात्मक साक्षरता कौशल्याच्या टक्केवारीने ज्ञानाचे मापन केले जाते.

३) दारिद्र्य रेषा दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकांची टक्केवारी.

४) सुयोग्य राहणीमान दीर्घकालीन बेकारी दर (12 महिने अगर अधिक) अगर सामाजिक अपवर्जनाचे निर्धारक.

वरील दोन प्रकारे मानवी दारिद्र्य निर्देशाकाचे मापन केले जाते. त्यासाठी या चार चलांचा अवलंब केला जातो. अर्थात, विकसनशील देशांत मानवी दारिद्र्य निर्देशांक अधिक असतो. सन 2007 मध्ये उत्पन्न दारिद्र्य निर्देशांकाने मानवी दारिद्र्य निर्देशांक मोजण्यात आला. त्यासाठी दररोज 1.25 अमेरिकन डॉलरपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांचा दारिद्र्य रेषेखालील लोकांत समावेश करण्यात आला होता. त्यानुसार नायजेरियातील 64.2% लोकसंख्या उत्पन्न दारिद्र्याने त्रस्त होती. परंतु त्याचा मानवी दारिद्र्य निर्देशांक 36.2% होता. भारतात याच वर्षी 41.6% लोकसंख्या उत्पन्न दारिद्र्य रेषेखाली होती पण मानवी दारिद्र्य निर्देशांक 28 टक्के होता. म्हणून दारिद्र्य निर्देशांक अधिक बहुव्याप्ती मापन आहे.

1.3 मानवी विकास वंचन निर्देशांक :–

मानवी विकासाचे चित्र अधिक स्पष्ट होण्यासाठी निर्देशांकाच्या वंचनाचा देखील विचार केला आहे. त्यामध्ये

1) आरोग्य वचन

2) शिक्षण वंचन

3) उत्पन्न वंचन

हे तीन निकष गृहीत धरले आहेत देशातील किती लोकांना चांगल्या आरोग्य सेवा मिळतात तर किती लोक आरोग्य सेवेपासून वंचित आहेत, शिवाय अशिक्षित अडाणो लोकांचे प्रमाण, प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणातील गळतीचे प्रमाण किती टक्के लोक शिक्षणा पासून वंचित आहेत. तर उत्पन्नापासून किती टक्के लोक वंचित आहेत दारिद्र्यरेषेखालील लोक, कमीत कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांची संख्या या सर्वांचा अभ्यास वंचित निर्देशांकात केला जातो, व त्यावर मानवी विकासाच्या वंचनाचा निर्देशांक तयार करुन मानवी विकासाचे मापन केले जाते. वंचन निर्देशांक वरील सोयी व सुविधापासून लोक किती जवळ व दूर आहेत ते दर्शवितो. वंचन निर्देशांक जेवढा शून्याच्या (0) जवळपास असेल, तेवढा तो सोई व सुविधांच्या उपलब्धतेची वाईट स्थिती दर्शवितो. तर हा निर्देशांक जेवढा एकच्या (1) जवळ असेल, तेवढा तो मानवी विकासाचो चांगली पातळी दर्शवितो.

आंतरराष्ट्रीय पातळीवर आयुर्मान, शिक्षण व राहणीमान या तीन घटकांना भारांक देऊन मानव विकास निर्देशांक काढला जातो. ज्या देशांचा मानव विकास निर्देशांक 0.8 ते 1.0 च्या जवळपास असेल तर त्या देशातील मानवी विकास उच्च दर्जाचा असतो. ज्या देशांचा हा निर्देशांक 0.5 ते 7.99 च्या दरम्यान असेल ते देश मध्यम मानव विकासाचे देश समजले जातात. तर ज्या देशांचा मानव विकास निर्देशांक 0.5 पेक्षा कमी असेल ते देश अल्प मानवी विकासाचे देश समजले जातात. मानव विकास निर्देशांकावरुन प्रत्येक देशाला क्रमांक दिला जातो. त्यावरुन त्या देशातील मानवी विकासाची पातळी समजते. सन 1997 मध्ये जगातील 174 देशांमध्ये भारताचा मानव विकास क्रमांक 135 होता. सन 1999 व 2001 मध्ये अनुक्रमे तो 126 व 124 इतका होता. सन 2005 मध्ये भारताचा क्रमांक 128 होता. तर मानव विकास निर्देशांक 0.619 होता.

वरील मानव विकास निर्देशांकावरुन भारताचा मानव विकास निर्देशांतील बदल व स्थान पुढील प्रमाणे.

तक्ता क्र 1.1

भारताच्या मानव विकास निर्देशांकाच्या वाढीचा कल

वर्षे	मानव विकास
1980	0.320
1990	0.389
1995	0.415
2000	0.440
2005	0.482
2009	0.515
2010	0.519
2014	0.687
बदल	+ 114.68

स्त्रोत **ESI- 2009-10-2012-13**

सन 1980 मध्ये भारताचा मानव विकास निर्देशांक 0.320 इतका होता तो 2010 मध्ये 0.519 इतका झाला तर सन 2014 मध्ये तो 0.687 इतका झाला म्हणजे गेल्या 34 वर्षाच्या काळात भारतातील मानव विकास निर्देशांकात + 114.68 % वाढ (सुधारणा) झाल्याचे दिसून येते.

सन 2010 चा भारताचा मानव विकास निर्देशांक 0.519 इतका होता जगातील 169 देशामध्ये भारताचा मानव विकास निर्देशांकाबाबतचा क्रमांक 119 इतका आहे. सन 2007 मध्ये तो 182 देशात 134 इतका होता म्हणजे भारताच्या मानव विकास निर्देशांक क्रमांक 134 वरुन 119 म्हणजे तो 15 ने घटला याचा अर्थ भारतात मानव विकास निर्देशांकात सुधारणा झाली आहे. सन 1980 ते 2010 या काळात मानवी विकासाबाबत भारतात मोठ्या प्रमाणात प्रगती घडून आली. भारताने मानव विकास निर्देशांकात सुधारणा घडवून आणण्यामध्ये उच्च व अतिउच्च मानव विकास निर्देशांक असणाऱ्या देशापेक्षा जास्त प्रगती केली आहे. चीन वगळता इतर देशांपेक्षा भारताची मानव विकासातील प्रगती जास्त आहे. असे असले तरी सुध्दा भारत मानवी विकासाबाबत मध्यम गटात मोडतो.

1.4 भारतातील मानवी विकास निर्देशांक:–

भारत सरकारच्यावतीने पहिला ''राष्ट्रीय मानव विकास अहवाल'' सन 2001 मध्ये प्रसिध्द केला. त्यामधील 1981, 1991 व 2001 मधील सर्व भारताचा व भारतातील विविध राज्यांचा मानव विकास निर्देशांक दर्शवला आहे. तर दुसरा अहवाल सन 2011 मध्ये प्रसिध्द केला. या अहवालात दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यात यशस्वी ठरणाऱ्या आर्थिक वाढीसाठी मानवी भांडवल आणि मानवी कार्यक्षमतेत वाढ या महत्त्वाच्या गरजा असल्याचे मत भारत मानव विकास अहवाल मांडत आहे. हा अहवाल तयार करण्यासाठी भारत मानवी विकास अहवाल, राष्ट्रीय मानव विकास अहवाल- 2001 आणि जागतिक मानवी विकास अहवाल 2010 या मध्ये वापरलेल्या निर्देशांकाचा वापर भारताने आपल्या अहवालात केल्याचे दिसते. पुढील पत्रकात वरील विविध अहवालामध्ये वापरलेले निर्देशांक दिले आहेत.

तक्ता क्र 1.2
मानव विकास अहवाल मध्ये वापरलेले निर्देशांक व त्यातील बदल

निर्देशांक	राष्ट्रीय मानव विकास अहवाल 2001	भारत मानव विकास अहवाल 2011	जागतिक मानव विकास अहवाल 2010
आरोग्य	वय वर्ष 1 असतानाचे अपेक्षित आयुर्मान	जन्म वेळेचे अपेक्षित आयुर्मान	जन्मवेळेचे अपेक्षित आयुर्मान
	अर्भक मृत्यू दर		
शिक्षण	साक्षरता दर (7 वर्षे व अधिक)	साक्षरता दर (7 वर्षे व अधिक)	शिक्षणाची सरासरी वर्षे
	औपचारिक शिक्षणाची तीव्रता	समायोजित शिक्षणाची सरासरी वर्षे	शिक्षणाची अपेक्षित वर्षे
उत्पन्न	असमानतेच्या अनुषंगाने समायोजित केलेला दरडोई उपभोग्य बाबींवरील वास्तव खच	असमानतेच्या अनुषंगाने समायोजित केलेला दरडोई उपभोग्य बाबींवरील वास्तव खर्च	दरडोई राष्ट्रीय स्थूल उत्पन्न (अमेरिकन डॉलरमध्ये)

स्त्रोत:-भारत मानव विकास अहवाल 2011, महाराष्ट्र मानव विकास अहवाल 2012

वरील घटकांचा वापर करुन युनोच्या सहाय्याने व महिबुब-ऊल हक आणि डॉ.बिस्वजित गुहा यांनीही भारतातील विविध घटक राज्यातील अभ्यास करुन मानव विकास निर्देशांक तयार केला आहे. सन 1999-2000 ते 2007 या कालावधीत भारताच्या मानव विकास निर्देशांकामधील 21 % नी घट झाली आहे. तर राज्यांच्या मानवी विकास निर्देशांकामध्ये 14 % नी वाढ झाली आहे. निर्देशांकात

राज्यामध्ये जी सुधारणा झाली त्यामध्ये शिक्षण निर्देशांक हा महत्त्वाचा घटक असून चांगली वाढ झाली आहे. त्यानंतर आरोग्य निर्देशांक व उत्पन्न निर्देशांकात सुधारणा झाल्याचे दिसते. देशातील जाती व सामाजिक गट यामधील असमानतेवर ही हा अहवाल प्रकाश टाकतो.

भारताचा मानव विकास अहवाल 2011 मध्ये देशात केरळ पहिल्या क्रमांकावर असून त्यानंतर दिल्ली, गोवा, पंजाब व महाराष्ट्राचा क्रमांक लागता. सोबतच्या तक्त्यात देशातील निवडक राज्यांचे मानवी विकास निर्देशांक अभ्यासता येतील.

तक्ता क्र. 1.3

भारतातील काही निवडक राज्यांचे मानव विकास निर्देशांक (1981 ते 2011)

राज्य	1981		1991		2001		2011	
	मा.वि.नी.	क्रमांक	मा.वि.नी.	क्रमांक	मा.वि.नी.	क्रमांक	मा.वि.नी.	क्रमांक
आंध्र प्रदेश	0.298	9	0.377	9	0.368	12	0.473	11
बिहार	0.237	15	0.308	15	0.292	15	0.367	17
गुजरात	0.360	4	0.431	6	0.466	8	0.527	8
हरियाणा	0.360	5	0.443	5	0.501	6	0.522	7
कर्नाटक	0.346	6	0.412	7	0.432	9	0.519	9
केरळ	0.500	1	0.591	1	0.677	2	0.790	1
मध्य प्रदेश	0.245	14	0.328	13	0.285	16	0.375	16
महाराष्ट्र	0.363	3	0.452	4	0.501	5	0.572	5
पंजाब	0.411	2	0.475	2	0.534	4	0.605	4
तामिळनाडू	0.343	7	0.466	3	0.480	7	0.570	6
उत्तर प्रदेश	0.255	13	0.314	14	0.316	14	0.380	14
पश्चिम बंगाल	0.305	8	0.404	8	0.422	10	0.492	10
आसाम	0.272	10	0.348	10	0.386	14	0.	
राजस्थान	0.256	12	0.347	11	0.424	9	0.	
ओरिसा	0.267	11	0.345	12	0.404	11	0.	
भारत	0.302		0.381		0.387		0.467	

संदर्भ – राष्ट्रीय मानवी विकास आयोग 2001 व भारत मानव विकास अहवाल 2011

सोबतच्या पत्रकात 1981, 1991 व 2001 च्या मानवी विकास निर्देशांकाची आकडेवारी दिली असून फक्त 15 प्रमुख राज्यांचीच आकडेवारी दिली आहे. सोबतच्या तक्त्यावरुन संपूर्ण भारताचा मानवी विकास निर्देशांक सुधारत आहे. 1981 साली 0.302 होता तर 2011 मध्ये 0.467 इतका झाला आहे. मात्र आंतरराष्ट्रीय गुणवत्तेनुसार 0.500 पेक्षा तो अजूनही कमी आहे त्यामुळे भारताचा समावेश अल्प मानव विकास निर्देशांकात केला जातो.

मात्र भारतातील कांही राज्यांनी विकास निर्देशांकात चांगली कामगिरी बजावली आहे उदा. केरळ 1981 मध्ये 0.500 इतका निर्देशांक होता तो 2011 मध्ये 0.790 इतका वाढला आहे. तर बिहार सारख्या राज्याचा 0.237 इतका मानवी विकास निर्देशांक होता तो फक्त 0.367 एवढाच कमी प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे देशात त्याचा 17 वा क्रमांक आहे.

देशातील पंजाब, तामिळनाडू, महाराष्ट्र यांचा मानवी विकास निर्देशांक चागला आहे. तर उत्तर प्रदेश, आसाम, मध्य प्रदेश, बिहार या राज्यांचा विकास निर्देशांक फारसा वेगाने वाढला नाही. त्यातल्या आर्थिकदृष्ट्या चांगल्या स्थितीत असलेल्या राज्यांची सापेक्षतेने मानवी विकास निर्देशांकातील कामगिरी चांगली आहे तर आर्थिकदृष्ट्या गरीब राज्यांची मानवी विकास निर्देशांकातील कामगिरी वाईट आहे.

1.5 भारतातील मानव विकास विषयक धोरणे :–

भारताने आपला पहिला मानव विकास अहवाल 2001मध्ये प्रसिध्द केला तर त्यामध्ये व 1981, 1991 व 2001 मधिल भारतातील विविध राज्यांचा मानव विकास दर्शविला आहे. तर भारताचा दुसरा मानव विकास अहवाल सन 2011 मध्ये प्रसिध्द केला आहे.

गेल्या पाच-सहा वर्षात जागतिक स्तरावर व भारतात ज्या आर्थिक समस्या निर्माण झाल्या त्याचे अर्थव्यवस्थेवर जे गंभीर परिणाम झाले त्यामुळे मानव विकासाच्या योजना किती महत्त्वाच्या आहेत हे स्पष्ट झाले. अर्थव्यवस्थेत निर्माण होणाऱ्या समस्या साडवणूकोसाठी अंतर्गत सुरक्षित व्यवस्था असली पाहिजे अन्यथा मागील अनेक वर्षापासून केलेली प्रगती व्यर्थ जाण्याचा धोका असतो भारताने मात्र या आर्थिक समस्येला योग्य पध्दतीने हाताळले .

भारतात 15 ते 59 वयोगटातील लोकांची संख्या 2011 मध्ये 58% होती ती 2021 मध्ये 64% होण्याचो शक्यता आहे. यामध्ये जवळजवळ 6 कोटी 30 लाख तरुणांची भर पडणार आहे. त्यामुळे भारत हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जाईल.परंतु विकास व कौशल्य पूर्ण असावा याची काळजी घ्यायला हवी म्हणून भारतातील योजनाकर्त्यानी आर्थिक वाढ व विकासाकडे लक्ष देताना मानवी विकासाकडे विशेष लक्ष दिलेले आहे. त्यामुळे अनेक योजनांना चांगला आर्थिक आधार देण्यात आला आहे. उदा.- सर्व शिक्षा अभियान, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, मागास प्रदेश विकास निधी, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, राष्ट्रीय ग्रामीणआरोग्य, स्वच्छता व पाणी पुरवठा योजना निर्मल ग्राम याजना इत्यादी.

ढोबळमानाने मानव विकास निर्देशांक तीन मुद्दयांच्या आधारे तयार के ला जातो त्यामध्ये (1) आरोग्यदायी दोर्घायुष्य जीवन जगणे. (2) साक्षरता आणि ज्ञानाधिष्ठीत बनणे.(3)चांगले राहणोमान असावे सन 2011 मध्ये प्रकाशीत झालेल्या H.D.I मध्ये भारताचा H.D.I 0.547 इतका होता ज्यामध्ये भारताचा क्रमांक जगातील 187 देशापैकी 134 होता. की .जो.2010 च्या रिपोर्ट नुसार169 देशांपैकी भारत 119 व्या क्रमांकावर होता.

भारताचा मानव विकास निर्देशांक 2000 ते 2008 मध्ये 21 % ने वाढला आहे. यामध्ये 28 % शैक्षणिक वाढ आहे. लिंगाधारीत विकास निर्देशांकात भारताचा 129 वा क्रमांक लागतो त्याचे कारण म्हणजे एकूण सामाजिक विकासात स्त्रियांना सामाजिक समानता नाही. आर्थिक तफावत मोठी आहे. भारतातील स्त्रियांच्या सबलीकरणावर अधिक भर दिला पाहिजे. त्यांचे आरोग्य, पोषण सामाजिक निर्णय प्रक्रियेत समानता यावर भर देणे आवश्यक आहे. आपल्या शेजाराचे पाकिस्तान 115 वा क्रमांक, बांगला देश 112 वा क्रमांक, श्रीलंका 72 यांची कामगिरी भारतापेक्षा चांगली आहे.

सर्वसमावेशक विकासासाठी दारिद्रय,बेरोजगारी आरोग्य, शिक्षण, स्त्रीशक्ती, सामाजिक कल्याण या सारख्या मुलांच्या समस्यांचा विचार करावा लागतो. जे लोक सामाजिक दृष्ट्या बहिष्कृत असणारे आर्थिक दृष्ट्या ही कमकुवत राहतात.गरीब, शेतकरी, शेतमजुर, मागासवर्गीय, स्त्रियां यांना सामाजिक तसेच आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते सरकारची ध्येय व धोरणे या अडचणी सोडवण्यासाठी काय

करत असून समाजाच्या विकासाच्या मुख्य प्रवाहात वंचित घटकांना आणण्याचे प्रयत्न जोरात सुरु असतात.

सामाजिक विकास हा मुख्यत: राज्य सरकारच्या अधिकारातील विषय असला तरी राष्ट्रीय पातळीवरुन त्यासाठी मदत पुरवली जात आहे. 2008 मधील अंदाजपत्रकात सामाजिक विकासासाठी 17.77 इतका खर्च केला होता तो वाढवून केला गेला. सराकारची विविध विकास विषयाची धोरणे पुढील प्रमाणे.

या कार्यक्रमांच्या माध्यमातून मुख्यत्वे करुन ग्रामीण जीवनाचा सामाजिक अंगावरच फक्त लक्ष केंद्रीत केले गेले, तुलनात्मकदृष्ट्या ग्रामीण भागातील जनतेचा आर्थिक दजा उंचावण्याकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. परिणामी ग्रामीण जनतेकडील उत्पादक सामग्री वाढली नाही व ग्रामीण भागात होणाऱ्या पतपुरवठयात संख्यात्मक सुधारणा होऊ शकली नाही.

1.6 एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम:-

भारताच्या ग्रामीण भागात राहणारी लोकसंख्या जास्त होती व स्वतंत्र्यानंतर शिक्षण, आरोग्य बरोबर सामाजिक विकासावरही भर देणे आवश्यक होते म्हणून वेळोवेळी ग्रामीण भागातील प्रगतीसाठी या कार्यक्रमामध्ये परस्पर समन्वयाचा अभाव होता. त्यामुळे दारिद्रय रेषेखालील जीवन जगणारे गरीब अल्पभधारक, भ्मिहिन शेतमजुर, या घटकाकडे काहीसे दुर्लक्ष झाले. त्यामुळे विकासापासून समाजातील मोठा गट वंचित राहीला. त्यामुळे भारताच्या ग्रामीण भागाचा सर्वांगिण विकास साधणे गरजेचे बनले.

या पूर्वी 1952 साली समुदाय विकास कार्यक्रम आखला. मात्र ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाची उदिष्ट्ये साध्य करण्यात फारसे यश आले नाही. त्यामुळे दारिद्रयरेषेखालील जीवन असणाऱ्या बहुसंख्य ग्रामीण जनतेच्या परिस्थितीत फारशा सुधारणा करण्यात यश आले नाही या परिस्थितीत बदल होऊन दारिद्रय रेषेखालील जीवन जगणाऱ्या लोकांच्या आर्थिक व सामाजिक विकास होऊन परिस्थितीत सुधारणा व्हावी व त्यांचा सर्वांगोण विकास होऊन त्यांचे जोवनमान उंचावले जावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून सन 1976-77 मध्ये एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमची रुपरेषा ठरवण्यात आली त्यामुळे

ग्रामीण भागातील गरीब व दारिद्र्यातील लोकांच्या विकासासाठी व्यापक कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरु झाली. हे लोक दारिद्र्यातून वर येण्यासाठी त्यांना जोडव्यवसाय, उदयोग उपलब्ध करुन देण्यासाठी विशेष प्रयत्न केले गेले.या योजनेत लाभधारक कुटुंबाची अंतिम निवड ग्रामसभा व ग्रामपंचायत यांच्या सहभागातून होते.

या योजने अंतर्गत लाभार्थीना कोंबडी पालन, जनावरे पालन या विषयी प्रशिक्षण देणे, शेतीची अवजारे, बैलजोड्या पुरवणे, शिवणयंत्रे देणे, इतर छोटे मोठे व्यवसाय करणे, खते बी-बियाणे यासाठी बँके कडून आर्थिक मदत मिळवून देणे, देशातील सर्व जिल्ह्यात या कार्यक्रमाची अंमलबजावणी जिल्हा ग्रामीण विकास विभागाच्यावतीने केली गेली.

लाभधारकांना प्रकल्प खर्चाच्या 33% अनुदान दिले जाते, तर वैयक्तिकलाभधाकांसाठी अनुदान मर्यादा 4000 ते 5000 हजार रुपयापर्यंत आहे, सन 1998 पर्यंत पाच कोटी सत्तावीस लक्ष कुटुंबाना मदत दिली गेली. त्यासाठी एकूण 30,872 को. रु. गुंतवणूक केली एकूण लाभधारकांमध्ये स्त्रियांचे प्रमाण 34% तर अनुसुचित जाती जमातीच्या 46% लोकांना लाभ झाला. पुढे 1999 मध्ये हा कार्यक्रम अधिक व्यापक अशा ''सुवर्णजयंती ग्राम स्व-रोजगार'' योजनेत विलीन करण्यात आला.

1.7 वीस कलमी कार्यक्रम:– 20 जून 1975 रोजी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी हा कार्यक्रम जाहीर केला होता 20 ऑगष्ट 1986 रोजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी नवीन सुधारीत 20 कलमी कार्यक्रम जाहीर केला तो पुढीलप्रमाणे.

1) ग्रामीण दारिद्र्या विरुध्द लढा :– भारताच्या ग्रामीण भागात प्रचंड दारिद्र्य असल्यामुळे त्याच्या विरुध्द लढा उभारुन प्रत्येक गरीब कुटुंबात या योजनेचा लाभ मिळल याची खात्री या योजनेत होती. रोजगाराच्या विविध कार्यक्रमांची सांगड घालून राष्ट्रीय व सार्वजनिक मालमत्ता निर्माण करणे आर्थिक विषमता कमी करणे, स्वयंरोजगारास चालना देणे. सहकारी स्थानिक स्वराज्य संस्थाचे पुनरुज्जीवन करणे इ. घटकांचा समावेश केला गेला.

2) पर्जन्यश्रयी शेतोचा विकास :– अवर्षण प्रवण क्षेत्र विकासासाठी विविध कार्यक्रम राबवण्या बरोबरच भ़जल संपत्तीचा चांगला वापर, जमीनीतील ओलावा टिकवण्याचे कार्यक्रम, बी-बियाणे विकास व वाटप इत्यादी कार्यक्रम राबवले जातात.

3) पाटबंधाऱ्याच्या पाण्याचा योग्य वापर :– यामध्ये सिंचन क्षेत्राचा, पाणलोट क्षेत्राचा विकास जमीनीचा पोत सुधारण्या बरोबरच जमीनीतील पाण्याचा निचारा करण्याच्या योजना, जमीनीतील क्षारांचे प्रमाण वाढणार नाही याची दक्षता घेणे, वगैरेचा समावेश होतो.

4) अन्नधान्योत्पादन वृध्दी:– एकूण कृषी उत्पादन वाढ घडवून आणणे खाद्यतेल, भात, कडधान्ये, भाजीपाला, फळे व ज्या भागात भात, गहू, यांचे उत्पादन कमी आहे. त्या भागात ते वाढविणे शेती उत्पादनावर प्रक्रिया करणे, धान्यसाठा गृहे, सोयी वाढवणे, दुग्धव्यवसाय व मत्सव्यवसाय यांची उत्पादकता वाढविणे.

5) जमीन सुधारणा :– शासनाकडे पडून असणाऱ्या अतिरिक्त जमीनीचे भमीहिन शेतमजूरांना वाटप केले व जमीन सुधारणा, कायमची अंमलबजावणी, यासारखी कामे हाती घेतली.

6) ग्रामीण मजुरांसाठी कार्यक्रम :– समाजातील वेठबिगारी सारख्या समस्या नष्ट करुन अशा लोकांचे पुनवर्सन घडवून आणणे. ग्रामीण मजुरांसाठी किमान वेतन लागू करणे त्याची अंमलबजावणी करणे शेतमजुरांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडणे.

7) पिण्यासाठी स्वच्छ व पुरेसे पाणी:–देशातील सर्वच खेड्यातील लोकांना पिण्यासाठी स्वच्छ शुध्द पाणी पुरविणे यासाठी प्रयत्न करणे अनुसूचित जाती - जमातीच्या लोकांना पिण्याचे पाणी पुरविण्याकडे विशेष लक्ष देणे.

8) आरोग्य :– सर्वांच्यासाठी आरोग्य मिळण्यासाठी प्राथमिक आरोग्य सेवांची गुणवत्ता वाढवणे. कुष्ठरोग, क्षयरोग या रोगांच्या निर्मुलनासाठी प्रभावी उपाय योजन, अपगांच्या पुनवसनासाठी

सरकारने आखलेल्या कार्यक्रमावर भर देणे, सर्व बालकांना रोगप्रतिबंधक लस टोचण, ग्रामीण भागातील स्त्रियांच्या स्वच्छता सुविधांमध्ये वाढ घडवून आणण.

9) कुटुंब कल्याण :– आदर्श कटुंबासाठी फक्त दोनच अपत्ये असावीत हा सर्वांनी नियम स्व:इच्छेने पाळवा यासाठी लोकांचे मतपरिवर्तन करणे, माता व बालसंगोपन यासाठी विविध कार्यक्रम राबवणे, बालमृत्यूचे प्रमाण कमी करणे.

10) शिक्षण विस्तार :- प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकिकरण करणे, त्यामध्ये मुलींच्या शिक्षणावर भर देणे. अनौपचारिक शिक्षण व प्रौढ शिक्षण कार्यक्रमांना चालना देणे. निरक्षरता दूर करण्याऱ्या विविध कार्यक्रमांना चालना देणे.

11) अनुसुचित जातो– जमातींच्या लोकांना न्याय मिळवून देणे :– भारताच्या राज्यघटने प्रमाणे असणाऱ्या तरतूदीनुसार कायदे करणे व त्या कायदयांची अंमलबजावणी करणे. अशा लोकांना शासकिय जमीनीचे वाटप करणे, व वाटलेल्या जमीनीवर या लोकांचा ताबा राहील यासाठी निश्चित प्रयत्न करणे, सफाई कामगांराचे पुनर्वसन करणे, त्यांच्या शैक्षणिक विकासासाठी प्रयत्न करणे.

12) महिलांना समान हक्क:– राष्ट्रीय पातळीवर स्त्रियांसाठी प्रशिक्षण व रोजगार कार्यक्रम त्यांना सामाजिक व आर्थिक विकासाच्या क्षेत्रात समान संधी देणे. हुंडा विरोधी कायद्याची परिणाम कारक अमलबजावणी करणे व लोकमत तयार करणे.

13) युवकांना संधी :– राष्ट्रीय विकासाच्या कार्यात युवकांना सहभागी करुन घेणे, क्रिडा, साहसी कार्य, संस्कृती क्षेत्रात युवकांना संधी देणे, चांगल्या युवकांचा शोध त्यांच्या सुप्त गुणांचा विकास साधने-त्याच्यात एकात्मता, सांस्कतिक मूल्ये, धर्मनिरपेक्षता व वैज्ञानिक रुची दृढ करणे.

14) लोकांच्यासाठी गृहनिर्माण:– गामीण भागातील गरीब व अनुसुचित-जाती-जमातीच्या लोकांच्या घरासाठी जागा व घरबांधणी कार्यावर भर देणे.

15) गलिच्छ वस्ती सुधारणा :– सध्याच्या झोपडपट्ट्यांमध्ये स्वच्छता व इतर प्राथमिक सुविधा देण्याबरोबरच भविष्यात झोपड पट्ट्यांची वाढ नियंत्रित करणे.

16) वनसंवर्धन :– सामाजिक वनिकरणाच्या माध्यमांतून जंगल संपत्तोत वाढ करणे, डोंगराळ भाग, पडीक जमीन, रेताड, वाळवंटी, समुद्र किनारच्या जमीनी अशा विविध जमीनीवर सुयोग्य वृक्षांची लागवड करणे.

17) पर्यावरणाचा समतोल राखणे :– पर्यावरणाचा विनाश झाला तर कोणते धोकेनिर्माण होतात. त्याची जाणीव करुन देणे लोकांच्या सहकार्याने व सहभागाने पर्यावरण संतुलनाचा कार्यक्रम राबविणे.

18) ग्राहकांचे संरक्षण :– ग्राहक चळवळीला उत्तेजन देणे, जीवन उपयोगी वस्तू गरिबांनाही उपलब्ध होतील याची दक्षता घेणे, सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक सशक्त बनविणे.

19) वोजपुरवठा :– सर्व खेडी वाड्या-वस्त्यापर्यत वीज पुरवठा करणे पर्यायी उर्जासाधनांचा बायोगॅस, सौर उर्जा या पध्दतीचा विकास करणे.

20) जबाबदार शासन :– प्रशासकोय कार्यपध्दती सोपी करणे प्रत्येक पातळीवर अधिकार व जबाबदारी निश्चित करणे. जनतेच्या तक्रारीचे त्वरीत व सहानुभूतीपूर्वक निवारण करणे.

1.8 सुवर्ण जयंती ग्राम स्वराज्य योजना:–

ग्रामीण भागातील गरिबांना स्वयंरोजगार पुरविणे हाच मूलभूत उद्देश एकात्मिक ग्रामीण विकास योजना, ग्रामीण युवा स्वयंरोजगार प्रशिक्षण योजना, ग्रामीण भागातील महिला व मुलाचा विकास ग्रामीण कारागिरांना सुधारीतअवजारे पुरविणे आणि गंगा कल्याण योजना सारख्या योजना राबवल्या असल्या तरी त्यांच्यात सुसत्रात नव्हती, त्यामुळे या योजना परिणामकारकरित्या राबविल्या जात नव्हत्या त्यामुळे दारिद्र्य निर्मूलनाचा मूळ उद्देश बाजूला पडला. या पार्श्वभूमीवर या योजनांचे पुनर्विलोकन करण्यासाठी नियोजन आयोगाचे एक सदस्य प्रा.हाश्मी यांच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमली. त्यांनी ग्रामीण भागातील विविध योजनांच्या एकत्रिकरणाची

शिफारस केली त्यानुसार केंद्रीय मत्रिमंडळाने ''सुवर्णजयंती ग्राम-स्वरोजगार योजना'' या एकाच व्यापक स्वरुपाच्या योजनेत विलिन केली व्यापक स्वरुपाची ही योजना एप्रिल 1999 पासून देशात व राज्यात राबविली जात आहे.

1.9 ग्रामीण युवकांना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण :– ग्रामीण भागातील तरुणांना शेतकी व अनुशंगिक व्यवसाय उद्योगधंदे इ. क्षेत्रात स्वयंरोजगार निर्माण करता यावा यासाठो त्यांना तांत्रिक शिक्षण देण्याच्या उद्देशाने 15 ऑगष्ट 1979 पासून ग्रामीण युवकांना स्वयंरोजगारसाठी प्रशिक्षण ही योजना देशात सुरु करण्यात आली. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाचाच एक विस्तारित भाग होता. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाप्रमाणे ही योजनाही 1 एप्रिल 1999 पासून अधिक व्यापक व सर्वसमावेशक अशा सुवर्णजंयती ग्राम-स्वराज योजनेत विलीन करण्यात आली. मात्र महाराष्ट्रात दारिद्रयरेषेखालील 18 ते 35 वयोगटातील तरुणांना आवश्यक ते तांत्रिक प्रशिक्षण देऊन अनुषांगिक व्यवसाय, उद्योगधंदे, व्यापार या क्षेत्रात स्वयंरोजगारासाठी पात्र बनवण्याचे या योजने अंतर्गत झालेले कार्य निश्चितच चांगले आहे. सामाजिक व आर्थिकदृष्ट्या उपेक्षित असणाऱ्या काही देवदासीनाही या योजने अंतर्गत रोजगार मिळवून देण्यात आला.

1.10 ग्रामीण भागातील महिला व बालकांचा विकास :– ग्रामीण भागातील महिला व बालकांच्या विकासाचा हा कायक्रम देशात सन 1983-84 पासून सन 1998-99 पर्यंत राबविला गेला. ग्रामीण भागातील महिला व बालकांचा विकास साधने हा या कार्यक्रम मुख्य उद्दश होता. ज्या जिल्ह्यात बालमृत्यूचे प्रमाण जास्त व साक्षरता कमी असे जिल्ह्ये या कार्यक्रमासाठी प्राधान्याने निवडले जात त्यामध्ये 10 ते 15 महिलांचे गट तयार करुन एखादा उत्पन्न देणारा उपक्रम निवडला जाई, प्रथम हा निधी 15000/- होता नंतर तो 25000/- रु. पर्यंत वाढवला या कार्यक्रमावर खर्च केंद्र सरकार, राज्यसरकार व युनिसेफ 40:40:20% या प्रमाणात करत 1997-1998 ला 2,19,620 महिला गट स्थापन क्ले गेले. या कार्यक्रमाचा लाभ 35 लाखाहन अधिक महिलांना मिळाला. 1 एप्रिल 1999 पासून हा कार्यक्रम सुवर्णजयंती ग्राम-स्वरोजगार योजनेत विलीन केला गेला.

1.11 ग्रामीण कारांगीरासाठी योजना :– प्राचिन काळी बलुतेदारी समाज व्यवस्था अस्तित्वात होती. या समाज व्यवस्थेत परंपरागत व्यवसायात कुशल कारागीर असत. जसे लोहार, सुतार,

चांभार, कुंभार हे सर्वजण शेतीच्या प्राथमिक, उपभोग्य वस्तुची गावातल्या गावात पूर्तता होत असे, समाज व्यवस्था जसजशी बदलत गेली तसतशी या ग्रामीण कारागिरांची संख्या घटू लागली त्यांनी इतर व्यवसायात अंगीकारले आणि फारच थोडे लोक या पारंपारिक व्यवसायामध्ये राहीले. ग्रामीण कारागीरांची ही गरज लक्षात घेऊन नवीन तंत्रज्ञानाची ओळख करुन देऊन त्यांच्या उत्पनाचा दर्जा उंचावणे संख्यात्मक वाढ व कारागीरांचा आर्थिक विकास घडवून त्यांचे जीवनमान उंचावणे हा या योजनेचा गाभा होता. विणकर, शिवणकाम करणारे व विडी कामगार यासारख्या योजनांचा लाभ समाजातील गरीब, तळागाळातील दुर्बल घटक कारागीरांना झाला. 1 मे 1999 पासून ही योजना सुवर्ण जयंती ग्राम-स्वराज्य योजनेत विलीन करण्यात आली.

1.12 गंगा कल्याण योजना :– भूजलाचा पुरेपूर उपयोग करुन अल्प-भू-धारक व सीमान्त शेतकऱ्यांना वैयक्तिक आणि सामुदायिक स्तरावर जलसिंचन सुविधा उपलब्ध करुन देण्याचा हा योजनेचा मुख्य उद्देश होय.

1.13 भारत सरकारचे शिक्षण विषयक धोरण

भारतात साक्षरतेचा प्रसार :– भारतात साक्षरता प्रसाराची सुरुवात स्वातंत्र्यपूर्व काळातच झाली होती. महात्मा जोतीराव फले व त्यांच्या पत्नी सावित्रीबाई, पंडिता रमाबाई आदी समाजसुधारकांनी शिक्षणप्रसाराची सुरुवात व चळवळ विसाव्या शतकाच्या पूर्वीच सुरु केली होती. त्यानंतर विसाव्या शतकात दुसऱ्या दशकानंतर महात्मा गांधीजी यांनी स्वातंत्र्य चळवळीचा एक भाग म्हणून मुलोद्योग शिक्षणाबरोबरच रात्रशाळा आणि साक्षरता वर्ग सुरु केले. सन 1937 मध्ये काही प्रांतात काँग्रेस पक्षाची सरकारे स्थापन झाल्यानंतर या चळवळीचे साक्षरता चळवळीत रुपांतर झाले. भारतातील पहिली 'लोकसाक्षरता चळवळ' बिहारमध्ये 'जनसाक्षरता समिती स्थापन करुन' सुरु करण्यात आली. त्यामध्ये शिक्षक , विद्यार्थी आणि इतरांनी स्वयंसेवी पध्दतीने साक्षरता वर्ग घेण्यास सुरुवात झाली. त्यामुळे 1931 ते 1941 या दहा वर्षांत साक्षरतेची टक्केवारी 6 टक्क्यांनी वाढली. त्यानंतर 1947 मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले व त्यानंतर सरकारने वेळोवेळी भारतात साक्षरता प्रसार व वाढीसाठी अनेक धोरणे आखली.

1.14 राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1968:–

भारताचे स्वत:चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण असावे या 1964 च्या कोठारी आयोगाच्या शिफारशीवरुन 1968 मध्ये पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरविण्यात आले. या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा उद्देश राष्ट्रीय विकासाला गती देणे हा होता. राष्ट्रीय विकास साधण्यासाठी देशात समानतेची भावना निर्माण व्हावी व ही समानतेची भावना शिक्षणाच्या माध्यमातून निर्माण व्हावी, यासाठी 1968 मध्ये शिक्षणाची पुनर्रचना करण्यात आली व यातून 1968 चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणातील काही तरतूदी पुढीलप्रमाणे.

- कृषी आणि तांत्रिक क्षेत्रांसाठी आवश्यक मनुष्यबळ निर्माण व्हावे म्हणून कृषी आणि तांत्रिक शिक्षणावर विशेष भर देण्यात यावा.
- प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावर गणित व विज्ञान विषय आवश्यक असावेत.
- पदवीपूर्व अभ्यासक्रमाची नव्याने आखणी करण्यात यावी.
- नैतिक, सामाजिक मूल्यांची जोपासना आणि चारित्र्य निर्मिती यावर भर देणे.
- सामाजिक किंवा राष्ट्रीय सेवा योजनेचा शिक्षणक्रमात समावेश करणे.
- शिक्षण क्षेत्रामधील विकेंद्रीकरण धोरण आखून गतिशिलता आणणे.
- देशातील ग्रामीण भागातील मुलांना 1 कि.मी. च्या अंतरावर शाळा उपलब्ध करुन देणे.
- 10+2+ या शैक्षणिक स्तराला अनुसरुन राज्यांमध्ये अभ्यासक्रम राबविणे.
- मुलामुलींसाठी समान अभ्यासक्रमाची रचना करणे.

1.15 राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986

देशातील बदलत्या परिस्थितीत आर्थिक, व्यावसायिक व तांत्रिक क्षेत्रात सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापीत होण्यासाठी देशाला एका नव्या शिक्षण धोरणाची गरज होती.

या धोरणाची उद्दिष्ट्ये

a नैतिक मूल्यांची जोपासना करणे. a आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठी विद्यार्थ्यांची मनोधारणा निर्माण करणे. a वैज्ञानिक दृष्टिकोन व लोकशाही वृत्तीची जोपासना करणे. a शारीरिक-मानसिक-बौध्दिक व सौंदर्यदृष्टीचा व्यक्तिमत्व विकासासाठी उपयोग करणे. a सर्वधर्मसमभाव व सामाजिक न्यायाची तत्वे अंगी बाळगणे.

वैशिष्ट्ये

a संविधानाप्रमाणे राष्ट्रीय शिक्षण पध्दतीनुसार शिक्षण. a शिक्षणाची समान संधी व समानतेकरिता शिक्षण. a विविध स्तरावर शिक्षणाची पुनर्रचना. a राष्ट्रीय उत्पन्नाच्या 6% शिक्षणात गुंतवणूक. a प्रौढ शिक्षण व निरंतर शिक्षणावर भर. a शिक्षणाचा भूतकाळ व भविष्यकाळ यात मेळ. a राष्ट्रीय साधन संपत्तीचा योग्य विकास व वाढ. a समाजभिमूख शिक्षणपध्दती.

या राष्टीय धोरणातील काही नाविन्यपूर्ण बाबी

a खडू-फळा मोहीम. a खेळ साहित्य व खेळणी. a सर्व हंगामांना योग्य अशा वर्ग खोल्या. a प्राथमिक विज्ञान संच पेटी. a राष्ट्रीय अभ्यासक्रम. a पदवी व नोकरी यातील फारकत व मनुष्यबळाचे नियोजन. aनवोदय विद्यालय.

1.16 सुधारीत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1992

आचार्य राममूर्ती व जनार्दन रेड्डी या समितीने 1986 च्या मूळ राष्ट्रीय शेक्षणिक धोरणाचे पुनर्वलोकन करुन समाजाच्या गरजानुसार मनुष्यबळ पुरविण्यासाठी निरंतर कौशल्य विकास या बाबींवर लक्ष केंद्रित करण्याचे सुचविले. तसेच खालीलप्रमाणे काही महत्त्वाचे बदल सुचविण्यात आले.

- संपूर्ण देशाला + 2 स्तर शालेय शिक्षणाचा अविभाज्य घटक म्हणून स्वीकारण्याची शिफारस.
- संस्कृत व अन्य प्राचीन भाषेच्या अभ्यासासाठी आणि विकासासाठी एक स्वतंत्र आयोगाची

स्थापना करणे.

- अनुसूचित जातीच्या शिक्षणामध्ये विस्तार करण्यासाठी जवाहर रोजगार योजनेच्या सुविधांचा वापर करणे.
- 14 वर्षे वयापर्यंतच्या मुलांना समाधानकारक गुणवत्तेचे मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचे ध्येय ठेवणे. त्यासाठी राष्ट्रीय चळवळ उभारणे.
- 1985 मध्ये स्थापन झालेल्या इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या सहकार्याने सर्व राज्यांमध्ये मुक्त विद्यापीठ स्थापण्यात सहकार्य करणे.

1.17 राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2001

आठव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा पुनर्विचार 1986 च्या राष्ट्रीय धोरणातील तरतूदीनुसार करण्यात आला. 1991 च्या नवीन आर्थिक सुधारणांमुळे तसेच संगणक क्रांती, ज्ञानाचा स्फोट, विज्ञान तंत्रज्ञानातील प्रगती या बदलत्या परिस्थितीमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात व अभ्यासक्रमात अनुकूल बदल करण्याची गरज भासू लागली. हा अभ्यासक्रमातील बदल प्राथमिक, माध्यमिक, विद्यापीठ अशा तिन्ही स्तरांवर सुधारण्याची प्रक्रिया सुरु झाली. यावर राष्ट्रीय पातळीवर चचा होऊन, 'NCERT नॅशनल करिकूलम फमवर्क फॉर स्कूल एज्युकेशन' असे राष्ट्रीय शिक्षण धोरण 2001 मध्ये या अभ्यासक्रमाचे पुनर्मुद्रीकरण करण्यात आले. हा अभ्यास आराखडा खालील पाच प्रकरणांमध्ये विभागलेला होता.

1) संदर्भ व विचारार्थ बाबी. 2) प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमाचे संघटन. 3) उच्च माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमाचे संघटन. 4) मूल्यमापन. 5) कार्यपध्दतीचे व्यवस्थापन.

वरील शालेय शिक्षण राष्ट्रीय अभ्यासक्रमानुसार खालील बदल करण्यात आले.

1) पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तके. 2) सर्व स्तरावर किमान अध्ययन क्षमता. 3) माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर सहामाही अभ्यासक्रम. 4) सहामाही परीक्षेचा अवलंब 5 वी ते 12 वी साठी स्वीकारला. 5) विद्यार्थ्यांना उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण जाहीर न करणे. 6) 10 वी बोर्डाची परीक्षा रद्द करणे. 7) तासिकाचा कालावधी ठरविणे इत्यादी.

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005

या आरखड्यांमध्ये खालील मुद्दे सुचविण्यात आले.

1) बदलत्या सामाजिक, आर्थिक व वैज्ञानिक परिस्थितीनुसार उपलब्ध संसाधनाचा शोध घेऊन उपलब्ध पर्यायामधून योग्य पर्याय निवडणे. 2) लोकशाहीला अनुसरुन अभ्यासक्रमाची सांगड घालणे. 3) घोकमपट्टी अध्ययनापेक्षा उपयोजित दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे. 4) शाळाबाह्य जीवनाशी ज्ञानाचा संबंध जोडणे. 5) पाठ्यपुस्तका बाहेरील जगाची माहिती व्हावी, यासाठो जाणीवपूर्वक अभ्यासक्रम समृध्द करणे. 6) परीक्षा पध्दती व मूल्यांकन पध्दती अधिक लवचिक बनविणे व त्यांची सांगड वर्गाशी घालणे.

अशाप्रकारे 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005' कृती प्रधान, कार्य केंद्रीय व सहभागात्मक ठरला.

1.18 शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपाययोजना

1) **खडू–फळा मोहीम–**(Operation Black Board) **:-** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 मध्ये या नाविन्यपूर्ण योजनेचा समावेश केला गेला व 1987-88 साली या योजनेची सुरुवात झाली. भारतामधील सर्व प्राथमिक शाळांना किमान महत्त्वाच्या सुविधा पुरविण्याचे लक्ष्य ठरविण्यात आले. जसे की,

I शिक्षक-एक शिक्षकी, प्रामुख्याने ग्रामीण भागातील शाळांमध्ये आणखी एका सहशिक्षकाची नेमणूक करावी. दोन्हीपैकी एक स्त्री शिक्षिका असावी.

II वर्गखोल्या- किमान दोन पक्क्या वर्ग खोल्या बांधल्या जाव्यात.

III साहित्य- ● शिक्षकांसाठी पाठ्यपुस्तक, मार्गदर्शिका इ.

● नकाशे, पृथ्वी गोल, तक्ते इ.

● खेळणी, ठोकळे, चित्रे, प्राणीजगत, मोजपट्ट्या टेप इ.

2) **माध्यान्ह भोजन, योजना :** पटनोंदणी वाढवणे, उपस्थिती वाढविणे व गळतीचे प्रमाण कमी करणे. याचबरोबर प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांची पोषणस्थिती सुधारणे यासाठी केंद्र शासनाने 15 ऑगस्ट 1995 मध्ये 'माध्यान्ह भोजन योजना' सुरु केली. वर्ष 2008-09 मध्ये 'राष्ट्रीय माध्यान्हभोजन योजना' या नावाखाली उच्च प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांकरिता या योजनेचा विस्तार करण्यात आला. या योजनेसाठी केंद्र व राज्य यांच्यात खर्चाचे वाटप 75:25 असे आहे.

3) **जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम** (District Primary Education Programme- DPEP) हा कार्यक्रम पूर्णत: केंद्रपुरस्कृत असून याची सुरुवात 1994 साली झाली. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हानिहाय नियोजन, विकेंद्रीत व्यवस्थापन, सहभागी प्रक्रिया इ. वर भर देण्यात आला. मुली, अनुसूचित जाती व जमाती या घटकांकडे लक्ष पुरविण्यात आले. या कार्यक्रमानुसार शाळा गळतीचे प्रमाण 10% पेक्षा कमी करणे, अध्ययनक्षमता किमान 25% ने वाढविणे. मुले व मुली आणि प्रगत व मागास सामाजिक गटातील शिक्षणाचे अंतर 5% पेक्षा कमी करणे इ. लक्ष्ये निर्धारित करण्यात आली.

4) **शिक्षाकर्मी प्रकल्प** : शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी काही विशिष्ट 'प्रदेश केंद्रित योजना' बाह्य निधीच्या सहाय्याने राबविण्यात आल्या. त्यापैकी राजस्थानमध्ये मागास खेड्यांमधील मुलींच्या शिक्षणासाठी शिक्षाकर्मी प्रकल्प राबविण्यात आला. शिक्षाकर्मी म्हणून गावातील महिलेची नेमणूक केली जाई.

5) **सर्व शिक्षा अभियान** : या अभियानाला 2001 मध्ये सुरुवात झाली. या अभियानाचे ध्येय पुढीलप्रमाणे.

I सन 2010 पर्यंत 6 ते 14 वयोगटातील सर्व मुलांना उपयुक्त आणि दर्जेदार प्राथमिक

शिक्षणाची सुविधा पुरविणे.

II समाजाच्या, वस्तीच्या आणि स्थानिक लोकांच्या शालेय व्यवस्थापनातील सक्रिय सहभागाद्वारे सामाजिक, प्रादेशिक आणि लिंगभावात्मक भेदभाव कमी करणे.

6) उद्दिष्ट्ये

• 2003 पर्यंत सर्व मुले शाळेत, शिक्षण हमी केंद्रात, पर्यायी शाळेत अथवा शाळेत परत आणणाऱ्या व्यवस्थेत दाखल करणे. • 2007 पूर्वी सर्व मलांना 5 वर्षांचे प्राथमिक शालेय शिक्षण देणे. • 2010 पूर्वी सर्व मुलांना 8 वर्षांचे प्राथमिक शालेय शिक्षण देणे. • समाधानकारक दर्जेदार प्राथमिक शिक्षणावर तसेच जीवनासाठीच्या शिक्षणावर भर देणे. • 2007 पूर्वी प्राथमिक शिक्षणातील सर्व स्तरांवरील उणिवा दूर करुन सामाजिक तसेच लिंगभेद दूर करणे. • 2010 पर्यंत सर्व मुला-मुलींना शाळेत टिकवून ठेवणे. • 2010 पर्यंत प्राथमिक शिक्षणाची सर्वांसाठी समान पातळी निर्माण करणे.

सर्व शिक्षा अभियान या केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त भागीदारीने सुरु केलेल्या कार्यक्रमाची पंचायत राजसंस्था, शिक्षण समिती, पालक-शिक्षक संघ, माता-पालक संघ, आदिवासी स्वायत्त संस्था, वस्ती पातळीवरील संस्था इत्यादीच्या मदतीने यशस्वीरीत्या अंमलबजावणी होत आहे.

7) **शैक्षणिक हक्क कायदा** : 4 ऑगस्ट 2009 साली 6 ते 14 वयोगटातील सर्व मुलांना मोफत व अनिवार्य शिक्षणाचा हक्क देणारे विधेयक संसदेने मंजूर केले. राज्यघटनेमध्ये 86 व्या घटनादुरुस्तीद्वारे अनुच्छेद '21 अ' चा समावेश करुन या कायद्याला घटनात्मक आधार प्रदान करण्यात आला. 1 एप्रिल 2010 पासून संपूर्ण देशभर हा कायदा अंमलात आणण्यास सुरुवात झाली.

या कायद्यातील महत्त्वपूर्ण तरतूदी

- शैक्षणिक वर्षाच्या कोणत्याही दिवसांपासून शाळेमध्ये प्रवेश घेण्याचा अधिकार.
- प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही विद्यार्थ्याला कुठल्याही कारणास्तव शाळेतून कमी करता येणार नाही. तसेच कोणतीही बोर्ड परीक्षा उत्तीर्ण होण्याचे बंधन लादले जाणार नाही.

- प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर (8 वी नंतर) 'प्राथमिक शिक्षण पूर्तता प्रमाणपत्र' प्रत्येक विद्यार्थ्याला देण्यात येईल.
- सर्व खाजगी शाळांमध्ये समाजातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांच्या मुलांना 25% आरक्षणाची तरतूद असेल.
- शिक्षकांच्या नेमणुकीबाबत योग्य शैक्षणिक अर्हता पाळण्याचे बंधन असेल. तसेच शाळेमध्ये शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर 1:30 असे असावे.
- शाळेतील पायाभूत सुविधा जसे की, क्रीडांगण, वर्ग खोल्यांची स्थिती इ. मध्ये विहीत काळादरम्यान सुधारणा घडवून आणावी.
- परिसर शाळा ही संकल्पना राबवण्यावर विशेष भर देण्यात येईल. मुलांना प्राथमिक शाळा 1 कि.मी. अंतराच्या आतमध्ये तर उच्च प्राथमिक शाळा (6 ते 8 वी) 3 कि.मी. अंतराच्या आतमध्ये उपलब्ध असावी.
- शाळेमध्ये प्रवेश देण्यसाठी प्रवेश प्रक्रिया पारदर्शक असावी, कोणत्याही प्रकारच्या प्रवेश परीक्षा, पालकांच्या व मुलांच्या मुलाखती, डोनेशन घेण्यावर मनाई करण्यात आली.
- कोणत्याही मुलाला शारीरिक शिक्षा किंवा शिक्षेच्या स्वरुपात मानसिक त्रास देण्यावर बंदी.
- शालेय व्यवस्थापन समितीमध्ये स्थानिक पातळीवरील निर्वाचित सदस्य, पालक यांचा समावेश.
- शिक्षकांना बिगर शैक्षणिक कामे करण्यास लावू नयेत.
- शिक्षकांना खाजगी शिकवणी वर्ग चालवता येणार नाहीत.
- अधिकाराच्या अंमलबजावणीचा खर्च केंद्र व राज्य शासन दोन्ही मिळून करतील.

अशाप्रकारच्या विविध शैक्षणिक योजना, धोरणे, प्रकल्प व कायद्यांमुळे भारतात साक्षरतेच्या प्रमाणात बरीच वाढ झालेली दिसून येते. 1951 मध्ये साक्षरतेची टक्केवारी 16.7 टक्के होती. 1951 मध्ये साक्षरतेचे प्रमाण 36 टक्के होते. 2001 मध्ये साक्षरतेचे प्रमाण 64.8 टक्के झाले तर 2011 मध्ये हे प्रमाण 74 टक्के पर्यंत वाढले.

2010-11 दरम्यान 43 जिल्ह्यांमध्ये 'साक्षर भारत' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत 49.93 लाख निरक्षर लोकांना साक्षर करण्यासाठी 11,996 ग्रामपंचायतींमध्ये प्रौढशिक्षण केंद्राची 2011 मध्ये स्थापना करण्यात आली. अशा प्रकारे साक्षरतेचे प्रमाण भारतात वाढत आले आहे. आता 2013 पर्यंत हे प्रमाण 74.04% एवढे आहे.

पुरुष साक्षरता प्रमाण 82.14% व महिला साक्षरता प्रमाण 65.46%

आज सरकारने केवळ मुलांसाठीच नाही तर महिला व ज्येष्ठांसाठी ही साक्षरता मोहिम हाती घेतली आहे. आज गावोगावी शाळा उभ्या आहेत. मुलींच्या शिक्षणासाठी फो माफोच्या योजना राबवल्या जात आहेत. तसेच दिवसा काम करणाऱ्यांसाठी रात्रशाळा व महाविद्यालयाची देखील सोय केली आहे. त्यामुळेच निरक्षरता दूर करण्याची जबाबदारी फक्त सरकारची नाही तर प्रत्येक नागरिकाची आहे. केंद्र सरकारने सर्वांसाठीच शिक्षणाचा कायदा केला आहे. त्याच्या अंमलबजावणीतून देशात 100 % साक्षरतेचे स्वप्न साकार होईल.

1.19 भारत सरकारच्या रोजगार निर्मितीच्या योजना.

1) जवाहर रोजगार योजना – दारिद्र्य निर्मूलन, रोजगार निर्मिती व तळागाळातील जनतचा प्रशासनात प्रत्यक्ष सहभाग ही संकल्पना साकारण्यासाठी सरकारने टाकलेले एक पाऊल महत्त्वाचे आहे. राष्ट्रीय पातळीवर या योजनांना प्राधान्य देऊन ग्रामपंचायतीना अधिकार व जबाबदारी देण्यात आली. पुढे 1999-2000 पासून ही योजना अधिक व्यापक अशा जवाहर ग्रामसमृध्दी योजनेत परावर्तीत केली गेली.

2) जवाहर ग्रामसमृध्दी योजना – ग्रामीण भागात टिकावू साधनसंपत्तो निर्माण करणे आणि ती करत असताना ग्रामीण बेरोजगारांना रोजगार मिळवून देणे. या योजनेचा हाच उद्देश होता. त्या शिवाय आश्वासक रोजगार योजना यांचा स्वतंत्र अभ्यास करुन ही योजना फक्त ग्रामस्तरावर राबविण्याचा निर्णय घेण्यात आला व त्याला "जवाहर ग्रामसमृध्दी योजना" असे नाव देण्यात आले. जवाहर ग्रामसमृध्दी योजना ग्रामस्तरावर राबवण्यात येत असल्याने तिच्या 20,000/- रुपये पर्यंतच्या खर्चास मान्यता देणारे अधिकार ग्रामपंचायतीनाच देण्यात आले आहेत.

3) संपूर्ण गामीण रोजगार योजना – आश्वासक रोजगार योजना व जवाहर ग्रामसमृध्दी योजना यांची वैशिष्ट्ये एकत्र करुन ग्रामीण भागातील बेरोजगारांना रोजगार मिळवून देणे, त्याचप्रमाणे त्यांना

अन्नधान्यांची शाश्वती मिळवून देणे आणि ग्रामीण भागात टिकावू स्वरुपाची सामहिक सामाजिक आणि आर्थिक साधनसामग्री निर्माण करणे. असा उदेश असतानाही ही योजना 2001 पासून देशातील सर्वच जिल्ह्यात राबवली जात आहे. केंद्र व राज्य सरकार 75.25 या प्रमाणात खर्च करतात. मजुरीच्या बदल्यात धान्य देण्याची व्यवस्था या योजनेत होती सन 2008 साली 270 कोटी रुपये या योजनेवर खर्च करुन 3 कोटी मनुष्य दिवस रोजगार उपलब्ध करुन दिला गेला. पुढे महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना आता सर्वत्र लागू केल्यामुळे 2008-09 पासून ही योजना बंद करण्यात आली.

4) ग्रामीण विकासाचा धडक कार्यक्रम – ही योजना 1971 मध्ये सुरु झाली होती. तीन वर्षासाठी ही योजना होती प्रत्यक्ष रोजगार देऊन पूर्ण बेरोजगारांना रोजगार देणे व ग्रामीण भागात टिकावू साधनसंपत्तो निर्माण करणे असा या योजनेचा उद्दश होता.

5) प्रायोगिक तत्वावरील प्रकर्षीत ग्रामीण रोजगार – सन 1972 ते 1976 मध्ये वेगवेगळ्या आर्थिक व भौगोलिक परिस्थिती असलेल्या भागात 15 गट तयार केले व एक कृती कार्यक्रम होता निवडक क्षेत्रातील रोजगारातील वैशिष्ट्य समजावून घेणे हा उद्दश होता.

6) कामासाठी अन्न कार्यक्रम – केंद्रशासनाच्या अनुदानावर ही योजना असून 1976-97 मध्ये ग्रामीण भागात रोजगार निर्मिती बरोबरच जादा तयार झालेल्या धान्याचा उपयोग करण्यासाठी रोजगाराचा मोबदला पैशा ऐवजी धान्यात देणे असा या योजनेत हेतू होता व हो योजना चांगली यशस्वी झाली. अन्नधान्याच्या किंमतीत स्थिरता राहिली व मजुरांना समान वेतन ही मिळाले.

7) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम – बहुआयामी व बहुक्षेत्रिय असा ग्रामीण विकास कार्यक्रम दारिद्र्य रेषेखालील कुटुंबा करीता राबविण्यात आला, लघु शेतकरी विकास संस्था सिमांत शेतकरी व शेतीविषयक विकास कार्यक्रम आणि समान क्षेत्रिय विकास कार्यक्रम इ. विविध क्षेत्रात कार्यक्रम होते. मात्र त्यांच्यात एकसंघता नव्हती ती निर्माण करुन 1978 मध्ये (आय. आर .डी. पी) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम राबविण्यात आला, 2 ऑक्टोबर 1980 नंतर देशभर त्याचा विस्तार वाढवला गेला.

8) ग्रामीण भूमिहिन रोजगार हमी कार्यक्रम – ग्रामीण भागातील भूमीहिनांसाठी रोजगाराच्या संधी वृध्दींगत करण्यासाठी 1983 मध्ये ही योजना सुरु करण्यात आली. प्रत्येक भूमिहीन शेतकरी कुटुंबातील कमीतकमी एका व्यक्तीला वर्षातून कमीत कमी 100 दिवस रोजगार पुरवणे हा उद्दश होता. केंद्रशासनाची 100% अशी पुरस्कृत योजना असन अनुसूचित जाती-जमातीना योजनेत प्राधान्य देण्यात आले या योजनेतून ग्रामीण भागातील रस्ते जोडणी, भूमी विकास, लघू, जलसिंचन प्रकल्प सामाजिक वनीकरण शाळा उभारणी इत्यादी मधन रोजगार निर्माण करुन देण्याची योजना आखली गेली.

9) ग्रामीण युवा स्वयरोजगार प्रशिक्षण योजना -Training of Rural Youth for Self Employment (TRYSEM) 15 ऑगष्ट 1979 रोजी ग्रामीण भागातील तरुणांना स्वंयरोजगारासाठी आवश्यक कौशल्य व प्रशिक्षण देण्यासाठी ही योजना सुरु केली. प्रत्येक गटातील 40 तरुण निवडून त्यांना मलभूत स्वरुपाचे कौशल्य व प्रशिक्षण प्राप्त होईल असे शासनाचे मत होते, कारण ग्रामीण भागातील तरुणांना रोजगारासाठी प्रशिक्षण देणारी ही सर्वांत मोठी योजना होती. प्रतीवर्षी जवळजवळ 2 लाख तरुणाना प्रशिक्षण त्यामध्ये दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील तरुणानां प्राधान्य देणे शेती व शेतीस जोड व्यवसायाचे प्रशिक्षण देणे. 18 ते 35 वयोगटातील मुलांमुलींना ही योजना होता. यामध्ये ग्रामीण महिलांना, कारागीरांना, अपंगाना, अनुसूचित जाती-जमातीच्या लोकांसाठी आरक्षण ठेवले होते. प्रशिक्षण झाल्यानंतर स्वयं रोजगारासाठी बँकेडून कर्जाची शिफारस कली जात होती.

10) माजो सैनिक स्वयंरोजगार योजना– सैन्य दलातील निवृत्त सैनिकांना त्यांच्या जन्म गावात पुन:स्थायिक होण्याकरीता 1983 मध्ये हा कार्यक्रम सुरु करण्यात आला. स्वयंरोजगार निर्मितीसाठी त्यांना प्रशिक्षण व आर्थिक मदत केली जाते.

11) सुशिक्षीत बेरोजगार तरुणांकरीता स्वयंरोजगार कार्यक्रम –कमी उत्पन्न असणाऱ्या कुटुंबातील तरुणाना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी 15 ऑगष्ट 1983 मध्ये ही योजना सुरु झाली. हा कार्यक्रम प्रामुख्याने उदयोग, सेवा व व्यवसाय या क्षेत्रावर केंद्रीत केलेला होता. या मध्ये लाभार्थी अनुसूचित जाती-जमातील असावेत असा हेतू होता.

12) शहरी गरीबांसाठीचा स्वयंरोजगार कार्यक्रम – मोठी शहरे, अर्ध महानगरे ज्यांचा समावेश IRDP मध्य होत नाही. अशा शहरांसाठी हा कार्यक्रम असन ज्यांचे उत्पन्न प्रतिवर्षी 7200/- पेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या कुटुंबाला लाभार्थी म्हणून घेतले जाते.

13) ग्रामीण कारागीरांना सुधारीतऔजारांचा पुरवठा –ग्रामीण कारागीरांना आधुनिक अवजारांचा पुरवठा करणे हा IRDP चा एकभाग होता 1992 मध्ये हा कार्यक्रम काही जिल्ह्यामध्ये सुरु करण्यात आला. परंतु या योजनेचा विस्तार देशभर करण्यात आला. ग्रामीण कारागीरांना अत्याधुनिक साहित्य पुरवून कारागिरांच्या उत्पादनाचा दर्जा उंचावण्यास मदत करणे. ज्यामुळे त्यांची कार्यक्षमता वाढवून उत्पन्न वाढण्यास मदत होइल असा या योजनेचा उद्देश होता. 1 एप्रिल 1999 पासून ही योजना सुवर्णजयंती ग्रामस्वराज योजनेत विलिन करण्यात आली.

14) आश्वासीत रोजगार योजना – 2 ऑक्टोबर 1993 मध्ये देशातील 261 जिल्ह्यात ही योजना लागू करुन तिचा विस्तार दुष्काळ प्रवण क्षेत्र व वाळवंट विकास कार्यक्रमातील गटामध्ये केला. ग्रामीण भागातील प्रत्येक गरजू व्यक्तीस व प्रतिकटुंब दोन व्यक्तीना वर्षातून 100 दिवस रोजगार उपलब्ध करुन

देणे हा या योजनेचा उद्देश होता 25 सप्टेंबर 2001 पासून संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेत विलीनीकरण करण्यात आले.

15) प्रधानमंत्री राजगार योजना – 1 एप्रिल 1994 पासून ही योजना विस्तारीत स्वरुपात देशभर सुरु झाली. रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी छोट्या-छोट्या उदयोगामाफत प्रतिवर्षी 10 लखापेक्षा जास्त रोजगार निर्माण करण्यावर या योजनेत भर दिला, 15 ऑगष्ट 2008 पासून प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात ही योजना विलिन करण्यात आली.

16) बालक संगोपन क्रिया - ग्रामीण भागातील महिला व बालक विकास योजने अतर्गत हा कार्यक्रम असून कामाच्या ठिकाणी पाळणाघर निर्माण करणे, साक्षरता केंद उभारणे, स्त्रिया व बालक यांच्या शिक्षणाची सोय करणे. त्यांचे आरोग्य, पोषण, मुलांच्या आरोग्यावर खास लक्ष देणे, अपंग मुलांना मदत असा या योजनेचा हेतू होता केंद्र व राज्य सरकार 50:50% खर्च करणार आहेत.

17) स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना (SGSY) - सर्वात व्यापक योजना 1 एप्रिल 1999 ला सुरु झाली व आजपर्यंत सुरु असणारी योजना आहे. गामीण विकासासाठी सुरु असणाऱ्या सहा योजनांचे एकत्रिकरण करुन ही व्यापक योजना सुरु केली.

दारिद्र्यातून कुटुंबाना बाहेर काढण्यासाठी व्यापक तरतूदी या योजनेत आहेत सूक्ष्म उद्योग स्थापन करणे, स्वयंसहाय्यता बचत गट निर्माण करणे. सध्या राष्ट्रीय पातळीवर कार्यरत असणारी ही एकमेव स्वयं: रोजगार योजना आहे. आज अखेर लाखो लोकांना वैयक्तिक कर्जे व दहा हजारापेक्षा जास्त स्वयंसहाय्यता गटांना मदत या योजनेतून देण्यात आली.

18) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा)– ग्रामीण भागातील प्रत्येक काम करण्यास इच्छुक कुटुंबाला आपली उपजिविका भागवण्यासाठी त्यांना संधी मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 1977 मध्ये मागेल त्याला काम या न्यायाप्रमाणे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा केला. राज्याच्या या योजनेचे यश पाहून केंद्र शासनाने देशभर ही योजना लागू केली. 7 सप्टेंबर 2005 रोजी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा अभिसुचित केला व 2 फब्रूवारी 2006 पासून मनरेगा कायद्याची अंमलबजावणी सुरु झाली. सध्या देशातील 614 जिल्ह्ये 2.65 लाख ग्रामपंचायतीचा या योजनेत समावेश होतो. गांधीजींच्या ग्रामीण स्वराज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी या योजनेचे नाव "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना" त्याचे संक्षिप्त नाव "मनरेगा" हा कार्यक्रम जगातील सर्वात मोठा रोजगार निर्मिती व उपजीविकेची संधी निर्माण करणारा कार्यक्रम आहे. या योजनेतून ग्रामीण भागातील असंघटित कामगारांना उपजीवीकेचे शाश्वत साधन उपलब्ध करुन देणे हा आहे.

याकरीता ग्रामीण कुटुंबांना मनरेगा अंतर्गत एका आर्थिक वर्षामध्ये किमान 100 दिवसांचा रोजगार उपलब्ध करुन देण्याची तरतुद करण्यात आली आहे. तसेच ग्रामीण जीवनाचा विकास होण्याकरीता मनरेगा माफत शाश्वत पायाभूत सुविधांचा विकास करण्याचे ध्येय निर्धारित करण्यात आले आहे. जलसंवर्धन, दुष्काळ निवारण, वनीकरण, जलसिंचन कालवे, फळ लागवड, जमीन सुधारणा, पुरव्यवस्थापन, ग्रामीण रस्ते जोडणी, पारंपारिक जलसाठ्याचे नूतनीकरण, इंदिरा आवास योजना इ. कामे योजनेतून होतात. या योजनेतून 1200 कोटी मानवी कार्य दिवसांचा रोजगार उपलब्ध झाला. सरासरी दरवर्षी पाच कोटी कुटुंबाना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला. स्त्रियांचा सहभाग या योजनेत महत्त्वाचा 47% एवढा आहे तर मागासवर्गीय जाती व जमाती यांचे मनरेगा मधील योजनादान हे 51% इतकेलक्षणीय आहे.

1.20 ग्रामीण गृहनिर्माण :–

अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मलभूत गरजा मानल्या जातात उत्तम दर्जाचे घर असणे म्हणजे चांगले जीवनमान व्यक्ती व देशाच्या समृध्दीचे प्रतिक असते. त्यामुळे विकासाची घर ही आवश्यकता ठरते. स्वातंत्र्यानंतर भारतात घरांचा प्रश्न गंभीर आहे. त्यातही शहरी व ग्रामीण असा भेदभाव मोठा आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून शासनाने गृहनिर्माण राष्ट्रीय गृहनिर्माण धोरण राबविल्याचे दिसते.

सन 2000 सालापर्यंत देशातील बेघरांचा प्रश्न पूर्णपणे सोडवण्यासाठी व ग्रामीण भागातील गृहनिर्माण चालना देण्यासाठी 1994 ला राष्ट्रीय गृहनिर्माण धोरण स्विकारले व त्यामधून ग्रामीण कामगार, अनुसुचित जाती-जमाती, कारागिरांना घरासाठी जागा, आर्थिक मदत, कर्जे व अनुदान देणे ग्रामीण गरिबांना घरासाठी बँकाकडून कर्जे देणे घरांचे नूतनीकरण, विस्तार व आधुनिकीकरणासाठी वित्त पुरवठा, मानवी वसाहतींचा आराखडा घरांची रचना स्थानिक परिस्थिती आर्थिक घटक यांचा विचार करुन त्या त्या भागात उपलब्ध असणारा कच्चा माल व बांधकाम साहित्याचा योग्य वापर करुन घरे देणे, घर बांधणे, घरात धूरविरहित चुली, प्रसाधन गृहे व अक्षय ऊर्जेचा वापर करण्यास प्रोत्साहन या बाबी धोरणात होत्या.

सन 1998 मध्ये केंद्र सरकारने राष्ट्रीय गृहनिर्माण व निवास धोरण जाहीर करुन सर्वांसाठी घर ही संकल्पना मांडून दरवर्षी वीस लाख नवीनघरांची निर्मिती करुन घर बांधणीचा कृती कार्यक्रम तयार केला व अधिकाधिक गरिबापर्यंत पोहोचण्याचे ध्येय ठेवण्यात आले.

1.21 दळवळण

ग्रामीण रस्ते व सामाजिक आर्थिक विकास :– रस्ते हा पायाभूत सुविधाच्या विकासासाठी महत्त्वाचा घटक असतो. ग्रामीण भागाच्या सामाजिक पगतीमध्ये रस्त्याच्या विकासाने महत्त्वाची जबाबदारी पार पाडली आहे. 1989 साली केंद्रीय रस्ते संशोधन संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार मुख्य रस्त्याला जोडून असणाऱ्या खेड्यांचा विकास जलद होतो. तर रस्त्यापासून लांब असणाऱ्या खेड्यांचा विकास कमी होतो. त्यामुळे ग्रामीण रस्ते विकास दारिद्र्य निर्मूलन, रोजगार निर्मिती, शिक्षण, आरोग्य व एकूणच अर्थव्यवस्थेचा विकास या बाबी रस्त्याच्या सुविधेवर अवलंबून असतात. भारतात सध्या 4.42 दशलक्ष कि.मी. पेक्षा जास्त रस्त्याचे जाळे आहे. त्यामुळे जगात भारताचा दुसरा क्रमांक लागतो. नोव्हेबर 2011 पर्यंत चौपदरी रस्त्यांची लांबी 14500 कि.मी. होती. तर राष्ट्रोय महामार्ग 70,938 कि.मी.राज्यमहामार्ग 1,54,522 कि.मी. इतर रस्ते 3,88,4136 कि.मी. इतक्या लांबीचे आहेत.

1) राष्ट्रीय ग्रामीण रस्ते विकास समिती :– भारत सरकारने सर्व खेड्याना रस्त्याने जोडण्यासाठी 2000 साली राष्ट्रीय ग्रामीण रस्ते विकास समितीची स्थापना केली या समितीने केलेल्या अभ्यासानुसार 2,90,480 खेडी पक्क्या रस्त्याच्या जोडणी पासून वंचित होती. त्यासाठी 11,62,000 कि.मी. लांबीच्या रस्त्याची अवस्था व्यक्त कली त्यासाठी विविध टप्पे करुन हे काम सुरु केले. केंद्रसरकारने या सर्व कामात निधी जमा करणे, सुसुत्रता आणणे यासाठी पुढील योजना हाती घेतली .

2) प्रधानमंत्री ग्रामसडक योजना :– केंद्रसरकारने प्रत्यक्ष निधीद्वारे रस्त्याचा विकास व थेट रस्ते जोडणे यासाठी ही योजना महत्त्वाची ठरली. देशातील दुगम घाट 500 पेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या वस्ती, डोंगराळ पदेश, वाळवंटी भाग, आदिवासी भाग या सर्वप्रदेशात रस्त्यांची जोडणी करण्यासाठी निवडक 60 आदिवासी जिल्ह्ये व 9 मागासलेले जिल्ह्ये यानां प्राधान्य देऊन ही योजना सुरु केली. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या अंदाजानुसार 1,60,000 वस्त्यांना जोडणाऱ्या रस्त्यांची गरज हेाती त्यामध्ये जुन्या रस्त्यांचे नतनीकरण करणे. व नवीन रस्ते निर्माण करणे. असा सहभाग होता या योजनेच्या वैशिष्ट्ये म्हणजे विक्रेंदीत नियोजन, लोक प्रतिनिधी माफत तपासणी नागरिकांना माहिती फलक रस्त्यांचा दर्जा तपासणे या गोष्टी समाविष्ट होतात.

3) भारत निर्माण योजने अंतर्गत ग्रामीण रस्ते विकास :– ग्रामीण रस्ते दरध्वनी जोडणे, जलसिचन, पाणीपुरवठा गृहनिर्माण व विद्युतीकरण या सर्वांचा समावेश भारत निर्माण योजनेत केला गेला. डोंगराळ भाग, वाळवंटी व अदिवासी भागात 500 लोकवस्तीच्या भागात रस्ते करणे व 1000 लोकसंख्येपेक्षा जास्त

असणाऱ्या इतर खेड्यांना जोडणे, टिकावू रस्ते करणे अशी योजना ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारी होती रस्त्यांची लांबी, येणारा खर्च व त्यासाठी निधी उपलब्ध करुन देणे असा उद्देश या योजनेचा होता 2012 पर्यंत ठरवून दिलेली कामे या योजनेत पूर्ण झाली, ग्रामीण भागत याचा चांगला फायदा झाला.

4) राष्ट्रीय महामार्ग विकास प्रकल्प :– विविध राज्यानां व महत्त्वाच्या स्थळांना जोडणाऱ्या रस्त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळाली. सध्या देशात 70,934 कि.मी लांबीचे राष्ट्रीय महामार्ग आहेत यांच्या विकासाचे व व्यवस्थापनाचे कार्य राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, राज्य सार्वजनिक बांधकाम विभाग आणि सीमा रस्ते संघटना यांच्या माफत केले गेले व आज अखेर 7 टप्प्यांमध्ये उत्तर दक्षिण पूर्व - पश्चिम म्हणजे मुंबई दिल्ली चेन्नई , कलकत्ता असा कॉरीडोर तयार केला. उत्तरला श्रीनगर, दक्षिणेला कन्याकुमारी तर पूर्वेकडे सिलचर ते पश्चिमेला पोरबंदर असे महामार्ग उभा केले गेले त्यामधून महत्त्वाची बंदरे आर्थिक ठिकाणे राज्यांच्या राजधान्या ही जोडले गेले आहेत. बांधा-वापरा हस्तातरीत करा या तत्त्वावर महामार्गाचे काम सुरु आहे.

1.22 जलमार्ग

मालवाहतुकीसाठी व त्यातही आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी जलमार्गाला फार महत्त्व आहे. देशात 14,500 किमी लांबीचा अंतर्गत जलमार्ग वाहतूकीसाठी आहे. गंगा, ब्रम्हपुत्रा त्याच्या उपनदया, गोदावरी, कृष्णा, त्यांचे कालवे नर्मदा, महानदी, तापी यांचे टप्पे यामधून अंतर्गत मालाची वाहतूक केली जाते यासाठी ''ईनलॅन्ड वॉटर वेज ऑथॉरीटी ऑफइंडिया'' व ''सेन्ट्रल ईनलॅन्ड वॉटर ट्रॉन्सपोर्ट कॉर्पोरेशन'' ची स्थापना सरकारने केली आहे.

भारताला सुमारे 7,517 कि .मी लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. भारताच्या किनारपट्टीवर 12 मोठी व जवळजवळ 200 लहान बंदरे आहेत. जगातील विविध देशाबरोबरचा माल वाहतूक व्यापार या बंदरामधून चालतो. देशात एकूण 140 जहाज वाहतूक कंपन्या आहेत व 707 जहाजे जलवाहतूक करतात भारत सरकारने व जहाज बांधणी मंत्रालयाने चैन्नई कोलकत्ता मुबई व विशाखपट्टणम येथे समुद्र विद्यापीठ सुरु केले असून भारत सरकारने सार्वजनिक क्षेत्रात आठ जहाज बांधणी केंद्रे सुरु केली आहेत व 19 खाजगी लहान मोठी जहाज बांधणी केंद्रे आहेत.

1.23 हवाईमार्ग

ब्रिटीशांनी भारतात प्रथम हवाई वहातूकीस सुरवात केली 1953 मध्ये एअर इंडिया व इंडियन एअरलाइन्स ही दोन महामंडळे स्थापन करण्यात आली. त्यानंतर हवाई वाहतुकीचा विकास झाला. सन 2011 च्या स्थितीनुसार एअर इंडियाकडे 162 विमाने होती त्यामध्ये नवीन 111 विमानांची भर पडली सध्या खाजगी अनेक कंपन्या विमान सेवा पुरवत आहेत.

पवनहंस हेलिकॉप्टर्स पुरविणारा देशातील सर्वात मोठा निगम होय. यांच्या वेगवेगळ्या प्रकारची 42 हेलिकॉप्टर्स असून तेल उद्योगास मदत व अतिदुर्गम प्रदेशाशी संपर्कासाठी याचा उपयोग होतो. जुन्या एअरपोर्ट कंपन्याचे एकत्रिकरण करुन 1 एप्रिल 1995 राजी एअरपोर्ट अथॉरिटी ऑफ इंडिया ची स्थापना करण्यात आली. सुरक्षित व कार्यक्षम हवाइ वहातूक सेवा पुरवणे वाहतुकीचे नियंत्रण याची जबाबदारी या कंपनीवर आहे.

आज देशात 15 आंतरराष्ट्रीय व 112 देशांतर्गत विमान तळावरुन हवाई वहातूक पार पाडली जाते. आज देशातील 13 विमानतळे खाजगी क्षेत्राकडे सोपवली असून दीर्घ मुदतोच्या भाडेपट्ट्याने घेतलेल्या या विमान तळांचे जागतिक दर्जाचे आधुनिकीकरण करणे व खाजगी गुंतवणूकदारांना या क्षेत्राकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न केला आहे.

1.24 टपालसेवा

भारतात एकूण 1,54,979 टपाल कार्यालय असुन जगातील कोणत्याही देशापेक्षा ही संख्या भारतात अधिक आहे व सर्वात महत्त्वाचे म्हणजे एकण कार्यालयापैकी 1,39,182 म्हणजे जवळजळळ 90% टपाल कार्यालये ग्रामीण भागात आहेत 7,176 लोकसंख्येमागे 1 टपाल कार्यालय असन स्वातंत्र्य पुर्व काळापासून दळणवळण टपाल सेवा महत्त्वाची होती. आज मोबाईल, इंटरनेट, व्हीडीओ कॉन्फरसिंग, इंटरनेट चॅटींग, ई-मेल,फक्स, यामुळ टपाल सेवा मर्यादित झाली आहे.

1.25 दरसंचार

मानवी जीवनातल्या प्रत्येक क्षेत्रामध्ये आज माहितो संप्रेषण तंत्रज्ञान क्षेत्राचा वापर महत्त्वपूर्ण ठरत आहे. 1948 साली दरध्वनी घनतेचे प्रमाण 0.02% होते. ते पुढील 50 वर्षात 1997 पर्यंत 1.92%

इतके वाढले. प्रथम संपूर्ण सार्वजनिक मालकी आसणारे दूरसंचार क्षेत्र 1991 नंतरच्या जागतिकीकरण व उदारीकरणाच्या धोरणामुळे प्रचंड विस्तारले गेले. परकीय व खाजगी क्षेत्राच्या प्रवेशामुळे 2012 पर्यंत दरध्वनी धारकांची संख्या 926.55 दशलक्ष एवढी झाली आहे. संपूर्ण सार्वजनिक मालकी आसणारे दरसंचार क्षेत्र 1991 नंतरच्या जागतिकोकरण व उदारीकरणाच्या धोरणामुळे प्रचंड विस्तारले गेले. संपूर्ण भारतभर असमान वाढ दूरदर्शनची आहे. ब्रॉडबँन्ड सेवाही सर्वात महत्त्वाची विस्तारीत असलेली सेवा होय. 2011 पर्यंत देशात 13.30 दक्षलक्ष ब्रॉडबँन्ड धारक आहेत. 20.99 दशलक्ष एवढी इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या आहे.

भारतात बिनतारी संदेश वहनाचे जाळे मोठे आहे, इंडियन टेलिग्राम 1855 मध्ये सन 2003 व 2006 मध्ये सुधारणा करुन वैश्विक सेवा अनिवार्य म्हणजे ग्रामीण व दुर्गम भागातील लोकांपर्यंत दूरसंचार सुविधा माफक आणि परवडणाऱ्या दरात उपलब्ध करुन देणे होय. सन 1999 नुसार सध्या परवानाधारक असलेल्या विविध दरसंचार सेवा पुरविणाऱ्या कंपन्यांच्या महसूलाचे एकत्रिकरण करुन त्याचा विनियोग वैश्विक सेवा अनिवार्यता कोषाला देतात.

1) नवीन दरसंचार धोरण 1999 :– देशातील सर्व खेड्यांना दरध्वनी आणि लघुगती सेवा पुरविणे. सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणांना इंटरनेट सवा पुरवणे दुर्गम भागात प्रतिघर टेलिफोन तरतूद व मोबाईल सेवा पुरवण्यासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे व अशी सेवा पुरवणाऱ्या कंपन्याचा ग्रामीण भागात माफक दरात सेवा उपलब्ध करुन देणे.

2) राष्ट्रीय टेलिकॉम पॉलिसी 2012 :– नागरिकांच्या सामाजिक, आर्थिक विकासासाठी भ्रमण ध्वनीचा एक साधन म्हणून वापर करणे हे या धोरणाचे ध्येय होय. याशिवाय ग्रामीण भागामध्ये खात्रीदायक व परवडण्या जोगी ब्रॉडबँन्ड सुविधा देण्यात आली आहे. ही सुविधा 2014 पर्यंत सर्व ग्रामपंचायतींना व सर्व गावे सर्व वस्त्यांना पोचवण्याचे लक्ष्य ठरवले गेले.

भारत सरकारने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर दरसंचार धोरणाचा विकास करण्यासाठी पुढील प्रकल्प हाती घेतले आहेत.

1) ग्रामीण विकासाकरीता रेडीओ 2) लघुग्रह सुचनात्मक दूरसंचार प्रयोग

3) समुदाय रेडीओ पुढाकार 4) बहुउद्देशीय सहभागात्मक विकास कार्यक्रम

याशिवाय ग्रामीण भागात दूरसंचारची व्याप्ती वाढवण्याकरीता एन, लॉग, अक्षया, ई गर्व्हनस ही सेवा जागृती या सारखे कार्यक्रम राबवले.

1.26 ग्रामीण पेयजल पुरवठा व स्वच्छता

मानवाला उत्तम जीवन जगण्यासाठी महत्त्वाचे पाणी. पाणी हे जीवन आहे व स्वच्छता जीवन जगण्याचा मार्ग आहे. त्यामुळेच मानवाला होणारे 80% आजार दुषित पाणी व अस्वच्छ परिसर यामुळे होतात लोकांच्या आरोग्यावर कार्यक्षमतेवर उत्पादन निर्मितीवर थेट परिणाम घडून येतो. शिवाय बालक व महिलांच्या आरोग्यावर फारच गंभीर परिणाम होतात या शिवाय समाजातील सर्वांना शुध्द पेयजल उपलब्ध होण हा मानवी हक्काचा एक घटक आहे. सध्या जागतिक स्तरावर उत्तम दर्जाच्या शारीरिक व मानसिक आरोग्य समवेत जीवनाचा आनंद घेता येणे हा मुलभूत मानवी अधिकार मानला जातो त्यामुळेच शुध्द पेयजलाचा पुरवठा व सुधारित स्वच्छता पध्दती अस्तित्वात आली.

भारतातील शासकीय आकडेवारी प्रमाणे 88% लोकांना पाण्याचा पुरवठा सुरक्षित स्त्रोताद्वारे केला जातो. परंतु यापैकी फक्त 25% लोकांनाच असे पाणी अंगणापर्यंत उपलब्ध होते. खास करुन महिलांना व मुलींना पाण्यासाठी पायपीट करावी लागते. शुध्द पेयजल पुरवठा व स्वच्छता ही प्रामुख्याने राज्य संस्थाकडे ही जबाबदारी सोपवली आहे.

1) ग्रामीण पेयजल पुरवठा :– ग्रामीण भागातील लोकांना कमी अंतरावर पेयजल उपलब्ध व्हावे यासाठी ग्रामीण जलपुरवठा योजना सुरु केलो सन 1981-1991 हे दशक ''जलदशक'' म्हणून राबविले गेले ज्यामध्ये निश्चित ध्येय ठरवले गेले भारत सरकारने 1987 साली ''राष्ट्रीय जलनिती'' जाहीर केली व त्यानुसार ग्रामीण पेयजल पुरवठा कार्यक्रमाला सर्वांत जास्त प्राधान्य देण्यात आले.

2) गतिवर्धीत ग्रामीण जलपुरवठा कार्यक्रम :– या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट्य हे ग्रामीण भागातील लोकांना सुरक्षित व पुरेशा प्रमाणात पेयजल पुरवठा करणे व यासाठी राज्य सरकारांना मदत करणे.

व्याप्तीच्या दृष्टीकोनातून पाहाता या कार्यक्रमाने उत्तम कामगिरी केलेली दिसून येते. 2005 मध्ये 55.067 खेडी ही पेयजल पुरवट्या पासून वंचित होती. 1 एप्रिल 2001 च्या आकडेवारीनुसार ही सर्व म्हणजे 55.06 गावे पेयजल पुरवठ्याने जोडण्यात आली. भारतातील एक़ण खेड्यांपैकी 4,77,426 गावे अंशत: पाणी पुरवठा होणारी आहेत.

3) स्वजलधारा :–सन 1999 साली क्षेत्रिय सुधार प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामीण पेयजल क्षत्रामध्ये प्रायोगिक तत्वावर मोठ्या सुधारणा हाती घेण्यात आल्या पुढे याची यशस्वीता पाहून 25 डिसेंबर 2002 साली संपूर्ण देशभर ''स्वजलधारा'' नावाने ही योजना राबविण्यास सुरवात झाली.

त्याचा सर्वात चांगला परिणाम म्हणजे पेयजल पाणी पुरवठ्याच्या योजना पुरवठा केंद्रीत पेक्षा मागणी केंद्रीत बनल्या व त्यात जनतेच्या सहभाग महत्त्वाचा मिळाला. या योजना निश्चित करणे, नियोजन आराखडा अमलबजावणी, वित्तोय नियंत्रण, व्यवस्थापन व मालकी हक्क देखिल सुनिश्चित करण्यात आला व त्यामध्ये गावकऱ्यांना 10% योगदान द्यावे लागते.

4) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम :– ग्रामीण पेयजल योजनांच्या संदर्भात मूल्याकन करण्यात आले. त्यातून बऱ्याच योजनांच्या बाबी समोर आल्या जसे शाश्वत पाणीपुरवठा निकृष्ट जल गुणवत्ता, क्रियान्वय व व्यवस्थापन, लैंगिक व सामाजिक व आर्थिक दष्ट्या समानता इ. यावर उपाय म्हणून 1 एप्रिल 2009 पासून ''सुधारित ग्रामीण पेयजल पुरवठा मार्गदर्शक तत्त्वे स्विकारण्यात आली.'' ही तत्त्वे म्हणजेच ग्रामीण भागातील सर्वांसाठी, सर्वकालीन सुरक्षित पेयजल पुरवठा, अंगणवाड्या यांना सुरक्षित पेयजल पुरवठा करणे. गावाना पेयजल पुरवठा करण्याऐवजी प्रत्येक घराला पेयजल पुरवठा करणे, जलसंवर्धनावर भर त्यासाठी सर्व प्रकारच्या उपायांच्या वापर राज्य शासनांना निधीचा वापर नियोजन निर्मिती याबाबत पूर्ण स्वायतत्ता दिली जाईल.

5) भारत निर्माण योजना व पेयजल पुरवठा :– ग्रामीण भागामध्ये पायाभूत सुविधांच्या उभारणीकरीता केंद्र शासनाने 2005 साली भारत निर्माण योजना सुरु केली या योजनेत प्रमुख सहा घटक समाविष्ठ आहेत.

1) जलपुरवठ्या पासून पूर्ण वंचित गावे.

1) जलपुरवठा योजने नंतर ही कोरडी पडलेली गाव.

2) प्रदुषणामुळे पाण्याची गुणवत्ता कमी आहे. त्या गावांना शुध्द पाणी देणे.

3) जलशुध्दीकरणासाठी विविध पध्दतींचा वापर करणे.

4) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल गुणवत्ता देखरेख व पाळत कार्यक्रम.

5) राष्ट्रीय संसाधन केंद्र स्थापन करणे.

या माध्यमातून ग्रामीण भागात पेयजल स्वच्छ व शुध्द पुरवठ्याचा कार्यक्रम

1.27 ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम

स्वच्छता ही सर्वसमावेशक संकल्पना असन आरोग्याशी निगडीत आहे. उत्तम स्वच्छता मोठ्या आजारांना दूर ठेवते. सर्वसाधारणपणे मानवी विष्ठेची योग्य विल्हेवाट लावणे, घनकचऱ्याची विल्हेवाट लावणे, द्रवरुप कचऱ्याची विल्हेवाट लावणे, घरगुती स्वच्छता व अन्न सुरक्षितता, वैयक्तिक व पर्यावरण स्वच्छता, शुध्द पेयजल एकत्र करणे, साठवणे व वापर करणे या सवाचा यामध्ये समावेश होतो.

1.28 केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम

संपूर्ण स्वच्छता अभियाना अंतर्गत 2017 पर्यंत ''उघडयावर शौच'' ही प्रथा भारतातून नष्ट करणे, हे या योजनेचे मुख्य ध्येय आहे त्यातून ग्रामीण लोकांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण. स्वच्छता सुविधांची व्याप्ती वाढवणे. आरोग्य शिक्षण व लोकांच्या मध्ये जागृती करणे, उघड्यावर शौचाला बसणे व त्यातून होणारे प्रदषण टाळण्यासाठी प्रयत्न या बाबी डोळ्यासमोर ठेवून शासनाने हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व्यूहरचना स्पष्ट केली त्याचा चांगला परिणाम घडुन आला.

देशाभरातील 607 जिल्ह्यात ही योजना परिणामकारक ठरली 2011 च्या आकडेवारीनुसार भारतात 15.61 कोटी घरे आहेत त्यापैकी 11.23 कोटी घरामध्ये आज शौचालय सुविधा उपलब्ध आहेत. स्वच्छता विषयक सुविधांचा विचार केला तर 2001 मध्ये 21.9% सुविधा होत्या 2011 मध्ये 71.94% व्याप्ती वाढली आहे यावरुन या योजनेचे यश लक्षात येते.

1.29 शालेय स्वच्छता व वैयक्तिक स्वच्छता शिक्षण

प्रत्येक ग्रामीण शाळेमध्ये मुले व मुलींसाठी स्वतंत्र शौचालय व मुतारीची सोय केली जाते यासाठी 20,000 रु.निधी प्रत्येको केंद्र व राज्य सरकार उपलब्ध करुन देतात विद्यार्थ्यामध्ये शौचालय वापराची

सवय ही ग्रामीण बदलाचे साधन बनणार आहे. म्हणून या स्वच्छता घटकाला फार महत्त्व दिले जाते. आज सर्व शिक्षा अभियानाचा एक भाग म्हणून हा कार्यक्रम देशभर राबवला जात आहे. आज देशातील 11.04 लाख शाळामध्ये व तीन हजार ऐंशी लाख अंगणवाड्यामध्ये ही स्वच्छता सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.

1.30 निर्मल ग्राम पुरस्कार

2 ऑक्टोबर 2003 पासून पंचायत राज्यसंस्थाना ग्रामीण स्वच्छता विषयक सुविधा राबविण्यासाठी प्रोत्साहन देणारी ही योजना असून हा पुरस्कार एकाच वेळेस जिल्हा-पंचायत-ग्रामपंचायत यांच्या चांगल्या कार्याची प्रशंसा करणे व त्यांना आर्थिक रुपात बक्षिसी दिली जाते यासाठी प्रत्येक घरात शौचालय असावे, सर्व शाळांमध्ये ही मुलांमुलीसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे असावेत, गावातील पर्यावरण स्वच्छ असले पाहिजे या पुरस्काराचे वितरण प्रतिवर्षी राष्ट्रपतींच्या हस्ते केले जाते, त्यामुळे आज राज्यातील राज्यामध्ये निर्मलग्राम करण्यासाठी स्पर्धा सुरु आहेत.

आंतरराष्ट्रीय स्तरावर या कार्यक्रमाला आदर्श मानले आहे. स्वच्छता विषयक सुविधा असणाऱ्या गावांच्या संख्येत या योजनेमुळे झपाट्याने वाढ होत आहे. 2005 साली देशातील 38 ग्रामपंचायत व 2 गटपंचायतीना हा पुरस्कार मिळाला तर ही संख्या 2010 मध्ये 2808 ग्रामपंचायती व एक गटपंचायती एवढी वाढली आहे.

केंद्रशासनाच्या स्वच्छता विषयक कार्यक्रमाचा चांगला परिणाम सर्व राज्यामध्ये दिसून येत आहे.

1.31 भारताचे ग्रामीण विदयुतीकरण

जागतिक स्तरावर ऊर्जेची उपलब्धता ही विकासाला वेग वाढवण्यासाठी अत्यंत महत्वाची बाब समोर आली आहे भारतातील केंद्र शासन व राज्यशासन उर्जा उपलब्धतेसाठी प्रयत्न करताना दिसतात. 2011 जनगणनेनुसार जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी 17.5% लोकसंख्या भारतामध्ये निवास करीत असताना भारताचा ऊर्जा वापराचा वाटा मात्र 4.2% एवढा कमी आहे. हा वापर विकसीत देशांपेक्षा फारच कमी आहे.

भारतातील ग्रामीण व शहरी भागातील घरे व यांचा विचार केला असता फार मोठी तफावत आढळून येते. सन 1994 साली ग्रामीण भागातील 36% जनता विजेचा वापर करत होती. आज 2011 साली हे प्रमाण 56% एवढे झाले आहे. तरी सुध्दा 74 दशलक्ष घरामध्ये आधुनिक उर्जा साधनांची सेवा पोहचत नाही. म्हणजे ते जुन्या पारंपारिक उर्जेवर अवलंबून आहेत घरात स्वयंपाकासाठी लाकुड फाटा, पाला पाचोळा, शेणाच्या गोवऱ्या, पिकांचे अवशेष यांच्या वापराचे प्रमाण जास्त आहे.

आपल्या खेड्यांपैकी 21% खेडी आणि 50% ग्रामीण घर अजन ही विद्युतीकरण झालेली नाहीत, दरडोई ऊर्जेचा वापर तफावत दाखवणारा आहे. उदा.75% ग्रामीण कुटबे स्वयंपाकासाठी जळणावर अवलंबून असतात, 10 % शेण्या वापरतात 5% L.P.G वापरतात तर शहरामध्ये स्वयंपाकासाठी लाकुड फाटा वापरणारी कुटुंबे 22%, केरोसिन वापरणारी 22% व 44% L.P.G.गॅस वापरतात. भारतासमोर दारिद्र्य निरक्षरता,बेरोजगारी, अन्नसुरक्षा ही आव्हाने असून त्यामध्ये ग्रामीण विद्युतीकरण हे ही मोठे आव्हान आहे, प्रत्येक पंचवार्षिक योजनेत ग्रामीण विद्युतीकरणाच्या योजना पुढील प्रमाणे राबविल्या गेल्या आहेत.

1) किमान गरजा कार्यक्रम :– 5 व्या पंचवार्षिक योजनेत ग्रामीण विद्यतीकरणासाठी राज्य विद्यत मंडळ यांच्या तफ दुर्गम व दूरवरील गावे निवडून त्याचे विद्यतीकरण करण्यावर भर दिला. त्यासाठी केंद्राने सहाय्यता निधी कर्ज व अनुदान स्वरुपात मदत देणे असा भाग होता.

2) कुटीर ज्योती योजना :– या योजनेमाफत दारिद्र्य रेषेखालील ग्रामीण कुटुंबीय मागासलेल्या जाती व आदिवासी यांना 100% अनुदानावर घरात फक्त प्रकाशासाठी वीज पुरवली जाते यासाठी ही योजना 1988-89 ला सुरु केली परंतु बऱ्याच वेळा वीजेचा तुटवडा व पुरेशी वीज न मिळाल्यामुळे हे लोक वीज बील भरत नव्हते त्यामुळे ही योजना बंद पडली.

3) प्रधानमंत्री ग्रामोदय योजना:– ही योजना राज्य विद्युत मंडळे, विद्यत विभाग, विद्यत कंपन्या या योजने नुसार ज्या राज्याची 100% गावे विद्युतकृत असेल तेथे दलित व आदिवासी वस्तीसाठो ही योजना

होती केंद्रसरकार याला 90% अनुदान देत होते,10% कर्ज मात्र राज्यानी हा पैसा दुसरीकडे वळविल्याने ही योजना बंद झाली.

4) गतीवर्धित ग्रामीण विद्युतीकरण कार्यक्रम:– या योजने अंतर्गत ग्रामीण विद्यतीकरणसाठी विद्युत वित्त महामंडळ, ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी नाबार्ड यांच्यामाफत स्वस्त दराने कर्ज पुरवठा केला जात होता. 2003-04 मध्ये योजना सुरु झाली.

5) एक लक्ष खेडी व एक कोटी घरांचे गतिवर्धित विद्युतकरण योजना :– वीज पुरवठयाच्या छोट्या-छोट्या योजनांचे एकत्रीकरण करुन 2004 पासून ही योजना सुरु केली असुन या योजनेवर ग्रामीण विद्यतीकरण महामंडळ नियत्रंण ठेवणार असून व पंधरा वर्षे अखंड सेवा असे या योजनेचे स्वरुप होते परंतु ग्रामीण भागातून महसुल न मिळणे, राज्याची आर्थिक परिस्थिती बिकट व निरुत्साह यामुळे अपेक्षित यश मिळाले नाही.

6) राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना :–10 व्या पंचवार्षिक योजनेत ही योजना सुरु केली व प्रत्येक टप्प्यात 1.15 लाख खेड्यांचे विद्यतीकरण व 2.034 कोटी दारिद्र्य रेषेखालील घरांचे विद्युतीकरणाचे लक्ष समोर ठेवले गेले. या योजनेची व्याप्ती प्रंचड असून 90% भांडवल केंद्रसरकार देते छोटे मोठे सब स्टेशन निर्माण करण. वीज निर्माण करणे, ती वाहून नेणे, ती वितरीत करण्याच्या प्रणाली विकसित करण्यावर भर दिला गेला.

ग्रामीण नूतनोकरण अक्षय ऊर्जा कार्यक्रम श्वाश्वत उर्जा व स्वच्छ उर्जा म्हणून पारंपारिक उर्जेला पर्याय नवीन उर्जा निर्माण करण्यासाठी 1982 साली केंद्रीय उर्जा मंत्रालयाच्या अंतर्गत अपारंपारिक उर्जा स्त्रोत विभागाची स्थापना करण्यात आली या योजनेनुसार खालील कार्यक्रम हाती घेतले.

1) राष्ट्रीय बॉयोगॅस विकास कार्यक्रम देशातील 44 लाख बॉयोगॅस प्लॉन्ट उभे केले गेले.

2) राष्ट्रीय सुधारित चुली कार्यक्रम यामध्ये इंधन म्हणून वापरला जाणारा लाकुड फाटा बंद करणे, झाडांचे संरक्षण करणे यासाठी सौर चुली तयार करण्यात आल्या.

3) बायोमॉस गॅसीफायर लाकुड पालापाचोळा व भाताचे कण यांचा वापर करुन त्यांचे वायुमध्ये रुपांतर

केले जाते व गॅसनिर्मिती केली जाते.

4) दुर्गम खेडी विद्यतीकरण कार्यक्रम-सौरउर्जा, बायोमॉस, पवनउर्जा यांच्या माध्यमातून अतिदुर्गम डोंगराळ खेड्यात वीज पोहोचविणे हा उद्देश होता आज अखेर 8104 खेड्यांना वीज पोहोचविण्यात आली आहे.

7) राजीव गांधी ग्रामीण L.P.G.**वितरक योजना :–** ही योजना 2009 साली सुरु झाली असून छोट्या छोट्या L.P.G. वितरण संस्था स्थापन करुन, लहान लहान सिलेंडर 5 किलोचे तयार करुन खेड्यातील लोकांना L.P.G वापरण्याची सवय लावण्यासाठी ही योजना सुरु झाली. 2015 पर्यंत 55 दशलक्ष गरीब लोकांपर्यंत हा छोटा सिलेंडर पोहचवण्याचे ध्येय शासनाचे आहे.

1.32 केंद्रशासनाच्या कल्याणकारी योजना

1) राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना– दारिद्र्यरेषेखालील 18 ते 64 वर्षे वयोगटातील कुटुंबातील कर्त्या कमावत्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास या योजने अंतर्गत त्याच्या कुटुंबास 10,000/- असे आर्थिक सहाय्य देण्यात येते. देशातील लाखो कुटुंबास या योजनेचा लाभ झाला आहे.

2) आम आदमी विमा योजना:– ग्रामीण भागातील भूमिहिन कुटुंबातील रोजगार करणाऱ्या 18 ते 59 वयोगटातील कुटुंब प्रमुखास किंवा कुटुंबातील एका मिळवत्या व्यक्तीस या योजने अंतर्गत विमा संरक्षण मिळते. केंद्र व राज्यशासन 100,100 रुपयाचा विमा हप्ता भारतीय आयुर्विमा महामंडळ भरतात. योजने अंतर्गत विमा कालावधीत मिळवत्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास 30,000/- रक्कम कुटुंबास मिळते, अपघाती लाभ 37,500/- ते 75000/- पर्यंत या शिवाय विमा संरक्षण व्यक्तीच्या 9 वी ते 12 वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या दोन मुलांना दरमहा प्रत्येकी 100 रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात येते.

3) इंदिरा गांधी वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना :– या योजनेतंर्गत 60 वर्षापेक्षा अधिक वयाच्या व्यक्तीला दरमहा दोनशे रु. इतकेनिवृत्तीवेतन वेतन दिले जाते अनेक राज्यांची याला जोडूनच राज्यसरकार कडून ही निवृत्ती वेतनाची रक्कम दिली जाते त्यामुळे वृध्द व्यक्तींना याचा लाभ होतो.

4) राष्ट्रीय सामाजिक अर्थसहाय्य कार्यक्रम :– सामाजिक बांधिलकी म्हणून समाजातील कमकुवत वर्गातील बेरोजगारी, वृध्दत्व, आजारपणा अशा गोष्टीवर गरीब लोक काम करु शकत नाही शिवाय या कुटुंबातील स्त्रियांना प्रसुतीसाठी योग्य सुविधा उपलब्ध करुन देणे, या उद्देशाने निवृत्तो वेतन मदत व महिलांना राष्ट्रीय मातृत्व लाभ योजना अशा योजनांमधून राष्ट्रीय, सामाजिक अर्थसहाय्य योजनेची अंमलबजावणी केली जाते.

1.33 इंदिरा आवास योजना

भारतातील सामान्य माणसाच्या मुलभूत गरजे पैकी एक असलेली निवाऱ्याची गरज पुर्ण करणारी सर्वात प्रमख व महत्त्वपूर्ण योजना आहे. सरकारचा दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमाचा एक भाग म्हणजे ग्रामीण भागातील गरिबांना निवारा उपलब्ध करुन देणे होय. म्हणून ग्रामीण विकास मंत्रालय अंतर्गत 1985 मध्ये ही योजना सुरु केली घरबांधणीसाठी तंत्रज्ञान, गरजा, आखणी यासाठी लाभधारक पूर्ण स्वातंत्र्य, निधी लाभार्थ्यापर्यंत थेट पोहचते. ग्रामीण, गरीब कमकुवत लोकांना स्वत:चे घरकूल बांधण्यास अनुदान, महिलांचे, अपंगाचे सबलीकरण, अल्पसंख्याक समाजाचे सक्षमीकरण ही या योजनेची वैशिष्ट्ये होती.

सन 2010 पासून ग्रामीण भागातील सपाट भागात राहणाऱ्या दारिद्रयरेषेखालील कुटुबास 45000 निधी दिला जातो. तर डोंगराळ भागातील गरीब कुटुंबास 48,500 रु. निधी या योजनेचा लाभ अनुसुचित जाती-जमाती गरीब दारिद्र्यरेषेखालच्या कटुंबास स्वत:चे घर उभारण्यासाठी झाला. याचा लाखो लोकांना फायदा झाला ही योजना फारच यशस्वी झाली.

1.34 केंद्र शासनाच्या इतर गृहनिर्माण योजना

1) अनुदान योजना :– वार्षीक उत्पन्न 32000 रु.पेक्षा कमी असणाऱ्या कुटुंबाला घर बांधणीसाठी संसाधन पुरवठा व्हावा म्हणून 10,000 रु. पर्यंत अनुदान 40,000/-रु. पर्यंत कर्ज अशी योजना होती 1999 साली सुरु झालेली ही योजना 2003 मध्ये इंदिरा आवास योजनेत विलीन केली गेली.

2) ग्रामीण गृहनिर्माण व निवासाच्या विकासासंबंधी नाविन्यपूर्ण योजना :–ग्रामीण भागात पर्यावरण संतुलन गृह बांधणी तंत्रज्ञान विकसीत करण्यासाठी 1999-2000 मध्ये ही योजना सुरु केली.

या योजनेचे लाभधारक मान्यता प्राप्त शैक्षणिक / तांत्रिक संस्था, सरकारी संघ, सरकारी स्वायत्त संस्था , विकास संस्था आणि बिगर सरकारी संस्था ज्याचे गृहनिर्माण मध्ये विशेष कार्य आहे अशा सर्व संस्थाचा समावेश होतो. 20 लाख पर्यंत बिगर सरकारी संस्थाना तर 50 लाख रु.पर्यंत सरकारी संस्थांना आर्थिक मदत पुरवली जाते. सध्या 125 प्रकल्प या योजनेत मजुर केले आहेत.

3) ग्रामीण घरबांधणी केंद्र स्थापना :– घरबांधणीच्या तंत्रज्ञानाचा प्रसार व पुरवठा करणे माफक दरात गृहबांधणीची साधने उपलब्ध करुन देणे, ग्रामीण घरबांधणी कौशल्याना प्रोत्साहन यासाठी ग्रामीण घर बांधणी केंद्र स्थापन करण्यासाठी 15 लाखपर्यंत मदत सरकार उपलब्ध करुन देते.

4) ग्रामीण गृहनिर्माण व निवासासंबंधी राष्ट्रीय मिशन :– सामाजिक सहभागातून निर्धारित वेळेत ग्रामीण भागातील संपूर्ण जनतेस नियमित स्वरुपात घरांची उपलब्धता करण्यासाठी आणि त्यासाठी आवश्यक विज्ञान व तंत्रज्ञानाचा विकास घडवून आणण्याकरीता ग्रामीण विकास मंत्रालयाने हे मिशन स्थापन केले.

5) 20 लक्ष गृहनिर्माण कार्यक्रम :– घरबांधणीसाठी कर्ज देणाऱ्या संस्थांनी ग्रामीण व शहरी भागातील अल्प उत्पन्न व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील कुटुंबाना घरांच्या उभारणीसाठी किमान 20 लाख घरांना पैसे उपलब्ध करुन दयावेत व त्यापैकी 13 लाख घरे ग्रामीण भागात उभारली पाहिजेत अशी अट होती. या माध्यमातून ग्रामीण भागातील गृहनिर्माणाला चालना दिली.

6) समग्र आवास योजना :– जनतेच्या सहभाग मिळवून निवारा, स्वच्छता व पिण्याच्या पाण्याची उपलब्धता यासाठी 1999-2000 साली ही योजना सुरु केली. एकात्मिक व समग्र विकास साध्य करण्यासाठी ही योजना कार्य करत असुन प्रत्येक गटातील 25 लाख रुपयाची मदत दिली जाते. व हा निधी-निवास, विकास माहितीचा प्रसार, शिक्षण आणि दळणवळण विकास याकरीता करण्याचे ठरले यामध्ये 10% सहभाग जनतेचा अपेक्षित केला गेला.

वरील प्रकारे केंद्र सरकारने गृहनिर्माण बाबत विविध धोरणे आखली तसेच प्रत्येक राज्य सरकारांनी ही गृहनिर्माण बाबतची वेगवेगळी धोरणे असुन जनतेच्या निवाऱ्याच्या गरजा भागवण्याचा व त्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न केला.

1.35 भारतातील सार्वजनिक आरोग्य विषयक धोरण

आरोग्य हा मानवी हक्क आहे. भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद 21 चा व अनुच्छेद 47 नुसार आरोग्य हा देखील मुलभूत अधिकार असुन भारतीय जनतेचे जीवनमान उंचावणे, सुपोषण व एकूणच आरोग्य सुधारावे ही शासनाची प्रमुख जबाबदारी आहे.

समाजातील व्यक्ती, कुटुंब व समुदाय यांना आरोग्य सेवा पुरविणाऱ्या विविध घटकांमाफत ज्या सेवा परविल्या जातात व ज्या माफत आरोग्याची जोपासना निगा व प्रोत्साहन दिले जाते. या सर्व प्रक्रियेला मिळून "**आरोग्य विषयक काळजी**" म्हटले जाते समाजातील सर्व स्तरापर्यंत आरोग्य सेवा प्रदान करणे हे आरोग्य व्यवस्थेचे प्रमूख लक्ष्य असते. आरोग्य विषयक नियोजन प्राधान्यक्रम ठरवण संसाधनांचे एकत्रिकरण व त्यांचे पुर्ववितरण धोरणांची अंमलबजावणी त्यांचे मूल्यमापन आणि आरोग्य शिक्षण इत्यादी बाबींचे व्यवस्थापन व संघटन करणारी यंत्रणा म्हणजेच आरोग्य व्यवस्था होय.

या आरोग्य व्यवस्थेमध्ये प्रतिबंध, उपचार व पुनवसन या तीनही प्रकारच्या आरोग्य सेवांचा समावेश होतो शिवाय राष्ट्रीय शासन ते समुदायाचा सहभाग यावर ते आधारलेले असते.

भारतातील घटनेनुसार "**आरोग्य**" हा राज्यसूची मधील विषय आहे. त्यामुळे केंद्र शासन आरोग्य संदर्भात नियोजन मार्गदर्शन सहाय्य व समन्वय या बाबी पार पाडीत असते. मात्र आरोग्य सेवा सर्व नागरिकापयत पोहाचवण्याची मुख्य जबाबदारी राज्य सरकारांची आहे. घटनेच्या विषय सूचीमधील वर्गीकरण पाहिले तर, सार्वजनिक आरोग्य स्वच्छता दवाखाना हे राज्य सूचीमध्ये लोकसंख्या नियंत्रण महत्त्वपूर्ण आकडेवारीची जमवाजमव हे विषय समवर्ती सूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहेत, जरी आरोग्य सेवा संदर्भातील महत्त्वपूर्ण जबाबदारी राज्य सरकारवर असली तरी देशाभरातील आरोग्य सेवा प्रदान करणाऱ्या यंत्रणेमध्ये फारशी विविधता आढळून येत नाही कारण बहुतेक राज्यात आरोग्य धोरणात समानता आढळून येते.

1.36 राष्ट्रीय रोगनियंत्रक कार्यक्रम

1) हिवताप निर्मूलन :– राष्ट्रोय हिवताप निर्मूलन कार्यक्रम हा एक संसर्गजन्य रोगाविरुध्द चालविलेला जगातील सर्वात मोठा आरोग्य विषयक कार्यक्रम होता. सन 1958 पासून तो भारतात राबविला. 1 सप्टेंबर 1979 पासून हिवताप निर्मूलन सुधारित कार्यक्रम देशाच्या कानाकोपऱ्यात राबविला. सध्या 20 लाखाच्या आसपास हिवताप रुग्ण प्रतिवर्षी आढळतात. या कार्यक्रमांतर्गत तापाच्या रोग्यांचे रक्ताचे नमूने गोळा करणे, त्याद्वारे हिवतापाचे रोगी शोधून काढणे व औषधोपचार करणे तसेच आवश्यक तेथे किटकनाशकांची फवारणी केली जाते.

2) हत्तोरोग नियंत्रण :– हत्तोरोग हा डासापासून होणारा रोग किनारपट्टीलगतच्या जिल्ह्यामध्ये तसेच जेथे सांडपाण्याची योग्य व्यवस्था नाही अशा मोठ्या शहरांच्या उपनगरी भागात आढळतो सर्व साधारणपणे 20 राज्यातील 250 जिल्ह्यात हा रोग आढळून येतो, 1955 पासून देशात हत्तोरोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. भारताच्या राष्ट्रीय आरोग्य धोरण 2008 अनुसार 2015 पूर्ण हत्तोरोग पूर्णत: निर्मूलन करण्याचे निर्धारित करण्यात आले आहे.

3) राष्ट्रीय किटकजन्यरोग नियंत्रण कार्यक्रम :– हिवताप, हत्तोरोग, चिकनगुनिया, डेंग्यू इ. आजार किटकांपासून होणाऱ्या रोगांच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी दशात राष्ट्रीय किटकजन्यरोग नियत्रंण कार्यक्रम राबविला जात आहे. वरील सर्व आजार संक्रमित होतात व त्यामध्ये रोग्याचा मृत्यूही होण्याचा धोका असतो त्यामूळे त्यावर नियत्रण महत्त्वाचे आहे. त्या दिशेने शासनाचे काम चालू आहे.

4) कुष्ठरोग निर्मूलन :– केंद्रशासनाच्या वतीने राबवला जाणारा हा महात्त्वाचा आरोग्य कार्यक्रम राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम असुन प्राथमिक अवस्थेतील कुष्ठरोगी शोधुन काढणे त्यांच्यावर नियमीत उपचार करणे. रोगमुक्त व्यक्तीचे पुनवसन करणे इ. कामे केली जातात. जगात सर्वात जास्त कुष्ठरोगी भारतात असुन 30 लाख लोक कुष्ठरोग रुग्ण आहेत. म्हणजे जगातील 60% कुष्ठरोगी भारतात आहेत त्यावरुन या रोगाच्या औषध उपचारासाठी आवश्यकता स्पष्ट होते.

देशात सन 1955 पासून या रोगाच्या नियंत्रणाची मोहिम राबवली गेली मात्र 1980 नंतरच या रोगाच्या नियंत्रणाचे काम सुध्दा 1993-94 पासून जागतिक बँकेच्या सहकार्याने या कार्यक्रमाची व्याप्ती वाढवण्यात आली. 1 एप्रिल 2001 पासून संपूर्ण कुष्ठरोग निर्मूलन करण्याच्या कार्यावरच भर दिला गेला आहे.

5) क्षयरोग नियंत्रण :– हा केंद्रशासनाकडून पुरस्कृत केलेला कार्यक्रम असून एक वर्षाखालील बालकांना बी.सी.जी.लस टाचणे, क्षयरोग्याना नियमीत औषधोपचार करुन घेण्यास प्रवृत्त करणे इत्यादी कामे केली जातात. आज देशात 1 काटी पेक्षा जास्त क्षय रोगाचे रुग्ण असून त्यापैकी 25 % रुग्णांचा रोग संसर्गजन्य अवस्थेत आहे. जगातील जवळजवळ 1/5 रुग्ण भारतात असून त्यामध्ये दरवर्षी 18 लाख नवीन रुग्णांची भर पडते. दर तीन मिनीटास दोन व्यक्ती भारतात क्षयरोगाने मृत्यू पावतात. त्यामुळे 446 जिल्हा क्षयरोग नियत्रण केंद्रे स्थापन केली आहेत. 28 मार्च 1997 पासून क्षयरोग नियत्रणाचा सुधारित कार्यक्रम राबविला जात आहे. या कार्यक्रमांतार्गत 86 लाखाहून अधिक रुग्णांवर उपचार करण्यात आले असून जवळजवळ 16 लाख मृत्यू टाळण्यात आले आहेत.

6) अंधत्व नियंत्रण:– केंद्र शासनाकडून 100% अर्थसहाय्यावर आधारित असून 1976 पासून हा कार्यक्रम देशात राबविला जात असून सन 2020 पर्यंत अंधत्वाचे प्रमाण 0.3% वर आणण्याचे उद्दिष्ट या कार्यक्रमाचे आहे. "**राष्ट्रीय आरोग्य धारण**"2002 नुसार जगातील 4.5 कोटी अंधत्वग्रस्तांपैकी 70% अंधत्वग्रस्त भारतात आहेत. वाढत्या वयामुळे वृध्दांच्या वाढत्या संख्येमुळे मोतोबिंदुच्या रुग्णांची संख्या अधिकाधिक वाढत जात आहे.

विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून नेत्र शिबिरे भरविणे, नेत्रशस्त्रक्रिया करणे, बालकांना 'अ' जीवनसत्वाचे डोस देणे इत्यादी कामे केली जातात. 1991-92 मध्ये 12 लाख शस्त्रक्रिया केल्या गेल्या होत्या. अलिकडच्या काळात देशात प्रतिवर्षी सरासरी 50 लाख इतक्या मोतिबिंदुवरील शस्त्रक्रिया केल्या जातात. तर सरासरी प्रतिवर्षी 25,000 लोक नेत्रदान करतात. महाष्ट्रात 1982 पास्न10 जून हा दिवस "दृष्टीदान दिवस" म्हणून पाळला जातो.

7) एड्स नियंत्रण :– AIDS या संक्षिप्त नावाने हा रोग ओळखला जातो. अजानक व कारणाशिवाय वेगाने वजन कमी होणे, रोगप्रतिकार शक्ती कमी होत जाणे, ग्रंथींना सूज येणे, ताप येणे, घाम येणे, फक्त मानवामध्ये या रोगाची लक्षणे दिसतात. विषाणू पासून हा रोग होतो भारतात हा रोग 1992 ला प्रथम रोगी सापडला. रक्ताच्या संक्रमणातून व अनैतिक लैंगिकजीवन जगणाऱ्या व्यक्ती मध्ये हा रोग होण्याचा धोका जास्त असतो.

भारतात 1992 पासून राष्ट्रीय एड्स कार्यक्रम राबवला जात आहे. 2001 च्या दरम्यान देशात जवळजवळ 40 लाख लोक एड्सग्रस्त रोगी कमी होत आहेत. भारत सरकारच्या अर्थसहाय्यावर आधारित राष्ट्रीय आरोग्य धोरण 2002 अनुसार एड्स रुग्णांच्या वृध्दीचा दर शून्यावर आणण्यासाठी अथक प्रयत्न कले जात आहेत. एड्स नियंत्रण हा कार्यक्रम 100% केंद्रीय अर्थसहाय्याद्वारे राबविला जातो. राष्ट्रीय आरोग्य धोरण 2008 नुसार एड्स रुग्णाचा वृध्दीचा दर शून्यावर आणण्यासाठी अथक प्रयत्न केले जात आहेत.

8) कर्करोग नियत्रंण:– पूर्वी पासून असाध्य गणला गेलेला रोगसुध्दा प्राथमिक अवस्थेत निदान झाल्यास व वेळीच आणि योग्य उपचार झाल्यास बरा होऊ शकतो. भारतात कर्करोगाचे 20 लाख रोगी असून प्रतिवर्षी कर्करोगाचे अंदाजे 7 लाख नवीन रुग्ण आढळून येतात. मानवी शरीरात पेशींची अनियमीत वाढ होणे, पेशींची गाठ निर्माण होते ही कर्करोगाची लक्षणे आहेत. मात्र प्रतिवर्षी तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करणे व इतर प्रदुषणा सारख्या बाबी पासून कर्करोग वाढत जात आहे. शासकीय स्तरावर फार मोठ्या प्रमाणात जाहिराती तंबाखू व इतर व्यसनाचा वस्तूंवर कर आकारले जातात. तरी ही कर्करोगाचे रुग्ण वाढत असल्याचे दिसून येते. मात्र या रोगाचा धोका ओळखून शासनाने त्यावर उपचाराच्या नवनवीन पध्दती शोधल्या आहेत. तर अनेक स्वयंसेवक संस्थांनी या क्षेत्रात मोलाचे कार्य केले आहे.

सध्या शस्त्रक्रिया, रेडिओथेरेपी व केमोथेरेपी या तीन उपचार पध्दतींचा देशात प्रामुख्याने वापर केला जातो. संपूर्ण देशात 25 विभागिय प्रादेशिक केंद्र कर्करोग नियत्रणाचे कार्य करीत अस्न या केंद्राचे योगदान महत्त्वाचे आहे.

9) एन.पी.सी.डी.एस. :– नॅशनल प्रोग्रॅम फॉर प्रिव्हेन्शन ॲन्ड कंट्रोल ऑफ कॅन्सर, डायबेटिस, कार्डीयो व्हॅस्व्युलर डिसिजेस ॲन्डस्ट्रोक या रोगाचे मराठीत नाव कर्करोग, मधुमेह, हृदयविकार आणि मेंदघात प्रतिबंधक आणि नियत्रक राष्ट्रीय कार्यक्रम असे करता येईल. हे सर्व असंसर्गजन्य परंतु घातक स्वरुपाच्या अनेक वर्षे वाया जातात. देशाचे व कुटुंबाचे मोठ्याप्रमाणात नुकसान या रोगाने होते या सर्व रोगांच्या नियंत्रणासाठी 1231 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. या कार्यक्रमाचा खर्च केंद्रसरकार 80% व संबधीत राज्यसरकार 20% करते. सध्या देशातील 21 राज्यांमध्ये हा कार्यक्रम राबवला जात आहे. या अतर्गत राबवलेल्या कार्यक्रमाचा फायदा लाखो रुग्णांना होत आहे.

10) गलगंड नियत्रण :– आयोडिनच्या कमतरतेमुळे गळ्यातील थायराईड या ग्रंथीचा गलगंड हा आजार होतो. देशातील 235 जिल्ह्यातील नागरिकामध्ये आयोडीनची कमतरता असल्याचे आढळून आले आहे. देशात आजच्या काळात जवळजवळ 7 कोटी लोक आयोडिनच्या कमतरतेमुळे निर्माण होणाऱ्या व्याधींनी त्रस्त आहेत. केंद्रशासनाकडून 100 % अनुदान या रोगाच्या नियंत्रणासाठी दिले जाते. आयोडिनची मात्रा मानवाच्या शरीरात गेली पाहिजे म्हणून आयोडिन युक्त मीठ देण्याचे काम ही या योजनेत समाविष्ट असून **नॅशनल आयोडिन डिफोशियन्सी डिसऑर्डर्स** कंट्रोल प्रोग्रॅम या नावाने हा कार्यक्रम ओळखला जातो.

11) पल्स पोलिओ कार्यक्रम :– पोलिओ रोगाचे जंतू बालकांना कायमचे अपगत्व आणू शकतात. त्याचा जीवनावर विपरीत परीणाम घडून येतो.जगभर पोलिओची तीव्र भयानकता विचारात घेऊन जागतिक आरोग्य संघटनेने "पोलिओ मुक्त जग" ही संकल्पना व उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून लसीकरणावर भर दिला आहे. भारत सरकारने संपूण देशात पोलिओ कार्यक्रम राबवुन देशातून पूर्णत: पोलिओचे निर्मूलन करण्यासाठी 1995-96 ते 2004-05 या पाच वर्षाच्या आतील वयोगटातील बालकांना दोन डोस देण्याचा कार्यक्रम राबविला गेला. व्यापक पोलिओ लसीकरणाच्या कार्यक्रम जागतिक सहकार्य ही मिळाले त्यामुळे गेल्या पाच वर्षात भारतात एकही पोलिओचा रुग्ण सापडला नाही भारत पोलिओ मुक्त जाहीर झाला आहे.

12) नारु निमलन अभियान :– नारु हा रोग पाण्यातील जंतूमुळे होतो.विशेषत: विहिरीतील पाण्यात याचे जंतू असतात. भारत सरकारने सार्वजनिक आरोग्या बरोबरच या रोगाचा स्वच्छतेशी असणारा संबध विचारात घेऊन केंद्र 50% व संबधीत राज्यांनी 50% खर्च करुन लोकांना स्वच्छ व शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे विहिरीत पाणी भरण्यासाठी मोटार, रहाट, यांचा वापर यामुळे नारुचे प्रमाण कमी करणे व या रोगांच्यारुग्णावर यशस्वी उपचार करुन 1998 पर्यंत राज्य व राष्ट्रीय पातळोवर नारु रोगाचे उच्चाटन केले गेले.

13) प्रजनन व बाल आरोग्य :– देशात सातव्या पंचवार्षिक योजने पर्यंत बालक व माता यांच्या आरोग्याशी संबधित विविध कार्यक्रम राबवण्यात येत होते. त्यांच्या स्वतंत्र अमंलबजावणीत अडथळे होते म्हणून सर्व कार्यक्रमांचे एकत्रिकरण करुन 1992 साली याला **"बालसुरक्षा व सुरक्षित मातृत्व"**असे नाव दिले.याचा उद्देश माता मृत्यू प्रमाण कमी करणे,अर्भक मृत्यू दर कमी करणे, एकूण जननदर कमी करणे, बालकांचे आरोग्य सुधारण्या बरोबरच लोकसंख्या स्थिर करण्याच्या धोरणावर भर दिला गेला. सुरक्षित मातृत्वसेवा, बालकांसाठी असलल्या आरोग्यसेवा पुरवणे, कुटुंबकल्याण कार्यक्रम, किशोरवयीन मुलांसाठी आरोग्यसेवा पुरवणे,आदिवासींच्या आरोग्याचो काळजी घेणे, नागरी भागाची वैद्यकीय सोईची उपलब्धता या बाबी अंतर्भूत आहेत.

जगातील 5 वर्षे वयोगटातील 9.7 दशलक्ष मत्यूमध्ये 2.1 दशलक्ष मृत्य एकट्या भारतात होतात जवळपास 25 दशलक्ष जन्म प्रतिवर्षी होतात.त्याच्या 1.57 दशलक्ष मुले एका वर्षाच्या आत मृत्यू पावतात आणि जवळजवळ 1 दशलक्ष नवजात बालकेजन्माच्या 1 महिन्याच्या आत मृत्यू पावतात. ही वस्तुस्थिती आहे.

14) सुपोषण कार्यक्रम – सन1975-76 पासून केंद्र शासनाने पुरस्कृत केलेला हा कार्यक्रम आहे. गावपातळीवर अंगणवाड्या माफत हा कार्यक्रम राबवला जातो. सहा वर्षाच्या आतील बालकांना सकस आहार देऊन त्यांचे आरोग्य संवर्धन करणे, समाजाच्या दुर्बल घटकांतील गरोदर महिला व माता यांना

पोषण आहार देणे, आदिवासी क्षेत्रातील कुपोषणाच्या समस्येवर मात करणे, आज देशातील 20 लाख अंगणवाडी केंद्रात हा कार्यक्रम राबवला जात आहे.

15) पूरक पोषण आहार कार्यक्रम:– सहा वर्षाखालोल बालके समाजातील दुर्बल व कमकुवत घटकातील गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांच्या पोषण विषयक किमान गरजा भागवून त्याच्या आरोग्याचा दर्जा उंचावणे, दुर्गम आदिवासी क्षेत्रातील कुपोषण टाळणे हा सुध्दा सर्वसाधारण बालके जसे साधारण कमी वजनाची बालके व अतिशय कमी वजनाची बालके असे वर्गीकरण करुन बालकांच्या पूरक आहारावर लक्ष केंद्रित केले जाते.

16) कुपोषण कल्याण:– सन 2011 च्या जनगणनेच्या अंतरिम निष्कर्षानुसार ती 121 कोटी 01 लक्ष 93 हजार 422 इतकी होती. जगतील एक़ण जमिनीच्या क्षेत्राच्या 2.42% इतकी जमीन या देशात जगातील 17.5% लोक राहतात. भारताने कृषी, उद्योग व तत्सम अन्य क्षेत्रांत नेत्रदिपक अशी प्रगती कलेली आहे. परंतु वाढत्या लोकसंख्यमुळे ही प्रगती जाणवू शकत नाही, अथवा विकास जाणवत नाहीत. या पार्श्वभूमीवर कुटुंब नियोजन कार्यक्रमाची गरज स्पष्ट होते. ही गरज लक्षात घेऊनच भारताने जगात अगोदर 1952 पासुनच सुरवात केली.1966 मध्ये केंद्रीय स्तरावर नियोजन सक्ती केली. ती लोकांना आवडली नाही. त्यामुळे सर्वच राजकिय पक्षांनी कुटुंब नियोजन हा विषय दुर्लीक्षित झाला.

इकॉनॉमीक सर्व्हे 2011 -12 नुसार देशातील जन्म प्रमाण हजारी 22.1 प्रत्येक स्त्रियांमागील जननदर 2.6 मृत्यूप्रमाण हजारी 7.2%तर बालमृत्यू प्रमाण दरहजारी 47 इतके आहे. पुरुषाची आयुमर्यादा 62.6 वर्षे सरासरी स्त्रियांची आयमर्यादा 64.2 वर्षे इतके आहे.

1.37 लोकसंख्या विषयक धोरण

सन 2046 पर्यंत लोकसंख्या स्थिर करणे व दोन मुलांचे कुटुंब ही दोन उद्दिष्ट्ये भारत सरकारच्या लोकसंख्या विषयक धोरणाची होती या धोरणात अल्पमुदत उद्दिष्ट्ये, मध्यम मुदतीची उद्दिष्ट्य व दीर्घमुदतीची उद्दिष्ट्य ठरवली होती. त्यामध्ये मातृत्व आरोग्य, बालकांचे जगणे, संततोनियमन ठरवली होती. त्यामध्ये आरोग्य सेवेची उपलब्धता अशा विविध तरतूदी होत्या.

या धोरणाची वैशिष्ट्य म्हणजे ग्रामीण भागात प्रसुतीच्या सोई वाढवणे, महिलांना सकस आहार व चांगले आरोग्य, बालकांचे आरोग्य, 2046 पर्यंत लोकसंख्या स्थिर ठेवणे, उशिरा अपत्ये होणाऱ्यांना बक्षिसे देणे, कुटुंब कल्याणाच्या सोई पुरविणे, कुटुंब कल्याणाचा प्रसार करणे, विवाहाच्या व प्रसुतीच्या शंभर टक्के नोंदी करणे, राष्ट्रीय लोकसंख्या समिती नेमणे इत्यादी होती. या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी 11 मे 2000 रोजी ''राष्ट्रीय लोकसंख्या आयोगाची'' नेमणूक केली. पंतप्रधान स्वत: अध्यक्ष, सर्व राज्याचे मुख्यमंत्री, केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासक, केंद्रीयमंत्री नामांकित लोकसंख्या शास्त्रज्ञ सार्वजनिक आरोग्य अधिकारी व बिगर सरकारी संघटना या आयोगाच्या सदस्य आहेत. राज्य पातळीवरील आयोगाचे अध्यक्ष संबंधित राज्याचे मुख्यमंत्री आहेत.

या धोरणावरही मोठ्या प्रमाणात टिका झाली तरी ही भारतात जन्मदर थोडा कमी झाला आहे.मात्र मृत्यूदर वेगाने घटला आहे. स्त्रियांची संख्या वेगाने घटली आहे. लहान बालकामध्ये मुलींची संख्या फारच घटल्याचे जाणवते. कुटुंबनियोजनाची जास्त जबाबदारी स्त्रियांच्यावरच टाकल्याची दिसते.

1.38 राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

12 एप्रिल 2005 पासून देशात ''राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान'' सुरु करण्यात आले. यामध्ये उत्तर भारतातील व ईशान्य भारतातील गरीब, मागासलेली अशा 18 राज्यांवर जास्त लक्ष केंद्रित केले. ग्रामीण भागातील विशेषत: दुर्गम भागातील गरीब कटुंबाना परवडण्यायोग्य, दर्जात्मक सुविधा आरोग्य सेवा सहज उपलब्ध करुन देणे हा योजनेचा उद्देश होता.

देशातील प्रत्येक खेड्यात, वस्तीवर 8 लाख 55 हजार आरोग्य प्रतिनिधी नेमणे, देशातील 442 जिल्ह्यामध्ये फिरती आरोग्य केंद्रे निर्माण केली आहेत. सध्या देशात 4,555 सामूहिक आरोग्य केंद्रे 23,673 प्राथमिक आरोग्य केंद्रे 1,47,069 आरोग्य उपकेंद्रे स्थापन केली असून चोविस तास लोकांना आरोग्य सेवा देण्याचा प्रयत्न केला जातो.

1.39 भारत निर्माण योजना

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारचे ग्रामीण विकासाच्या दृष्टीने पायाभूत सुविधांच्या विकासाचे महत्त्व लक्षात घेऊन विविध विकासाच्या योजना सुरु करुन त्यांची अमंलबजावणी केली मात्र त्याला विविध कारणामुळे अपयश आले. सर्व दोष दूर करुन ग्रामीण विकास साध्य करण्यासाठी शासनाने एका नवीन कार्यक्रमाची सुरवात केली तो म्हणजे "**भारत निर्माण योजना**" होय. 2005 साली हा कार्यक्रम सुरु करण्यात आला. ग्रामीण पायाभूत विकासाच्या सर्व योजना या कार्यक्रमाच्या एक छत्राखाली आणल्या आहेत. कालबध्द व नियोजित स्वरुपात हा कार्यक्रम असुन यामध्ये पाणीपुरवठा, रस्ते, गृहबांधणी, दर्ध्वनी, विद्युत, जलसिंचन या घटकांचा समावेश आहे.

1.40 ग्रामीण विकास योजना व कार्यक्रम

क्षेत्रीय विकास कार्यक्रम

1) जिल्हा प्रकर्षित कृषी कार्यक्रम:–अन्नधान्याचा प्रश्न सोडविण्यासाठी जानेवारी 1959 मध्ये भारत सरकारने काही विदेशी तज्ज्ञांच्या मार्गदर्शना खाली भारतातील कृषी मधील कमी उत्पादनाच्या समस्येचा अभ्यास करुन उपाय सुचविण्यासाठी अभ्यास गट नेमला त्यामध्ये त्यांना हा कार्यक्रम सुचवला होता.

2) प्रदेश प्रकर्षीत कृषी कार्यक्रम :– गहू, तांदुळ, भरडधान्य, कापूस, ऊस इत्यादी पिकांमध्ये वाढ घडवून आणण्यासाठी ही योजना सुरु करण्यात आली. अध्यावत तंत्रज्ञान, प्रगत बियाण, खते इत्यादी. वापरुन उत्पादन क्षमतेत वाढ घडवून आणण्यासाठी ही योजना सुरु केली त्यातूनच हरितक्रांतीला चालना मिळाली.

3) वाळवंट विकास कार्यक्रम :– वाळवंटी जमीन वाढू नेयत व सध्या असणाऱ्या वाळवंटी भागाला प्रतिबंध करणे व वाळवंटी क्षेत्राचा विकास घडवून आणणे हा योजनेचा उद्वेश होता शिवाय हिमाचल प्रदेश, जम्मू काश्मीर, येथील शोत वाळवंटी क्षेत्राच्या विकासासाठी या प्रदेशात वृक्षारोपण व वाळूच्या टेकडयांचे स्थिरीकरण, जलसिंचनाद्वारे पिकांची लागवड करण्यासाठी सध्या 7 राज्यातील 40 जिल्ह्यात या योजनेची अंमलबजावणी केली जात आहे.

4) दुष्काळग्रस्त विकास कार्यक्रम:–हा एक राष्ट्रीय कार्यक्रम असून सातत्याने दुष्काळग्रस्त असणाऱ्या क्षेत्रांच्या विकासाकरीता निकष्ट नैसर्गिक साधन सामग्रीवर मोठ्याप्रमाणार असलेल्या क्षेत्रांच्या

विकासाधारीत निकष्ट नैसर्गिक साधन सामग्रीवर मोठ्याप्रमाणार असलेल्या मनुष्य व प्राण्यांच्या अन्न, चारा, पाणी इ. गरजाचा येणारा ताण या भागाचे वैशिष्ट्य होय. सध्या 13 राज्यांतील 672 गटांमध्ये हा कार्यक्रम सुरु असून त्याचा चांगला परिणाम ग्रामीण विकास कार्यक्रम गतिमान झाले आहेत.

5) लाभक्षेत्र विकास कार्यक्रम हा कार्यक्रम भारतातील 60 मोठया व लघु पाठबंधारे व नियोजन मंडळाने स्थापन केलेल्या लाभक्षेत्र विकास कार्यक्रम व जलसिंचन विकासामध्ये लाभाथ्याची भूमिका विषयावरील दोन कार्यगटांनी केलेल्या शिफारशी वरुन याची पुनरचना केली गेली.

6) आदिवासी क्षेत्र विकास कार्यक्रम :–आदिवासी क्षेत्राचा परिपूर्ण विकास साधुन तेथील उत्पादन व उत्पादनाला चालना देण्याकरीता हा कार्यक्रम सुरु करण्यात आला. या मागासलेल्या क्षेत्राचा विकास करण्यासाठी कृषी उत्पादनात वाढ व वन उत्पादनांचा विकास करणे तसेच पत बाजाराच्या उपलब्धतेसाठी मोठ्या आकाराच्या बहुउद्देशीय सोसायट्या स्थापन करण्यात आल्या.

7) डोंगरी प्रदेश विकास कार्यक्रम:– डोंगरी भागाचा विकास साध्य करण्याकरीता तसेच पठारी व डोंगरी भागातील विकासातील दरी दूर करण्याकरीता हा कार्यक्रम सुरु करण्यात आला. या क्षेत्रातील शेतोचा विकास त्यातून लोकांच्या उत्पन्नात वाढ व त्यासाठी जमीन सपाटीकरण इत्यादी सारख्या भूविकास योजनांवर भर अशी उपाययोजाना यामध्ये होती.

8) एकात्मिक पडिक जमीन विकास कार्यक्रम :– जमीन मालकांच्या सक्रीय सहभागातून पडीक जमीनीचा विकास करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले. गावपातळीवर आराखडा आखून जमीनीची क्षमता लक्षात घेऊन जमीनीचा विकास करण व ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मितीचे कार्य केले जाते.

1.41 महाराष्ट्राचे मानव विकासविषयक धोरण

महाराष्ट्र हे भारतातील एक प्रगत राज्य मानले जाते. प्रति व्यक्ती सरासरी उत्पन्नात महाराष्ट्राचा चौथा क्रमांक (65,000) असून सरासरी आयुर्मान 70 वर्षे आहे. दर हजारी बालमृत्यू दर 42 इतका आहे. महाराष्ट्राची सरासरी साक्षरता 82%एवढी आहे. मानव विकासाच्या दृष्टीने महाराष्ट्र मध्यम मानव

विकास गटात येणारे राज्य आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्राचा देशात तिसरा क्रमांक लागतो. राज्याचे क्षेत्रफळ 3,07,713 चौ. किमी. आहे. 2011 च्या जनगणनेनुसार 10 कोटी असून भारतातील श्रीमंत राज्यांपैकी एक असलेल्या महाराष्ट्रातील दरडोई उत्पन्न, राष्ट्रीय दरडोई उत्पन्नापेक्षा अधिक आहे. यामधील बहुतेक उत्पन्न कारखानदारी व सेवा क्षेत्रातून मिळते. राज्यातील 45% लोक शहरी भागात तर 55% लोक ग्रामीण भागात राहतात तर दारिद्र्याचे प्रमाण 22% एवढे आहे.

महाराष्ट्रातील मानवी साधनसंपत्तीच्या विकासाची वास्तविकता जाणून घेण्यासाठी मानवी संसाधन विकासालाही आवश्यक असलेले शिक्षण, आरोग्य आणि कुटुंबकल्याण याबाबतची उपलब्धता आणि विकास यांचा मागोवा घ्यावा लागेल, कारण या सुविधांच्या उपलब्धते शिवाय मानवो संसाधन विकास अशक्य आहे.

विकसनशील अर्थव्यवस्थेत सामाजिक क्षेत्र महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. सामाजिक क्षेत्राच्या विकासात राज्याने ठोस प्रगती केली आहे. सामाजिक विकासाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यात शिक्षणातील गुंतवणूकीची भूमिका प्रमूख आहे. उत्तम प्रशासन व जनतेच्या सहभागातून गुणात्मक सेवा व सामाजिक क्षेत्राच्या विकासात सर्वोत्तम परिणाम घडवून आणता येतील.

1) शिक्षण :– सर्वसमावेशक वाढ होण्यासाठी शिक्षण हा प्रमुख घटक असून सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे प्रमूख साधन ही आहे. महाराष्ट्रामध्ये आधुनिक शिक्षणाची सुरुवात ब्रिटीश मिशनऱ्यांनी 18 व्या शतकात केली. 1821 रोजी पुण्यात संस्कृत कॉलेजची स्थापना झाली. 1857 मध्ये मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. 1884 मध्ये महात्मा फले यांनी अस्पृश्यांसाठी पहिली शाळा काढली. 1880 नंतर राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ उभी राहिली. 19 व्या व 20 व्या शतकात शिक्षणाचा प्रसार ग्रामीण भागात नेण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 'रयत शिक्षण संस्थेचे' योगदान मोठे आहे. तर याच कालावधीत महाराष्ट्रातील अनेक शिक्षण संस्था, शाळा, महाविद्यालये यांनी अध्यापन, संशोधन, ग्रंथ प्रकाशन यांच्याद्वारे शिक्षण प्रसाराचे कार्य वाढवत नेले. संस्कृत तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, पुरातत्वशास्त्र अशा अनेक विद्या शाखांमध्ये राज्यातील विद्वानांनी आपला वेगळा ठसा उमटवला आहे.

अलिकडच्या काळात तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि शैक्षणिक क्षेत्रातील तंत्रज्ञान हस्तक्षेपात प्रोत्साहन यामुळे दर्जेदार शिक्षण सेवांसह गरीबांना खास करुन समाजातील वंचित घटकांना शिक्षणाच्या संधीही सहज उपलब्ध होतील. दर्जेदार मुलभूत शिक्षणामुळे सामाजिक आणि प्रादेशिक असमतोल कमी होऊन संतुलित वाढ व विकास साध्य होईल. ''बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009'' नुसार मुलांना मूलभूत व दर्जेदार शिक्षणाचा हक्क देता येईल. महाराष्ट्रातील शिक्षणाविषयोची माहिती पुढीलप्रमाणे घेता येईल.

2) शालेय शिक्षण :– राज्यात प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक असे शिक्षणाचे टप्पे असून शिक्षण पद्धतीच्या मनोऱ्याच्या त्या पायऱ्या आहेत. 'सर्व शिक्षा अभियाना'च्या माध्यमांद्वारा हा पाया चांगल्या प्रकारे प्रस्थापित झाला आहे. प्राथमिक क्षेत्राचे सार्वत्रिकोकरण या कार्यक्रमानुसार विद्यार्थ्यांना त्यांच्या राहत्या घरापासून 1.5 किमी. च्या अंतरात शिक्षणविषयक सुविधा उपलब्ध असणे गरजेचे आहे. या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा परिषदांना अनुदान वितरीत करण्यात येते. सन 2010-11 मधील राज्यात पहिली ते सातवी पर्यंत शिक्षण देणाऱ्या 75,695 शाळा होत्या, तर पहिली ते दहावी पर्यंत शिक्षण देणाऱ्या 15,762 शाळा होत्या. पहिली ते बारावी पर्यंत शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या 4,626 इतकी होती तर 11 वी, 12 वी चे वर्ग असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या 969 इतकी होती.

प्राथमिक शाळेत (1 ली ते 7 वी) विद्यार्थी संख्या 1 कोटी 6 लाख 26 हजार होती. तर माध्यमिक (8 वी ते 10 वी) विद्यार्थी संख्या 56 लाख 3 हजार होती. उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या 51 लाख 8 हजार इतकी होती.

तर राज्यात कनिष्ठ महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, वैद्यकिय महाविद्यालये व कृषी महाविद्यालये 2,855 इतकी आहेत.

3) प्रशासकीय व्यवस्था :– राज्यात 3 शिक्षण संचालक आहेत. शालेय व महाविद्यालयीन शिक्षण, उच्च शिक्षण आणि प्रौढ शिक्षण अशा 3 विभागांसाठी 3 निराळे संचालक आहेत. तसेच तांत्रिक शिक्षण,

व्यावसायिक शिक्षण, वैद्यकिय शिक्षण व शेतकी शिक्षण यासाठीही संचालक आहेत. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचे नियंत्रण जिल्हा परिषदेतफ तर उच्च शिक्षणाचे नियंत्रण विद्यापीठ, सचिवालय व विद्यापीठ अनुदान मंडळातफ होते.

4) नवे शैक्षणिक धोरण :– आर्थिक व सामाजिक विषमता दूर करुन जीवनमूल्ये उंचावली जावीत हे प्रमुख उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून नवे शैक्षणिक धोरण केंद्र सरकारने 1986 मध्ये जाहीर केले. यात मे 1992 मध्ये थोडी सुधारणा करण्यात आली. यात राष्ट्रीय शिक्षण पद्धतीचा पुरस्कार करण्यात आला आहे. 5 + 3 + 2 + 2 + 3 असा नवा शैक्षणिक आकृतीबंध, आंतरराष्ट्रीय सामंजस्य व शांततामय सहजोवन यावर भर, शैक्षणिक विकासातील असमतोलाचे निर्मूलन, शिक्षणसंस्थांच्या कार्याचे सुसूत्रिकरण, त्यांना स्वायत्तता, उद्योजकता विकासाकडे खास लक्ष, निरंतर शिक्षण अशी तत्त्वे यात आहेत. या सर्वांसाठी दिल्लीच्या राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने अभ्यासक्रमांचा व पाठ्यपुस्तकांचा आराखडा तयार केला आहे.

नवीन अभ्यासक्रमात लोकशाही, सामाजिक न्याय कर्तव्ये, जबाबदारीची जाणीव, स्त्री-पुरुष समानता, पर्यावरण रक्षण, अंधश्रद्धा निर्मूलन, लोकसंख्या शिक्षण, वैज्ञानिक वृत्ती अशी तत्त्वे असणार आहेत. धर्म, पंथ, जाती, भाषा, संस्कृती यांच्या विविधतेतून एकतेची भावना प्रतित व्हावी ही त्यामागची भावना आहे. या तत्त्वाच्या अंमलबजावणीसाठी शिक्षकांचे व्यापक प्रमाणावर प्रशिक्षण हा या कार्यक्रमाचा मुख्य गाभा आहे.

राष्ट्रीय साक्षरता मिशनच्या धर्तीवर फब्रुवारी 1989 मध्ये 20 सदस्य असणाऱ्या राज्य साक्षरता मिशनची स्थापना करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये व्यायामाची आवड निर्माण व्हावी, क्रीडा संस्कृती जोपासावी यासाठी खास पावले उचलली जातात.राज्यात क्रीडा संकुले बांधण्याचा निर्णय झाला असून 40 क्रिडासंकुले पूर्ण झाली आहेत. शासकीय व बिनशासकीय नोकऱ्यांमध्ये 5% आरक्षण देण्याचा धोरणात्मक निर्णय झाला आहे.

सन 1986 च्या शैक्षणिक धोरणाची चिकित्सा 1990 मध्ये करुन शिक्षणाचे सार्वत्रिकरण, स्त्रिया व मागासवर्गीयांचे शिक्षण, शैक्षणिक लोकशाही या मुद्यांवर त्यात भर आहे.''शिक्षणाचा हक्कहा मूलभूत हक्कअसावा. शिक्षणावर उत्पन्नाच्या 4% खर्च सध्या होतो तो 6% पर्यंत व्हावा ही अपेक्षा जून 1997 मध्ये शिक्षण खात्याने घेतलेल्या नव्या धोरणानुसार व्यक्त करण्यात आली. या धोरणाची खालील वैशिष्ट्ये होत.

1) प्राथमिक शाळेच्या मुलांच्या दप्तराचे ओझे 1.5 कि.ग्रॅ इतके असावे.

2) माध्यमिक शाळांच्या विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे 3.5 कि.ग्रॅ इतके असावे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील तत्त्व ध्यानात घेऊन राज्य सरकारने सर्व शिक्षण मोहीम सुरू केली आहे. त्यामध्ये खालील वैशिष्ट्ये होत.

1) सर्व मुलामुलींना 2003 पर्यंत शाळेत दाखल करणे.

2) 2007 पर्यंत सर्व मुलामुलींचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करणे.

3) 2010 पर्यंत सर्व मुलामुलींचे शालेय शिक्षण पूर्ण करणे.

4) शिक्षणाचा दर्जा उंचावणे.

5) शिक्षणातील स्त्री-पुरुष तफावत 2010 पर्यंत नाहीशी करणे.

6) 2010 पर्यंत शाळामधील संपूर्ण उपस्थितीचे उद्दिष्ट्ये साध्य करणे.

ही उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी पुरेशा शाळा खोल्या, शिक्षक संख्या, इमारत दुरुस्ती, मुलांना मोफत पाठ्यपुस्तके, शिक्षक प्रशिक्षण, नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांसाठी मार्गदर्शन, शाळाबाह्य मुलांसाठी विशेष उपक्रम या सर्वांसाठी केंद्र व राज्य सरकार प्रत्येकी 50% खर्च उचलते. शिक्षणापासून वंचित राहिलेल्या बालकामगार व निराधार बालकांसाठी पुढील विविध योजना राबवल्या आहेत.

5) केंद्रिय विद्यालये :– केंद्रशासनात, संरक्षणदलात नोकरी करणाऱ्या व्यक्तींच्या पाल्यांना वारंवार बदलीचा त्रास व शिक्षणात अडथळा येऊ नये म्हणून देशात सर्वत्र सारखा अभ्यासक्रम असणारी केंद्रिय विद्यालयांची साखळी सुरू केली असून अभ्यासाबरोबर खेळ व अभ्यासेतर उपक्रम इंग्रजी व हिंदी

माध्यमातून शिक्षण हे शाळेचे वैशिष्ट्ये आहे. राज्यातील 40 केंद्रिय विद्यालयातील 33,000 विद्यार्थी या शिक्षणाचा लाभ घेत आहेत.

6) रात्रशाळा :– राज्यात पहिली रात्रशाळा पणे येथे 1855 मध्ये महात्मा फले यांनी सुरू केली. सध्या संपूर्ण महाराष्ट्रात 140 रात्रशाळा असून एकट्या मुंबईत 110 रात्रशाळा आहेत. त्यात सुमारे 30 हजार विद्यार्थी असून मुलींची संख्या 25% आहे.

7) साखरशाळा :– साखर कारखान्यात ऊस तोडणी कामगार म्हणून राज्याच्या मागास, ग्रामीण व दुष्काळी भागातून अंदाजे 4,00,000 मजूर येतात. त्यांचा (6 ते 8) महिने कारखान्याचा हंगाम असतो. त्यांच्या मुलांची संख्या 40 ते 50 हजार आहे. आईवडिलांबरोबर मलांवरही विस्थापनाची वेळ येते. त्यांच्यासाठी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावरच साखरशाळा सुरू करण्यात आल्या आहेत. त्यांच्या परीक्षा, निकालपत्रके नियमित घेऊन त्यांची शिक्षणाची सोय केली जाते. पंचवार्षिक योजनत यासाठी खर्चाची तरतूद केली आहे.

8) पाषाणशाळा :– दगडाच्या खाणीत व वीटभट्टीवर काम करणाऱ्या मजुरांच्या मुलांसाठी पाषाणशाळा व भोंगाशाळा सुरू केल्या आहेत. या मुलांना अनौपचारिक व लवचिक पद्धतीने शिक्षण देऊन शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले जाते.

9) शंभर दिवसांची शाळा :– औपचारिक वा परंपरागत पूर्णकालिक शिक्षणापासून वंचित असलेल्या 6 ते 14 वर्षे या वयोगटातील मुलांसाठी राज्यात जवळजवळ 300 अनौपचारिक शिक्षण केंद्र कार्यरत आहेत. खास करून आदिवासी भागात 100 दिवसांच्या शाळेसारखा उपक्रम स्वयंसेवी संस्थांमाफत राबवला जातो.

10) भोंगाशाळा :– 'भोंगा शाळा' ही संकल्पनाही अनौपचारिक शिक्षणाशी निगडीत आहे. वीट भट्टीवरील कामगार कुटुंबास त्यांच्या परिसरातच अंशकालीन अभ्यासक्रमावर आधारित अनौपचारिक शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात येते. असे शिक्षण देणाऱ्या शाळांना भोंगा शाळा म्हणून ओळखले जाते.

11) सेतूशाळा / संधीशाळा :– दोन वर्षांपूर्वी करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार राज्यात शाळेत जाणाऱ्या वयोगटातील 70,000 विद्यार्थी शालेय शिक्षणापासून वंचित राहिले असल्याने अथवा शाळेत जाऊ शकत नसल्याने शाळा बाहेर राहिलेल्या या मुलांना अनौपचारिक शिक्षण देऊन त्यांच्या शैक्षणिक गरजा भागविण्याच्या दृष्टिकोनातून राज्यात सेतूशाळा, राजीव गांधो संधीशाळा यासारखे उपक्रम राबवले जात आहेत.

1.42 प्रौढ शिक्षण

2 ऑक्टोबर, 1978 पासून देशात व राज्यात ''प्रौढ शिक्षण कार्यक्रम'' सुरू केला. त्याचा उद्देश 15 ते 35 वर्षे वयोगटातील प्रौढांसाठी साक्षरतेबरोबरच अंकज्ञान, कार्यात्मक कौशल्य, सामाजिक जागृती यावरही भर दिला गेला. 1986 साली 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' हे देशातील निरक्षरतेचे समूळ उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून आखले असून त्यासाठी नियोजनबद्ध व कालबद्ध प्रयत्न आवश्यक आहेत. प्रौढ साक्षरतेसाठी पुढील योजना आहेत.

1) राष्ट्रीय साक्षरता प्रचारक अभियान :– साक्षरतेची गती वाढण्यासाठी 1986 मध्ये जाहीर केलेल्या नवीन शैक्षणिक धोरणात प्रौढ शिक्षणावर विशेष लक्ष केंद्रित केले गेले व देशातील निरक्षरता 1995 पर्यंत नष्ट करण्याचा कार्यक्रम हाती घेतला. त्यानुसार मे 1988 मध्ये 'राष्ट्रीय साक्षरता प्रचारक अभियान' स्थापन करण्यात आले.

2) राज्य साक्षरता अभियान :– राष्ट्रीय साक्षरता अभियानाच्या धर्तीवर फब्रुवारी 1989 मध्ये वीस अशासकिय सदस्यांचा समावेश असलेले 'राज्य साक्षरता अभियान' स्थापन करण्यात आले व राज्यात प्रौढ शिक्षण कार्यक्रमास गती देण्यात आली.

3) संपूर्ण साक्षरता मोहीम :– टप्प्याटप्प्याने राज्यातील सर्व जिल्ह्यात आठव्या व नवव्या योजनेत 'संपूर्ण साक्षरता मोहीम' आखून राज्यातील 15 ते 35 वयोगटातील लोकांमध्ये साक्षता साध्य करण्यात यश मिळत आहे.

4) जनशिक्षण निलायम केंद्र :– जनशिक्षण निलायम केंद्रामाफत नवसाक्षरांना त्यांनी घेतलेल्या शिक्षणाचा विसर पडू नये म्हणून त्यांना वाचनालयामाफत पुस्तके, वृत्तपत्रे व नियतकालिके पुरवणे, सांस्कृतिक कार्यक्रम करणे, खेळ आयोजित करणे असे धोरण 1988-89 मध्ये सुरू केले.

5) निरंतर शिक्षण योजना :– प्रौढ शिक्षण मोहिमेअंतर्गत सर्वच जिल्ह्यात साक्षरता कार्यक्रम राबवला, त्याची सांगता ही झाली. त्यामुळे प्रौढ शिक्षण कार्यक्रमाऐवजी नवसाक्षरांसाठी 'निरंतर शिक्षण योजना' राबविली जात आहे.

1.43 आदिवासींसाठी शैक्षणिक सुविधा –

आदिवासींमधील शैक्षणिक मागासलेपण लक्षात घेऊन 6 ते 14 वयोगटातील आदिवासी विद्यार्थ्यांना पर्याप्त, अनौपचारिक प्रौढ शिक्षणासाठी योजना आखल्या आहेत. आदिवासी भागात किमान 100 लोकसंख्या असलेल्या वस्तीत शाळा उघडण्याचे प्रमाणक निर्धारित केले आहे.

1) **अंशकालीन वर्ग :–**9 ते 14 वयोगटातील जी मुले पर्याप्त शिक्षण घेऊ शकली नाहीत त्यांच्यासाठी अंशकालीन वर्ग चालवले जातात. त्यांना इयत्ता 4 थी पर्यंतचा अभ्यासक्रम शिकवला जातो.

2) **पाळणाघरे –** आदिवासो मुलांना आईवडिलांच्या अनुपस्थितीत घरातील लहान मुलांना सांभाळावे लागते. त्यामुळे ही मुले शाळेत जात नाहीत. म्हणून जिल्हा परिषदेमाफत बालवाड्यांना जोडून पाळणाघरे चालवली जातात.

3) **राज्यशासनाकडून विशेष प्रयत्न :–** इयत्ता 1 ली ते 4 थी पर्यंतच्या आदिवासी मुलांमधील गळती व नापासाचे प्रमाण कमी करण्यासाठी खास प्रयत्न केले जातात. आदिवासी भागात काम करणाऱ्या शिक्षकांना पुरस्कार म्हणून रु. 1,000/- पारितोषिक व अग्रीम वेतनवाढ दिली जाते. ठाणे, चंद्रपूर जिल्ह्यात तीन निवासी शाळा उघडून तेथे विद्यार्थ्यांना मोफत जेवण, गणवेश व पुस्तके पुरविलो जातात.

4) **आश्रमशाळा :–** राज्यात आदिवासी विकास योजनेच्या अंतर्गत येणाऱ्या रायगड, नाशिक, चंद्रपूर, ठाणे, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, नांदेड, अमरावती, यवतमाळ, नागपूर, भंडारा,

गोंदिया व गडचिरोली या सोळा जिल्ह्यात शासकीय अनुदानावर 684 आश्रमशाळा, 273 मलोद्योगोत्तर आश्रमशाळा कार्यरत आहेत. ते आदिवासी शिक्षणाचे पवित्र कार्य करीत आहेत.

5) प्रोत्साहनात्मक विविध योजना :– आदिवासी भागात प्रौढ शिक्षण कार्यक्रमावरही विशेष लक्ष असून सैनिकी शाळेत मोफत शिक्षण, परीक्षा फो माफ, शिष्यवृत्त्या, औद्योगिक प्रशिक्षणासाठी विद्यावेतन, माफत गणवेश, पुस्तक पेढी यासारख्या योजनाही राबवल्या जात आहेत.

1.44 नवोदय विद्यालय

केंद्र सरकारच्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार महाराष्ट्रात 32 नवोदय विद्यालये असून त्यात 6 वी पासून 12 वी पर्यंत शिक्षण दिले जाते. 75% विद्यार्थी ग्रामीण भागातील व 25% विद्यार्थी शहरी भागातील असा प्रवेश दिला जातो व वर्गीकृत जातीजमातीच्या मुलामुलींना त्यांच्या जिल्ह्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात प्रवेश दिला जातो. शिक्षणातील एक अभिनव प्रयोग म्हणून याकडे लोक पाहतात.

1.45 माहिती तंत्रज्ञान आणि शिक्षण

माहिती व तंत्रज्ञानविषयक केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या समितीच्या शिफारशी राज्य शासनाने स्वीकृत केल्या असून एकविसाव्या शतकास व प्रचलित संगणक युगास अनुसरून 1999 या वर्षीच माहिती व तंत्रज्ञान धोरण 1988 जाहीर केले आहे. शालेय शिक्षणा संदर्भात माहिती व तंत्रज्ञान धोरण वर्ष ही सन 1999 मध्ये पाळण्यात आहे.

विद्यार्थ्यांना अध्ययनात व शिक्षकांना अध्यापनात संगणकाचा वापर करण्यास प्रोत्साहीत करुन टप्प्याटप्प्याने संगणकाद्वारे शिक्षण साध्य करणे हे नव्या धोरणाचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार माहिती व तंत्रज्ञान हा वैकल्पिक विषय आठवी ते दहावीच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आला आहे.

1.46 शिक्षण सेवक योजना

राज्यातील शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी सन 2000 पासून शिक्षणसेवक योजना शासनाने अंमलात आणली आहे. सर्व शासनमान्य अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व कनिष्ठ

महाविद्यालये येथील शिक्षकांना पात्रतेनुसार प्रती महिना 3,000 ते 5,000 या कंत्राटी मानधनावर घेण्यात येते. वास्तविक पूर्ण रिक्त पदावर नियुक्ती न करता तात्पुरत्या नेमणुका केल्या जातात.

1.47 कला शिक्षण

1965 मध्ये कला विद्यापिठाची स्थापना करण्यात आली.यामाफत प्रमाणपत्र व पदविका दिल्या जातात. राज्यात मुंबई, औरंगाबाद व नागपूर येथे महाविद्यालये आहेत. ड्रॉईंग, पेंटींग, उपयोजित कला, फोटोग्राफो, स्क्रिन प्रिंटींग अंतर्गत सजावट प्रकल्प यांचे शिक्षण दिले जाते. राज्यात इतरत्र 30 बिगर सरकारी कला महाविद्यालये आहेत.

1.48 शैक्षणिक विकासासाठी महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वपूर्ण योजना

1) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना फो माफो :– सन 1959 पासून ही योजना राबवली अस्न सुरुवातीस वार्षिक 900 रुपये पेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या पाल्यांना ही योजना होती. याची मर्यादा वाढवत सध्या वार्षिक उत्पन्न 15,000 पेक्षा कमी असणाऱ्या आर्थिक दुर्बल व्यक्तींच्या मुलांना या योजनेचा लाभ दिला जातो. महाराष्ट्रात पंधरा वर्षापेक्षा जास्त काळ राहणाऱ्या व्यक्तीनांच या योजनेतून पाल्यांना सवलत घेता येते.

2) महात्मा फले शिक्षण हमी योजना :– ग्रामीण भागातील काम करणारी गरीब मुले, बालकामगार, शेती, पशुसंवर्धन, ऊसतोडणी यासारख्या उद्योगात त्यांना कामे लावतात. तर शहरी भागात हॉटेल व्यवसाय, बांधकाम, कागद-भंगार गोळा करणाऱ्या व्यवसायात कमी पगारात कामे लावतात. शिक्षण घेण्याच्या वयात त्यांना काम करावे लागते. प्राथमिक शिक्षणा पासून ही मुले वंचित असतात. त्यांना शिक्षण घेता यावे म्हणून राज्य शासनाने ही योजना सुरू केली असून स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून त्यांच्यासाठी शाळा-केंद्रे उघडलो जातात. मानधनावर शिक्षकांची नेमणूक केली जाते. शासनाकडून या योजनेअंतर्गत प्रत्येक शाळा-केंद्रासाठी प्रत्येक वर्षासाठी खर्चाची तरतूद असते. 6 ते 14 वयोगटातील मुलांसाठी ही योजना मुलभूत हक्कठरली आहे.

3) मुलींना मोफत शिक्षण :– महाराष्ट्राने सन 1983-84 पासूनच मुलींना मोफत शिक्षणाचा कार्यक्रम सुरू केला. सुरुवातीला दहावीपर्यंत नंतर 12 वी पर्यंतचे शिक्षण मोफत दिले जाते. ही सवलत घेणारी मुलगी व पालकांचे महाराष्ट्रात पंधरा वर्षे व त्यापेक्षा जास्त वास्तव्य आवश्यक मानले जाते.

4) प्राथमिक स्तरावरील मुलींच्या शिक्षणाचा राष्ट्रीय कार्यक्रम :– हा कार्यक्रम (NPEGEL) या नावाने ओळखला जातो. 2003 पासून आर्थिकदृष्ट्या मागास विकास गटातील अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय, अल्पसंख्यांकासाठी व दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील मुलांना प्राथमिक स्तरावर दर्जेदार शिक्षणाची संधी प्राप्त करून देण्यावर हा कार्यक्रम भर देतो. मुलींना मीनामंच, लाईफ स्कील डेव्हलपमेंट, बालकांची काळजी आणि शिक्षण या कार्यक्रमाच्या माध्यमातून शिक्षण दिले जाते.

5) कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय :– सन 2004 पासून आर्थिकदृष्ट्या मागास विकास गटातील अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय, अल्पसंख्यांक व दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील उच्च प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या मुलींना दर्जेदार शिक्षणासाठी निवासी विद्यालयाची सोय करण्याच्या उद्देशाने ही योजना सुरू असून राज्यातील आर्थिकदृष्ट्या मागास 36 विकास गट व 20 गलिच्छ वस्त्यांची निवड करून राबवली जाते.

6) सावित्रीबाई फ़ले दत्तक पालक योजना :– इयत्ता 12 वी पर्यंतच्या मुलींना सरकारने मोफत शिक्षणाची सोय केली असली तरी मुलींना शिक्षणासाठी प्रवृत्त करणे, त्यांच्या किमान गरजा भागवण्यासाठी प्रति महिना 30 रुपये मानधन देऊन त्यांना दत्तक घेणे, 1 ली ते 7 वी पर्यंत या योजनेचा लाभ मुलींना देणे अशी योजना असून संपूर्ण भारतात महाराष्ट्राने ही क्रांतिकारक योजना आखली आहे.

7) अहिल्याबाई होळकर योजना :– या योजनेनुसार ग्रामीण भागातील इयत्ता 5 वी 10 वी मधील मुलींना त्यांच्या गावात माध्यमिक शाळा नसेल तर दुसऱ्या गावातील शाळेत मोफत बसची सोय केली जाते. या योजनेचा सपूर्ण खर्च महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ व महाराष्ट्र शासन 2 : 1 या प्रमाणात आर्थिक भार उचलतात.

8) एकलव्य शिष्यवृत्ती योजना :–पदवी परीक्षेत शास्त्र शाखेत 70% पेक्षा जास्त व इतर शाखांमध्ये 60% पेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील हुशार विद्यार्थ्यांना या योजनेत पदव्युत्तर शिक्षणासाठी 5,000 रुपयाची मदत देतात.

9) मुलींना उपस्थिती भत्ता :– अनुसूचित जाती-जमाती, भटक्या व विमुक्त जातीजमाती यामधील तसेच दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील मुलींकरीता त्यांना शाळेत जाण्यास उत्तेजन मिळावे म्हणून सन 1991-92 पासून ही योजना सुरू असून शैक्षणिक वर्षात किमान 220 दिवस प्राथमिक शाळेत उपस्थित मुलींना प्रत्येक दिवसाला एक रुपया याप्रमाणे उपस्थिती भत्ता दिला जातो. मात्र पालकांच्या उत्पन्नाच्या मर्यादेची अटसुद्धा आहे.

10) आदिवासी विद्यार्थ्यांना उपस्थिती भत्ता :– आदिवासी समाजाची आर्थिक व सामाजिक स्थिती शिक्षणाविषयी अनास्था निर्माण करणारी असते. म्हणून आदिवासींच्या मुलांना शिक्षणात गोडी वाटून शाळेत जाण्यास त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी इयत्ता 5 वी ते 10 वी पर्यंतच्या मुलांना प्रतिवर्षी सरासरी 500 रुपये इतका उपस्थिती भत्ता दिला जातो.

11) सैनिकी शाळा :– सन 1996-97 मध्ये प्रत्येक जिल्ह्यात एक सैनिकी शाळा बिगर शासकीय संस्थाना सुरू करण्यास परवानगी दिली गेली. आज राज्यात 43 सैनिकी शाळा असून काही जिल्ह्यात फक्त मुलींसाठी शाळा आहे. विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, नेतृत्व गुण, शिस्त, शौर्य-धैर्य व आत्मविश्वास या गुणांचे संस्कार व त्यांचे संवर्धन होण्यासाठी या शाळा प्रयत्न करतात.

12) महाराष्ट्र छात्र सेना :– राज्यातील सर्व शाळांमध्ये इयत्ता 8 वी व 9 वी च्या विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, खिलाडूवृत्ती, नेतृत्व गुण व राष्ट्रीय एकात्मता यांची जोपासना व्हावी म्हणून सन 2000 पासून ही योजना सुरू केली आहे. प्रत्येक शाळेत किमान एक छात्रसेना तुकडी असावी. शहरी भागात 100 विद्यार्थी, ग्रामीण भागात 50 विद्यार्थी व दुर्गम भागात 30 विद्यार्थी असे या योजनेत अभिप्रेत आहे.

13) संगणक विषयक ज्ञानाचा प्रसार :– 21 व्या शतकाची गरज लक्षात घेऊन संगणक विषयक ज्ञानाचा प्रसार व्हावा म्हणून माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना संगणक पुरवण्याची केंद्र पुरस्कृत योजना राज्यात राबवली गेली व त्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संगणकाचा प्रसार करण्यावर भर दिला गेला.

14) पहिली पासून इंग्रजी :– इंग्रजी शिक्षणाची व्यवहारातील गरज व जागतिक व्यवहाराची भाषा म्हणून इंग्रजीला प्राप्त झालेले महत्त्व लक्षात घेऊन सन 2000-01 पासून 'पहिलीपासून इंग्रजी' ही योजना शासनाने सुरू केली. त्यामुळे राज्य, देश व आंतरराष्ट्रीय स्तरावर इंग्रजीच्या माध्यमातून स्पर्धेला तयार करणे हा उद्देश या योजनेचा आहे. इतर विषयांप्रमाणे इंग्रजीही पहिली पासून मुलांना सहज यावे हा उद्देश त्यात आहे.

15) क्रीडा प्रबोधिनी :– राज्यात एकूण 11 ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी स्थापन करून पुण्यात मध्यवर्ती केंद्र स्थापन केले आहे. 'कॅच देम यंग' या तत्त्वानुसार 8 ते 14 वयोगटातील विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना चांगले प्रशिक्षण देऊन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रतिभासंपन्न खेळाडू तयार करण्याचे काम या योजनेत केले जाते. 1995 पासूनच सरकार विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा गुण वाढवण्याचा प्रयत्न करते.

1.49 शिक्षण विकास निर्देशांक

राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन विद्यापीठ आणि मानव विकास मंत्रालय यांच्यामाफत प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावरील शिक्षण विकास निर्देशांक तसेच संपूर्ण मूलभूत शिक्षणा करिता केवळ 'जिल्हा शैक्षणिक माहिती प्रणाली' ह्या माहितीवर आधारित असणारा संयुक्त निर्देशांक परिगणित करण्यात येतो. शिक्षण विकास निर्देशांक हा राज्याच्या विशिष्ट निर्देशांका बरोबरच मूलभूत शिक्षणाचे नवीन पैलू दर्शवितो. भारतातील मूलभूत शिक्षण आणि सार्वत्रिक मूलभूत शिक्षणाच्या दिशेने प्रगती सांख्यिकी 2009-10 अहवालानुसार महाराष्ट्र प्राथमिक स्तराकरिता 14 व्या क्रमांकावर तर उच्च

प्राथमिक आणि संयुक्त स्तराकरिता 13 व्या क्रमांकावर असून शिक्षण विकास निर्देशांक अनुक्रमे 0.58 प्राथमिक स्तर, 0.75 उच्च माध्यमिक स्तर, 0.66 संयुक्त स्तर येता.

1.50 सार्वजनिक आरोग्य

कोणत्याही देशाच्या विकासात तेथील जनतेच्या आरोग्यास महत्त्वाचे स्थान असते. 1978 साली भारत सरकारने 'सर्वांसाठी आरोग्य' ही संकल्पना स्वीकारली. कुटुंबकल्याण, जनतेचे आरोग्य, पोषण, विविध रोगांचे निर्मूलन उदा. कुष्ठरोग, हिवताप यासारखे कार्यक्रम राबवून केंद्रशासनाच्या नियोजन प्रक्रियेचा एक भाग आहे. सर्वसाधारणपणे ''आरोग्य म्हणजे केवळ रोग आणि विकलांगपणा निवारण करणे नव्हे तर संपूर्ण शारीरिक, मानसिक आणि सामाजिक स्वास्थ्य होय.''

देशातील दारिद्र्य, लोकसंख्या वाढ, त्यातून निर्माण होणारे बालमृत्यू, कुपोषण, अस्वच्छता यासारख्या समस्या तसेच अस्वच्छतेतून निर्माण होणारी रोगराई यांचा विचार करून सार्वजनिक आरोग्याच्या प्रश्नाला प्राधान्य देणे गरजेचे असते. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने 'सर्वांसाठी आरोग्य 2020' पर्यंत जे ध्येय साध्य करावयाची आहेत ती केंद्रान ठरवून दिलेल्या लक्ष्यानुसार निवडक आरोग्य निर्देशांक व राज्याची सद्यःस्थिती पुढील तक्त्यात पाहता येईल.

तक्ता क्र 1.4

आरोग्य निर्देशांक व राज्याची सद्यःस्थिती

अ. नं.	आरोग्य विषयक निर्देशांक	केंद्राने 11 व्या योजनेत ठरवलेले लक्ष्य	2010 पर्यंतची राज्याची सद्यःस्थिती
1)	जन्मदर (हजारी)	18.0	17.1
2)	मृत्यूदर (हजारी)	05.0	06.5
3)	बालमृत्यू दर (हजारी)	17.0	31.0
4)	माता मृत्यू दर (हजारी)	01.1	01.3
5)	अर्भक मृत्यू दर	25.0	28.0
6)	जननदर	02.1	02.0

आधार – नमुना नोंदणी पाहणी, भारताचे महानिबंधक

सर्वसाधारणपणे राज्यात 1,264 सार्वजनिक सरकारकडून अनुदानावर चालणारी रुग्णालये, 2,924 दवाखाने, 2,520 क्षय रुग्णालये चिकित्सालये, 1,816 प्राथमिक आरोग्य केंद्रे, 10,580 आरोग्य उपकेंद्रे, 386 ग्रामीण रुग्णालये, 14 वैद्यकिय महाविद्यालये, 23 जिल्हा किंवा सिव्हिल रुग्णालये, 8 महिला रुग्णालये, 4 मनोरुग्णालये, 3 रेत रुग्णालये, 172 प्राथमिक आरोग्य केंद्रे व 61 फिरती आरोग्य पथके असून दर एक लाख लोकसंख्येमागे 102 रुग्णालयीन खाटा असून राज्यात वरील सुविधांच्या माध्यमातून आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली जाते.

1.51 विविध आरोग्य योजना

1) **जीवनदायी आरोग्य योजना :–**आर्थिकदृष्ट्या कमकुवत व दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना महागड्या शस्त्रक्रियांचा खर्च भागविता यावा यासाठी त्यांना अर्थसहाय्य या योजनेतून दिले जाते. मेंदूविकार, मूत्रपिंड विकार, हृदय विकार, मज्जारज्जूचा आजार व कर्करोग यासारख्या व्याधींवर शस्त्रक्रियेसाठी 1 लाख 50 हजारापर्यंत अर्थसहाय्य केले जाते. त्यासाठी 250 कोटींचा निधी शासनाने उभा केला आहे.

2) **जननी सुरक्षा योजना :–** सन 2005-06 पासून ही योजना लागू असून गरीब व आर्थिकदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या मागास महिलांमध्ये घरीच प्रसूत होण्याचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे महिला व बालमृत्यूही जास्त होतात. हे टाळून महिलांची प्रसुती रुग्णालये, आरोग्य केंद्र व इतर आरोग्य संस्थांमध्ये प्रसुती वाढल्या पाहिजेत म्हणून शासन शासकीय दवाखान्यात प्रसुती होणाऱ्या शहरी महिलांना 600 रुपये तर ग्रामीण महिलांना 700 रुपये अनुदान भत्ता दिला जातो. त्यामुळे माता मृत्यूदर, अर्भक मृत्यूदरही कमी झाला आहे.

3) **शालेय आरोग्य कार्यक्रम :–** हा कार्यक्रम नियमित उपक्रम म्हणून शासनाच्या वतीने राबवला जात असून खाजगी व सार्वजनिक शाळांमधील पहिली ते चौथी शाळामध्ये मोफत तपासणी व मोफत वैद्यकिय सोयीसुविधा पुरविल्या जातात.

1.52 राष्ट्रीय रोगनियंत्रण कार्यक्रम

1) हिवताप निर्मूलन :– प्रथम 1958 मध्ये राष्ट्रीय हिवताप निर्मूलन योजना सुरू केली. त्यात 1979 मध्ये सुधारणा करून ही योजना देशात व राज्यात राबविली आहे. तापाच्या रोग्याचे रक्त नमुने गोळा करणे, त्यातील हिवतापाचा रोगी शोधून काढणे व त्याच्यावर औषधोपचार करणे, किटकनाशक फवारणे, डास नष्ट करणे, राज्याच्या ज्या भागात हिवताप सतत असतो तेथे प्रभावी उपचार व्यवस्था केली जाते.राज्यात ठाणे, रायगड, नाशिक, जळगाव, धुळे, नांदेड, यवतमाळ, गडचिरोली, चंद्रपूर, पूणे, मुंबई याठिकाणी खास हिवतापाची पथके नेमण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

2) राष्ट्रीय किटकजन्य रोगनियंत्रण कार्यक्रम :– हिवताप, हत्तीरोग, मेंदूज्वर, चिकनगुनिया, डेंग्यू, चंडिपुरा या रोगांच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी देशात व राज्यात ही योजना लागू असून राज्याच्या वेगवेगळ्या भागांचा अभ्यास करून 15 राष्ट्रीय हत्तीरोग निर्मूलन पथके, 6 सर्वेक्षण पथके, 7 रात्र चिकित्सालये, 3 शोध व उपचार पथके नेमली असून वर्धा येथे हत्तीरोग संशोधन केंद्र आहे.

3) कुष्ठरोग निर्मूलन :– हा पूर्णपणे केंद्रशासन पुरस्कृत कार्यक्रम असून कुष्ठरोगी शोधून नियमित उपचार करून रोगमुक्त व्यक्तीचे पुनर्वसन केले जाते. प्रचलित शासनाच्या सर्व योजनांचे 1983 मध्ये 'राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमात' रुपांतर केले गेले. जागतिक बँकेच्या सहकार्याने 1993-94 मध्ये याची व्याप्ती वाढवली गेली. 2000 साली पहिला टप्पा, 2001 मध्ये दुसरा टप्पा सुरू केला. महाराष्ट्रात 'टाटा रिसर्च सेंटरने' लस तयार केली असून कुष्ठरोग निर्मूलन व पुनर्वसन क्षेत्रात महाराष्ट्राने चांगली कामगिरी केली आहे. राज्यात जवळजवळ 288 स्वयंसेवी संस्था या कार्यात शासनाला मदत करत आहेत.

4) क्षयरोग नियंत्रण :– एक वर्षाखालील मुलांना बी. सी. जी. लस टोचणे, क्षयरोग्यांना नियमित औषध उपचारास परावृत्त करणे असा कार्यकम असून देशात 466 जिल्हा क्षयरोग नियंत्रण केंद्रे ग्रामीण भागात आसून ती या रोगाच्या नियंत्रणाचे काम करतात. तसेच 330 चिकित्सा केंद्रेही स्थापन केली आहेत. देशात 1 कोटी लोक आजमितीस क्षयरोगाने ग्रस्त आहेत. दरवर्षी सरासरी 18 लाख नवीन रुग्ण देशात सापडतात. जागतिक बँक व इतर स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्यातून मार्च 1997 ला क्षयरोग

नियंत्रणाचा सुधारित कार्यक्रम आखला आहे. हा कार्यक्रम देशातील सर्वात मोठा सार्वजनिक आरोग्य कार्यक्रम म्हणून ओळखला जातो.

5)अंधत्व निवारण :– सन 1976 पासून हा कार्यक्रम राबवला जात असून वीस कलमी कार्यक्रमांत त्याचा समावेश आहे. 100% केंद्राच्या अर्थसहाय्यावर हा कार्यक्रम राबिवला जातो. नेत्र शिबीर भरविणे, नेत्र शस्त्रक्रिया करणे, बालकांना 'अ' जीवनसत्वाचा डोस देणे, मोतीबिंदूमुळे येणारे अंधत्व टाळण्यासाठी शस्त्रक्रिया, नेत्रभिंगारोपण शस्त्रक्रियाही केली जाते. प्रतिवर्षी 25,000 लोक नेत्रदान करतात. 10 जून हा दिवस 'दृष्टीदिन' म्हणून पाळला जातो. महाराष्ट्र या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत अग्रेसर आहे.

6) एड्स नियंत्रण :– राज्यात या कार्यक्रमाची अंमलबजावणी 'महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण' संस्थेमाफत केली जाते. राज्यस्तरावर एड्स प्रतिबंध व नियत्रणाचे कार्य नियोजन, समन्वय, अंमलबजावणी याची जबाबदारी या संस्थेवर असून राज्यात ठिकठिकाणी कार्यशाळा व परिषदा आयोजित करून छापील साहित्य प्रकाशित करून रोगाबाबत जनतेस माहिती दिली जाते. पुण्याजवळ भोसरी येथे 'राष्ट्रीय एड्स अनुसंधान संस्था' संशोधन करते. देशातील एड्स रुग्णांपैकी 50% रुग्ण महाराष्ट्रात व महाराष्ट्रातील एकूण रुग्णांपैकी 50% रुग्ण मुंबईत आहेत. त्यामुळे राज्यात एड्स नियंत्रण कार्यक्रम राबवण्यासाठी विविध संस्था स्थापन केल्या आहेत. 100% केंद्राच्या अर्थसहाय्यातून जागतिक बँकेचे सहाय्य घेऊन हा कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यावर भर असून राष्ट्रीय आरोग्य धोरण 2002 नुसार एड्स रुग्णांची संख्या वृद्धीचा दर शून्यावर आणण्यासाठी प्रयत्न चालू आहेत.

7) सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम :– राज्यात सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम राबवण्यात येत असून या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश संपूर्ण जगातून विविध रोगाचे उच्चाटन करण्यासाठी जागतिक आरोग्य संघटना विविध कार्यक्रम राबविते. भारतानेही अलिकडच्या काळात सर्व राज्यात पोलिओचा रुग्ण आढळणार नाही यासाठी व इतर रोगांच्या लसीकरणाचा कार्यक्रम आखला. त्यामध्ये क्षयरोग, घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात, पोलिओ व गावर यासारख्या लसींमुळे रोगाला प्रतिबंध करता येतो. कारण या आजारांमुळे गर्भवती स्त्रिया, अर्भके व विविध वयोगटातील बालके यांच्या मृत्यूचे, रोगग्रस्ततेचे व

अपंगत्वाचे प्रमाण कमी करण्यासाठी उत्तम दर्जाच्या लसीकरण सेवा पुरविणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. पुढील तक्त्यात लाभार्थ्यांची संख्या व सरकारचे लक्ष्य यांचा आढावा देणेत आला आहे.

तक्ता क्र.1.5

सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम – 2012

अ. नं.	लस	2011–12 लक्ष्य अंक लाखात	सद्य:स्थिती अंक लाखात
1)	बी. सी. जी.	19.91	16.60
2)	डी. टी. पी.	19.81	15.38
3)	पोलिओ	19.81	15.32
4)	एच. आय. व्ही.	19.81	7.51
5)	गोवर	19.81	15.16
6)	डी. टी. पी. (बुस्टर)	19.44	14.11
7)	पोलिओ (बुस्टर)	19.04	14.03
8)	डी. टी. 5 वर्षे	18.78	12.23
9)	टी. टी. 10 वर्षे	19.93	20.26
10)	टी. टी. 16 वर्षे	20.72	14.76
11)	टी. टी. (गरोदर माता)	21.79	14.87
12)	झालेला खर्च	--	11.44 कोटी

आधार – राज्य आरोग्य कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन, जानेवारी 2012 पर्यंत

8) कर्करोग नियंत्रण :– देशात कर्करोगाचे अंदाजे 20 लाख रुग्ण असून त्यापैकी 8% महाराष्ट्रात आहेत. प्रतिवर्षी ही संख्या वाढतेच आहे. याचा विचार करून राज्याने ककरोग नियंत्रणाचा कार्यक्रम हाती घेतला असून धुम्रपान व तंबाखू सेवनापासून लोकांना परावृत्त करण्यासाठी कार्यक्रम तयार केले जातात. 100% केंद्राच्या अर्थसहाय्यातून हा कार्यक्रम चालतो.

9) गलगंड नियंत्रण :–आयोडीनच्या कमतरतेमुळे गलगंड हा गळ्यातील थायराईड या ग्रंथींचा आजार होतो. या रोगाचे औरंगाबाद, जालना, अमरावती, वर्धा, बुलढाणा, धुळे व सातारा या जिल्ह्यात रुग्ण आढळतात. म्हणून आयोडीनयुक्त मीठ वाटप करणे, तपासणी पथकाद्वारे रुग्ण शोधणे, योग्य तो औषधोपचार करणे ही कामे 100% केंद्राच्या सहाय्यावर चालवली जातात.

10) आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी, सिद्ध व होमिओपॅथी :– हा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाचा महत्त्वाचा घटक आहे. 'आयुष' या नावाने हे अभियान ओळखले जाते. देशातील आरोग्य सुविधा पुरवणाऱ्या मुख्य प्रवाहात राज्यातील ही औषधोपचार पद्धत आणणे, चांगला दर्जा राखणे, संशोधन व विकास, आजारावर चांगला उपचार याचे नियोजन व नियंत्रण आयुष ही संस्था करते. सध्या राज्यात 62 आयुर्वेदिक महाविद्यालये, 489 आयुर्वेदिक दवाखाने, रुग्णालयाशी संलग्न 8 युनानी महाविद्यालये, 25 युनानी दवाखाने,45 होमिओपॅथीक महाविद्यालये व एक शासकीय होमिओपॅथी रुग्णालय आहेत.

11) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान :– राज्यातील 55% लोकसंख्या खेड्यात राहते व तुलनात्मकदृष्ट्या अभ्यास केला तर आरोग्यविषयक सुविधा ग्रामीण भागात कमी आहेत. म्हणून भारत सरकारने 2005 मध्ये हे अभियान सुरू केले. राज्य सरकार या अंतर्गत महिला, बालके व दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाना उत्तम दर्जाच्या आरोग्य सेवा देणे, माता मृत्यूदर, बाल मृत्यूदर व एकूण जन्मदर कमी करण्यासाठी या योजने अंतर्गत प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम राबवला जातो. खेड्यातील अंगणवाडीतील मुलांची तपासणी व आजाराबद्दल मार्गदर्शन, पहिली ते दहावी पर्यंतच्या शाळांची तपासणी, आवश्यकते नुसार औषधोपचार, सामाजिक आरोग्य अभियानांतर्गत नर्सची नेमणूक करून प्रसुती, नवजात बालकांची काळजी, संसर्गजन्य रोगांना प्रतिबंध अशा उपाययोजना केल्या जातात. ग्रामीण भागातील स्त्रियांच्या आरोग्याचा दर्जा वाढावा म्हणून 'उत्कृष्ट खेड पुरस्कार योजना' राबवली जाते.

12) सुपोषण कार्यक्रम

1) **एकात्मिक बालविकास कार्यक्रम –**सन 1975-76 पासून केंद्रशासन पुरस्कृत हा कार्यक्रम राज्यात राबवला जातो. सहा वर्षा पर्यंतच्या मुलांच्या पोषण व आरोग्य यांचा दर्जा उंचावणे, बालरोग व बालमृत्यूचे प्रमाण कमी करणे, मलांचा मानसिक, शारीरिक व सामाजिक विकास घडवून आणणे, लहान मुलांबरोबरच गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांची आरोग्य पोषण स्थिती सुधारणे यासाठी लसीकरण, पूरक पोषण आहार, आरोग्य पोषण आहार, आरोग्य सेवा, पोषण या मूलभूत सेवा देतात. राज्यात

97,462 मान्यताप्राप्त अंगणवाड्या, 11,567 मान्यताप्राप्त मिनी अंगणवाड्या आणि 553 मंजूर बालविकास प्रकल्प आहेत. 553 बालविकास प्रकल्पांपैकी 104 नागरी भागात असून 364 ग्रामीण भागात तर 85 आदिवासी भागात आहेत. ग्रामस्तरावर हा कार्यक्रम अंगणवाड्यांच्या माध्यमातून राबवला जातो. केंद्र व राज्याकडून खर्चाची तरतूद या अंतर्गत केली जाते.

2) **परक पोषण आहार कार्यक्रम –** सहा वर्षाखालील बालके, समाजातील दुर्बल व कमकुवत घटकातील गर्भवती स्त्रिया, स्तनदा माता यांच्या पोषणविषयक किमान गरजा भागवून त्यांचा दर्जा उंचावणे ही या योजनेची उद्दिष्ट्ये आहेत. आदिवासी भागातोल कुपोषणावर लक्ष ठेवून होणारे बालमृत्यू टाळण्यासाठीही यात तरतूद आहे. 6 महिने ते 6 वर्षापर्यंत बालक, गर्भवती स्त्रिया, स्तनदा माता व किशोरवयीन मुले यांना प्रथिनयुक्त आहार पुरवला जातो.

3) **मध्यान्ह भोजनाचा राष्ट्रीय कार्यक्रम –**15 ऑगस्ट 1995 पासून 'मधल्या वेळच्या जेवणाची योजना' संपूर्ण देशभर राबवली जात असून पहिली ते पाचवी पर्यंतच्या मुलांना मधल्या सुट्टीत आहार पुरवला जातो. पुढे 1 ऑक्टोबर 2007 पासून शैक्षणिकदृष्ट्या मागास भागातही हा कार्यक्रम 6 वी ते 8 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनाही लागू केला. या कार्यक्रमामुळे शाळेत जाणाऱ्या मुलाचे प्रमाण वाढले. त्यातून साक्षरता व सामाजिक एकात्मताही साध्य होईल असा राष्ट्रीय उद्देश योजनेचा आहे.

4) **प्रजनन व बालआरोग्य कार्यक्रम** -बाळंतपणातील माता मृत्यूदर कमी करणे, अर्भक मृत्यूदर कमी करण्यासाठी दुर्बल घटकातील बालकांच्या स्तनदा मातांसाठी चांगले आरोग्य व कपोषण नियंत्रण हा उद्देश या योजनेचा आहे. या आहाराबरोबरच टॉनिकच्या गोळ्याही देण्याची योजना आहे. तसेच 1 ते 5 वयोगटातील बालकांना त्रिगुणी व पोलिओचे डोस दिले जातात. क्षयप्रतिबंधक व गोवराची लसही टोचली जाते.

1.53 महाराष्ट्रातील आधारभूत संरचना

आर्थिक व सामाजिक विकासात वाहतूक, दळणवळण, उर्जा, टपालसेवा यांचा सहभाग महत्त्वाचा असतो.

1) रस्ते वाहतूक :– 1853 मध्ये पहिला ब्रिटीशांनी मॅकडोनाल्ड पद्धतीचा रस्ता तयार केला. त्यानंतर वाहतुकीचे महत्त्वपूर्ण साधन म्हणून रस्त्यांचा विकास करण्यास सुरुवात झाली.

सन 1941 ते 1961 या काळासाठी रस्ते बांधणी योजना निश्चित केली. यास 'नागपूर योजना' असे म्हटले जाते. या योजने अंतर्गत राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, प्रमुख जिल्हा रस्ते, इतर रस्ते व ग्रामीण रस्ते असे रस्त्यांचे वर्गीकरण केले. त्यानंतर 1961 ते 1981 या 20 वर्षांसाठी रस्ते विकास योजना तयार करण्यात आली. सर्व गावे मुख्य रस्त्यास जोडण्याची योजना होती. पुढे 1981 ते 2007 या वीस वर्षांसाठी आणखी एक रस्ते विकास योजना तयार केली. या योजनेनुसार डोंगराळ भागातील गावे रस्त्यापासून किमान 5 कि. मी. च्या आत असावीत व इतर गावांबाबत हे अंतर 3 कि. मी. च्या आत असावे. महाराष्ट्र सरकारने या योजनांची कार्यवाही केल्याने रस्ते विकासाला प्रचंड गती मिळाली.

2) महाराष्ट्राची रस्त्यांची प्रगती :– भारतातील राष्ट्रीय महामार्गांची एकूण लांबी 66,590 कि. मी. असून महाराष्ट्रात त्यापैकी 4,367 कि. मी. आहे. म्हणजे केवळ 6.56% महामार्ग राज्याच्या वाट्याला आला असून क्षेत्रफळ व लोकसंख्या या दृष्टिकोनातून रस्त्यांच्या लांबीचा अभ्यास व त्यावरून होणाऱ्या वाहतूक सुविधांचा विचार केला तर देशातील 25% औद्योगिक उत्पादन महाराष्ट्रात होते व त्याची रस्त्याच्या उपलब्धतेशी तुलना केली तर राष्ट्रीय हमरस्ते खूपच कमी आहेत. त्या तुलनेत जिल्हा व ग्रामीण रस्ते एकूण उद्दिष्टाच्या 98% बांधले गेले. तर विकासातील प्राथमिक पायरी असणारे ग्रामीण रस्त्यांचे उद्दिष्ट पूर्ण झाले नाही. महाराष्ट्रात दर 1,000 चौ. मी. मध्ये केवळ 13.6 कि. मी. लांबीचे रस्ते आहत. मात्र राष्ट्रीय सरासरी 2.4 कि. मी. ची आहे. महाराष्ट्रातील विविध रस्त्यांच्या प्रगतिचा आढावा पुढीलप्रमाणे

1) राष्ट्रीय महामार्ग :– राज्यातून विविध भागातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाची लांबी सन 1965-66 मध्ये 2,364 कि. मी. इतकी होती. ती सन 2009-10 मध्ये 4,379 कि. मी. इतकी वाढ झाली. राष्ट्रीय

मार्गाच्या बांधणीचा खर्च केंद्र सरकार करते. त्याला व शहरांना जोडणारे रस्ते राज्य सरकारच्या अधिकारात येतात. महाराष्ट्राने त्याचीही गुणवत्ता चांगली ठेवली आहे. राष्ट्रीय महामार्गात 85% वाढ झाली आहे.

2) **राज्य महामार्ग :–** महाराष्ट्रात सन 1965-66 मध्ये राज्यमार्ग 10,528 कि.मी. लांबीचे होते. ते सन 2009-10 मध्ये 34,102 कि.मी. इतके झाले. राज्य सरकार राज्यमार्गाने राज्यातील प्रमुख शहरांना जोडतात. त्यांची गुणवत्ता राष्ट्रीय महामार्गाप्रमाणे ठेवण्याचा प्रयत्न राज्य सरकार करते. गेल्या चाळीस वर्षात राज्य महामार्गात तीन पटीपेक्षा जास्त वाढ झाली आहे.

3) **प्रमुख जिल्हा रस्ते :–** राज्य सरकार विविध जिल्ह्यांना जोडण्यासाठी व तेथून तालुक्यांना व गावांना जिल्हांतर्गत रस्त्यांनी जोडले जाते. सन 1965-66 मध्ये 12,628 कि. मी. होते. त्यामध्ये कच्चे रस्ते जास्त होते. ते वाढवून पक्के रस्ते व चांगले रस्ते केले. सन 2009-10 मध्ये 49,901 कि.मी. इतके झाले. म्हणजे मागील चाळीस वर्षात साडेचार पट वाढ झाली. तर जिल्ह्यातील इतर रस्त्यामध्ये 8,744 कि. मी. वाढून 46,817 कि. मी. इतकी वाढ झाली आहे.

4) **इतर जिल्हा रस्ते :–** यामध्ये जिल्ह्यातील इतर छोट्या-मोठ्या रस्त्यांचा समावेश होतो. सन 1965-66 मध्ये 8,744 कि. मी. रस्ते ते सन 2009-10 मध्ये 46,817 कि. मी. झाले. ही वाढ साडेचार पट होती.

5) **ग्रामीण रस्ते :–** हे हलक्या दर्जाचे असतात. कच्चे खडीचे रस्त्यांची संख्या जास्त असते. छोट्या वाडी, वस्ती व शेतातून हे रस्ते केले जातात. सन 1965-66 ते 2009-10 या कालावधीत ग्रामीण रस्त्यांची अंदाजे लांबी17,527 कि.मी. वरून 1,04,844 कि. मी. पर्यंत वाढली. साधारणतः सहापट वाढ या कालावधीत रस्त्यांची झाली. म्हणजे शासनाने जवळजवळ सर्व खेड्यापाड्यापर्यंत रस्त्यांचे जाळे विणले आहे.

3) रस्त्यांची सद्यःस्थिती :– रस्त्यांची राष्ट्रीय सरासरी विचारात घेतली असता प्रति 100 चौरस किलोमीटरला 75 कि. मी. आहे तर राज्याची 87 कि. मी. आहे. ही सरासरी जास्त येते. तरी देशात

रस्त्यांच्या बाबतीत महाराष्ट्राचा देशात 12 वा क्रमांक लागतो. लोकसंख्येचा विचार केला तर राज्यात प्रति लाख लोकसंख्येमागे 449 कि. मी. चे रस्ते आहेत.सातत्याने महाराष्ट्रात वाहनांची संख्या वाढते. त्यामुळे रस्त्यांची गरज वाढते. 80% प्रवासी वाहतूक व 60% मालाची वाहतूक रस्त्यावरून होते. त्यामुळे वाहतुकीच्या इतर साधनांपेक्षा रस्त्यांचे महत्त्व जास्त आहे. तरी सुद्धा 0.5% गावे अजूनही डोंगरकपारीतील रस्त्यांनी जोडलेली नाहीत.

4) **महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ :–** महाराष्ट्रातील रस्ते वाहतूकीत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. सन 1988 मध्ये या महामंडळाने सेवेची 50 वर्षे पूर्ण केली. एप्रिल 2010 मध्ये महामंडळाच्या मालकीची 15,950 वाहने होती. ती एकूण 16,521 मार्गावर धावत होती. महामंडळामाफत दररोज सरासरीने 65.26 लाख प्रवाशांची वाहतूक केली जाते. भारतातील विविध राज्यात जी राज्य परिवहन महामंडळे आहेत त्यामध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचा 'प्रथम क्रमांक' लागतो. जवळजवळ ना नफा ना तोटा या तत्त्वावर एस.टी.प्रवास होतो. सरासरी वार्षिक एकूण महसूल 4370.16 कोटी रुपये व एकूण खर्च 4300.38 कोटी रुपये आहे. तर एकूण नफा 70.02 कोटी रुपये होता. पण खाजगी प्रवासी आरामगाड्या, अनधिकृत वाहने यांच्याशी महामंडळाला सतत स्पर्धा करावी लागते. मात्र आजही महाराष्ट्राच्या सामाजिक सेवेत एस.टी.महामंडळाचे योगदान मोठे असून प्रवासी वाहतूक होणाऱ्या क्षेत्राच्या विकासात या महामंडळाची भूमिका महत्त्वाची आहे.

5) **महाराष्ट्र राज्य रस्ते विकास :–** महाराष्ट्र राज्याने रस्ते वाहतूक विकासासाठी धाडसी पाऊल सन 1996 मध्ये उचलले. 'बांधा, वापरा व हस्तांतरीत करा' या तत्त्वाचा अवलंब केला व खाजगी क्षेत्राच्या सहभागातून रस्ते व छोटे-मोठे पूल व इतर आवश्यक पायाभूत सुविधांच्या विकासाच्या कार्याला चालना देण्याचे काम केले. हे महामंडळ रस्ते प्रकल्प, उड्डाणपूल प्रकल्प, वाहनांना लागणारे तेल, स्वतंत्र व्यवस्था, वसुली इत्यादी कामे पाहते. यामुळे आज महाराष्ट्राच्या ग्रामीण भागापर्यंत चांगले रस्ते, नदी व इतर गरजेनुसार पूल, उड्डाणपूल यांची निर्मिती वेगाने झाली आहे व शासनाला वाहतुकीत वाढ झाल्याने

कर रुपाने उत्पन्नही मिळत आहे. सन 2010 पर्यंत महामंडळाने 2011 पर्यंत 7,187 कोटी रुपये खर्चाचे एकूण 18 प्रकल्प पूर्ण केले आहेत.

6) विभागीय असमतोल :– महाराष्ट्राच्या भौगोलिक रचनेनुसार जे विविध विभाग केले आहेत त्या प्रत्येक विभागानुसार रस्त्यांच्या विकासाचा 1961 ते 1981 या कालावधीचा विचार केला तर पश्चिम महाराष्ट्रात 92% रस्त्यांचे बांधणीचे उद्दिष्ट साध्य केले. कोकण विभागात हे उद्दिष्ट 68%, मराठवाड्यात 78% आणि विदर्भात 58% केवळ उद्दिष्ट साध्य झाले आहे. ज्या विभागात रस्त्यांचा विकास झाला नाही ते विभाग आर्थिक विकासात मागे पडल्याचे दिसते. डॉ. दांडेकर समितीच्या अभ्यासानुसार ही आकडेवारी निश्चित केली असून ज्या भागात रस्त्यांचा विकास झालेला नाही त्यांना त्यांचा अनुशेष भरून काढण्यासाठी कोकण विभागाला 46 कोटी रुपये, मराठवाडा 44 कोटी रुपये व विदर्भाला 84 कोटी रुपयाची आवश्यकता असल्याचे या समितीने सांगितले असून एकूण 733 कोटी रुपयांची तरतूद महाराष्ट्राच्या विविध विभागातील असमतोल दूर करण्यासाठी आवश्यक असल्याचे सांगितले आहे.

1.54 रेल्वे वाहतूक

भारतातील रेल्वे वाहतूकोची 1853 साली ब्रिटीशांनी मुहुर्तमेढ रोवली. मात्र रेल्वेचा खरा विकास स्वातंत्र्यानंतरच झाला. आज भारतीय वाहतूक व्यवस्थेचा कणा म्हणून भारतीय रेल्वेला ओळखले तो. 1880 मध्ये सोलापूर-नागपूर हो शहरे रेल्वेने जोडली. सन 1885 मध्ये मुंबई ते बडोदा तर स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रातील विविध रेल्वेमार्ग सुरु झाले. सन 2010 मध्ये राज्यातील रेल्वेमार्गांची लांबी 5,983 कि.मी. असून ती भारतातील एकूण लोहमार्गाच्या 9.4 इतकी लांबी आहे. गेल्या 50 वर्षात राज्यातील लोहमार्ग लांबी18.3% नी वाढली.

रेल्वेचा विकास व व्यवस्थापन करताना भारत सरकारने रेल्वेचे स्वतंत्र झोन तयार केले. राज्याने सुद्धा प्रमुख चार झोन निर्माण करून त्या माध्यमातून महाराष्ट्रातील रेल्वेचे व्यवस्थापन केले आहे. ते पुढीलप्रमाणे -

1) मध्य रेल्वे लांबी 2,920 कि.मी. सर्वात मोठा रेल्वे झोन आहे.

2) दक्षिण मध्य रेल्वे झोन लांबी1,486 कि.मी.

3) दक्षिण पूर्व रेल्वे झोन लांबी 668 कि.मी.

4) पश्चिम रेल्वे झोन लांबी336 कि.मी.

स्वतंत्र कार्यालयामाफत वाहतूक व्यवस्थेचे नियोजन केले जाते.

रेल्वे विकासाची वैशिष्ट्ये :–

1) रेल्वेने महाराष्ट्रातील जवळजवळ सर्व व्यापारी केंद्रे जोडण्यात आली आहेत. तथापी विदर्भ, मराठवाडा व कोकण विभागात तुलनेने रेल्वेचा अल्प विकास झाला आहे.

2) महाराष्ट्रातील काही प्रमुख ठिकाणे विशेषतः जिल्हा ठिकाणे रेल्वेच्या मार्गावर नाहीत. उदा.- सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ओरोस, गडचिरोली, अलिबाग, बुलढाणा, बीड ही जिल्ह्याची ठिकाणे रेल्वेपासून दूर राहिली.

3) महाराष्ट्रातील रेल्वेमार्गाचे विद्युतीकरण फारच मागे आहे. देशात विद्युत मार्गांची संख्या जास्त आहे. महाराष्ट्रातील 40% रेल्वेमार्गांचे विद्युतीकरण पूर्ण झाले आहे.

4) महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपूर या मोठ्या शहरात उपनगरी रेल्वे सेवा अत्यंत महत्त्वाची व प्रभावी काम करताना दिसते. त्यामुळे उपनगरी रेल्वेला 'जीवन वाहिनी' म्हणूनही ओळखले जाते.

5) राज्यातील 32.5% लोहमार्गाचे दुपदरीकरण म्हणजे जोडसमांतर लाईनमध्ये प्रवासाची सोय असणेचे काम पूर्ण झाले आहे.

5) राज्यातील शेतमाल विशेषतः कापूस, गूळ, ज्वारी, हळद, आंबा, फणस, द्राक्षे, केळी, संत्री यांची वाहतूक, यंत्रे व यंत्रांचे सुटे भाग, पक्का माल यांच्या वाहतुकीच्या दृष्टीने रेल्वेचे कार्य महत्त्वाचे मानले जाते.

6) देशात आयात-निर्यात होणाऱ्या मालाची 22% वाहतूक एकट्या मुंबई बंदरातून होते. त्यामुळे राज्यातील माल बंदरापर्यंत आणणे व बाहेरून आलेला माल देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्यात रेल्वेचे योगदान महत्त्वाचे मानले जाते.

7) उपनगरी रेल्वेत मुंबईचा प्रथम क्रमांक असून देशाच्या आर्थिक राजधानीतून दररोज 50 लाख लोकांची वाहतूक केली जाते.

8) **कोकण रेल्वे :–** देशाच्या पश्चिम किनारपट्टीवर तीन राज्यांना जोडणारी राज्यातून सुरुवात होणारी अत्यंत महत्त्वाची रेल्वे आहे. त्याची लांबी 382 कि. मी. असून या लोहमार्गावर एकूण 68 स्थानके महत्त्वाची असून त्यातील 34 स्थानके एकट्या महाराष्ट्रात आहेत. मुंबईपासून भारताचे दक्षिण टोक कोचिन पर्यंत या गाडीने पश्चिम कोकण किनारपट्टी जोडली जाते व पूर्वीच्या मार्गापेक्षा 513 कि.मी. अंतराची बचत यामुळे झाली आहे.या रेल्वेचा फायदा कोकणच्या विकासाला फार मोठा झाला आहे. कोकणातील विविध फळांवर प्रक्रिया करणारे उद्योग, मत्स्य व्यवसाय, खनिजे, त्यावर अधारीत उद्योग, जंगल उद्योग, उर्जा उद्योग, इंधन व्यवसाय यांना प्रोत्साहन व त्याची वाहतूक सुलभ झाली आहे. अत्याधुनिक जपानी तंत्रज्ञानाने समुद्र किनाऱ्यावरून जाणाऱ्या या रेल्वेमुळे पर्यटनासही चालना मिळाली आहे. ही महाराष्ट्राची अत्यंत महत्त्वाची प्रवासी वाहतुकीलाही उपयुक्त रेल्वे ठरली आहे.

9) **मेट्रो रेल्वे :–** दिल्ली प्रमाणेच मुंबईतही मेट्रो प्रकल्प साकारला जात आहे. त्यामुळे जागेची बचत व वाढत्या लोकसंख्येचा प्रवास जलद व सुखकारक होणार आहे. एकूण 1,000 कि.मी.लांबीची ही रेल्वे सध्या पूर्ण झाली असून 6,192 कोटी रुपयाचा महाराष्ट्रातील अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प ठरला आहे त्यापाठोपाठ पुणे, नागपूर या शहरातही मेट्रो रेल्वेची मागणी होत आहे.

1.55 जल वाहतूक

जगातील विविध देशांना व खंडांना जोडण्याचे व व्यापार वाढवण्याचे पूर्वीपासून कार्य जलवाहतूकीतूनच झाले आहे. अत्यंत कमी खर्च व स्वस्तात मालवाहतूक करता येते. समुद्र, नद्या व कालवे यांच्या माध्यमातून जलवाहतूक करता येते. मात्र त्यासाठी त्या ठिकाणी समुद्र किनारा व मोठ्या नद्यांच्या पात्राची जास्त गरज असते. महाराष्ट्राला 720 कि.मी. चा समुद्रकिनारा लाभला असून मुंबईसारखे नैसर्गिक बंदर व कोकण किनाऱ्यावर 54 बंदरे आहेत. समुद्रमार्गे वस्तूंची वाहतूक मोठ्या प्रमाणात होते.

मुंबई बंदरातून एकूण आयात निर्यात 545.41 लाख टन तर प्रवासी वाहतूक 64.41 हजार तर जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टमधून 519.9 लाख टन मालाची आयात-निर्यात वाहतूक होते.तर लहान बंदरामध्ये 'मेरी टाईम बोर्ड' च्या नियंत्रणाखाली राज्यातील सर्व लहान लहान 48 बंदरे नियंत्रणाखाली आणली असून त्याच्यावर सागरी क्षेत्रातील विनिमय व विकास कार्यक्रम याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली आहे.

जलवाहतुकिविषयी सरकारचे धोरण :– लहान बंदरांची, अंतर्गत जलवाहतूक विकास याला सरकारने प्राधान्य दिले असून मुंबई-मांडवा, म्हासळे-जंजिरा, दक्षिण मुंबई-कारंजा, विष्णुपुरी-नांदेड या जलमार्गांना व अंतर्गत जलवाहतुकीला सरकारने मान्यता दिली आहे. बंदरांची वर्षभर पाहणी, छोट्या जहाजांची खरेदी, नौका समुहाची खरेदी, बंदरातील गाळ काढणे, दुरुस्ती करणे या कामांचा यात समावेश असून 87.6 कोटोची तरतूद नवव्या पंचवार्षिक योजनेत केली गेली व 324 बंदरांच्या विकासाचा कार्यक्रम खाजगी क्षेत्राच्या सहकार्याने आखला आहे.

1.56 महाराष्ट्रातील हवाई वाहतूक विषयक धोरण

सन 1925 ला हवाई वाहतूक सुरु केली. प्रथम खाजगी क्षेत्रात व स्वातंत्र्यानंतर विमान सेवांचे राष्ट्रीयकरण झाले. इंडियन एअरलाईन्स व एअर इंडिया यांच्याकडे हवाई सेवा सोपविली. राज्यात मुंबई येथे दोन आंतरराष्ट्रीय विमानतळ असून पुणे, सोलापूर, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अकोला, नागपूर येथे केंद्राच्या सहाय्याने तर कराड, नांदेड, उस्मानाबाद, धुळे, चंद्रपूर, रत्नागिरी, जळगांव, भंडारा,

अकोला, फलटण, वाडा, किनवट येथे विमानतळे बांधली आहेत. सध्या मुंबई, पणे, नागपूर येथून आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक चालते. सन 2010 पर्यंत प्रतिवर्षी देशांतर्गत विमान वाहतूक व आंतरराष्ट्रीय प्रवासी वाहतूक एकूण 483.49 लाख इतकी तर एकूण माल वाहतूक हवाईमार्गे 6,06,724 टन होती.

सध्या नागरी विमान वाहतुकीचा विकास साधण्यासाठी धुळे, उस्मानाबाद, अमरावती, शिर्डी, लातूर, तारापूर येथे नव्या धावपट्ट्या बांधण्याची योजना आहे. सन 2002 मध्ये 'महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित' स्थापन केले आहे. दहाव्या पंचवार्षिक योजनेत 59.08 कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील दळणवळण व्यवस्था सर्वसाधारणपणे दळणवळण प्रणालीत टपाल, तार, दूरध्वनी, रेडिओ, दूरदर्शन, माहिती दूरसंचार यांचा समावेश होतो. अलिकडच्या काळात आर्थिक विकास प्रक्रियेचा हा अविभाज्य भाग मानला जातो. उद्योगधंदे, व्यापार, प्रशासकीय सेवा इत्यादी सर्वांसाठी कार्यक्षम दळणवळण यंत्रणेची गरज असते. अलिकडे बँकिंग, शिक्षण, मनोरंजन, उद्योग, माहिती तंत्रज्ञान या सर्व क्षेत्रात क्रांती झाली आहे. विविध प्रकारची माहिती लवकरात लवकर प्राप्त करणे, तिचा संचय करणे, माहितीवर प्रक्रिया करणे, ती इतरत्र पोहोचविणे या बाबी सुलभ झाल्या आहेत. दळणवळण क्षेत्रातील क्रांतीने लोक अधिक जवळ येण्यास मदत झाली. यामुळे शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, कायदा, संरक्षण या सर्वांचा विकास साधता येतो.

1.57 टपाल सेवा

भारतातील इतर राज्यांच्या मानाने दळणवळणाच्या सेवांमध्ये महाराष्ट्र राज्य आघाडीवर आहे. सन 2009-10 मध्ये राज्यातील टपाल कार्यालयांची संख्या 12,853 होती. त्यापैकी 11,524 टपाल कार्यालये ग्रामीण भागात होती. राज्यात सरासरी 6,000 व्यक्तीमागे एक टपाल कार्यालय येते. सध्या 52,584 टपाल पेट्या असून राज्यात एकूण 7,920 पोष्टमन आहेत. राज्याच्या सर्व खेड्यापाड्यापर्यंत टपाल सेवा पोहोचली आहे. टपाल कार्यालयांकडून बचत बँक, द्रुत टपालसेवा, रात्रीची टपालसेवा, आयुर्विमा, बचत प्रमाणपत्रे, म्युच्युअल फडाचे व्यवहार होतात. राज्यात रात्रीची टपालसेवा 1,108

ठिकाणी व द्रुतगती टपालसेवा आहे. तर जादा शुल्क आकारून 28 तास रजिस्टर्ड पत्रे पोहोचवण्याची सोय निवडक शहरात आहे. राज्यात 2,452 तार कार्यालये आहेत. तर 1963 ला टेलेक्स सोय केली. राज्यातील मुंबई, नागपूर, पुणे, नाशिक, कोल्हापूर, अमरावती, औरंगाबाद, अंमळनेर येथे टेलेक्सची व्यवस्था कार्यरत आहे.

1.58 दूरध्वनी सेवा

दळणवळण क्षेत्रातील महत्त्वपूर्ण सेवा म्हणून दूरध्वनीकडे पाहिले जाते. शेती, व्यापार, बँकींग व्यवहार, शेअर बाजार यासारख्या क्षेत्रात दूरध्वनी सेवेला प्रचंड मागणी आहे. संपूर्ण भारतात महाराष्ट्र या सेवेत आघाडीवर आहे. सन 2009 साली संपूर्ण भारतात 2 कोटी 30 लाख दूरध्वनी कनेक्शन होती. सन 2010 पर्यंत राज्यात 59.55 लाख दूरध्वनी कनेक्शन होती. तर भ्रमण (मोबाईल) ध्वनींची संख्या 863.77 लाख होती. महाराष्ट्राची राजधानी मुंबईचा थेट संपर्क राज्यातील 119 शहरे व देशातील 1,385 शहरांशी होता. सध्या महाराष्ट्रात भारत संचार निगम लिमिटेड व महानगर टेलिफोन निगम लिमिटेड या सरकारी व आठ खाजगी कंपन्याही दूरसंचार सेवा पुरवितात. सध्या दूरध्वनी व भ्रमणध्वनी सेवा क्षेत्रात प्रचंड स्पर्धा सुरू असून यांची संख्याही वेगाने वाढत आहे.

1.59 इंटरनेट

जागतिकीकरणामुळे जग जवळजवळ येते आहे असे बोलतात. इंटरनेटच्या वापरावरून विविध प्रकारच्या माहिती मिळण्याच्या सुविधेमुळे जग आपल्या कॉम्प्युटरच्या पडद्यावर दिसू लागले आहे. सर्व प्रकारच्या शैक्षणिक संस्था, सरकारी कार्यालये, बँका, खाजगी कंपन्या यांच्याकडून इंटरनेटचा वापर वाढत आहे. बऱ्याच संस्था, कंपन्या आपली माहिती संकेत स्थळावर उपलब्ध करून देत आहेत. महाराष्ट्र शासनाचेही सर्व सर्व्हे, शासन निर्णय, परिपत्रके, विविध योजना यांची माहिती इंटरनेटवर उपलब्ध होते. ई-मेल, सोशल नेटवर्कींग, आर्थिक व्यवहार यासाठी इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. भारतात इंटरनेट व ब्रॉडबॅन्ड वापरणाऱ्यांची संख्या महाराष्ट्रात सर्वात जास्त आहे. सप्टेंबर 2010 पर्यंत इंटरनेट वापरणारे लोक 14,064 इतके तर ब्रॉडबॅन्ड वापरणारे 19,066 लाख होते.

1.60 आकाशवाणी

दैनंदिन माहिती, चर्चा, विशिष्ट विषयावर विवेचन, करमणूक, वृत्तनिवेदन, आरोग्य, कुटुंबकल्याण, शेती, मार्गदर्शन, हवामान, बाजारभाव इ. दैनंदिन माहिती प्रसारित करण्यासाठी आकाशवाणी हे प्रभावी माध्यम आहे. सरकारच्या माहिती व नभोवाणी मंत्रालयाच्या वतीने आकाशवाणी केंद्र चालवले जाते. 1927 ला महाराष्ट्रातील मुंबई येथे भारतातील पहिले रेडिओ केंद्र सुरू करण्यात आले. महाराष्ट्रात 21 रेडिओ केंद्रे असून सध्या एफ.एम. सेवाही उपलब्ध केली आहे. 1977 पासून आकाशवाणी व दूरदर्शन या सेवा प्रसारभारती वैधानिक मंडळाच्या अंतर्भूत कार्यरत आहेत.

1.61 दूरदर्शन

महाराष्ट्रात मुंबई येथे 1972 मध्ये पहिले केंद्र सुरू झाले. राज्यात मुंबई, नागपूर कार्यक्रमांचे प्रसारण केले जाते. तर विविध शहरातून कार्यक्रमाचे पुनःप्रक्षेपण केले जाते. सध्या महाराष्ट्रात पाच उच्च शक्ती दूरदर्शन प्रक्षेपण केंद्रे आहेत व 40 लघुशक्ती प्रक्षेपण केंद्रे आहेत. सार्वजनिक आरोग्य, संगणक शिक्षण, प्रदूषण, यागा शिक्षण, कुटुंब कल्याण, प्रौढांसाठी कार्यक्रम, शेतीवरील कार्यक्रम अशा विविध विषयावरील मार्गदर्शन, नाटक, सिनेमा अशा विविध विषयांच्या माध्यमातून लोकांशी संपर्क साधला जातो.

1.62 दैनिके व नियतकालिके

सध्या समाजात सर्वात लोकप्रिय संपर्क माध्यमामध्ये नियतकालिकांचा क्रमांक महत्त्वाचा आहे. दैनिके, नियतकालिके यांची भूमिका समाजजागृतीमध्ये अग्रेसर अधिक आहे. भारतात नियतकालिकांमध्ये तिसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्र आहे. सन 2008 मध्ये भारतात एकूण प्रसिद्ध होणारी नियतकालिके 69,323 होती. त्यापैकी 6,018 महाराष्ट्रात प्रसिद्ध होत होती. तर दैनिकांमध्ये देशात महाराष्ट्राचे प्रमाण 56.6 व राज्यात मराठी वृत्तपत्रांची सरासरी विक्री 17.50 लाख होती. शेती, उद्योगधंदे, व्यापार, वाहतूक, बँकींग, क्रीडा, सरकारी धोरण, स्थानिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय घडामोडी याविषयी सर्वांशी संपर्क साधणारे हे भावी साधन आहे.

1.63 राज्य शासनाचे महिला व बालविकास धोरण

राज्यातील महिला व बालकांच्या सर्वांगिण विकासासाठी शासनाच्या विभागामाफत कार्यक्रमांची अंमलबजावणी केली जाते. त्याच्या योग्य कार्यवाहीसाठी राज्य शासनाने महिला व बालकल्याण समितीची स्थापना केली आहे. याशिवाय बालिका समृद्धी योजना व एकात्मिक बालविकास योजना कार्यान्वित केली गेली.

महिला व बालकल्याण समिती :– या समितीच्या वतीने महिला व बालकांसाठी विविध योजना तयार केल्या जातात. त्यामध्ये बालविकास सेवा योजना, ट्रायसेम योजना, बालवाड्या यांच्या सहविविध याजना, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील महिलांसाठी आहेत. राज्यशासनाच्या वतीने जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत यांच्या निधीमधून ही समिती खर्चाची तरतूद करत असते. ती पुढीलप्रमाणे आहे.

1) **5 वी ते 10 वी पर्यंतच्या मुलींना मोफत सायकली :–** ज्या दुर्गम व ग्रामीण भागातील मुलींना राहत्या घरापासून शाळेत पोहोचण्यासाठी 2 कि. मी. पेक्षा जास्त चालावे लागते त्यांच्यासाठी समितीमाफत दारिद्र्य रेषेखालील मुलींना मोफत सायकल वाटप केले जाते.

2) **बालवाडीसाठी 1,000 रुपयाचे अनुदान :–** ज्या भागात अंगणवाड्या किंवा बालवाड्या नाहीत तेथे बालवाडीला किमान 40 विद्यार्थी होत असतील तर त्या छोट्या वाडी-वस्तीवर 1,000 रुपये अनुदानावर बालवाड्या चालवण्याची परवानगी राज्य शासनाने दिली आहे.

3) **महिलांना शिवणयंत्रे :–** केंद्र पुरस्कृत एकात्मिक ग्रामीण विकास योजना व समाज कल्याण विभाग यांच्यामाफत ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या महिलांना शिवणयंत्रे मोफत पुरविण्यात येतात.

4) **प्रौढ शिक्षण जनजागृती आणि वाचनालये :–** नोंदणीकृत महिला मंडळामाफत ग्रामीण भागातील महिलांमध्ये विविध कार्यक्रमांद्वारे जनजागृती, प्रौढ शिक्षण वर्ग, शिबिरे, वाचनालये सुरु करण्यात येतात.

5) **बालकांची आरोग्य तपासणी :–** ज्या ठिकाणी सार्वजनिक आरोग्य विभागामाफत 0 ते 6 वयोगटातील बालकांच्या आरोग्याची तपासणी योजना उपलब्ध नसेल त्या ठिकाणी तज्ज्ञ डॉक्टरांकडून आवश्यक ते औषधोपचार करण्यात येतात.

6) **ग्रामीण भागातील महिलांसाठी सुलभ शौचालये :–** केंद्र पुरस्कृत ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाखाली एखाद्या गावात वैयक्तिक शौचालये बांधणे शक्य नसेल तेथेच प्रायोगिक तत्त्वावर केवळ स्त्रियांकरिताच सामुदायिक शौचालयाची मागणी आल्यास आणि ग्रामपंचायतीने जागा उपलब्ध करून दिल्यास शौचालये व स्वच्छतागृहे बांधण्यात येतात. ही योजना जिल्हा परिषदेमाफत राबविली जाते.

7) **खेळाचे साहित्य :–** बालवाड्यांमधील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक ते शैक्षणिक व खेळ साहित्य खरेदी करण्याचे समितीस अधिकार राहतील.

8) **सेवकांना पुरस्कार :–** अंगणवाडी व बालवाड्यांमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या सेविकांना पुरस्कार देण्यात येतील.

9) एकात्मिक बालविकास योजनेअंतर्गत बालवाड्या साहित्य, खर्चातून बालवाड्या व अंगणवाड्यांना साहित्य देणे.

10) **प्रोत्साहनात्मक स्पर्धांचे आयोजन :–**विविध क्षेत्रात बालक व महिला यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी प्रोत्साहनात्मक स्पर्धा आयोजित करण्यात येतील.

11) **पंचायत राज संस्थेचे प्रशिक्षण :–**जिल्हा परिषद, गामपंचायत, पंचायत समिती यामध्ये निवडून आलेल्या महिला लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण देण्यात येईल.

12) **महिला प्रतिनिधींसाठी अभ्यास सहल :–** ग्रामपंचायत, पंचायत समिती यामध्ये निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींसाठी अभ्यास सहल आयोजित करण्यात येणार असून यासाठी प्रतिवर्षी 12 हजार रुपये खर्च करण्यात येणार आहेत. मात्र पंचायत समिती आणि जिल्हा परिषद मिळून एकत्रित सहल आयोजित करण्याची अट घालण्यात आली आहे.

13) **अपंग मुले व महिलांना कृत्रिम अवयव बसवून त्यांचे पुनर्वसन :–** दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील अपंग मुले व महिलांना कृत्रिम अवयव बसवण्याची गरज असल्यास ते बसवण्यासाठी खर्च करण्यात येईल.

14) **गणवेश वाटप :–** आर्थिक परिस्थिती चांगली नसलेल्या इयत्ता 5 वी ते 10 वी पर्यंतच्या मुलींना गणवेशाचे वाटप करण्यात येते.

15) **गरीब महिलांना साड्या :–** गरीब परिस्थितीतील महिलांना साड्यांचे वाटप करण्यात येईल. स्वयंरोजगाराचे साधन म्हणून म्हैस, बकऱ्यांच्या खरेदीसाठी सहाय्य, मागासवर्गीय, बिगर मागासवर्गीय, आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील महिलांना स्वयंरोजगाराच्या दृष्टिकोनातून गाय, म्हैस, बकरी कोंबड्यांच्या खरेदीसाठी आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

16) **विवाहासाठी अर्थसहाय्य :–** आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील मुलांना विवाहासाठी 2,000 रुपये अर्थसहाय्य देण्यात येईल.

17) **उद्योगाच्या प्रशिक्षणासाठी अनुदान :–** जिल्ह्यातील महिला मंडळे, स्वयंसेवी संस्था, नोंदणीकृत संस्था यांना ग्रामीण उद्योगातील प्रशिक्षणामाफत अनुदान देण्यात येते.

18) **पाळणाघर :–** आर्थिकदृष्ट्या गरीब स्त्रिया शेतावर काम करण्यासाठी अथवा रोजगारासाठी जातात तेव्हा त्यांच्या मुलांना पाळणाघराची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते.

19) **संसार उपयोगी साहित्य :–** आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील महिलांना 2,000 रुपये रोखीने न देता भांडीकुंडी इत्यादी संसार उपयोगी साहित्य देण्यात येईल.

20) **विधवा परित्यक्ता महिलाना शेतीसाठी :–**विधवा, परित्यक्ता, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांना शेती उपयोगी अवजारे खरेदी करण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्यात येते.

21) **निराश्रित महिलांना घरकुलासाठी मदत :–** ज्या महिलांना कुणाचाच आधार नाही अशा निराश्रित, असहाय्य महिलांना घरकुलासाठी 6,000 रुपयापर्यंत आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

22) **जिजामाता महिला आधार विमा योजना :–** एखाद्या कुटुंबातील त्यातही ज्या कुटुंबाचे उत्पन्न मुळातच तुटपुंजे आहे, अशा कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचे आकस्मिक निधन झाल्यास कुटुंबावर

आपत्ती कोसळते. अशा व्यक्तींच्या विधवा पत्नीस व मुलांना संकटप्रसंगी मदत करण्यासाठी ही योजना राज्यात 1 मे 1999 पासून लागू केली असून 21 ते 70 वर्षे वयोगटातील कुटुंबप्रमुखांचे वा कर्त्या व्यक्तीचे निधन झाल्यास विधवा पत्नी, मुलामुलींना 25,000 रुपये अर्थसहाय्य विमा कंपनीकडून देण्यात येते.

23) बळीराजा सुरक्षा विमा योजना :– राज्यात भूमिहीन शेतमजूर व अल्प भूधारक शेतकऱ्यांची 1 कोटी 31 लाख कुटुंबे आहेत. वादळ, अतिवृष्टी, भूकंप, पूर आदी आपत्ती ओढवल्यास त्याचा सर्वाधिक फटका अशा कुटुंबांना अधिक बसतो. आपत्तीच्या प्रसंगी अशा शेतकऱ्यांना विमा संरक्षण देण्याच्या हेतूने राज्य शासनाने 1 मे 1999 पासून वरील योजना राबवण्यास सुरुवात केली आहे. याशिवाय समुद्राच्या लाटा, गारपीट, वीज पडणे या नैसर्गिक आपत्ती शिवाय स्टोव्ह, गॅसचा भडका, शॉर्ट सर्किट यासारख्या दुर्दैवी अपघातांमुळे संबंधित शेतकऱ्याची झोपडी, घर वा जनावरांचा गोठा यांचे अशतः नुकसान झाल्यास त्याच्या दुरुस्तीसाठी रुपये 5,000 इतकी तर पूर्णतः नुकसान झाल्यास पुनर्बांधणीसाठी रुपये 10,000 इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून दिली जाते.

24) अन्नपूर्णा योजना :– सध्या अंमलात असलेल्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील स्थिर किंमतीच्या योजनेत सुधारणा करून राज्य शासनाने 1 मे 1999 पासून नवीन 'अन्नपूर्णा योजना' राज्यात राबविण्यास सुरुवात केली आहे. या योजनेअंतर्गत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना म्हणजेच ज्यांना केशरी व पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिका देण्यात आल्या आहेत, अशा कुटुंबांना शिधापत्रिकेवर दोन रुपये किलो दराने 10 किलो गहू वा तांदूळ दिले जाणार आहेत. भूमिहीन शेतमजूर, अल्प भूधारक, आदिवासी शेतमजूर, नागरी गलिच्छ वस्त्यांमधून जीवन कंठणारे श्रमजीवी अशा दारिद्र्य रेषेखालील सर्वच घटकांना या योजनेमुळे दिलासा दिला आहे.

1.64 महाराष्ट्राची लोकसंख्या व लोकसंख्या धोरण

भारताच्या जनगणनेस संपन्न अशी परंपरा आहे. जनतेच्या विविध पैलूवर सांख्यिकीय माहितोचा जनगणना हा मोठा स्त्रोत आहे. ही माहिती नियोजनासाठी, लोकसंख्येचा कल, त्याची विविध वैशिष्ट्ये, लोकसंख्या, श्रमशक्ती, साक्षरता, निवास व कुटुंबाच्या सुविधा, नागरिकीकरण,सामाजिक गट, भाषा,

धर्म, स्थलांतर, अपंगत्व या माहितोचा जनगणना हा स्त्रोत आहे. 2011 नुसार राज्याची लोकसंख्या 11.24 कोटी असून देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ती 9.3% आहे. आकारमानानुसार महाराष्ट्राचा लोकसंख्येत दुसरा क्रमांक लागतो.

तक्ता क्र.1.6

लोकसंख्या तपशील

अ. नं.	तपशील	सन 2001	सन 2011
1)	लोकसंख्या (लाखात)	969	1,124
	पुरुष -	504	584
	स्त्रिया -	465	540
2)	ग्रामीण लोकसंख्या	558	615
	पुरुष -	285	316
	स्त्रिया -	273	299
3)	नागरी लोकसंख्या	411	509
	पुरुष -	219	268
	स्त्रिया -	192	241
4)	दरवार्षिक वृद्धी दर	22.7	16.0

आधार–महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती अहवाल 2011–12

राज्याची गेल्या दहा वर्षातील लोकसंख्येची वाढ 16% असून 1941 नंतरची सर्वात कमी वाढ आहे. 1971 ला महाराष्ट्राचा दरहजारी जन्मदर 32.2 होता तो 2010 पर्यंत 17.1 इतका कमी झाला आहे. तर मृत्यूदर दरहजारी 1971 ला 12.3 होता तो 2010 पर्यंत 6.5 वर इतका कमी झाला आहे. तर अर्भक मृत्यूदर दरहजारी 1971 ला 105 होता तो 2010 पर्यंत 28 इतका कमी झाला आहे. ही स्थिती लोकसंख्येची असली तरी अंतरिम निष्कर्षानुसार 2011 मध्ये 11 कोटी 25 लाख 72 हजार 972 इतकी असून प्रति चौ. कि. क्षेत्रात 365 लोक दाटीवाटीने राहतात. गेल्या दहा वर्षात महाराष्ट्रात 1,54,94,354 इतकी लोकसंख्येत वाढ झाली आहे.

सध्या गतीने लोकसंख्या वाढ राहिली तर राज्याच्या आर्थिक, सामाजिक व आरोग्यविषयक प्रगती हानीकारक होऊन लोकसंख्या विकासात फार मोठा अडथळा ठरत आहे. ही बाब लक्षात घेऊन केंद्र पुरस्कृत 'कुटुंब कल्याण कार्यक्रम' राज्यात वेगाने राबवला गेला. राज्यातील जिल्हा परिषदांकडे हा

कार्यक्रम सोपवला गेला व कुटुंब नियोजनाबरोबरच माता व बालसंगोपन, मुलांना ट्रिपल, पोलिओ डोस, बी.सी.जी. ची लस देणे, मातांना प्रसुतीपूर्व धनुर्वाताची लस टोचणे, माता व अर्भक मृत्यू प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना केली जाते. राज्य शासनाने लोकसंख्या नियंत्रणासाठी पुढील उपाय योजल आहेत.

1) कुटुंब कल्याण कार्यक्रम :– संपूर्ण भारतात कुटुंब कल्याणाच्या कार्यक्रमात महाराष्ट्र आघाडीवरच राहिला आहे. ग्रामीण भागातील बाळंतपण करणाऱ्या दायांना प्रसुती कार्याचे शास्त्रीय शिक्षण देण्यात येत असून 'प्रत्येक गावात एक सुईण' हे उद्दिष्ट राज्याने साध्य केले आहे. स्वयंसेवी संघटनांचेही कुटुंबकल्याण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य घेतले जात आहे. कुटुंब नियोजनाच्या क्षेत्रात महाराष्ट्राला 1982-83 आणि 1983-84 अशी लागोपाठ दोन वर्षे अडीच कोटी रुपयांची पारितोषिके मिळाली. सन 1990-91 मध्ये भारत सरकारने 5.75 लाख लक्ष्य निश्चित केले असताना महाराष्ट्राने 5.25 लाख शस्त्रक्रिया घडवून 91% उद्दिष्ट पार पाडून राज्याने या कामगिरीचा मोठा टप्पा गाठला. 1967 नंतर तर ही योजना इतक्या वेगाने राबविली की, कुटुंब नियोजनाच्या साधनांचा वापर करू लागली. नसबंदीच्या 1 कोटी शस्त्रक्रियांची नोंद झाली होती व 50 लाख महिला 'तांबी' सारख्या साधनांचा वापर करू लागल्या.

2) सावित्रीबाई फ़ले कन्या कल्याण योजना :–ज्या जोडप्यास एकही मलगा नाही व एक किंवा दोन मुलींनंतर ज्यांनी नसबंदी केली आहे त्यांच्यासाठी 1 एप्रिल 1995 पासून 'राष्ट्रीय बचतपत्र' व 'युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया प्रमाणपत्र' या स्वरुपात बक्षीस देण्याची योजना होती. यामध्ये 1 एप्रिल 2000 पासून थोडा बदल करून अजिबात मुलगा नसणाऱ्यांना 1 किंवा 2 मुलींवर नसबंदी करणाऱ्या दारिद्र्य रेषेखालील जोडप्यांना ही योजना लागू केली आहे. ही योजना कुटुंब कल्याणाचा उद्देश साध्य करण्याबरोबरच महिलांचा सामाजिक दर्जा उंचावण्यास उपयुक्त ठरणार आहे.

महाराष्ट्र शासनाला 1961 च्या जनगणनेनंतर प्रथमच लोकसंख्येच्या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात आले होते. 1966 ला महाराष्ट्राच्या आरोग्य मंत्रालयाने कुटुंब नियोजन विभाग स्थापन करून त्यात वेळोवेळी सुधारणा व भरीव आर्थिक तरतूदीची व्यवस्था केली.

3) 1976 चे राष्ट्रीय लोकसंख्या धोरण :–यापूर्वी लोकांचे मन परावर्तीत करून लोकसंख्या नियंत्रित करण्याएवजी वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी सक्तीची उपाययोजना, राष्ट्रीय लोकसंख्या धोरणाची विशेष बाब ठरली. प्रत्यक्ष कार्यवाही त्यामध्ये नसबंदी, ऑपरेशन यासाठी ठराविक लक्ष्य ठरवून काम सुरू आहे. याच धोरणात विवाहाचे वय पुरुषांना 21 व स्त्रियांना 18 वर्षे किमान वयाचो अट घातली.

4) सन 1980 नंतरचे लोकसंख्या धोरण :–1976 च्या सक्तीच्या धोरणाचा परिणाम व लोकांचा प्रचंड विरोध यामुळे सरकारन लोकसंख्या नियंत्रणासाठी पुन्हा मवाळ भूमिका घेतली व गर्भनिरोधक साधने वापरणाऱ्या जोडप्यांची संख्या 22% वरून 41% पर्यंत वाढवण्याचे धोरण ठरले. जन्मदर कमी करून 'छोटे कुटुंब सुखी कुटुंब' ही संकल्पना जनतेने स्वीकारावी, त्यांचा सहभाग वाढवून लोकसंख्या नियंत्रण करावे असा हेतू त्यामध्ये गृहित धरला.

5) लोकसंख्याविषयक धोरण 2000 :–11 मे 2000 रोजी भारताच्या लोकसंख्येने 100 कोटीचा आकडा ओलांडला. तेव्हा भारतात लोकसंख्या स्फोटाची स्थिती निर्माण होईल यासाठी भारत सरकारने लोकसंख्या धोरणाच्या कार्यवाहीचा निर्णय केंद्र शासनाने घेतला. 'एक कुटुंब दोन मुले' या परिणामावर आधारित 'लोकसंख्या धोरण 2000' निश्चित केले. 2040 पर्यंत लोकसंख्या स्थिर करणे ही महत्त्वाची दोन उद्दिष्ट्ये पूर्ण करणे हा हेतू होता. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने ही 9 मे 2000 मध्ये लोकसंख्या धोरणाचा नवीन ठराव करून 1 मे 2001 रोजी ते जाहीर केले व त्याची अंमलबजावणी सुरू केली. या धोरणाने राज्याच्या शाश्वत विकासाला चालना देणे, उत्पन्नाचे अधिक समान वाटप करणे, त्यासाठी लोकसंख्या स्थिर ठेवण्याला प्राधान्य देण्याचे या धोरणात ठरले.

6) लोकसंख्या धोरणाची उद्दिष्ट्ये :–

1) स्थूल जन्मदर सन 2004 पर्यंत 2.5 वरून 2.1 इतका कमी करणे.

2) अर्भक मृत्यूदर व माता मृत्यूदर घटवणे.

3) कौटुंबिक आरोग्याची व्यापक पातळीवर सुधारणा करणे.

4) डोंगराळ प्रदेश, छोटी गावे, शहरातील झोपडपट्ट्या आदी भागात आरोग्यविषयक सोईसुविधा पुरविणे.

5) या धोरणाच्या यशस्वीतेसाठी आरोग्य संस्था, मनुष्यबळाचा व आधारभूत संरचनेचा पर्याप्त वापर करणे.

6) आरोग्यविषयक सेवांची उपलब्धता आणि त्यांचा दर्जा वाढविणे.

7) संसर्गजन्य रोगांच्या नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक व नियंत्रण करणारे उपाय योजणे.

8) सुरक्षित गर्भपाताच्या सोईचा विस्तार करणे.

9) सर्व प्रकारच्या रोगप्रतिबंधक लसी बालकांना देण्याची मोहीम राबविणे.

10) 'दोन अपत्यांचे कुटुंब' ही संकल्पना स्वीकारण्यास जोडप्यांना प्रोत्साहन देणे.

11) दारिद्र्य रेषेखालील दोन अपत्यानंतर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या कुटुंबांचा विमा उतरवणे.

12) कुटुंब कल्याण कार्यक्रम अधिक लोकाभिमूख करणे.

या धोरणाला आरोग्य निर्देशांक सुधारण्याबाबत महाराष्ट्रातील जन्मदर 1998 ला 22.5 होता तो 2010 पर्यंत 15 कमी करणे, राज्यातील दरहजारी मृत्यूदर 2010 पर्यंत 5 इतका कमी करणे तर महाराष्ट्रातील बालमृत्यू दर दरहजारी 1998 ला 49 हाता तो 2010 पर्यंत 15 पर्यंत आणणे, ही लक्ष्ये ठरविली गेली.या धोरणाची वैशिष्ट्ये पुढील होत.

1) दोन मुलांचे कुटुंब हे तत्त्व स्वीकारणाऱ्या शासकीय-निमशासकोय कर्मचाऱ्यांना व्यक्तीगत लाभ, अंशदान इ. सवलती जाहीर केल्या.

2) सरकारचे हे धोरण विविध पातळीवरील अधिकारी, समन्वयक व अधिकारी यांच्या सहकार्यावर अवलंबून असते म्हणून त्यांचा गोपनीय अहवाल तयार करणे स्वयंमूल्यमानाच्या स्वरूपात नोंद घेणे असे ठरले.

3) आरोग्य सेवांची उपलब्धता वाढवण्यासाठी वैद्यकिय शिक्षण घेतल्यानंतर दोन वर्षे ग्रामीण भागात सेवा करणे, सार्वजनिक आरोग्य सेवा विस्तारणे.

4) मातृत्व व बालक आरोग्य सेवा उपलब्धतेसाठी कुटुंब कल्याण शिबीराचे आयोजन करणे.

5) सरकारने या अगोदर लोकसंख्याविषयक 1978 चा बालविवाह कायदा, 1969 चा जन्ममृत्यू नोंद कायदा, 1998 चा विवाह नोंद कायदा, मुलींना मोफत शिक्षण अशा सर्व कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी करणे.

6) या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायतींना निधी देणे. 1 मे 2001 पासून 'जागरुक ग्रामपंचायत' योजना लागू करून स्थानिक स्तरावरील नेते व प्रतिनिधींचा सहभाग वाढवणे असे धोरण ठरले.

7) माता बालक सेवा केंद्राची स्थापना करून अल्पवयीन विवाह, लवकर प्रजनन, निरक्षरता, अंधश्रद्धा, कुपोषण यामुळे महिलांच्या आरोग्यावर परिणाम होतो. यात सुधारणा करणे.

8) विवाहाच्या नोंदी व प्रसुतीच्या नोंदी सर्वत्र ठेवण्याची सोय केली. जन्म-मृत्यूच्या नोंदीमध्ये प्रसुतीकाळात होणाऱ्या मृत्यूवर लक्ष दिले गेले.

9) महिलांचा सहभाग अधिक वाढवण्यासाठी 'राज्य लोकसंख्या महिला आयोग' स्थापणे.

10) मुख्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली लोकसंख्या धोरणाच्या यशस्वीतेसाठी 'राज्य लोकसंख्या आयोग' नेमून राज्यातील सर्व जिल्ह्यात विविध समिती स्थापन करून हे धोरण यशस्वी करण्यावर भर दिला.

या धोरणाचे मूल्यमापन खालील प्रमाणे करण्यात आले.

लोकसंख्या धोरणाची फलश्रुती अभ्यासली तर लोकसंख्या स्थिरीकरणाच्या उद्दिष्ट आणि त्यांच्या पूर्तीसाठी अजूनही व्यापक प्रयत्नाची गरज आहे. या धोरणात पुढील उणीवा जाणवल्या.

1) गर्भनिरोधक व नसबंदीच्या साधनांवर या धोरणात भर दिला व त्यातल्या त्यात महिलांच्यावर कुटुंब कल्याणाची जबाबदारी जास्त आणि महिलांच्या आरोग्यावर याचे वाईट परिणाम होतील अशी टीका झाली.

2) सक्तिचा गैरवापर वेळोवेळी झाल्याचे दिसते. सार्वजनिक रुग्णालयांना प्रत्येक वर्षी लक्ष्य ठरवून देतात. त्याच्या पूर्ततेसाठी चुकीच्या मार्गांचा अवलंब होतो. शिवाय नसबंदी घेणाऱ्या लोकांचा पैसा भ्रष्टाचारात दुसऱ्यांनाच मिळतो इत्यादी घटना समोर आल्या.

3) महिलांच्या साक्षरतेवरच जन्मदर घटण्याचे प्रमाण अवलंबून असल्याचे भारतातील केरळ, तामिळनाडू या राज्यांनी दाखवून दिले आहे. बाकीच्या राज्यातही महिला साक्षरतेवर भर दिला पाहिजे, तरच शक्य आहे.

4) लोकसंख्या नियंत्रण ही अजूनही शासकीय काम म्हणूनच लोक पाहतात. लोकांचा व्यापक सहभाग मिळवण्यात अजूनही पूर्ण यश आलेले नाही. हा विषय प्रबोधन, स्त्रियांची व्यासपीठे, बचत गट, सहकारी संस्था अशा माध्यमांची सांगड घालून राबवला पाहिजे.

5) वृद्धापकाळासाठी व्यापक सुरक्षितता लोकांना मिळाली तर अधिक अपत्ये जन्माला घालण्याचे प्रमाण कमी होईल. म्हणून गरीब, अडाणी, अंधश्रद्धाळू लोकांच्यात विमा सुरक्षितता मोहीम राबवली पाहिजे.

1.65 महाराष्ट्रातील रोजगार संबंधी धारण

1) रोजगार हमी योजना :– २० डिसेंबर १९७४ रोजी राज्य विधिमंडळात रोजगार हमी योजना एकमताने मंजूर केली. ३३ जिल्हे व ३५० तालुक्यात लागू केली. ग्रामीण भागातील श्रमाची कामे करणाऱ्या अकुशल मजुरांची बेकारी दूर करणे व त्यातून ग्रामीण भागाचा विकास साधेल हा या योजनेचा गाभा होय. महाराष्ट्राची ही अभिनव योजना पुढे देशाने स्वीकारली. या योजनेची वैशिष्ट्ये पुढील होत.

1) या योजनेच्या नियोजनाची जबाबदारी नियोजन विभाग, जिल्हाधिकारी, तालुका स्तरावर तहसिलदार यांच्यावर सोपविली.

2) योजनेच्या अंतर्गत खर्चासाठी अधिकारी निश्चिती कली गेली.

3) श्रमिकांना रोजगाराबाबत हमी या योजनेने दिली.

4) घराजवळ काम शक्यतो आठ किलोमीटरच्या आत, शिवाय लांब काम असेल तर इतर सुविधा पुरवण्याची तरतूद केली गेली.

5) श्रमप्रधान कामांना प्राधान्य देण्याचे यात ठरवले गेले.

6) प्रौढ व्यक्तींना काम दिले जाते. मात्र अपवादात्मक 15 ते 18 वयोगटातील मुलांना घरच्या अडचणीसाठी रोजगार दिला जातो.

7) या मजुरांना योग्य मजुरीचा दर दिला जातो.

8) आवश्यकता असेल तेथेच काम दिले जाते.

9) रोजगार व बेरोजगार भत्ता देण्याचे बंधन आहे.

10) कामावर अपघात झाल्यास सानुग्रह अनुदान मिळते.

11) रजेची सोयही या योजनेत आहे.

या योजनेमुळे समाजातील कमकुवत घटकांना आधार मिळाला. शहराकडे ग्रामीण भागात रोजगार नाही जाणाऱ्या मजुरांचा लोंढा थांबला. दुष्काळात मजूर सावकाराच्या जाळ्यात अडकतात मात्र त्याला या योजनेने प्रतिबंध झाला. मजुरांना निश्चित रोजगार व मजुरी मिळण्याची हमी या योजनेत होती.

या योजनेतून सामुदायिक विकासाला पोषक कामे आणि गावाच्या उपयुक्ततेच्या कामांमुळे फायदा झाला.

2) फलोद्यान विकास कार्यक्रम :– २१ जून १९९० पासून 'फलोद्यान विकास कार्यक्रम' हा शेतीविकासाचा रोजगाराभिमूख कार्यक्रम रोजगार हमी योजनेखाली सुरू करण्यात आला. मजुरांच्या सहाय्याने शेतकऱ्यांच्या शेतावर फळझाड लागवड करण्यात येते. शेतीची उत्पादकता वाढवणे व ग्रामीण भागात टिकाऊ साधनसंपत्तीची निर्मिती हा उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न या योजनेत केला आहे.

3) जवाहर रोजगार योजना :– दारिद्र्य निर्मुलन आणि रोजगार निर्मितीच्या योजनांचे पुनर्विलोकन त्यात सुधारणा सुचविण्यासाठी नेमलेल्या समितीच्या अहवालानुसार ही योजना फक्त ग्राम स्तरावर राबविण्याचा निर्णय झाला. १९९९-२००० पासून देशात व राज्यात राबविली जात आहे.

ग्रामीण भागातील रोजगार संधी वाढवण्याबरोबरच ग्रामीण भागासाठो कायमस्वरुपी साधनंसपत्ती निर्माण करणे व दारिद्र्य रेषेखालील लोकांना रोजगार उपलब्ध करून देणे हा उद्देश आहे.

ग्रामपंचायतीमाफत ग्रामस्तरावर योजना राबवणे व मुलभूत सोयीसुविधा निर्माण करणे, ही योजनेची वैशिष्ट्ये आहेत.

4) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम :– पंतप्रधान रोजगार योजना व ग्रामीण रोजगार निर्मिती योजना या दोन योजनांचे एकत्रीकरण करून राज्याच्या ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागात पंतप्रधान रोजगार निर्मिती हा केंद्र पुरस्कृत कार्यक्रम १५ ऑगस्ट २००८ पासून राबविला जात आहे.

लहान-लहान उद्योग उभे करून त्यांच्या माध्यमात्न रोजगार व स्वयंरोजगाराची निर्मिती करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. त्यासाठी कर्ज व अनुदान उपलब्ध करून दिले जाते. कारागीर व बेरोजगार यांना एकत्र करून ग्रामीण व शहरी भागात नवीन स्वयंरोजगार उद्योगांची उभारणी करण्यावर भर ठेवून ही योजना 15 ऑगस्ट 2008 पासून राबविली आहे.

5) सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना :– नेहरू रोजगार योजना, नागरी भागातील गरीबांसाठी मुलभूत सेवा आणि पंतप्रधान एकात्मिक नागरी दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम यांचे एकत्रीकरण करून १ डिसेंबर १९९७ पासून ही योजना सुरू केली आहे. स्वयंरोजगार निर्मिती व रोजगार पुरविणे हा उद्देश या योजनेचा असून दारिद्र्य रेषेखालील इयत्ता नववीपर्यंत शिकलेल्या शहरातील बेरोजगारांना या योजनेचा लाभ दिला जातो.

6) सुवर्णजयंती ग्राम स्व–रोजगार योजना :–ग्रामीण भागातील रोजगार, महिला बालविकास, युवकांना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण यासारख्या छोट्या व वेगवेगळ्या सर्व योजना की ज्यांचा उद्देश ग्रामीण भागातील गरीबांना स्वयंरोजगार पुरवणे हाच मुख्य उद्देश असणाऱ्या सर्व योजनांचे एकत्रीकरण करून 1 जुलै 1999 पासून ही योजना देशात व राज्यात राबवली गेली.

प्रत्येक जिल्ह्यात साधनसंपत्ती, परंपरागत कारागिरी व लोकांच्यातील कलाकौशल्याचा अभ्यास करून गरीब व दारिद्र्यातील लोकांचे गट करून त्यांना प्रशिक्षण देऊन त्यांना स्वयंरोजगार करण्यासाठी गरजेनुसार पतपुरवठा करून योजना करून देणे. अनुसुचित जाती-जमाती मधील लोक, महिला, दुर्बल घटक या सर्वांना तीन वर्षात टप्प्याटप्प्याने दारिद्र्यरेषेच्या वर आणणे हाच उद्देश या योजनेचा आहे.

सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे शेतीप्रधान भारतात शेतमालाच्या विक्रीचा प्रश्न सर्वात गंभीर होता. त्यामुळे या योजनेत गाव, जिल्हा आणि राज्यस्तरावर पणन केंद्राची स्थापना करून ग्रामीण भागाच्या विकासाची सर्वात महत्त्वाची योजना म्हणून त्याचा उल्लेख झाला. ग्रामीण भागात उत्पादन होणाऱ्या उत्पादनांचे विपणन हा ग्रामीण स्व-रोजगाराला चालना देणारा महत्त्वपूर्ण घटक आहे. म्हणून 2008-09 पासून गाव, जिल्हा आणि राज्यस्तरावर पणन केंद्र स्थापन करण्याचे धोरण केंद्र सरकारने स्विकारले आहे. या योजनेअंतर्गत 2009-10 मध्ये राज्यात 19,807 वैयक्तिक लाभार्थींना व स्वयंसहाय्य गटाच्या माध्यमातून स्वयंरोजगार मिळणारे 1,32,319 लाभार्थी अशा 1,52,126 लाभार्थ्यांना अर्थसहाय्य दिले गेले.

7) महात्मा गांधो राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना :– महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेस आदर्श मानून त्या धर्तीवर केंद्रानेही राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची आखणी केली. अधिनियम २००८ नुसार २ फब्रुवारी २००६ पासून देशातील निवडक २०० जिल्ह्यात सुरू केली. या योजने अंतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबातील किमान एका व्यक्तीला १०० दिवस रोजगार पुरविता न आल्यास भत्ता देण्याची तरतूद त्यामध्ये आहे. याच योजनेचे 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना' असे नामकरण केले.

सन 2009-10 मध्ये या योजनेअंतर्गत 5,91,547 कुटुंबांना रोजगार पुरवण्यात आला. ग्रामीण बारमाही जोडरस्त्यांची 356 कामे, पूरनियंत्रण व पूरसंरक्षणाची 346 कामे, जलसंधारणाची व जलसंवर्धनाची 7,305 कामे, 602 दुष्काळ प्रतिबंधक कामे, अनुसुचित जाती-जमातींच्या व नवीन भूधारकांना सिंचन सुविधा पुरवण्याची 611 कामे, पारंपारिक जलस्त्रोत नूतनीकरणाची 552 कामे, शेतीविकासाची 801 कामे याप्रमाणे पूर्ण करण्यात आली.

राज्यशासनाच्या वतीने सन 1972 पासून चालविली जाणारी रोजगार हमी योजना राज्यात एकत्रित राबविल्या जात आहेत. राज्यातील या योजनेने आर्थिक वर्षात प्रतिकुटुंबास 365 दिवस रोजगार पुरवण्याची हमी दिली.

8) दशलक्ष विहीर योजना :– रोजगार हमीतून राबवली जाणारी ही योजना १ जानेवारी १९९६ पासून स्वतंत्ररित्या राबवली जात होती. शेतकऱ्यांच्या शेती उत्पादनात वाढ व्हावी व त्याला अधिक चांगले जीवनमान जगता यावे यासाठी विहिर सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विहिरीसाठी शेतकऱ्यांना अनुदान दिले जाते. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाला, अनुसुचित जाती-जमातीच्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल. १९९९ पासून ही योजना 'सुवर्णजयंती ग्राम स्व-रोजगार योजनेत' विलीन केली.

9) आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ :– रोजगार व स्वयंरोजगार निर्मितीच्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे आणि अशी अंमलबजावणी करीत असतानाच राज्यातील उपलब्ध मनुष्यबळ व साधनसंपत्ती यामध्ये वाढ घडवून आणणे व या योजनेचा लाभ आर्थिकदृष्ट्या मागास तरुणांना मिळवून देणे हा या महामंडळाच्या स्थापनेचा उद्देश होता. थेटकर्ज योजना, बीज भांडवल कर्ज योजना, गट प्रकल्प योजना या माध्यमातून महामंडळ आर्थिकदृष्ट्या मागास तरुणांना कर्ज पुरवठा करणे.

10) मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ :– राज्यातील मुस्लीम समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील बेरोजगार तरुणांना स्वतःचा रोजगार करता यावा, स्वयंरोजगारातून त्यांची आर्थिक प्रगती साधली जावी हा मुख्य हेतू हे महामंडळ स्थापनेचा हाता. सन २००० साली हे महामंडळ सुरू केले.

11) सुशिक्षित बेरोजगारांसाठी बीज भांडवल :– सुशिक्षित बेरोजगार व्यक्तींना उद्योग व्यवसायासाठी बीज भांडवल पुरवून त्यांना प्रोत्साहन देऊन त्याला त्याच्या पायावर उभा करणे हा या योजनेचा उद्देश आहे. १८ ते ५० वर्ष वयातील किमान सातवी पास व्यक्तींना याचा लाभ घेता येतो. सध्या शासनाने सुशिक्षित बेरोजगारांसाठी विविध योजना कर्ज व अनुदान रूपाने केल्या आहेत. मात्र त्यामध्ये ठराविक रक्कम कर्जदाराने गुंतविणे बंधनकारक असते. अशा प्रकारची थोडीफार रक्कम किंवा बीज भांडवलही न

उभारु शकणाऱ्या बेरोजगारांसाठी ही योजना आहे. २००९-१० मध्ये १,८५५ स्व-रोजगार प्रकल्पांना ९ कोटी ६४ लाख रुपयांचे बीज भांडवल पुरवण्यात आले.

1.66 महाराष्ट्र शासन सामाजिक विकास योजना

1) संजय गांधी निराधार योजना –

जी व्यक्ती स्वतःचा चरितार्थ चालवण्यासाठी असमर्थ, निराधार, अंध, अपंग, पक्षाघात, कर्करोग, एड्स, शारीरिक व मानसिक आजारांमुळे स्वतःची उपजीविका चालवण्यास असमर्थ असणाऱ्या निराधार पुरुष 65 वर्षे वय व स्त्रियांना 60 वर्षाची अट असून आर्थिकदृष्ट्या निराधार विधवा यांनाही थोडेफार आर्थिक सहाय्य करण्याच्या उद्देशाने मासिक 250 रुपये अनुदान दिले जाते. राज्य सरकार तहसिलदारांकडून ही योजना राबवते.

2) कुटुंब अर्थसहाय्य योजना –

कुटुंबात कमावत्या पुरुष अथवा स्त्रियांचा मृत्यू झाला व ते कुटुंब दारिद्र्य रेषेखालील असेल तर व मृत्यू पावणारी व्यक्ती उत्पन्नात महत्त्वाची असेल तर वय 18 ते 64 वर्षा दरम्यान असेल तर त्या कुटुंबातील व्यक्तिचा नैसर्गिक मृत्यू झाला तर 5,000 रुपये व अपघाती मृत्यू झाल्यास 10,000 रुपये इतके अर्थसहाय्य दिले जाते. याचा लाभ मृत्यू पावणाऱ्या व्यक्तीच्या विधवेस/विधुरास, अज्ञान मुलामुलींना, अविवाहीत मुलींना तसेच त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्यांना दिला जातो.

3) असंघटित कामगारांसाठी जनश्री विमा योजना –

राज्यातील असंघटित कामगारांसाठी राज्य शासनाने 12 ऑगस्ट 2004 पासून जनश्री विमा योजना लागू केली आहे. ही योजना 18 ते 60 वयोगटातील, दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींसाठी असून दारिद्र्य रेषेच्या वर किंचित जे आहेत त्यांनाही या योजनेचे फायदे मिळू शकतात. वार्षिक हप्ता रु. 200 असून त्यापैकी रु. 100 केंद्र शासनाच्या सामाजिक सुरक्षा निधीतून तर रु. 50 राज्य शासनाकडून व 50 रुपये संबंधित व्यक्तीकडून भरून विमा उतरवला जातो. या योजनेनुसार पुढील फायदे मिळतात.

1) हा विमा घेतलेल्या असंघटित मजूराचा मृत्यू झाल्यास त्याच्या वारसदारांना रु. 30,000 मिळतात.

2) अपघाती मृत्यू झाल्यास रु. 75,000 मिळतात.

3) अपघातात कायमस्वरुपी अपंगत्व आल्यास रु. 75,000 मिळतात.

4) अपघातात दोन्ही डोळे किंवा हात, पाय दोन्ही गमावल्यास रु. 75,000 मिळतात.

5) विमा उतरवणाऱ्या मजुरांच्या मुलांच्या शिक्षणाकरिता शिक्षा सहयोग योजनेअंतर्गत इ. 9 वी ते 12 वी साठी तसेच आय.टी.आय. कोर्ससाठी जास्तीत जास्त दोन मुलांना प्रत्येक तिमाहीसाठी 300 रुपये शिष्यवृत्ती कोणतेही अंशदान हप्ता न भरता मिळते. गरीबातल्या गरीब विद्यार्थ्यांसाठीच ही योजना लागू होते.

4) ज्येष्ठ नागरिकांसाठी एस.टी. पास. प्रवास सवलत –

दि. 1 जानेवारी 1996 पासून 65 वर्षावरील वृद्धांना एस.टी. ने प्रवास केल्यास भाड्यात 50% सवलत देण्याची योजना सुरू असून ही योजना केवळ साध्या बसना लागू आहे. तहसिलदार कार्यालयाकडून संबंधितांना कागदपत्रांची तपासणी करून ओळखपत्र दिले जाते. निवडणूक आयोगाचे ओळखपत्रही चालते. त्यामध्ये वय व जन्मतारखेचा उल्लेख महत्त्वाचा असतो.

1.67 ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम –

भारत हा शेतीप्रधान देश आहे. एकूण लोकसंख्येच्या 69% लोकसंख्या आजही खेड्यात राहते. त्यामुळे खेड्यातील स्वच्छता व आरोग्य यांच्या निकषांवरच राष्ट्रातील एकूण स्वच्छता व आरोग्य प्रतीत होते. त्यामुळे ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमास महत्त्व प्राप्त झाले आहे.

महाराष्ट्र हे राज्य सामाजिक व आर्थिकदृष्ट्या भारतातील पुढारलेले राज्य असल्याने ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम राज्यभर अंमलात आणला आहे. ग्रामसफाई व भंगीमुक्ती मोहिमांमध्ये महाराष्ट्राचे कार्य उल्लेखनीय आहे. या कार्यक्रमांतर्गत सफाई कर्मचारी महिलांची मार्गदर्शनपर शिबीरे भरवली जातात. चंद्रपूर जिल्ह्यातील शिंदेवाडी व पणे जिल्ह्यातील मांजरी येथे अशी शिबीरे घेतली जातात.

स्वच्छता अभियान - भारतातील शहरालगतच्या झोपडपट्ट्यांमध्ये व ग्रामीण भागात गावाबाहेर पण जवळच उघड्यावर प्रातर्विधी करण्याची अनारोग्यकारक व अनेक साथीच्या रोगांना जन्म देणारी पद्धत रुजली आहे. ही पद्धत बंद करण्याच्या उद्देशाने भारत सरकारने संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत ग्रामीण भागात शौचालये व त्या अनुषंगाने विविध बांधकामे करण्यावर भर दिला आहे.

या कार्यक्रमाचा भाग म्हणून वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी केंद्राकडून 1,500 रुपये व राज्य सरकारकडून 700 रुपये मदत देतात. महाराष्ट्र राज्याच्या 2003 च्या पाहणीनुसार राज्यात ग्रामीण भागातील 110.5 लाख कुटुंबांपैकी 89 लाख कुटुंबांकडे वैयक्तिक शौचालयाची सुविधा नसल्याचे दिसून आले होते. त्यामुळे गावोगावी घराघरात शौचालय त्यासाठी संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत 2011 अखेर ग्रामीण भागात 65 लाख शौचालये बांधण्याचा कार्यक्रम आखला गेला.

निर्मलग्राम पुरस्कार योजना - महाराष्ट्रात संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान अत्यंत चांगल्या प्रकारे राबविल्यानंतर महाराष्ट्रातील ग्रामीण भाग हागणदारीमुक्त करण्यासाठी निर्मलग्राम पुरस्कार योजना राबवली गेली. केंद्र शासनाने 2003-04 या वर्षापासून ही योजना सुरू केली. या योजने अंतर्गत उघड्यावर प्रातर्विधी करण्याची पद्धत पूर्णपणे बंद करून गावाचा परिसर स्वच्छ ठेवणाऱ्या ग्रामपंचायतींना, पंचायत समित्यांना व जिल्हा परिषदांना रोख पारितोषिके देण्यात येतात. याचा शंभर टक्के खर्च केंद्र शासन करते.

महाराष्ट्र शासनाने सुरू केलेली ही योजना महाराष्ट्रात फारच गाजली. आजअखेर भारतात निर्मलग्राम पुरस्कार घेणाऱ्या सर्वात जास्त ग्रामपंचायती महाराष्ट्रात आहेत. 6,668 ग्रामपंचायती व तीन पंचायत समित्यांना निर्मलग्राम पुरस्कार मिळाला आहे. राज्यात रोगराई निवारणाच्या कार्याला त्यामुळे चालना मिळाली आहे.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान - संत गाडगेबाबा हे समाजसेवक होते. त्यांनी स्वच्छतेतून समाजकार्य करण्याची परंपरा निर्माण केली. मातीचे गाडगे व झाडू घेऊन ते गावागावात जाऊन सर्व गाव झाडून काढत व संध्याकाळी कीर्तनातून स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत असत. त्यामुळे राज्यात राबविल्या

जाणाऱ्या ग्रामस्वच्छता अभियानास 'संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान' हे नाव दिले. त्यामुळे ग्रामस्वच्छता कार्यास गती मिळाली.

राज्य सरकारने या अभियानांतर्गत सर्व गावात स्वच्छता अभियान राबवून काही निकषांवर सर्वोत्कृष्ट ठरणाऱ्या ग्रामपंचायतींची निवड करण्यासाठी जिल्हा परिषद, मतदार संघ स्तरापासून राज्यस्तरापर्यंत प्रत्येक स्तरावर तपासणी समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. प्रत्येक पंचायत समितीतील पहिल्या तीन सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायतींना अनुक्रमे 25 हजार, 15 हजार व 10 हजार रुपये दिले जातात व प्रत्येक जिल्ह्यातील पहिल्या तीन ग्रामपंचायतींना अनुक्रमे 5 लाख रुपये, 3 लाख रुपये व 2 लाख रुपये दिले जातात आणि संपूर्ण राज्यातील पहिल्या तीन ग्रामपंचायतींना अनुक्रमे 25 लाख रुपये, 15 लाख रुपये व 12.5 लाख रुपये अशी बक्षीसे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या नावे दिली जातात.

1.68 पाणीपुरवठा

संयुक्त राष्ट्रसंघाने 1981-91 हे दशक 'आंतरराष्ट्रीय पाणीपुरवठा व स्वच्छता' म्हणून जाहीर केले. साहजिकच भारत सरकार व महाराष्ट्र शासनाने या कालावधीत पाणीपुरवठा व स्वच्छता या कार्यक्रमांना प्राधान्य दिले. या कालावधीत राज्यात 90% नागरी लोकसंख्येला व 50% ग्रामीण लोकसंख्येला पिण्याचे स्वच्छ व पुरेसे पाणी उपलब्ध करून देण्याचे ठरवले गेले. अजूनही हा उद्देश साध्य झाला नाही. आजही महाराष्ट्र शासन सर्वांना स्वच्छतेतून आरोग्य व स्वच्छ पिण्याचे पाणी पुरेसे देण्याचा पाणीपुरवठा कार्यक्रमाचा पाठपुरावा केला जात आहे.

महाराष्ट्र शासनाने सहाव्या योजनेच्या काळात 16,232 गावांची पिण्याच्या पाण्याची समस्या पूर्णतः व अंशतः सोडविण्यात आली. तर सातव्या योजना काळात 18,308 गावे व सुमारे 1,70,000 वाड्या-वस्त्यांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला गेला. आठव्या पंचवार्षिक योजनेत 26,000 गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला गेला. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत गावांच्या व शहरांच्या पाणीपुरवठा

समस्या सोडवण्यावर जरी भर दिला गेला तरी आजही महाराष्ट्रातील 15,000 गावे, वाड्या-वस्त्यांना पिण्याच्या स्वच्छ व पुरेशा पाण्याच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. प्रतिवर्षी येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमुळे या समस्या अधिक तीव्र बनताना दिसत आहेत. त्यावर उपाययोजना करण्याचा केंद्र व राज्य प्रयत्न करते.

1) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम – 'भारत निर्माण' कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागात सुविधा व मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी राबविण्यात येतो. लोकांना स्वच्छ पिण्याचे पाणी ही जीवनावश्यक बाब आहे. अशुद्ध पाण्याने लोकांना विविध प्रकारचे आजार होतात. ते टाळण्यासाठी ग्रामीण भागात पिण्यायोग्य आणि पुरेसा पाणी पुरवठा कायमस्वरुपी करण्यासाठी सन 2010-11 या वर्षात योजनेअंतर्गत सरकारने 9,745 गावे/वाड्यांपैकी 8,987 गावे/वाड्यांचे उद्दिष्ट पूर्ण केले असून त्यासाठी शासनाचा 1,300 कोटी रुपये इतका खर्च झाला. तर सन 2012 पर्यंत जे 6,502 वस्त्यांवर पाणी पुरवठ्या करण्याचे लक्ष्य होते त्यापैकी 1,931 वाड्यांवर पाणीपुरवठा केला.

2) टंचाई निवारण कार्यक्रम :– ज्या गावामध्ये व खेड्यामध्ये दरवर्षी उन्हाळ्यात पाण्याची टंचाई असते, त्यामुळे जेव्हा राज्यात असमान पाऊस पडतो तेव्हा टंचाई निवारण कार्यक्रम राबवला जातो.

3) महाराष्ट्र सुजल आणि निर्मल जल अभियान :– महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेस 50 वर्षे पूर्ण झाल्या निमित्त महाराष्ट्र शासनाने सुजल व निर्मल जल अभियान सुरू केले. त्यामध्ये प्रत्येक गावाला-वाडीवस्तीवर पाणीपुरवठा करण्यासाठी तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय सुधारणा करण्याच्या उद्देशाने हे अभियान सुरू केले. पाणी टंचाई व पाण्याच्या वाढत्या मागणीवर मात करून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व स्वच्छता विषयक सुविधा सर्व नागरिकांना उपलब्ध करून देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. सन 2012 पर्यंत 110 पाणी पुरवठा व मलनिस्सारण योजनांना 743.18 कोटी रुपयांची प्रशासकीय मंजूरी दिली गेली. तर राज्यातील 10,101 अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांमधील कुटुंबियांना घरगुती नळ जोडण्या व वैयक्तिक शौचालये उपलब्ध करून देण्याकरिता महाराष्ट्र सुजल व निर्मल जल अभियानांतर्गत 'महाराष्ट्र गोल्डन ज्युबिली नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना' सुरू करण्यात आली. या

योजनेअंतर्गत 90% अनुदान राज्य सरकार देते व 10% वाटा लाभार्थी व्यक्ती किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेचा असतो. नळजोडणी व शौचालय बांधकामासाठी प्रत्येक कुटुंबाना 4,000 रुपये व 12,000 रुपये अनुदान दिले जाते. या योजनेअंतर्गत 40,000 लाभार्थ्यांना लाभ मिळाला आहे.

4)शिवकालीन पाणी साठवण योजना :– निसर्गातील पावसाचे पाणी पारंपारिक व अपारंपारिक पद्धतीने जलसंधारण करणे, पाण्याच्या स्त्रोतांचे सक्षमीकरण करणे, छतावरील पावसाच्या पाण्याची साठवणूक करणे, डोंगराळ भागातील पावसाचे पाणी अडवण्यासाठी वनराई बंधारे, तलाव बांधणो अशा विविध मार्गांचा अवलंब करून लोकांना पिण्याचे पाणी वर्षभर कसे उपलब्ध होईल असा उद्देश डोळ्यासमोर ठेवून राज्यात शिवकालीन पाणी साठवण योजना सन 2001 पासून राबवली जात आहे. गेल्या दहा वर्षात 8,187 गावांची निवड या योजनेसाठी केली आहे व आजअखेर 254.54 कोटी रुपये खर्च केले आहेत.

पावसाचे पाणी साठवणे व त्याचा गरजेनुसार वापर करणे यामध्ये नागरी भागात ही पद्धत फारच लोकप्रिय होत आहे.

5) जलस्वराज्य योजना :– महाराष्ट्र शासनाने 2003 सालापासून ग्रामीण भागातील पिण्याचे पाणी चांगले व स्वच्छ मिळावे त्यासाठी पाणी पुरवण्याचा दर्जा चांगला असला पाहिजे म्हणून 'जलस्वराज्य योजना' राबवली आहे. सन 2011 पर्यंत या योजनेचा लाभ 11.27 लाख कुटुंबाना पाणीपुरवठा व स्वच्छतेच्या सुविधा उपलब्ध केल्या असून त्यासाठी 1,224.76 कोटी इतका खर्च झाला आहे. या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे 3,007 ग्रामपंचायती व 5,119 गावे वाडी/वस्त्यांना नियमित पाणीपुरवठा होत आहे.

जलस्वराज्य योजनेची जून 2011 पर्यंतची प्रगती सोबतच्या तक्त्यात दिली आहे.

तक्ता क्र.1.7

जलस्वराज्य योजनेची जून 2011 पर्यंतची प्रगती

विभाग	ग्रामपंचायत संख्या		
	निवडलेल्या	प्रकल्पातील	पर्ण झालेल्या

	ग्रामपंचायती	ग्रामपंचायती	ग्रामपंचायती
कोकण	353	323	317
पुणे	511	474	471
नाशिक	380	288	286
औरंगाबाद	852	812	710
अमरावती	554	464	461
नागपूर	741	646	641

माहिती स्त्रोत : पाणी पुरवठा विभाग, महाराष्ट्र शासन आर्थिक पाहणी अहवाल 2011–12

6) ग्रामीण पाणी पुरवठा 'आपलं पाणी' प्रकल्प :– महाराष्ट्रात सतत टंचाईत असणारे जिल्हे म्हणजे पणे, औरंगाबाद व अहमदनगर या तीन जिल्ह्यात राबविला जात आहे. त्यासाठी जर्मन गव्हर्मेंट डेव्हलपमेंट बँकेच्या अर्थसहाय्याने ग्रामीण पाणीपुरवठा 'आपलं पाणी' हा प्रकल्प राबवला आहे. जिल्ह्यातील सर्व लोकांना पिण्याचे पाणी शाश्वत पुरवले पाहिजे, पाणलोट क्षेत्राचा विकास करणे, तसेच परिपूर्ण भूजल व्यवस्थापन, इत्यादीद्वारे आरोग्य व स्वच्छता यामध्ये सुधारणा करणे हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पात सहभागी होणाऱ्या स्थानिक संस्था ह्या सक्षम असल्या पाहिजेत म्हणून हा प्रकल्प राबवताना त्याकडेही लक्ष देऊन स्थानिक संस्थांचे सबलीकरण करणे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. 31 मार्च 2011 पर्यंत राज्यातील 235 ग्रामपंचायतींच्या आसपासच्या 833 लोकवस्त्यांमध्ये या योजनेअंतर्गत पाणी पुरवठा करण्यात आला असून त्यासाठी 102.69 कोटी इतका खर्च झाला. या प्रकल्पाच्या सुरुवातीपासून चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

7) एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम :– पाणलोट विकास म्हणजे पाण्याचे संवर्धन होय. जी नैसर्गिक साधनसंपत्ती असते उदा.- जमीन, पाणी, वनस्पती, प्राणी या साधनसंपत्तीची पुनर्निमिती आणि विवेकशील पद्धतीने संवर्धन होय. सन 2008 मध्ये भूसंसाधन विभाग, ग्रामीण विकास मंत्रालय यांनी पाणलोट क्षत्र विकास कार्यक्रमासाठी संयुक्त सूचना जारी केल्या. हा कार्यक्रम 2009 मध्ये सुरू केला आहे.

1.69 पर्यावरण संवर्धन

नैसर्गिक साधन संपत्तीचा वेगाने होणारा संख्यात्मक व गुणात्मक ऱ्हास यामुळे त्याचे व्यवस्थापन व संवर्धन यासाठी चिंता वाढवणारा आहे. केंद्र तसेच राज्य शासनाने पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेतलेला आहे.

महाराष्ट्र जल प्रदूषण प्रतिबंध अधिनियम 1969 या तरतूदीनुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची स्थापना 1971 साली झाली. जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम 1974 राज्यात 1981 साली लागू झाला. हे मंडळ राज्याला पर्यावरणाशी निगडीत विषयांवर मार्गदर्शन तसेच हवेची गुणवत्ता नद्या, खाडी/समुद्र, भूजल दर्जा, औद्योगिक सांडपाणी व ध्वनी प्रदूषण यावर संनियंत्रण करते.

1.70 वायू प्रदूषण

परिवहन, स्थिर साधनांतील इंधन ज्वलन, ज्वलनासाठी वापरलले इंधन जसे कोळसा, लाकूड, वाळलेले गवत इ. आणि बांधकाम उद्योग ही वायू प्रदषणाची प्रमूख कारणे आहेत. विविध शैक्षणिक संस्थांच्या मदतीने राज्याच्या 17 जिल्ह्यातील 82 ठिकाणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ वायूच्या गुणवत्तेचे संनियंत्रण करीत आहे. हे नियंत्रण राष्ट्रीय वायू गुणवत्ता संनियंत्रण कार्यक्रम, राज्य वायू गुणवत्ता संनियंत्रण कार्यक्रम व अखंडित वायू संनियंत्रण केंद्र इत्यादी अतर्गत करण्यात येत आहे. वायू प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी कमी गधक असलेले डिझेल वापरणे, शिसेरहीत पेट्रोल वापरणे, सीएनजी/एलपीजी हे पर्यायी इंधन वापरणे, पीयुसी अनिवार्य करणे, 15 वर्षे झालेल्या वाहनांवर बंदी घालणे आणि आठ वर्षे पूर्ण झालेल्या वाहनांना सीएनजी/एलपीजी वापरण्यासाठी रुपांतर करणे अशा उपाय योजना करण्यात येत आहेत.

1.71 जल प्रदूषण

राष्ट्रीय जल गुणवत्ता कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे जागतिक पर्यावरण संनियंत्रण यंत्रणा (जेम्स) व भारतीय राष्ट्रीय जलस्त्रोत नियंत्रण (मिनार्स) प्रकल्प राबवित आहे. सद्यःस्थितीत, मंडळाद्वारे 200 ठिकाणी जमिनीवरील पाण्याचे व 50 ठिकाणी भूजलाचे असे 250 केंद्रांचे संनियंत्रण करण्यात येत आहे. मंडळाने 'जल व वायू प्रदषण अधिनियम' अंतर्गत 2010-11 मध्ये विविध उद्योगांना स्थापना किंवा विस्ताराबाबत 13,843 संमती पत्रे दिली आहेत. या अधिनियमातील

तरतूदीनुसार मंडळाने विशिष्ट उद्योग व स्थानिक स्वराज्य संस्थांकडून त्यांनी वापरलेल्या पाण्यासाठी रु. 30.42 कोटी एवढी पाणीपट्टी वसूल केली आहे.

1.72 ध्वनी प्रदूषण

ध्वनी प्रदषण हा तिसऱ्या क्रमांकाचा अतिहानीकारक पर्यावरण प्रदषणाचा प्रकार असून, हा एक प्रमुख पर्यावरणाचा प्रश्न आहे ह्याची संपूण जगास जाणीव झाली आहे. ध्वनी प्रदूषणामुळे मनुष्याच्या आरोग्यावर होणाऱ्या प्रतिकूल परिणामाच्या वाढत्या जाणीवे बरोबरच पर्यावरणातील ध्वनीप्रदषणाबाबतची सहनशीलता कमी होणाऱ्या लोकांच्या संख्येत भर पडत आहे. ध्वनी प्रदषण अधिनियम 2000 अन्वये औद्योगिक, निवासी, वाणिज्यिक आणि शांतता विभाग असे भाग पाडण्यात आले आहेत. यामुळे विशिष्ट भागात ध्वनी स्तर विशिष्ट डेसिबल पर्यंत मर्यादित केले आहेत. ध्वनी प्रदषणाला आळा घालण्यासाठी सणासुदीच्या काळात 125 डेसिबलपेक्षा जास्त आवाज करणाऱ्या फटाक्यांवर बंदी तसेच सण साजरे करताना ध्वनिवर्धक लावणे व मोठ्या आवाजाचे फटाके वाजविणे यावर वेळेचे बंधन घालण्यात आले आहे.

1.73 जमिनीचे प्रदूषण

जमिनीचे प्रदषण म्हणजे एखाद्या विभागातील मातीची गुणवत्ता कमी होवून ती जमीन दूषित व वापरण्यास अयोग्य होते. फक्त खते आणि किटकनाशके त्यासाठी जबाबदार नाहीत तर आणखीही काही बाबी सुद्धा त्यासाठी कारणीभूत आहेत. मातीच्या प्रदूषणाची इतर कारणे कारखान्यातील कचरा जसे घातक वायू व रसायने, अयोग्य व घातक सिंचन प्रक्रिया, कुजलेल्या वस्तूवरील अयोग्य प्रक्रिया व व्यवस्थापन, आम्लाचा पाऊस, कारखान्यातून निघणारा धूर पावसात मिसळणे, वाहनातील इंधन गळती तसेच मोठ्या डंपिंग ग्राऊंड किंवा नदी व तिच्या प्रवाहात टाकलेल्या कचऱ्याची चुकीची विल्हेवाट व अनारोग्यकारक व्यवस्थापन यामुळे भर पडली आहे. प्रदषणाचे जमिनीवरील परिणाम भयावह असून ते पर्यावरणाचा समतोल व जमिनीवरील प्राणीमात्रांच्या आरोग्यास घातक ठरू शकतात.

1.74 घातक कचरा

महाराष्ट्रात 5,428 घातक कचरा निर्माण करणारे कारखाने आहेत. राज्यामध्ये प्रतिवर्षी अंदाजित 18 लाख मे. टन एवढा घातक कचरा निर्माण होतो. एकूण 5,969 कारखान्यांनी घातक कचरा व त्याची विल्हेवाट लावणे यासाठी सभासदत्व घेतले आहे. कचऱ्याचे सुयोग्य व्यवस्थापन करण्यासाठी महाराष्ट्र प्रदषण नियंत्रण मंडळ विविध पाऊले उचलत आहे. राज्यात घातक टाकाऊ कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी तळोजा, ठाणे जिल्ह्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाचे टी.टी.सी. औद्योगिक क्षेत्र, पुणे जिल्ह्यातील रांजणगाव आणि नागपूर जिल्ह्यातील बुटीबोरी येथे चार प्रमख केंद्रांची उभारणी केली आहे. ज्या उद्योगांनी घातक कचऱ्याची आवारातच बेकायदा साठवण आणि विल्हेवाट केली आहे अशा 59 उद्योगांना घातक कचरा व्यवस्थापन, हाताळणी व हद्द नियम 2008 अन्वये मंडळाने दंड आकारला आहे. तसेच अशा उद्योगांना त्यांच्या आवारात असलेला घातक कचरा, सार्वजनिक घातक कचरा प्रक्रिया साठवणूक व विल्हेवाटीची सुविधा असलेल्या केंद्रावर पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सप्टेंबर, 2011 पर्यंत अशा दोषी उद्योगांकडून मंडळाने एकूण रु. 43.30 लाख एवढी दंडाची रक्कम वसूल केली आहे.

घातक कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली अथवा नाही याचा मागोवा घेणे यासाठी घातक कचरा वाहून नेणाऱ्या वाहनांमध्ये ग्लोबल पोजिशनिंग सिस्टम (जी.पी.एस.) राज्याने अनिवार्य केली आहे. सद्यस्थितीत 200 घातक कचरा वाहतूकदारांनी ही प्रणाली आपल्या वाहनांवर बसविली आहे.

1) प्रमख अपघाती घातक कारखाने :– जर कारखान्यातील घातक पदार्थांचा साठा किंवा वापर हा 'वस्तूनिर्माणासाठी घातक रसायनांची आयात अधिनियम 1989' आणि 'रासायनिक दर्घटना (विपत्काल, नियोजन, तयारी आणि प्रतिक्रिया अधिनियम, 1996)' विहीत मर्यादेच्या बाहेर असतील तर सदर कारखाने प्रमख अपघाती घातक या अंतर्गत येतात. सुरक्षा आणि आरोग्याच्या परिमाणाप्रमाणे व्यवस्थापनाला माहिती व खात्री द्यावी लागते. व्यवस्थापन कामगारांना, घातक रसायनांचा वापराबाबतची माहिती व हाताळणी याबाबत प्रशिक्षण देते. कारखान्यात होणारे अपघात टाळण्यासाठी अंतर्गत अपघात प्रतिबंधक योजना अनुसरावी लागते. काही अपघातांचे परिणाम फक्त कारखान्यांपुरतेच

मर्यादित रहात नाहीत तर नजिकच्या क्षेत्रावर सुद्धा त्याचा परिणाम होतो. यासाठी बाह्यक्षेत्रातील अपघात प्रतिबंधक योजना अस्तित्वात आणली जाते. यासाठी दुर्घटना, अपघाताच्या ठिकाणी तांत्रिक मार्गदर्शन व नियंत्रणासाठी राज्य, जिल्हा आणि स्थानिक स्तरावर दुर्घटना प्रतिबंधक गट स्थापन केले.

शासन अधिनियम 1989 अंतर्गत महाराष्ट्रात 365 (मुंबइ-16, ठाणे-18, वसई-22, कल्याण 25, रायगड-60, नाशिक-29, पुणे-111, कोल्हापूर-24, औरंगाबाद-31, नागपूर-23 आणि अकोला-6) प्रमुख घातक अपघात कारखाने आहेत. या कारखान्यांनी त्यांच्या ठिकाणी आपत्कालीन योजना तयार केल्या आहेत आणि त्याची प्रात्यक्षिके नियत कालावधीत आयोजित केली जातात.

2) ई–कचरा :– ई-कचऱ्यामध्ये हेलोजनेटेड कंम्पाउंडस,जड धातू तसेच किरणोत्सारी पदार्थ असे आरोग्य व पर्यावरणास अपायकारक असणारे घटक असतात. मंडळाने ई-कचरा यास अग्रक्रम क्षेत्र म्हणून घोषित केले असून या उद्योगातील गुंतवणूकदारांमध्ये याबाबत जाणीव निर्माण करण्यास पुढाकार घेतला आहे. मंडळाने पर्यावरणाच्या दृष्टीने प्रभावी तंत्रज्ञान असलेल्या सात उद्योगांना ई-कचरा पुनःप्रक्रियेसाठी अधिकृत केले असून त्यांची एकूण पुनःप्रक्रिया क्षमता प्रतिवर्षी 10,050 मे. टन इतकी आहे. मंडळाने प्रतिवर्षी 50,000 टन एवढा इ-कचरा निर्माण होण्याची धोक्याची सूचना दिली आहे. मंडळाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा सोबत देशातील पहिले एकात्मिक ई-कचरा पुनःप्रक्रिया सुविधा केंद्र सार्वजनिक खाजगी भागिदारी तत्त्वावर सुरू करण्याचे निश्चित केले आहे.

3) जैव वैद्यकीय कचरा :– राज्यात महाराष्ट्र प्रदषण नियंत्रण मंडळामाफत भारत सरकारच्या जैव-वैद्यकीय (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, 1998 कायद्याची अंमलबजावणी करण्यात येते. राज्यात एकूण 35 सामूहिक जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन व विल्हेवाट केंद्रे कार्यरत असून त्यापैकी 29 कद्रे भस्मीकरणावर आधारीत व उर्वरित केंद्रे जमिनीत खोलवर पुरण्याच्या पद्धतीवर आधारीत आहेत.

1.75 वातावरण बदल

राज्य सरकारने वातावरण बदलाच्या होणाऱ्या परिणामाच्या अनुषंगाने 'द एनर्जी अँड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट (टेरी)' या संस्थेबरोबर सामंजस्य करार केला आहे. सदर संस्था दोन वर्षाच्या कालावधीत वातावरण बदलासंबंधी सविस्तर कृती आराखडा तयार करणार आहे. या आराखड्यात प्रामुख्याने जलविज्ञान व जलस्त्रोत, कृषी व अन्न पद्धती, तटीय क्षेत्रातील सागरी जीवसृष्टी व जैविक विविधता व जीवनशैलीशी निगडीत क्षेत्रे जसे मानवी आरोग्य, वने व आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे.

1) पर्यावरणविषयक अनुमती :– पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, 1986 अंतर्गत केंद्र शासनाने महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (एम.सी.झेड.एम.ए.) राज्य स्तर पर्यावरण प्रभाव मूल्यमापन प्राधिकरण (एस.इ.आय.ए.ए.) व राज्य स्तर विशेषज्ञ मूल्यांकन समिती (एस.इ.ए.सी.) यांची पर्यावरणविषयक अनुमतीसाठी स्थापना केली आहे. या प्राधिकरणास सागरी पर्यावरणाचे संरक्षण व प्रदूषण नियंत्रण करून सागरी पर्यावरणाच्या दर्जात सुधारणा करावयाच्या उपाययोजनांचे अधिकार देण्यात आले आहेत. हे प्राधिकरण राज्य शासन, राष्ट्रीय सागरी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण किंवा केंद्रशासन यांनी सदर्भासाठी पाठविलेल्या सागरी नियंत्रण क्षेत्राशी संबंधित पर्यावरणाशी निगडीत बाबी हाताळेल.

2) राष्ट्रीय नदी कृती आराखडा :– देशातील प्रमख प्रदषित नद्यांचे शुद्धीकरण करणे हा राष्ट्रीय नदी कृती आराखड्याचा मुख्य उद्देश आहे. राष्ट्रीय नदी कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत 70 टक्के निधी केंद्र शासनाकडून व 30 टक्के निधी संबंधित नगरपालिका/महानगरपालिका/राज्य शासनाकडून उपलब्ध करून दिला जातो. या योजने अंतर्गत त्र्यंबकेश्वर, नाशिक, नांदेड, कराड व सांगली शहरातील नद्यांमधील पाण्याचे शुद्धीकरण करण्याचे काम यशस्वीरित्या पार पाडण्यात आले असून कोल्हापूर व प्रकाशा येथील नदीच्या शुद्धीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.

3) राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना :– सरोवर हे ताज्या पाण्याचा मुख्य स्त्रोत असल्याने त्याची अवनती रोखण्यासाठी नियोजनबद्ध, कायमस्वरूपी आणि शास्त्रशुद्ध प्रयत्न करण्याची गरज आहे. राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून त्याचे स्वरूप 70:30 असे आहे. या योजनेअंतर्गत

12 तलावांचे काम पूर्ण झाले असून भिवंडीमधील वारलादेवी तलाव आणि सोलापूर मधील सिद्धेश्वर तलाव यांचे काम प्रगतीपथावर आहे.

4) राज्य सरोवर संवर्धन योजना :– सरोवरांचे महत्त्व लक्षात घेता तदनुषंगिक समस्यांची तीव्रता कमी करण्याच्या दृष्टीने व सूक्ष्म हवामानावरील त्यांचा प्रभाव जाणून राज्य सरकार प्रदूषित सरोवरांचे संवर्धन करण्यासाठी निधी उपलब्ध करून देते. या योजनेअंतर्गत यमाई तलाव-पंढरपूर, हनुमान तलाव-काटोल, शार्लेट तलाव-माथेरान, जयसिंगराव तलाव-कागल, देधरगाव तलाव-धुळे, गांधीसागर व सोनेगाव तलाव-नागपूर, पीअर तलाव-नंदुरबार, मोती तलाव-सावंतवाडी आणि गणेश तलाव व ऐतवडे खुर्द तलाव-सांगली यांची कामे प्रगती पथावर आहेत.

वरील प्रकारे महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व ग्रामीण स्वच्छता याविषयी आखलेल्या योजनांचा आढावा घेतला आहे.

1.76 संशोधन समस्या : (Statement of the Problem)

''सांगली व सातारा जिल्ह्यातील मानवी विकासाचा तुलनात्मक अभ्यास 1990–2011''

देशातील सर्व घटक राज्यात औद्योगिक, सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या पुढारलेले व पुरोगामी विचाराचे राज्य म्हणून महाराष्ट्राचा उल्लेख केला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानव निर्देशांक मार्गदर्शक तत्त्वानुसार व निकषानुसार महाराष्ट्र राज्यातील परिस्थितीचे विश्लेषण केल्यास विदर्भ व मराठवाडा विभागातील जिल्ह्यांमध्ये मागासलेपणाचे प्रमाण जास्त आहे. मुंबई शहर आणि उपनगर ठाणे, रायगड, सिधुंदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि नागपूर या जिल्ह्यांची सरासरी राज्यातील इतर जिल्ह्यांपेक्षा जास्त आहे. त्याचा अभ्यास करणे व महाराष्ट्राच्या स्थापनेबरोबरच सांगली व सातारा या दोन जिल्ह्यांची निर्मिती झाली. पश्चिम महाराष्ट्र हा विकासात पुढे असणारा महाराष्ट्रातील भाग आहे.

त्यामधील हे दोन जिल्ह असून आर्थिक विकास व मानवी विकासामध्ये जिल्हाअंतर्गत अभ्यास करण्यासाठी हा विषय निवडला आहे.

1.77 अभ्यासाची उद्दिष्ट्ये : (Objectives of the Study)

या अभ्यासाची उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे.

1) महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील आर्थिक विकास व मानवी विकास या दोहोतील संबंध अभ्यासणे.

2) सांगली व सातारा जिल्ह्यातील आर्थिक विकास व मानवी विकास दोहोंतील संबंध अभ्यासणे.

3) सांगली व सातारा जिल्ह्यातील शैक्षणिक घटकांचा अभ्यास करणे.

4) सांगली व सातारा जिल्ह्यातील आरोग्य विषय घटकांचा अभ्यास करणे

5) सागली व सातारा जिल्ह्यातील लोकांच्या राहणीमान, आयुमर्यादा,आहार वगैरे बाबींचा अभ्यास करणे.

6) सांगली व सातारा जिल्ह्यातील मानव विकास निर्देशांकाची भारत व महाराष्ट्रातील मानवी विकासाशी तुलना करणे.

7) सांगली व सातारा जिल्ह्यातील मानव विकास वंचन निर्देशांक अभ्यासण.

8) सांगली व सातारा जिल्ह्यातील मानव विकासाशी निगडीत घटकांची तुलना करणे.

9) मानव विकासात सुधारणा करण्यासाठी उपाय योजना सूचविणे.

1.78 गृहीतके : (Hypothesis)

1) आर्थिक विकास व मानव विकासात धन सहसंबंध असतात.

2) सांगली व सातारा जिल्ह्यातील मानवी विकासात तफावत आढळून येते.

3) सांगली व सातारा जिल्ह्यातील लोकसंख्येशी संबंधित घटकात (साक्षरता, स्त्री-पुरुष प्रमाण, बालमृत्यू, आयुर्मान वगैरे) तफावत आढळून येते.

4) महाराष्ट्र राज्य व सांगली व सातारा जिल्ह्यातील मानवी विकासात फरक आढळून येतो.

1.79 अभ्यास विषयाचे महत्त्व : (Rational of the Study)

आर्थिक विकास व मानवी विकास या दोन्ही संकल्पना परस्पर पूरक आहेत. परंतु आर्थिक विकासाबरोबरच मानवी विकास घडून येईलच असे नव्हे. महाराष्ट्रात पश्चिम महाराष्ट्र आर्थिक विकासामध्ये सर्वात पुढे आहे. त्यामध्ये प्रामुख्याने कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यांचा समावेश होतो. असे असलेतरी आर्थिक विकास व मानवी विकासामध्ये जिल्हा अंतर्गत असमतोल आढळून येतो. मानवी विकासातील हा जिल्हातंर्गत असमतोल शोधणे व त्याबाबत उपाय योजना सूचविणे, तसेच आर्थिक विकासाची फळे सर्वसाधारण लोकांच्यापर्यंत पोहचविण्यासाठी उपाय सूचविणे, मानव विकासाच्या कोणत्या घटकाची कमतरता आहे ते शोधन काढणे. तसेच स्त्री-पुरुष असमानता, शिक्षण वंचन, आरोग्य, बालमृत्यू प्रमाण, शिक्षण, वगैरे सोयी सुविधांची उपलब्धता याचा अभ्यास करणे व सांगली व सातारा जिल्ह्यातील मानवी विकास निर्देशांकाच्या विविध घटकांची तुलना करुन कोणत्या घटकाच्या बाबत कोणता जिल्हा अग्रेसर किंवा मागे आहे, इत्यादी बाबींचा अभ्यास करुन, संपर्ण महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांसाठी उपाय योजना सूचवून, महाराष्ट्रातील मानवी विकासाला चालना देण्यासाठी आवश्यक बाबींचा ऊहापोह करणे, यादृष्टीने या अभ्यास विषयाची निवड केली आहे.

1.80 संशोधन पध्दती : (Research Methodology)

हा संशोधन अभ्यास प्रामुख्याने माहितीच्या दुय्यम (Secondary Data) स्त्रोतावर आधारित आहे. माहितीचे संकलन करण्यासाठी भारताचे आर्थिक सर्वेक्षण, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा परिषद अहवाल, जिल्हा सांख्यिकी अहवाल, भारत व महाराष्ट्राचे मानवी विकास अहवाल वगैरेचे 1991 ते 2011 पर्यतचे विविध अहवाल, विविध पुस्तके वापरलेली आहेत व त्यामधून दुय्यम माहिती गोळा केली आहे.

1.81 तथ्य संकलन व विश्लेषण :

या संशोधनासाठी सरासरी, शेकडेवारी साधा वाढीचा दर, चक्रवाढ वाढीचा दर, गुणोत्तर पध्दती, आलेख, प्रमाण विचलन, विचरण गुणांक, सहसंबंध वगैरे पध्दतींचा वापर केला आहे त्यासाठी ठी पुढील सुत्रे वापरली आहेत.

1) साधा वाढीचा दर = $\mathbf{SGR = \frac{C - B}{B} X\ 100}$

2) चक्रवाढ दर = $\mathbf{CGR = \left(\frac{P1}{P0}\right)^{\frac{1}{n}} - 1X100}$

3) गुणोत्तर = $\mathbf{R = \frac{A}{B} X\ 100}$

4) प्रमाण विचलन = $\sigma = \sqrt{\frac{\Sigma d^2}{N} - \left(\frac{\Sigma d}{N}\right)^2}$

5) विचरण गुणांक = $C.V = \frac{\sigma}{X} X\ 100$

6) सहसंबंध = $\mathbf{r = \frac{\sum X Y}{\sqrt{\Sigma x^2 X\ \Sigma y^2}}}$

मानवी विकास निर्देशांक काढण्यासाठी यु.एन.डी.पी.व महाराष्ट्र शासनाने वापरलेली सुत्रे येथे वापरलेली आहेत.

चलघटक निर्देशांक = $\frac{\text{प्रत्यक्ष मूल्य} \quad \text{किमान मूल्य}}{\text{कमाल मूल्य-किमान मूल्य}}$

1) आयुर्मान निर्देशांक = $\frac{\text{प्रत्यक्ष सरासरी आयुर्मान - 25 वर्षे}}{\text{85 वर्षे - 25 वर्षे}}$

2) शैक्षणिक निर्देशांक

1) $\frac{2}{3}$ x $\frac{\text{प्रत्यक्ष प्रौढ साक्षरता दर - 0}}{100 - 0}$

(2) $\frac{1}{3}$ x $\frac{\text{प्रत्यक्ष स्थूल पटावरील विद्यार्थ्याचे प्रमाण - 0}}{100 - 0}$

1.82 व्याप्ती व मर्यादा : (Scope & Limitation of the Study)

सांगली जिल्ह्यातील दहा तालुके व सातारा जिल्ह्यातील आकरा तालुके असून या दोन्ही जिल्ह्यात कांही तालुके डोंगराळ भाग आहेत तर कांही तालुके नदीकाठच्या प्रदेशात सधन आहेत. तर कांही तालुके दुष्काळी तालुके आहेत. त्यामुळे अभ्यासाची व्याप्ती दोन्ही जिल्ह्यात विविध विभागानुसार आहे.

हा अभ्यास सांगली व सातारा या दोन जिल्ह्यापुरताच मर्यादित आहे. तसेच अभ्यासाचा कालावधी सन 1991 ते 2011 या 20 वर्षापुरताच मर्यादित आहे.

1.83 सैध्दांतिक पार्श्वभूमी : (Theoretical Frame Work)

अर्थतज्ज्ञ डॉ. महिबूब उल हक यांनी मानवी विकासाची सैध्दांतिक मांडणी केल्याने 1990 मध्ये मानवी विकास ही नवीन संकल्पना उदयाला आली. त्या अगोदर देशाच्या विकासाच्या मोजमापासाठी स्थूल राष्ट्रीय उत्पादन व दरडोई उत्पादन या गोष्टींनाच जास्त महत्त्व होते. परंतु त्यामुळे देशात दारिद्र्य, बेकारी, नैसर्गिक साधन संपतीचा चुकीचा वापर असा असमतोलपणा निर्माण झाला. त्यावर उपाय म्हणून डॉ. हक व डॉ. अमर्त्य सेन यांच्यामते मानवी विकास म्हणजे लोकांच्या निवडी विस्तारण्याची प्रक्रिया होय. विकासाच्या प्रत्येक पातळीवर शिक्षण, आरोग्यदायी जीवन जगण व चांगल्या जीवनमानासाठी चांगले राहणोमान यातून मानवी विकास व देश विकास घडवून आणणे. अर्थतज्ज्ञ सेन यांनी सामाजिक निवड, दारिद्र्याचा निर्देशांक, दुष्काळाचे विश्लेषण व कल्याणाचे महत्तमीकरण यावार प्रकाश टाकून प्रत्येक व्यक्तीस किमान आवश्यक मूलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण प्राप्त झाल्यास कल्याण साधले जाते ही मध्यवर्ती कल्पना मांडली. याशिवाय अर्थतज्ज्ञ हिक्स, थॉमस माल्थस, ऑर्थर लेव्हीस, ॲडमस्मिथ, जोसेफ शुंपीटर, पॉल स्टीटन, मार्शल यांनीही मानवी विकासाबाबत व मानवी

भांडवला बाबत सैध्दांतिक मांडणो केली आहे. या सर्वसिध्दांताचा उद्देश मनष्यातील गुंतवणूकीला जास्त मौल्यवान भांडवल समजण आहे. कारण मानवी भांडवलातील गुंतवणूकी अभावी देशाचा आर्थिक विकास कमी राहतो. यावरुन आज महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यात कमी अधिक प्रमाणात दारिद्र्य, बेकारी, कुपोषण, झोपडपट्ट्या, निरक्षरता या समस्या जाणवतात. त्यावर उपाययोजना ही मानवी विकासावरच अवलंबून आहे. ही संशोधन विषयाची पाश्वभूमी आहे.

1.84 प्रकरण नियोजन

प्रकरण 1 ले : प्रस्तावना

मानवी विकास संकल्पना- मानवी विकास व आर्थिक विकास- मानव विकासाचे निर्देशक व निकष-भारतातील मानव विकासाचे धोरण, महाराष्ट्रातील मानव विकासाचे धोरण, संशोधन पध्दती-व्याप्ती-कालावधी- मर्यादा- उद्दिष्ट्ये- गृहीतके- माहिती संकलन-माहितीचे विश्लेषण- प्रकरण योजना इत्यादी.

प्रकरण 2 रे : सांगली व सातारा जिल्ह्यांची भौगोलिक वैशिष्ट्ये :-

जमीन,पाऊस,भौगोलिक रचना-शेती-पिक पध्दती- औद्योगिक उत्पादन-लोकसंख्या-रोजगार-मुलभूत सोयी-बँका-शैक्षणिक संस्था वगैरे.

प्रकरण 3 रे : संदर्भ साहित्याचा आढावा Review of Literature

प्रकरण 4 थे : मानव विकासाचे मुलभूत निर्देशांकाचा कल :-

लाकसंख्या-लोकसंख्यावाढीचा दर-आयुर्मान-साक्षरता-पुरुष-स्त्री-वाढीचा कल-शिक्षण-विद्यार्थी स्थूल प्रवेश गुणोत्तर-प्राथमिक शाळा-माध्यमिक शाळा-उच्चमाध्यमिक शाळा व उच्च शिक्षण (कॉलेज), सर्व शैक्षणिक स्तरातील संयुक्त नांव नोंदणी-शिक्षणावरील सार्वजनिक खर्चाचा कल व त्यांचे राष्टोय उत्पन्नाशी प्रमाण दरडोई उत्पन्न-वास्तव दरडोई उत्पन्न-सांगली व सातारा जिल्ह्यातील शहरीकरणाचा कल.

प्रकरण 5 वे : आरोग्य विषयक सोयींची उपलब्धता :-

जन्ममृत्युदर-बालमृत्युदर-मातांच्या मृत्युचा दर-लोकसंख्येमागे दवाखान्यांची उपलब्धता-आरोग्य कर्मचारी उपलब्धता-खाटांची उपलब्धता-वाढीचा कल-पिण्याच्या पाण्याची उपलब्धता-स्वच्छता सोयींची उपलब्धता-डॉक्टर लोकसंख्या गुणोत्तर-आरोग्य सोयींवरील सार्वजनिक खर्चाचा कल-वगैर मानव विकास निर्देशांक, सांगली व सातारा जिल्ह्याची तुलना, दारिद्र्य निर्देशांक चले 1) 40 वर्षापर्यत जगण्याची शक्यता असणाऱ्या लोकांचे प्रमाण (सरासरी आयुर्मान) 2) शुध्द पिण्याचे पाणी न मिळणाऱ्या लोकांचे प्रमाण 3) वयानुसार कमी वजनाच्या मुलांचे प्रमाण 4) निरक्षरतेचे प्रमाण.

प्रकरण 6 वे : दारिद्र्य निर्देशांक व वंचन निर्देशांक

आरोग्य सोयांपासून वंचित लोकसंख्येचे प्रमाण-पिण्याच्या पाण्याच्या साईपासून वंचित लोकसंख्येचे प्रमाण-स्वच्छता विषयक सोईपासून वंचित लोकसंख्या-साक्षर नसलेल्या लोकसंख्येचे प्रमाण-साक्षर नसलेल्या स्त्री-पुरुष लाकसंख्येचे प्रमाण-5 वर्षाखालील कुपोषित मुलांचे प्रमाण-5 वर्षाखालील मुलांच्या मृत्यूचे प्रमाण-घरे असलेली व नसलेली लोकसंख्या लिंगभेद विषमता चित्र :- (Gender Disparity Profile) स्त्री-पुरुष प्रमाण- प्रौढ महिला साक्षरता-प्राथमिक शाळांमधील मुला-मुलींची प्रमाण-प्राथमिक-द्वितीय व तृतीय पातळीवरील नांव नोंदणी प्रमाण-स्त्री-पुरुष यांचे सरासरी आयुर्मान-मुलभूत सोयींच्या वाढीचा दर-लिंगभेद-विकास-निर्देशांक (GDI) लिंगाधारीत सक्षमीकरण-मापन-(GEM)- भारत व महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यातील मानवी विकास निर्देशांकाचा कल व तुलना-गृहीतकाची पडताळणी

प्रकरण 7 वे : निष्कर्ष व शिफारशी :-(Findings & Recommendations**)**

- संदर्भ -

" Agrawal A.N. "	:-	"Indian Economy" Vishwa Prakashan, New delhi 1997
"Misra & Puri "	:-	"Indian Economy" Himalaya Publishing House- Mumbai
"Datta R., Sundhram K.P.M."	:-	"Indian Economy" S. Chand & Company Ltd. New Delhi
"Economic Survey of India"	:-	Government of India- Publication

"Economic Survey of Maharashtra"	:-	Government of Maharashtra (Publication)
India- 2010	:-	Government of India Publication
Schultz T.W.	:-	"Capital Formation by Education" JPE December 1990
" Panchmukhi P.R. "	:-	"Educational Capital in India" IJE- JAN- March 1965
मानव विकास अहवाल 2002	:-	मानव विकास अहवाल, महाराष्ट्र सरकार
मानव विकास अहवाल 2012	:-	मानव विकास अहवाल, महाराष्ट्र सरकार
ककडे विजय बं.	:-	मानवी संपत्तीचा विकास निराली प्रकाशन पुणे.2008
क्षीरसागर के' व पाटील व्ही.बी.	:-	मानव संसाधन विकास 2011 के' सागर पब्लीकेशन
जे.एफ.पाटील (संपादक)-1999	:-	अमर्त्यसेन कल्याणाचा कारागीर प्रकाशन -प्रबोधन प्रकाशन ज्योती, इचलकंरजी ऑक्टोबर, नोव्हेंबर - 1999
मनोज पाटील -2008	:-	नागरिकांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विकास योजना चौधरी लॉ पब्लीशर्स जळगांव
तुकाराम जाधव -2013	:-	21 व्या शतकासाठी साक्षरता संपादक युनिकबुलिटीन दिवाळी अंक, नोव्हेंबर 2013 अंक6
व्ही.बी.घुगे	:-	महाराष्ट्रातील मानवी विकासाची वास्तविकता अर्थसंवाद जानेवारी, मार्च 2004 खंड 27 अंक 4

प्रकरण 2

सांगली व सातारा जिल्ह्यांची भौगोलिक वैशिष्ट्ये

		पान नं.
2.1	सांगली जिल्ह्याची वैशिष्ट्ये	**125**
2.2	सांगली जिल्हा सांख्यिकीय माहिती	**125**
2.3 अ)	सांगली जिल्हा	**131**
2.4	सांगली जिल्ह्याची व्याप्ती	**131**
2.5	स्थान	**132**
2.6	पर्जन्य	**132**
2.7	भौगोलिक व भुस्तरीय रचना	**132**
2.8	जमीन व धारण क्षेत्र	**133**
2.9	जमीन वापर	**133**
2.10	मुख्य पिके व त्याखालील क्षेत्र	**134**
2.11	लोकसंख्या	**139**
2.12	साक्षरता	**140**
2.13	पायाभूत सोई सुविधा	**141**
2.14	सातारा जिल्ह्याची भौगोलिक वैशिष्ट्ये	**144**
2.15	सातारा जिल्हा सांख्यिकीय माहिती	**145**
2.16 ब)	सातारा जिल्हा	**149**
2.17	कृषी गणना 2000-01	**151**
2.18	पायाभूत सोयीसुविधा	**154**


प्रकरण 2

सांगली व सातारा जिल्ह्यांची भौगोलिक वैशिष्ट्ये

2.1 सांगली जिल्ह्याची वैशिष्ट्ये:–

नकाशा

2.2 सांगली जिल्हा सांख्यिकीय माहिती



अ.क्र	बाब	परिमाण	जिल्हा
1	2	3	4
एक	**प्राकृतिक रचना**		
1	**भौगोलिक स्थान**		
	उत्तर अक्षांश	अंश	16.45-17.22
	पूर्व रेखांश	अंश	73.42-75.40
	क्षेत्रफळ	000 चौ.कि.मी.	8.6
2	**प्रशाकिय रचना**		
	तालुके	संख्या	10
	शहरे	संख्या	7
	एकूण गांवे	संख्या	728
दोन	**स्थानिक स्वराज्य संस्था**		
1	महानगरपालिका	संख्या	1
2	नगरपरिषद	संख्या	4
3	पंचायत समित्या	संख्या	10
4	ग्रामपंचायती	संख्या	705
तीन	**लोकसंख्या** (2011)		
1	ग्रामीण	हजार	2101
2	नागरी	हजार	720
3	एकूण	हजार	2821
4	पुरुष	हजार	1436
5	स्त्रिया	हजार	1385

6	स्त्रिया प्रती हजार पुरुष	संख्या	964
7	अनुसुचित जातींची लोकसंख्या(2001जिल्हा)	हजार	313
8	घनता (लोकसंख्या प्रती चौ.कि.मी)	संख्या	329
9	**साक्षरतेचे प्रमाण**		
	ग्रामीण	टक्के	80.72
	नागरी	टक्के	88.14
	एकूण	टक्के	82.62
	पुरुष	टक्के	90.40
	स्त्रिया	टक्के	74.66
	साक्षरतेमध्ये जिल्ह्याचा राज्यात क्रमांक	क्रम संख्या	18
	दारिद्र्य रेषेखालील ग्रामीण कुटुंबे (2002)	लाख	0.68
चार	**जिल्हा उत्पन्न अंदाज**		
	एकूण उत्पन्न (स्थूल)	कोटी रु.	22137
	दरडोई उत्पन्न (स्थूल)	रुपये	76133
	एकूण उत्पन्न (निव्वळ)	कोटी रु.	20701
	दरडोई उत्पन्न (निव्वळ)	रुपये	71196
पाच	**कृषी**		
	भौगोलिक क्षेत्र	हजार हेक्टर	861
	जंगलव्याप्त क्षेत्र	हजार हेक्टर	48
सहा	**पिकाखालील क्षेत्र (2001-02)**		
	एकूण क्षेत्र	हजार हेक्टर	712
	एकूण ओलिताखालील क्षेत्र	हजार हेक्टर	174

सात	**जमीन वहिती धारण संख्या 2000-01**		
	दोन हेक्टर पेक्षा कमी	000 हेक्टर	313
	2 ते 10 हेक्टर	000 हेक्टर	351
	10 हेक्टर पेक्षा जास्त	000 हेक्टर	43
आठ	**जलसिंचन पूर्ण झालेले पाटबंधारे प्रकल्प त्याखालील लाभक्षेत्र 31/03/2012**		
	मोठे पाटबंधारे प्रकल्प	संख्या	5
	मध्यम पाटबंधारे प्रकल्प	संख्या	6
	लघु पाटबंधारे प्रकल्प (राज्यक्षेत्र)	संख्या	85
	सिंचन विहीरीखाली भिजणारे क्षेत्र(2001-02)	हजार हेक्टर	113
नऊ	**पशुसंर्वधन पशुगणना - (2007)**		
	एकूण पशुधन	हजार	1492
	गो जातीय	हजार	332
	म्हैस वर्गीय	हजार	503
	मेंढया व शेळ्या	हजार	562
	कोंबड्या व बदके	हजार	4021
दहा	**सहकार क्षेत्र 2008-09**		
	सहकारी संस्था (31/03/2012)	संख्या	5921
	प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था (31/03/2012)	संख्या	759
	सहकारी दुग्धसंस्था (31/03/2012)	संख्या	830

अकारा	**वीज (31/03/2012)**		
	विद्युतीकरण झालेली गांवे	संख्या	728
	वीज पुरवठा केलेले कृषी पंप संच	हजार	171
	विजेचा वापर		
	घरगुती	हजार कि.वॅट. तास	210224
	व्यापारी	हजार कि.वॅट. तास	55329
	औद्योगिक	हजार कि.वॅट. तास	319525
	कृषी	हजार कि.वॅट. तास	638702
	इतर	हजार कि.वॅट. तास	33877
	एकूण	हजार कि.वॅट. तास	1257657
बारा	**परिवहन व दळणवळण**		
	रेल्वे मार्गाची एकूण लांबी	कि.मी	174
	रस्त्यांची लांबी (पृष्ठांकित) (31/03/2012)		
	राष्ट्रीय महामार्ग	कि.मी	30
	राज्य महामार्ग	कि.मी	931
	प्रमुख जिल्हामार्ग	कि.मी	2199
	इतर जिल्हामार्ग	कि.मी	3484
	ग्रामीण रस्ते	कि.मी	3326
	एकूण	कि.मी	9970

तेरा	**नोंदणीकृत कारखाने व रोजगार**		
	नोंदणीकृत कारखाने 2010	संख्या	890
	नोंदणीकृत चालू कारखाने 2010	संख्या	810
	(त्यांतील कामगार) 2010	संख्या	20523
	साखर कारखाने 2012	संख्या	15
	साखरेचे उत्पादन राज्य -2011-12	हजार मे.टन	0
	सहकारी सूत गिरण्या 2012	संख्या	13
चौदा	**शिक्षण क्षेत्र**		
	एकूण शाळा	संख्या	2097
	विद्यार्थी	हजार	251
	शिक्षक	हजार	9
	प्रती शिक्षक विद्यार्थी	संख्या	27
	माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण		
	एकूण शाळा	संख्या	596
	विद्यार्थी	हजार	263
	शिक्षक	हजार	8
	प्रती शिक्षक विद्यार्थी	संख्या	32
	उच्च शिक्षण		
	एकूण शाळा	संख्या	41
	एकूण विद्यार्थी	हजार	39

	तांत्रिक व व्यवसाय शिक्षण		
	शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था	संख्या	10
	अशासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था	संख्या	6
पंधरा	**सार्वजनिक आरोग्य**		
	रुग्णालये	संख्या	25
	दवाखान	संख्या	27
	प्राथमिक आरोग्य केंद्रे	संख्या	59
	प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे	संख्या	320
सोळा	**आदिवासी कल्याणकारी योजना 2012-13**		
	मागासवर्गीयांसाठी वसतिगृहे	संख्या	18
सतरा	**सार्वजनिकवितरण व्यवस्था**		
	रास्त भावाची दुकाने	संख्या	1205

स्त्रोत– सांगली जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2011–12 सांगली जिल्हा गॅजेट 3) महाराष्ट्रातील जिल्हे के सागर 2008

2.3 अ) सांगली जिल्हा

जमीन, पाऊस, भौगोलिक रचना, शेती, पिकपध्दती, औद्योगिकउत्पन्न, लोकसंख्या, रोजगार, मुलभूत सोयी, बँका, शैक्षणिकसंस्था वगैरे.

2.4 सांगली जिल्ह्याची व्याप्ती

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सातारा जिल्हा प्रतिसरकारच्या चळवळीमुळे देशभर गाजला. स्वातंत्र्यानंतर प्रशासनाच्या सोयीसाठी सातारा जिल्ह्याचा दक्षिण भाग म्हणजे तासगांव तालुका, खानापुर तालुका, वाळवा तालुका व शिराळा तालुका हे चार तालुके हस्तांतरीत केले व कर्नाटकाच्या सिमेलगत मिरज व परीसरातील गावे जत भागातील गावांचे दोन वेगळे तालुके निर्माण करून सहा तालुक्यांचा **दक्षिण सातारा** नावाचा नवीन जिल्हा निर्माण करण्यात आला.

या जिल्ह्यामध्ये औंध येथील सांगलीचे पटवर्धन संस्थान, मिरजेचे पटवर्धन संस्थान, व जत येथील डफळे संस्थान यांचा समावेश त्यामध्ये केला. संयुक्त महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली व 21 नोव्हबर 1960 रोजी या जिल्ह्याचे दक्षिण सातारा हे नाव बदलून सांगली जिल्हा असे करण्यात आहे. यामध्ये सांगली शहर मोठे होते त्याच्या नावाची उत्पत्ती कृष्णा व वारणा नदोच्या संगमामुळे सांगली झाली होती. जिल्ह्यास तेच नाव दिले गेले पुढे 1965 साली मिरज व खानापूर यांचे विभाजन करुन पलुस व खानापूर तालुक्यातील कांही गावांचा मिळून कडेगांव हा तालुका निर्माण केला तो 25 मार्च 2002 रोजी आज जिल्ह्यात एकूण दहा तालुके आहेत.

2.5 स्थान

सांगली जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ 8572 चौ.कि.मी. असन क्षेत्रफळाच्या दृष्टीने सांगली जिल्ह्याचा महाराष्ट्रात 21 वा क्रमांक आहे. जिल्ह्याची पूव पश्चिम लांबी अंदाजे 205 कि.मी. असून दक्षिण उत्तर रूंदी अंदाजे 96 कि.मी.आहे. या जिल्ह्याच्या उत्तरेस सातारा व सोलापूर जिल्हा, दक्षिणेस क कोल्हापूर जिल्हा व कर्नाटक राज्यातील बेळगांव व विजापूर जिल्हा पुर्वेस व पश्चिमेस रत्नागिरी जिल्हा आहे. जिल्ह्याचा रेखांश अक्षाश 16.45 अंश ते 17.42 अंश ते 75.40 अंश पुर्ण रेखांश असा आहे.

2.6 पर्जन्य

जिल्ह्याची पूर्व पश्चिम लांबी जास्त असून पश्चिमेकडील शिराळा तालुक्यात पर्जन्यमान सर्वात जास्त आहे.पश्चिमेकडून पुर्वेकडे पावसाचे प्रमाण कमी कमी होत जाते. सन 2011 मधील जिल्ह्याचे पर्जन्यमान 498.5 मी.मी. असून सर्वात जास्त पाऊस शिराळा तालुक्यात तर सर्वात कमी पाऊस आटपाडी,जत भागात होतो.

2.7 भौगोलिक व भूस्तरीय रचना

हवामान व पर्जन्याचा विचार करता जिल्ह्याचे तीन भाग होतात.

1) पश्चिमेकडील जास्त पावसाचा डोगरी भाग

2) मध्यम पावसाचा नदयांचा सुपीकव सपाट प्रदेश

3) तर पुर्वेकडील कमी पावसाचा दुष्काळी पठारांचा भरड मातीचा प्रदेश

पश्चिमेकडील सह्याद्री पर्वताच्या पुर्वेकडे पसरलेल्या रांगा कृष्णा, कोयना, वारणा व येरळा या नदयांच्या सानिध्यातील गाळाचा सपाट प्रदेश शिराळा व वाळवा तालुक्यांचा पश्चिम भाग डोंगराळ असन वाळवा, कडगांव, पलुस, मिरज, तासगांव सुजलम व सुफलाम तालुके म्हणून ओळखले जातात तर पुर्वेकडील कमी पावसाचे आटपाडी, जत, कवठेमहंकाळ, खानापूर, मिरज पुर्व भाग दुष्काळी भाग म्हणन समावेश होतो.

जिल्ह्यात विविध प्रकारची माती आढळते शिराळा तालुक्यात, तपकिरी कॅटराईट प्रकारची मुरुममिश्रीत करडया रंगाची माती आढळते. कृष्णा, वारणा, व येरळा या नदयांच्या खोऱ्यात काळी कसदार उच्च प्रतिची माती आढळते. तर अग्रणी व माण नदयांच्या परीसरातील मातो काळ्या प्रतोची माती आढळते भूजल पातळी सर्वसाधारण 6 मीटर खोलवर विशेषत: जिल्ह्याच्या पूर्व भागात पाण्याचे प्रमाण फारच कमी आढळते.

2.8 जमीन व धारण क्षेत्र

कृषी गणना 2000-01 नुसार सांगली जिल्ह्यात 8.6% लक्ष हेक्टर जमीन असन 5.56 लाख खातेदार आहेत. एकूण खातेदारापैको 58% खातेदार अल्पभूधारक असन त्यांच्याकडे 1 ते 2 हेक्टर जमीन आहे. तर 19% खातेदारांकडे 2 हेक्टरपेक्षा जास्त जमीन आहे.

2.9 जमीन वापर

सांगली जिल्ह्याची एकूण 8.61 लाख हेक्टर क्षेत्रापैकी जवळजवळ 19% हे जंगलव्याप्त, ओसाड, बिगरशेती, उपयोगाचे कायमपड क्षेत्र शिवाय कुरणे, झाडे व झुडपाखाली लागवडी योग्य नसलेले आहे. 8% क्षेत्र चालू व इतर पडीत आहे. उरलेले 73% क्षेत्र हे लागवडी योग्य आहे. मात्र त्यापैको 78% क्षेत्र या वर्षामध्ये निव्वळ पेरणी योग्य होते. जिल्ह्यात पिकाखालील एकूण क्षेत्र सुमारे 7.68 लाख हेक्टर असून त्यापैकी 21% क्षेत्र दुबार पिकाखाली येते.

2.10 मुख्य पिके व त्याखालील क्षेत्र

सांगली जिल्ह्यात रब्बी, ज्वारी, बाजरी, गहू, तांदूळ, ही अन्नधान्याची पीके घेतली जातात. रब्बी ज्वारीला येथे शाळू म्हणन ओळखले जाते. मालदांडी ही शाळुची जात येथे विशेष प्रचलित आहे. जत, आटपाडी व क्वठेमहकांळ हे तालुके रब्बी ज्वारीसाठी प्रसिध्द आहेत. कृष्णा काठाच्या सखल व सुपीक प्रदेशात गहू पिकवला जातो. तांदळाचे सर्वाधिक उत्पादन शिराळा तालुक्यात घेतले जाते. हळद, ऊस, द्राक्षे ही जिल्ह्यातील प्रमुख नगदी पिके आहेत. हळदीच्या उत्पादनात हा जिल्हा पूर्वीपासून प्रसिध्द आहे. सांगलीचा हळद व हळद वायदे बाजार हा संपुर्ण देशात प्रसिध्द आहे. ऊसाच्या उत्पादनात वाळवा, तासगांव, कडेगांव, मिरज हे तालुके अग्रेसर आहेत. ऊसावर प्रक्रिया करणारे साखर कारखाने ही जिल्ह्यात भरपूर आहेत.

अलिकडच्या काळात हा जिल्हा द्राक्षेच्या उत्पादनात अग्रेसर असून वाळवा व तासगांव तालुके प्रसिध्द झाले आहेत. कृष्णा काठाच्या काही प्रदेशात तंबाखुचे उत्पादन घेतले जाते. काही पाणस्थळ प्रदेशात पानमळेही प्रसिध्द आहेत. याशिवाय भुईमुग, हरभरा, सोयाबीन, डाळी व वेगवेगळी कडधान्ये यांचे उत्पादनही जिल्ह्यात घेतले जाते.

जिल्ह्यात एकूण पिकाखालील क्षेत्र 712 हजार हेक्टर पैकी 68% क्षेत्र, अन्नधान्याखाली 16% क्षेत्र, गळीताच्या पिकाखाली 8% क्षेत्र, ऊसाखाली व 5% क्षेत्र, चाऱ्याच्या पिकाखाली होते. उर्वरित 8% क्षेत्र हे प्रामुख्याने फळे, भाजीपाला, कापूस, तंबाखू पिकाखाली होते. एकूण अन्नधान्य पिकाखालील क्षेत्रापैकी 54 तृणधान्याखाली व उर्वरीत 19% कडधान्याखाली होते.

तक्ता क्र. 2.1

तृणधान्य व निरनिराळ्या पीकाखालील क्षेत्र (हेक्टरमध्ये)

अ.न	तालुके	तांदुळ	गहू	ज्वारी	बाजरी	मका	वरी	नाचणी	राळा	एकूण तृणधान्ये
1)	शिराळा	11441	1730	4135	0	2638	135	980	430	21489
2)	वाळवा	4500	3818	14065	20	1175	0	0	0	23578
3)	पलुस	0	0	0	0	0	0	0	0	0
4)	कडेगांव	0	0	0	0	0	0	0	0	0
5)	खानापूर	5	4557	45247	7325	2240	0	0	0	59374
6)	आटपाडी	5	3021	28127	1624	824	0	0	0	33601
7)	तासगांव	1624	5347	40829	1412	2491	0	0	0	51703
8)	मिरज	96	3810	29878	8260	1668	0	0	0	43712
9)	क.महांकाळ	0	2673	22760	9100	402	0	0	0	34935
10)	जत	15	2927	86808	14805	5616	0	0	0	110171
	एकूण जिल्हा	17686	27883	271849	42546	17054	135	980	430	378563

एकूण तणधान्याचे लागवडी खालील क्षेत्र सांगली जिल्ह्यातील पाहिले आसता पलुस व कडगांव तालुक्यात अजिबात नाही

तक्ता क्र2.2

कडधान्य पीका खालील क्षेत्र (हेक्टरमध्ये)

अ.न	तालुके	तुर	मुग	उडीद	कुळीथ	मटकी	चवळी	वाटाणा	एकूण कडधान्ये	एकूण तृणधान्ये
1)	शिराळा	120	730	37	1020	2511	350	30	7019	28815
2)	वाळवा	191	170	439	1180	2413	410	20	116.6	35938
3)	पलुस	0	0	0	0	0	0	0	0	0
4)	कडेगांव	0	0	0	0	0	0	0	0	0
5)	खानापूर	3624	1502	2784	1910	2965	911	30	19490	87438
6)	आटपाडी	1086	122	320	730	2720	55	0	6824	40592
7)	तासगांव	1636	405	1383	1210	2880	165	15	15184	67188
8)	मिरज	1192	1408	390	1020	2432	256	10	12385	56295
9)	क.महांकाळ	1000	100	400	320	2726	140	0	7007	42005
10)	जत	847	1432	490	2802	2821	630	40	12392	124373
	एकूण जिल्हा	9696	5869	6321	10192	21468	2897	145	91907	475644

सांगली जिल्ह्यातील कडधान्यांच्या पिकांचे दर हेक्टरी व एकूण उत्पन्न संदर्भ वर्ष 2010–11

तक्ता क्र2.3

नगदी पीका खालील क्षेत्र (हेक्टरमध्ये)

अ.न.	तालुके	ऊस	मिरची	एकूण मसाले पदार्थ	एकूण फळे व भाजीपाला	कापुस	भुईमुग	सुर्यफुल	करडई	सोयाबीन	एकूण तृणधान्ये
1)	शिराळा	6510	191	259	1333	0	3780	172	3	1352	5509
2)	वाळवा	24400	600	794	1843	0	10243	175	125	13358	26160
3)	पलुस	0	0	0	0	0	0	0	0		0
4)	कडेगांव	0	0	0	0	0	0	0	0		0
5)	खानापूर	4900	492	735	6138	230	10529	711	153	6390	18248
6)	आटपाडी	840	135	169	1387	360	445	16	43	10	518
7)	तासगांव	2250	432	559	5077	49	1610	380	72	13093	15362
8)	मिरज	13800	576	702	3537	231	4422	572	61	23235	28426
9)	क.महांकाळ	1010	163	170	1655	259	840	164	540	593	2083
10)	जत	1560	181	556	5352	1929	3390	6612	5213	77	15409
	एकूण जिल्हा	55270	2770	3944	25752	3055	35259	3745	6210	60108	111718

सांगली जिल्ह्यातील पिकांचे दर हेक्टरी व एकूण उत्पन्न संदर्भ वर्ष 2010–11

तक्ता क्र. 2.4

विविध पीकाखालील क्षेत्र व उत्पादन (हेक्टरमध्ये)

अ.न	पिकांचे नाव	प्रति हे.उत्पादन कि	एकूण उत्पादन मे.टनामध्ये
1)	तांदुळ	1737	304
2)	गहू	1516	286
3)	ज्वारी	524	1237
4)	बाजरी	248	60
5)	बार्ली	00	00
6)	मका	2338	1118
7)	नाचणी	1000	3
8)	इतर तृणधान्य	273	6
9)	एकूण तृणधान्य	7636	3014
10)	हरभरा	665	127
11)	तुर	208	11
12)	उडीद	300	21
13)	मूग	405	23
14)	मसुर	उ.ना	उ.ना
15)	इतर कडधान्ये	348	32
16)	एकूण कडधान्ये	1926	214
17)	जवस	उ.ना	उ.ना
18)	भुईमुग	786	176
19)	सोयाबीन	1425	869

20)	तीळ	उ.ना	उ.ना
21)	सूर्यफल	540	20
22)	एकूण तेलबिया	2751	1065
23)	एरंडी	0	0
24)	ऊ स	84 ट.न	59400
25)	नारळ	00	00
26)	कापुस	210	32
27)	ताग	उ.ना	उ.ना
28)	अंबाली	उ.ना	उ.ना
29)	तंबाखू	उ.ना	उ.ना
30)	औषध पदार्थ	उ.ना	उ.ना
31)	आले	उ.ना	उ.ना
32)	मिरची	उ.ना	उ.ना

आधार- कृषी विकास अधिकारी जि.प.सांगली

2.11 लोकसंख्या

ज्या प्रमाणे देशातील लोकसंख्या ही त्या देशातील साधन संपत्तीचा भाग असते त्या प्रमाणे जिल्ह्यातील लोक संख्या महत्त्वाची असत जिल्ह्याचा विकास साधतानाही इतर साधना बरोबरच मानवी साधनांचा ही विकास करावा लागतो सन 2011 च्या जनगनेनुसार सांगली जिल्ह्याची लोक संख्या 28,20,575 इतकी असून त्यापैकी 14,35,972 पुरुष व 13,84,603 इतक्या स्त्रिया आहेत. लोकसंख्येच्या बाबतीत सांगली जिल्हा महाराष्ट राज्यात 15 वा आहे गेल्या दशकातील लोकसख्या वाढीचा विचार केला तर 9.18% इतकी वाढ झाली आहे हा लोकसंख्या वाढीचा दर ग्रामीण भागात

8% व शहरी भागात 14% इतका आहे. उपलब्ध आकडेवारी नुसार सांगली जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता 88 चौ.कि.मी.मागे 329 इतको असून एकूण लोकसंख्येच्या 73.44% लोकसंख्या ग्रामीण तर 26.56% लोकसंख्या शहरी आहे. सन2011 च्या जनगणनेनुसार 88 हजार पुरुष मागे 964 स्त्रिया असे प्रमाण आहे तर स्त्री-पुरुष प्रमाण सर्वात जास्त शिराळा तालुक्यात 1017 इतके तर सर्वात कमी वाळवा तालुक्यात 937 इतके आहे.

२.१२ साक्षरता

साक्षरतेच्या बाबतीत हा जिल्हा आघाडीवर आहे 82.62% इतके प्रमाण असून 2011च्या जनगणनेनुसार पुरुष साक्षरता 90.40% तर स्त्री साक्षरता 74.66% आहे. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येत 12% लोक अनुसुचित जातीचे तर 0.69%लोक अनु.जमातीचे आहे. सोबतच्या तक्त्यात लोकसंख्येची 1971 ते 2011 पर्यंतची आकडेवारी दिली

तक्ता क्र2.5

लोकसंख्या, साक्षरता व स्त्री–पुरुष प्रमाण

1	वर्ष	1971	1981	1991	2001	2012
2	एकूण लोकसंख्या (हजारात)	1540	1834	2209	2583	2820
3	ग्रामीण लोकसंख्या प्रमाण	81.36%	78.52%	77.27%	75.49%	74.49%
4	नागरी लोकसंख्या प्रमाण	18.64%	21.48%	22.73%	24.51%	25.51%
5	साक्षरता	37.48%	46.86%	62.61%	76.62%	82.62%
6	दरहजारी पुरुषा मध्ये स्त्रियांचे प्रमाण	949	967	958	957	964

स्त्रात –सांगली जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2012

2.13 पायाभूत साई सुविधा

1) वहातुक व दळण वळण-

सन 2011-12 अखेर जिल्ह्यातील एकूण रस्त्यांची लांबी 9969 कि.मी.होती त्यापैको 6436 कि.मी.डांबरी रस्ता तर 1410 कि .मी.खडीचा रस्ता व 2122 कि.मी.इतर माल वापरुन केलेला रस्ता आहे. यामध्ये राष्ट्रीय महामार्ग 30 कि.मी., राज्यमार्ग 931 कि.मी. प्रमुख जिल्हामार्ग 2199 कि.मी. व इतर जिल्हामार्ग 3484 कि.मी. आणि ग्रामीण रस्ते 3326 कि.मी.असा रस्त्याचा समावेश आहे.

आज अखेर सांगली जिल्ह्यात 5.20 लाख वाहने असून त्यापैको 77% वाहने दुचाको आहेत महाराष्टराज्य परिवहन महामंडळाच्या 864 बस गाड्या प्रवासी वाहतूक सोय देतात. सांगली जिल्ह्यातील रेल्वे मार्गाची लांबी 173.96 कि.मी. असून त्यापैको सर्व लाईन ब्रॉडगेज कले आहे. त्यामध्य मिरज हे रेल्वेचे मोठे जंक्शन असून सांगली किर्लास्करवाडी, ताकारी, सांगली, भिलवडी ही स्थानिक आहेत. दळणवळणा मध्ये सांगली जिल्ह्यात एकूण 419 पोस्ट कार्यालये आहेत. तर पत्रे जमा करण्याच्या पत्र पेट्या 1303 आहेत जिल्ह्यातील 391 गावामध्ये पोस्ट ऑफिस आहेत. ग्रामीण व शहरी दूरध्वनी धारकांची संख्या 88589 असून सार्वजनिक दूरध्वनी केंद्राची संख्या 7335 इतको आहे.

2) वीज वापर

सन 2011-12 मध्ये विजेचा वापर 1257 द.ल.कि.वॅट तास इतका असून जिल्ह्यात 7.22 लाख वीज कनेक्शन आहेत. सरासरी विजेचा दरडोई वापर 380 कि.वॅट तास इतका आहे. जिल्ह्यातील 728 गावे विद्यतीकरण पूर्ण झालेली आहेत. तर 171 हजार कृषी पंपांना विजेचा पुरवठा कला जातो एकूण वीज वापरात घरगुती 210224 हजार कि.वॅट. तास, व्यापारासाठी 55339 कि वॅट.तास, औद्योगीक वापरामध्ये 319525 हजार कि.वॅट.तास, व शेतीसाठी 638702 हजार कि.वॅट.तास, इतका विजेचा वापर होत आहे.

3) सार्वजनिक आरोग्य

सन 2011-12 अखेर जिल्ह्यात 20 रुग्णालये, 27 दवाखाने, 5 प्रसुतीगृहे 59 प्राथमिकआरोग्य केंद्रे व 320 प्राथमिकआरोग्य उपकेंद्रे कार्यरत आहेत. या संस्था मधील खाटांची संख्या 1454 इतकी असून जिल्ह्यातील उपलब्ध माहिती नुसार संदर्भ वर्षात 52971 जन्म व 20632 मृत्यू नोंदले गेले आहेत.

सांगली जिल्ह्यात 73 कुटुंब कल्याण केंद्रे कार्यरत असून त्यापैकी 59 केंद्रे ग्रामीण भागात कार्यरत आहेत. उर्वरित 14 केंद्रे नागरी भागात कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे माता व बाल संगोपन कार्यक्रमांतर्गत संदर्भ वर्षात त्रिगुणी लस, पोलिओ, बी.सी.जी तसेच धुनूर्वात इ.लसी टोचल्या जातात.

4) पाणी पुरवठा

सांगली जिल्ह्यात 724 गावे आसून वाड्या वस्त्यांची संख्या 4603 इतकी आहे तर बारा महीने पिण्याचे पाणी उपलब्ध असलेल्या गावांची संख्या 612 इतकी आहे व एकूण वाड्या वस्त्या पैकी 3612 ठिकाणी बारमाही पाणी उपलब्ध आहे तर पिण्याच्या पाण्याची टंचाई असणारी एकूण गावे 112 व त्याखालील वाड्या वस्त्यांची संख्या 991 इतकी असून सरासरी 180 टंकरने या गावांना, वाड्या वस्त्यांना पाणी पुरवठा प्रतिवर्षी केला जातो.

5) उद्योग व रोजगार

सांगली जिल्ह्यात 9 औद्योगिक वसाहती असून त्यामध्ये छोटे मोठे उद्योग कायरत आहेत. सन 2011-12 अखेर 80.56 कोटीचे 1992 प्रकल्प कार्यरत आहेत. सांगली जिल्ह्यात सन 2011-12 अखेर एकूण 5921 सहकारी संस्था असून त्यापैकी 759 कृषी पतसंस्था 1255 बिगर कृषी पतसंस्था, 56 पणनसंस्था 2360 उत्पादकसंस्था व 1491 सामाजिक सेवा संस्था कार्यरत होत्या, सांगली जिल्हा हा साखर कारखानदारी साठी प्रसिध्द आहे. जिल्ह्यातील सहकारी तत्त्वावरील 15 साखर कारखाने कार्यरत असून 2011-12 मध्ये 62.21 लाख टन ऊसाचे गाळप करुन 76.55 लाख क्विंटल साखर उत्पादन झाले आहे.

सांगली जिल्ह्यात एकूण नोदणींकृत कारखाने 890 असून त्यापैकी 810 चालू आहेत व त्यामध्ये 20523 इतके कर्मचारी 11,000 असून, जिल्हा परिषदेमध्ये 15000 कर्मचारी, नगर परिषद व महानगर पालिकेमध्ये 3400 कर्मचारी काम करत आहेत.

6) शिक्षण :–

सांगली जिल्हा हा पश्चिम महाराष्ट्रातील एक सधन जिल्हा म्हणून ओळखला जातो. सन 2011 मध्ये जिल्ह्यात प्राथमिक शाळांची संख्या 2097, असून 445 माध्यमिक शाळा, 151 उच्च माध्यमिक शाळा होत्या. प्राथमिक शाळेतील एकूण विद्यार्थ्यांपैको 67% विद्यार्थी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शिक्षण घेत होते तर माध्यमिक शाळेतील 90% विद्यार्थी खाजगी अनुदानित संस्थांमध्ये शिक्षण घेत होते. प्राथमिक शाळेत प्रति शिक्षक विद्यार्थी संख्या 27 होती तर माध्यमिक व उच्च माध्यमिक संस्थांमध्ये हीच संख्या 32 एवढी होती.

पुढील तक्त्यात प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षणातील शाळा, विद्यार्थी संख्या दर्शवली आहे.

तक्ता. क्र 2.6

प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षणातील शाळा, विद्यार्थी संख्या

अ.न	शाळा	संख्या	मुले	मुली	एकूण
1)	स्थानिक स्वराज्य संख्या प्राथमिक शाळा	1753	86310	81318	167628
2)	खाजगी अनुदानित प्राथमिक शाळा	171	31824	23331	55155
3)	स्थानिक स्वराज्य संख्या माध्यमिक शाळा	1	1105	11537	28430
4)	खाजगी अनुदानित माध्यमिक शाळा	352	3804	58233	62037
5)	खाजगी विना अनुदानित माध्यमिक शाळा	92	6443	4375	10818
6)	उच्च माध्यमिक शासकिय शाळा	1	264	156	420
7)	खाजगी उच्च माध्यमिक अनुदानित शाळा	144	75027	62676	137703
8)	खाजगी विना अनुदानित उच्च माध्यमिक शाळा	6	1323	604	1927
9)	एकूण महाविद्यालये	41	23992	16250	39242

आधार– शिक्षणधिकारी, प्राथमिक, माध्यमिक, शिक्षण विभाग जिल्हा परिषद सांगली

वरीलप्रमाणे सांगली जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक , उच्च माध्यमिक व उच्च शिक्षणातील संस्था व त्यामधील मुले-मुली आहेत.

7) बँका, विमा व बचतगट

सांगली जिल्ह्यात वर्गीकृत बँकाची संख्या 86 असून या बँकाच्या शाखा 209 आहेत. तर आयुर्विमा महामंडळाच्या भारतीय जीवन विमा निगमच्या 8 शाखा व खाजगी आयुर्विमा कंपन्या 6 आहेत. जिल्ह्यात एकूण 5120 विमा प्रतिनिधी असून, बचत गटाच्या बाबतीत महत्त्व पुर्ण कामगिरी बजावली आहे. 36574 बचत गट असून दारिद्र्य रेषेखालील 6648 व दारिद्र्यरेषेवरील 39926 बचत गट आहेत. त्यांनी या आर्थिक वर्षात 872.19 लाख रुपयांची उलाढाल केली आहे

2.14 सातारा जिल्ह्याची भौगोलिक वैशिष्ट्ये:-

नकाशा



2.15 सातारा जिल्हा सांख्यिकोय माहिती

अ.क्र	बाब	परिमाण	जिल्हा
-1-	-2-	-3-	-4-
एक	**पाकृतिक रचना**		
1	**भौगोलिक स्थान**		
	उत्तर अक्षांश	अंश	17.5-18.11
	पूर्व रेखांश	अंश	73.33-74.54
	क्षेत्रफळ	000 चौ.कि.मी.	10.48
2	**प्रशासकीय रचना**		
	तालुके	संख्या	11
	शहरे	संख्या	22
	एकूण गांवे	संख्या	1,739
दोन	**स्थानिक स्वराज्य संस्था**		
	महानगरपालिका	संख्या	0
	नगरपरिषद	संख्या	8
	पंचायत समित्या	संख्या	11
	ग्रामपंचायती	संख्या	1509
	नगरपंचायत	संख्या	1
तीन	**लोकसंख्या (2011)**		
	ग्रामीण	हजार	2434
	नागरी	हजार	570
	एकूण	हजार	3004
	पुरुष	हजार	1513
	स्त्रिया	हजार	1491

	स्त्रिया प्रती हजार पुरुष	संख्या	986
	अनुसुचित जातींची लोकसंख्या (2001)	हजार	246
	घनता (लोकसंख्या प्रती चौ.किमी)	संख्या	247
	साक्षरतेचे प्रमाण		
	ग्रामीण	टक्के	80.73
	नागरी	टक्के	90.43
	एकूण	टक्के	84.2
	पुरुष	टक्के	92.09
	स्त्रिया	टक्के	76.29
	साक्षरतेमध्ये जिल्ह्याचा राज्यात क्रमांक	क्रम संख्या	12
	दारिद्र्य रेषेखालील ग्रामीण कुंटुंबे (2002)	लाख	0.83
चार	**जिल्हा उत्पन्न अंदाज**		
	एकूण उत्पन्न (स्थूल)	कोटी रु.	22414
	एकूण उत्पन्न (निव्वळ)	कोटी रु.	20886
	दरडोई उत्पन्न (निव्वळ)	रुपये	67134
पाच	**कृषी**		
	भौगोलिक क्षेत्र	हजार हेक्टर	1058
	जंगलव्याप्त क्षेत्र	हजार हेक्टर	138
सहा	**पिकाखालील क्षेत्र (2001-02)**		
	एकूण क्षेत्र	हजार हेक्टर	534
	एकूण ओलिताखालील क्षेत्र	हजार हेक्टर	152
सात	**जमिन वहिती धारण संख्या 2000-01**		
	दोन हेक्टर पेक्षा कमी	000 हेक्टर	430
	2 ते 10 हेक्टर	000 हेक्टर	307
	10 हेक्टर पेक्षा जास्त	000 हेक्टर	37

आठ	**जलसिंचन पूर्ण झालेले पाटबंधारे प्रकल्प त्याखालील लाभक्षेत्र**		
	मोठे पाटबंधारे प्रकल्प	संख्या	7
	मध्यम पाटबंधारे प्रकल्प	संख्या	10
	लघु पाटबंधारे प्रकल्प (राज्यक्षेत्र)	संख्या	36
	सिंचन विहीरीखाली भिजणारे क्षेत्र (2010-11)	हजार हेक्टर	113
नऊ	**पशुसंर्वधन पशुगणना - (2007)**		
	एकूण पशुधन	हजार	1515
	गो जातीय	हजार	359
	म्हैस वर्गीय	हजार	347
	मेंढ्या व शेळ्या	हजार	703
	कोंबड्या व बदके	हजार	1652
दहा	**सहकार क्षेत्र**		
	सहकारी संस्था	संख्या	6406
	प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था	संख्या	948
	सहकारी दुग्धसंस्था	संख्या	1165
अकारा	वीज (31/03/2012)		
	विद्यतीकरण झालेली गांवे	संख्या	1716
	वीज पुरवठा केलेले कृषी पंप संच	हजार	128
	विजेचा वापर		
	घरगुती	हजार कि.वॅट. तास	284
	व्यापारी	हजार कि.वॅट. तास	84
	औद्योगिक	हजार कि.वॅट. तास	478
	कृषी	हजार कि.वॅट. तास	445
	इतर	हजार कि.वॅट. तास	69
	एकूण	हजार कि.वॅट. तास	1360

बारा	**परिवहन व दळणवळण**		
	रेल्वे मार्गाची एकूण लांबी	कि.मी	124.84
	रस्त्यांची लांबी (पृष्ठांकित)		
	राष्ट्रीय महामार्ग	कि.मी	130
	राज्य महामार्ग	कि.मी	966
	प्रमुख जिल्हामार्ग	कि.मी	2215
	इतर जिल्हामार्ग	कि.मी	1730
	ग्रामीण रस्ते	कि.मी	4670
	एकूण	कि.मी	9711
तेरा	**नोंदणीकृत कारखाने व रोजगार**		
	नोंदणीकृत कारखाने 2010	संख्या	528
	नोंदणीकृत चालू कारखाने 2010	संख्या	456
	साखर कारखाने 31 मार्च 2011*	संख्या	11
	साखरेचे उत्पादन राज्य -2011*	हजार मे.टन	687
	सहकारी सूत गिरण्या 2012	संख्या	7
चौदा	**शिक्षण क्षेत्र**		
	एकूण शाळा	संख्या	3148
	विद्यार्थी	हजार	277
	शिक्षक	हजार	12
	प्रती शिक्षक विद्यार्थी	संख्या	23
	माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण		
	एकूण शाळा	संख्या	820
	विद्यार्थी	हजार	354
	शिक्षक	हजार	11
	प्रती शिक्षक विद्यार्थी	संख्या	32

	उच्च शिक्षण		
	एकूण शाळा	संख्या	38
	एकूण विद्यार्थी	हजार	39
	तांत्रिक व व्यवसाय शिक्षण		
	शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था	संख्या	11
	अशासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था	संख्या	6
पंधरा	**सार्वजनिक आरोग्य**		
	रुग्णालये	संख्या	18
	दवाखाने	संख्या	19
	प्राथमिक आरोग्य केंद्रे	संख्या	71
	प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे	संख्या	400
सोळा	**आदिवासी कल्याणकारी योजना 2012-13**		
	मागासवर्गीयांसाठी वसतिगृहे	संख्या	58
सतरा	**सार्वजनिकवितरण व्यवस्था**		
	रास्त भावाची दुकाने	संख्या	1602

स्त्रोत– सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2011–12 2) सातारा जिल्हा गॅजेट 3) महाराष्ट्रातील जिल्हे के सागर 2008

2.16 ब) सातारा जिल्हा

सातारा जिल्हा एक ऐतिहासिक महत्त्व असणारा जिल्हा असन महाराष्ट्रातील पश्चिम महाराष्ट्रातील एक जिल्हा भिमा आणि कृष्णा नदोच्या खोऱ्यात वसलेला आहे. हा जिल्हा विविध भूभागांनी बनलेला आहे या जिल्हयाच्या उत्तरेला पुणे पूर्वेस, सोलापूर, दक्षिणेस सांगली आणि पश्चिमेस रत्नागिरी जिल्हा उत्तर-पश्चिमेस रायगड जिल्हा आहे.

इतिहास काळात सातारा प्रांत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या जिल्हाचे सन 1948 मध्ये 11 शासकिय विभाग होते त्यामध्ये आवश्यकतेनुसार बदल करुन त्या वेळच्या ब्रिटीश सरकारने 1856 मध्ये 12 प्रांत केले 1862 मध्ये जिल्ह्याच्या सिमा मध्ये बदल केला गेला.1949 मध्ये हा जिल्हा मोठा

असल्याने उत्तर सातारा व दक्षिण सातारा असे या जिल्हाचे स्पष्टपणे दोन विभाग केले.असे पाहिले तर 1863,1464,1867,1875,1884,1927 व 1947 अशा सात वेळा या जिल्ह्याच्या सिमारेषांची पुनरचना करण्यात आली पुढे 1956 मध्ये राज्यावर पुनरचना करण्यात झाल्या नंतर त्यांचा समावेश मुंबई प्रांतात केला व पुढे 1 मे 1960 रोजी महाराष्ट् राज्याची स्थापना झाल्यानंतर उत्तर सातारा विभाग हा सातारा जिल्हा म्हणन तर दक्षिण सातारा हा नवनिर्वाचीत सांगली जिल्हा म्हणून समाविष्ट झाला.

सन 2011च्या जनगणनेनुसार सातारा जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र 10480 चौ.को.असन महाराष्ट् राज्याचा 3.40% इतके आहे. जिल्ह्यात एकूण 11 तहसिल कार्यालये व पंचायत समित्याही तेवढ्याच आहेत. प्रशासनाच्या सोई साठी सातारा, वाई, कराड व फलटण असे 4 महसुल विभाग असून सातारा जिल्ह्याचे ठिकाण पुणे -बगलोर राष्ट्रोय महामार्गावर आहे.

जमीनीचा उंच सखलपणा लक्षात घेता पश्चिमेकडील प्रदेश डोंगराळ असन यामध्ये महाबळेश्वर, जावली, पाटण व सातारा भाग व मधला भाग कृष्णा काठचा प्रदेश खोलगट असून त्यामध्ये वाई, सातारा, तालुक्यातील उर्वरित भाग कोरेगाव,व कराड हे तालुके येतात. पूर्वेकडील प्रदेश माळरानाचा असून त्यामध्ये खटाव व फलटण तालुक्याचा भाग व खंडाळा तालुका येता त्यामुळे जिल्हा तीन स्वाभावीक विभागात विभागला आहे.

सातारा जिल्ह्यातील कृष्णा ही मुख्य नदी असन महाबळेश्वरच्या पठारावर समुद्रसपाटीपासुन सुमारे 1371 मीटर उंचावर कृष्णा नदी उगम पावते. कोयना, वेण्णा, कुडाळी, उरमोडी, वसना, येरळा आणि तारळी या तिच्या उपनद्या आहेत. या सात नदयांचे मिळून कृष्णा नदीचे लाभक्षेत्र तयार झाले आहे. सातारा जिल्ह्यात 160 कि.मी प्रवास करुन ही नदी सांगलो जिल्ह्यात प्रवेश करते.

भौगोलिक परिस्थितीनुसार जिल्ह्यातील हवामानात बदल आढळुन येतात उन्हाळ्यामध्ये पश्चिम विभागातील हवामान थंड व अल्हाददायक असते परंतु पावसाळ्यात थंडी असते जिल्ह्याच्या पश्चिम व मध्य भागापेक्षा जिल्ह्याच्या पूर्व भागातील हवामान अधिक उष्ण आहे. ऋतुमनाप्रमाणे तेथील हवामानात तफावत फार मोठ्या प्रमाणात आहे.

पर्जन्यमानाच्या बाबतीतही ह्या जिल्ह्यात पश्चिम भाग व पूर्व भाग यांच्यात फार तफावत आहे पूर्व भागातील दुष्काळी भागात सरासरी वार्षिक पर्जन्यमान 400 मी.मी. तर पश्चिम भागतील उंचीवरील ठिकाणी 2344 मी.मी. इतके जास्त आहे, तर जिल्ह्याच्या मध्यभागात 800 ते 1000 मी.मी .इतक पावसाचे प्रमाण आहे संपूर्ण जिल्ह्याचे वाषिक सरासरी पर्जन्यमान 1019.7 मी.मी .इतके असते तरी पर्जन्यात तफावत मोठी असल्याने दुष्काळी पट्टा मोठा आहे.

सातारा जिल्ह्यात जमिनीची प्रतवारी भिन्न स्वरुपाची आहे .जमिनीचा पोत विविध प्रकारचा आहे अत्यंत नापीक पासुन ते गाळाच्या थरांची जाडी कमी जास्त असल्यामुळे अत्यंत सुपिक असे जमीनीचे प्रकार आढळतात कृष्णा, वेण्णा, कुडळी व कोयना आणि केरा. या नदीच्या खोऱ्यातील वाइ, जावली व पाटण तहसिल मध्ये अत्यंत सुपिक व गाळाचा जाड थर असणारी जमीन बनली आहे. कृष्णा खोऱ्यातील जमीन अत्यंत सुपिक आहे. पश्चिमी डोगंराळ भागात व पूर्व दुष्काळी भागात खडकाळ जमीन आहेत .

2.17 कृषी गणना 2000–01

प्रमाणे जिल्ह्यात 7.80 लाख वहित खातेदार अस्न त्याचे एकूण क्षेत्र 7.75 लाख हेक्टर इतके होते. मागील कृषी गणनेच्या तुलनेत खातेदाराची संख्या 32 % ने वाढली आहे. सातारा जिल्ह्यातील शेतीचे खातेदार एकूण जेवढे आहेत त्यापैकी 21% खातेदाराची जमीन पूर्ण ओलीताखाली अस्न 69% पर्ण जिरायत तर 10% खातेदार अशंत:ओलिता खालील जमीन धारण करीत होते.

सन 2002-03 च्या आकडेवारी नुसार जिल्ह्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापको 13% जंगल व्याप्त 11% क्षेत्र शेतीला उपयुक्त नसलेले 25% क्षेत्र लागवड न केलेले व पडोक तर निव्वळ कसलेले क्षेत्र 51% इतके होते बाजरी,ज्वारो व भूईमूग ही खरोप हंगामातील महत्त्वाचो पिके अस्न गहू आणि हरभरा हो रब्बोतोल महत्त्वाचो पिके आहेत आणि ऊस हे जिल्ह्यातील नगदो पिक आहे.

पिकाखालोल क्षेत्राचा विचार केलातर एकूण लागवडी योग्य क्षेत्रापैको तृणधान्या खालिल 57% क्षेत्र होते. त्यामध्ये ज्वारो पिकाखाली 29% बाजरी पिकाखालोल 13% भाग पिकाखालोल 5% क्षेत्र होते. ऊसाखालोल 6% क्षेत्र गळोताच्या पिकाखाली 13% क्षेत्र व 9% क्षेत्र भुईमूग व 2% क्षेत्र सोयाबीन पिकाखालोल होते. कडधान्याच्या पिकाखालो 10% क्षेत्र त्यापैको 3% हरभरा पिकाखाली आहे. खालील तक्त्यात लागवडी खालील क्षेत्र व सिंचन बाबतचो माहितो दर्शवितो.

तक्ता क्र 2.7

सातारा जिल्ह्यातील लागवडो खालील क्षेत्र व सिंचन बाबत माहिती

बाब प्रभाग	टक्केवारी	1960/61	1990/91	2000/01	2002/03
1) ओलिता खालील क्षेत्र हेक्टर	9.68	1010	1710	2318	**2168**
2) लागवडी खालील क्षेत्र	83.53	7860	7760	7991	**7991**
3) ओलिताखालील क्षेत्राशी लागवडो खालील क्षेत्राची टक्केवारी		11.58%	22.04%	29.01%	**27.13%**

स्त्रोत– सातारा जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन 2001/02,2006/07,2011/12

खालील तक्ता –सातारा जिल्हयातील पिकाखालिल एकूण क्षेत्र दर्शवितो.

तक्ता क्र 2.8

जिल्ह्यातील पिकाखालील क्षेत्र व टक्केवारी

अ.नं	बाब	परिणाम	टक्केवारी	1960/61	2000/01	2002/03
1)	तृणधान्ये	शंभर हेक्टर		1470	4048	3982
2)	कडधान्ये	–,,-		190	942	695
3)	तेलबिया	–,,-		3.71	886	870
4)	ऊस	–,,-		100	470	437
5)	कापुस	–,,-		30	57	36
6)	पिकाखालील निव्वळ क्षेत्र	–,,-		6800	5576	5343
7)	निव्वळ पेरलेल्या क्षेत्रापैकी दुबार पेरणी क्षेत्र % वारी	–,,-		7.96	29.21	30.23
8)	सिंचना खालील स्थूल क्षेत्र	100 हेक्टर		1010	23.18	2168
9)	निव्वळ सिंचन क्षेत्र	–,,-		800	1786	1786
10)	कालव्या द्वारे सिंचन क्षेत्र	–,,-		450	652	652
11)	विहीरी द्वारे सिंचन क्षेत्र	–,,-		350	1134	1134

स्त्रोत– सातारा जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन 2001/02,2006/07,2011/12

विविध पिकाखालील सातारा जिल्ह्यातील उपलब्ध जमिनी पैको जे क्षेत्र प्रत्यक्ष दाखवले आहे त्यामध्ये तृणधान्याच्या क्षेत्रात वाढ, कडधान्ये उत्पादनात घट, ऊसाच्या क्षेत्रात घट तर कापस क्षेत्रात घट झालो आहे.

खालोल तक्ता सातारा जिल्ह्यातील तालुकावार निरनिराळ्या पिकाखालोल प्रत्यक्ष क्षेत्र व ओलिता खालोल क्षेत्र दर्शवितो.

तक्ता क्र 2.9

तालुकावार पिकाखालोल प्रत्यक्ष क्षेत्र व ओलिता खालील क्षेत्र(हेक्टरमध्ये)

अ.नं	पिक	पिकाखालील क्षेत्र	ओलिताखालील क्षेत्र
1)	तांदुळ	45417	11320
2)	गहू	35304	30188
3)	खरीप,रब्बी,ज्वारी एकूण	20010	30920
4)	बाजरी	89903	14920
5)	मका	13323	3482
6)	ऊरी	607	0
7)	नाचणी	8914	0
8)	राळा	310	0
9)	रवा	91	0
10)	इतर तृणधान्ये	3405	430
11)	एकूण तृणधान्ये	398202	111260
12)	हरभरा	22006	7920
13)	तुर	6675	1604
14)	मुग	5280	1306

15)	उडीद	5474	523
16)	कुळीत	1395	0
17)	मटकी	9529	0
18)	चवळी /वाटाणा	5453	210
19)	एकूण क्डधान्ये	69484	11943
20)	एकूण अन्नधान्ये	467686	123203
21)	ऊस	43694	43694
22)	मिरची	902	902
23)	लसुण	109	109
24)	इतर मसाले पदार्थ	2347	1584
25)	एकूण मसाले पदार्थ	3358	2595
26)	एकूण फळे व भाजीपाला	42280	28026
27)	एकूण तंतु पिके	3899	3614
28)	एकूण गळीत धान्ये	86993	5942
29)	एकूण औषधी व मादक पदार्थ	420	171

आधार – सातारा जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन – 2012

2.18 पायाभूत सोयीसुविधा –

1) दळणवळण

वाहतुकोच्या बाबतीत हा जिल्हाराष्ट्रोय महामार्ग पुणे बेगलोर वर येतो. सन 2011-12 पर्यंत जिल्ह्यातील एकूण लांबी 9711.47 कि .मी. इतकी होती त्यापैकी 5555.28 कि.मी.लांबीचे डांबरीरस्ते 2661.65 कि.मी खडीचे व 1494.54 कि.मी इतर मालाचा वापर करून तयार केलेले होते. त्यामध्ये जिल्हा मार्ग व तालुका मार्गाचा समावेश आहे.

कोल्हापूर मुंबई हा दक्षिण मध्य रेल्वेचा 124.84 कि.मी.लांबीचा ब्रांडगेज एकेरी रेल्वेमार्ग जिल्ह्यातून जातो त्या मार्गावर एकूण 14 रेल्वे स्थानके आहेत. त्या मध्ये सातारा व कराड ही दोन महत्त्वाची रेल्वे स्थानिक आहेत हा जिल्हा डोंगराळ असल्याने रेल्वे मार्ग जिल्ह्याच्या पुर्व व मध्य भागातुन जातात पश्चिमेकडील, पाटण, जावळी महाबळेश्वर व वाई या डोंगराळ भागात रस्ते विरळ आहेत घाटाचे आहेत. कोकण भागात जोडणारे घाट या जिल्ह्यात आहेत.

जिल्ह्यात 2012 अखेर 5.00 लाख वाहने वापरात होती या मध्ये सर्वात जास्त म्हणजे 74.32% वाहने दुचाकी आहेत.

खेड्यापाड्यात पोस्टाच्या सुविधा पोहचल्या असून 652 गावामध्ये 665 डाकघरे आहेत. अलिकडच्या काळात शासकिय दूरध्वनीची संख्या कमी होऊन मोबाइल धारकांची व इंटरनेटचा वापर करणाऱ्या लोकांची संख्या वाढत आहे.

2) वीज वापर–

सातारा जिल्ह्यात वीज कनेक्शनची संख्या 7.06 लाख इतकी आहे तर वार्षिक वीजेचा वापर सरासरी 1360 दशलक्ष किलो वॅट लाख इतका आहे सध्या कृषी, औद्योगीक व घरगती क्षेत्रात वीजेचा वापर वाढत आहे. प्रतिवर्षी 20% वीजेची मागणी वाढत असल्याचे दिसते सन 2011-12 मध्ये 453 कि.वॅ. लाख इतका वीजेचा दरडोई वापर झाल्याचे दिसून येते.

जिल्ह्यातील सर्व शहरे व 1716 गावाना वीजेचा लाभ मिळालेला आहे. तर जिल्ह्यातील 127939 कृषी पंपाना वीजेचा पुरवठा झाला आहे.

3) वैद्यकिय व सार्वजनिक आरोग्य

सन 2011-12 अखेर सातारा जिल्ह्यात 18 रुग्णालये 19 दवाखाने 71 प्राथमिक आरोग्य केंद्रे व 400 प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे व 6 प्राथमिक आरोग्य पथके कार्यरत होती. रुग्णालये व प्राथमिक आरेग्य केंद्रे या संस्थांतील खाटांची संख्या 1262 इतकी असून उपलब्ध माहीतीनुसार 2011 मध्ये 50053 जन्म व 18737 मृत्यूनोंदले गेले आहेत.

4) वित्तोय स्थिती

जिल्ह्यात प्राथमिक कृषी सहकारी संस्थांची संख्या 948 असून त्याची सभासद संख्या 550691 इतको असून त्यापैको तोट्यातील सहकारी संस्था 202 इतक्या आहेत. कर्जाच्या थकबाकोचे प्रमाण जास्त आहे.

5) उद्योग व उद्योगधंदे –

कराड, सातारा व वाई येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक वसाहती आहेत. शिरवळ तालुका खंडाळा येथिल शिर्के पेपर मिल, कराड येथिल किर्लोस्कर ब्रदर्सचा हेमेटिक सिल्ड कॉम्प्रेसर हैडोलिक प्रोडक्ट कारखाना, जरंडेश्वर येथिल भारत फोर्ज इत्यांदी मोठ व मध्यम स्वरुपाचे 37 कारखाने आहेत.

उद्योग क्षेत्रात जिल्ह्यात उपलब्ध असलेल्या पोषक वातावरणामुळे गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक गुंतवणूक होऊ लागली आहे. खंडाळा व फलटण तालुक्या मध्ये प्रत्येक एक या प्रमाणे दोन विशेष आर्थिक क्षेत्र (S E Z) स्थापन करण्यात आले असून फलटण तालुक्यामध्ये 101 हेक्टर तर खंडाळा तालुक्यामध्ये केसुर्डी टप्पा क्र 1 करिता 110.74 हेक्टर क्षेत्र आरक्षित करण्यात आले आहे. सन 2011-12अखेर 9336 एवढ्या थेट गुंतवणूकोचे 23 प्रकल्प मंजूर असून व्यतिरिक्त रु 180 कोटो गुंतवणूकोचे 169 एवढे उद्योग जिल्ह्यात कार्यरत आहेत.

सातारा जिल्ह्यात 6 सहकारी व 5 खाजगी साखर कारखाने असे एकूण 11 साखर कारखाने कार्यरत असून वार्षिक 56.65 लाख टन उसाचे गाळप व 6.87 मेटोक टन साखर उत्पादन होते आहे.सन 2010 अखेर फंक्टरी ॲक्टखाली नोंदवलेली एकूण 528 उद्योगांपैको 72 उद्योगधंदे बंद आहेत. चालू असलेल्या 456 कारखान्यामध्ये अंदाजे 31876 कामगार काम करत होते.

खालोल तक्त्यात सातारा जिल्ह्यातोल तालुका निहाय रेड, ऑरेंज व ग्रोन सर्वाजनिककारखाने

तक्ता क्र 2.10

सातारा जिल्हयातील तालुका निहाय रेड, ऑरेंज व ग्रीन सर्वाजनिक कारखाने

अ.नं	तालुका	एकूण
1)	महाबळेश्वर	232
2)	वाई	147
3)	खंडाळा	166
4)	फलटण	83
5)	माण	39
6)	खटाव	46
7)	कोरेगांव	48
8)	सातारा	578
9)	जावळी	27
10)	पाटण	29
11)	कराड	369
	एकूण जिल्हा :-	**1764**

आधार–उप प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ सातारा.

सातारा जिल्हयातोल खाजगी व शासकिय निमशासकिय उद्योगांची माहिती वरील तक्त्यात पाहिली खालोल तक्त्यात निरनिराळ्या उद्योगातील रोजगार बाबतची माहिती अभ्यासता येईल.

तक्ता क्र 2.11

निरनिराळ्या उद्योगातील रोजगार बाबतची माहीती

अ.नं	उद्योग गट	एकूण कामगार संख्या
1)	कृषी	1433
2)	वस्तू निर्माण	24913
3)	वीज निर्मिती,गॅस,पाणी व सांडपाणी सेवा	1386
4)	बांधकाम	4514
5)	घाऊक व किरकोळ व्यापार व हॉटेल व्यवसाय	2382
6)	परिवहन,गोदामे आणि दळणवळण	7419
7)	वित्त पुरवठा,विमा स्थावर मालमत्ता व व्यापार सेवा	10581
8)	सामुहिक,सामाजिक व व्यक्तीगत सेवा	40879
9)	दुकाने व्यापारी संस्था, हॉटेल चित्रपट गृहे	24754
एकूण जिल्हयातील सर्व प्रकारचे कामगार		118198

आधार :–सहायक,संचालक,जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कद्रे सातारा.

वरील तक्त्यात सातारा जिल्हातोल विविध प्रकारच्या उद्योगात रोजगार संधो मिळालेल्या लोकांची संख्या दर्शवलो आहे

6) शिक्षण :–

सन 2011-12 अखेर जिल्ह्यात 3148 प्राथमिक शाळा 653 माध्यमिक शाळा 167 उच्च माध्यमिक शाळा होत्या. प्राथमिक शाळेतिल एकूण विद्याथ्यापैको 66.50% विद्यार्थी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये शिक्षण घेत होते.तर माध्यमिक शाळेतील 91.61% विद्यार्थी खाजगी अनुदानित संस्थामध्ये शिक्षण घेत होते.प्राथमिक शाळेत प्रति शिक्षक विद्यार्थी संख्या 23 होती तर माध्यमिक व उच्चमाध्यमिक संस्थांमध्ये हिच संख्या 32 एवढी होती.

उच्चशिक्षणाचा विचार करता 2011-12 मध्ये उपलब्ध माहिती नुसार जिल्ह्यात सव साधारण उच्च शिक्षणाची 38 महाविद्यालये कार्यरत आहेत.तर त्यामध्ये 39465 विद्यार्थी आहेत.

खालिल तक्ता प्राथमिक माध्यमिक व उच्च शिक्षणातील शिक्षक विधार्थी व शाळांची संख्या

तक्ता क्र 2.11

प्राथमिक माध्यमिक व उच्च शिक्षणातील शिक्षक विद्यार्थी व शाळांची संख्या

अ.नं	शाळा	मुले	मुली
1)	शासकीय प्राथमिक शाळा	117	191
2)	स्थानिक स्वराज्य शाळा	93950	90470
3)	खाजगी प्राथमिक अनुदानित शाळा	37027	30590
4)	खाजगी प्राथमिक विनाअनुदानीत शाळा	15085	9853

आधार – शिक्षणधिकारी सातारा जिल्हा

सातारा जिल्ह्यातील प्राथमिक शाळतील विद्यार्थी संख्या असून शासकोय, स्थानिकस्वराज्य संख्या व खाजगी प्राथमिक अनुदानित शाळा, खाजगी प्राथमिक विना अनुदानित शाळांचो माहीती स्पष्ट केली आहे.

प्रकरण 3

संदर्भ साहित्याचा आढावा Review of Literature

प्रस्तावना

युनोच्या महासभेने विकास कार्यक्रम संघटनेची स्थापना 1965 साली केली. सर्व विकसनशील जगतात शीघ्र गतीने आर्थिक विकास साधने व राहणीमानाचा दर्जा उंचावणे हे महत्त्वाचे कार्यक्रम 150 देशांमध्ये व 40 आतरराष्ट्रीय संस्थां मध्ये राबवले जातात व दरवर्षी मानव विकास अहवाल प्रसिध्द केले जातात का अहवाल विशिष्ट निकषांच्या आधारे तयार केला जातो. 1990 पासुन यू.एन.डी.पी.दरवर्षी मानवी विकास निर्देशांक दर्शवणारे अहवाल प्रकाशीत करत आहेत या अहवालात आयुमर्यादा, प्रौढ साक्षरता, चांगले राहणीमान यासाठी किमान उत्पन्न मर्यादा यांचा विचार करुन त्या त्या देशाचा मानवी विकास निर्देशांकात कितवा क्रमांक आहे हे दर्शविले जाते. 1997 सालो या अहवालात प्रथमच मानवी दारिद्र्य, निर्देशांक व आयुर्मान, शिक्षण, वार्षिक उत्पन्न या आधारावर स्त्री-पुरुष समानता दर्शविणाऱ्या निर्देशांकाचा समावेश केला तर 2000 सालच्या अहवालात मानवधिकार व मानवी विकास या विषयावर लक्ष केंद्रीत केले गेले. प्रत्येक वर्षीच्या अहवालात मानवी विकास हे साध्य प्राप्त करण्यासाठी नवनवीन विचार मांडले जातात त्यामुळे आज आर्थिक वृध्दी व विकासापेक्षा 'मानवी विकास' संकल्पना व्यापक व गुणात्मक पैलुवर भर देणारी म्हणून जगभर स्विकारली जात आहे.

भारतातही या आधारावर मानव विकास अहवाल तयार करण्याचा प्रयत्न सर्वच घटक राज्यांनी केला महाराष्ट्राने 2002 साली आपला मानवी विकास अहवाल तयार केला महाराष्ट्रात 35 जिल्हे असून प्रत्येक जिल्ह्याचा मानवी विकास निर्देशांक भिन्न भिन्न आहे. भौगोलिक क्षेत्र, जमीन, पिकांची रचना या सर्वात भिन्नता आहे. त्यामुळे त्याचा अभ्यास करून मानवी विकास व त्याच्या निर्देशांकाचा अभ्यास करण्यासाठी हा विषय निवडला असून माझ्या वाचनात मानवी विकास संदर्भातील विविध पुस्तके, रिपोर्ट, मासिके व इतर साहित्य आले त्यातील निवडक साहित्याचा आढावा या प्रकरणात घेतला असून या संदर्भ साहित्याच्या आढव्या वरुन संशोधनासाठी निवडलेल्या अभ्यास विषयामध्ये असलेल्या विविध घटकांची कल्पना येते.

‘‘मानव विकास अहवाल महाराष्ट्र 2002’’[1]

‘‘मानव विकास या संकल्पने पासून महाराष्ट्रातील बराच मोठा वर्ग दुरच राहीला आहे. राज्याच्या विविध भागांत दरडोई उत्पन्नाच्या पातळीवर आसणारी मोठी विषमता, झोपडपट्टीत राहणारी प्रचंड लोकसंख्या, वाढती लोकसंख्या व चुकीच्या दिशेने बदलत जाणारे लिंग गुणोत्तर पोषण आहाराबाबतचो निराशाजनक स्थिती या पार्श्वभूमीवर समाजाच्या राहणीमानाचा दर्जा सुधारावा म्हणून संयुक्त राष्ट्रविकास कार्यक्रमा अंतर्गत (U N D P) ने मानव विकास निर्देशांकानुसार विविध देशांची प्रतवारी निश्चित करण्याच्या कार्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळत आहेत.आरोग्य, शिक्षण व इतर मुलभूत सेवांच्या क्षेत्रात त्या त्या राष्ट्राने बजावलेल्या कामगीरीचा विचार करुन हा दर्जा निश्चित केला जातो. भारताच्या विविध राज्यात मानव विकास अहवाल तयार केले जात आहेत. महाराष्ट्रशासनही ‘मानव विकास अहवाल’ म्हणजे केवळ शासनाच्या वेगवेगळ्या विभागांनी हाती घेतलेले कार्यक्रम आणि योजना तसेच त्यांनी पार पाडलेली कामगिरी यांचे दर्शन घडविणारा एक दस्ताऐवज या पलिकडे जाऊन महाराष्ट्रातील मानव विकासाचे वास्तव समोर मांडले आहे. शासनाच्या योजनांवर होणाऱ्या टिकांचाकी विश्लेषणात विचार केला आहे. त्यामुळेच मानव विकासाची भूमिका व संकल्पना, महाराष्ट्राचा समृध्द भूतकाळ व अनिश्चित भविष्य काळासाठी तरतूदी काय कराव्यात, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सर्वांना सामावून घेण्यासाठीच्या योजना आरोग्य, पोषण, शिक्षण, लिंगभेद, आर्थिक वाढ व मानव विकास यांच्यातील सहसंबंध या पुस्तकात मांडला आहे.’’

‘‘**क्षीरसागर व्ही. एस. व पाटील व्ही. बी. 2009**’’[2]

‘‘ कोणत्याही देशाचा आर्थिक विकास निरनिराळ्या प्रकारच्या साधनांची उपलब्धता व त्यांचा सुयोग्य वापर यांच्या आधारे साधला जातो. देशाच्या आर्थिक विकासाच्या संदर्भात महत्त्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या संसाधनात नैसगिक संसाधने, वित्तीय संसाधने, व मानवी संसाधना अभावी निष्क्रिय ठरतात. मानवी संसाधनाच्या सहाय्यानेच इतर साधनांचा विकास होतो व शेवटी मनुष्य हाच आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू आहे. कारण मनुष्य हा आर्थिक विकासाचे किंवा उत्पादनाचे जसे एक साधन आहे तसेच

आर्थिक विकासाचे अंतिम उद्दिष्ट आहे. त्यामुळेच मानवी कल्याणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मानवी संसाधनांचा चांगल्या प्रकारे कसा उपयोग करुन घेता येईल याला विशेष महत्त्व प्राप्त होते हे सांगुन या पुस्तकात लोकसंख्या, शिक्षण, आरोग्य व ग्रामीण विकास यांच्या संबंधित संविस्तर चर्चा मांडली आहे.''

"तायडे पुष्पा 2006"[3]

या लेखात ''मानवी विकास म्हणजे लोकांना उपलब्ध असलेल्या पर्यायांचा विस्तार करण्याची प्रक्रिया आहे.'' मानवी हक्क हे एकमेकांना पूरक व निगडीत असतात. यापैकी कोणाही एका घटकाला दुसऱ्यापासून वेगळे करुन विचार करता येत नाही. असे मत व्यक्त केले आहे. 1990 पासून जागतिक मानव विकास अहवालात 2000 साली ''आर्थिक सुबत्ता आणि मानवी विकास यातला संबंध स्वयंसिध्दा किंवा स्वयंस्पष्ट नाही. सारख्याच उत्पन्नाच्या दोन देशांचा मानव विकास निर्देशांक भिन्न असू शकतो व आर्थिक सुबत्तेत फरक असू शकतो हे सांगुन राज्य पातळीवरील मानव विकास अहवाल तयार करताना जिल्हा, तालुका व ग्राम समुहाच्या विकासाच्या गरजांचा सुध्दा अभ्यास केला जाऊ शकतो याचा उल्लेख या अहवालात मांडला आहे.''

राज्यातील अर्ध विकसीत विभागातील मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी लागणाऱ्या सार्वजनिक वित्तीय गुंतवणूकी बाबत राज्य पातळीवरचे मानव विकास अहवाल उपयुक्त ठरतात. महाराष्ट्राची लोकसंख्या, आदिवासींचे प्रमाण, स्थलांतरांचे प्रमाण, झोपडपट्ट्यांची वाढती संख्या, साक्षरता, कार्यकारी लोकसंख्या, रोजगार, संघटित, असंघटीत क्षेत्र यांच्या समस्या महाराष्ट्रा समोर उभ्या आहेत. याशिवाय लोकसंख्या वाढीचे उच्च प्रमाण, बाहेरुन महाराष्ट्रात येणाऱ्या लोकांचे प्रचंड लोंढे, अर्थव्यवस्थेत टिकून राहिलेले दारिद्रय महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेमधील विविधतेचा अभाव भूमिहीन शेतमजूरांची प्रचंड संख्या आणि लोकसंख्येमध्ये स्त्रिया व मुलींच्या प्रमाणात भयानक घट या सर्व संकटावर मात करण्यासाठी त्याच्यावर तीव्र व चौफर हल्ला करण्याची व्यूह रचना विविध उपायांनद्वारे करुन विकासाचा वेग वाढविणे आवश्यक आहे. पण लाभांचे वाटप करण्याबाबत समान न्याय मिळवून देणे ही गोष्ट महत्त्वाची आहे. यावर या लेखात भर दिला आहे.

"झिंगन एम. एल. 2004"[4]

या पुस्तकात मानव विकास निर्देशांकाबाबत विचार मांडला असून दोन किंवा त्यापेक्षा अधिक घटकांना एकत्र करुन सामाजिक विकास मोजण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये अर्थतज्ज्ञ मौरीस डी. मौरीस यांनी 1979 मध्ये 23 विकसनशिल व विकसित देशांचा अभ्यास करुन ''जीवनाचा भौतिक गुणवत्ता निर्देशांक (PQLI)'' सांगितला असून त्यामध्ये बालमृत्यू 0 ते 1 वर्षे मुलांच्या जगण्याची संभाव्यता व शिक्षण या घटकांबरोबरच स्वास्थ्य, पिण्याचे पाणी, अन्न सुरक्षितता, पोषणआहार यांचा समावेश करुन जीवनात भौतिक गुणवत्ता महत्त्वाची आहे. याचे विश्लेषण करुन मानव विकास निर्देशांक HDI ही संकल्पना संयुक्त राष्ट्र संघाने 1990 ला मांडून दीर्घायुष्य, शिक्षण, चांगले राहणीमान या वरुन निर्देशांक कसा काढतात याची माहिती सांगितली आहे. व उच्च मानव विकास देश, मध्यम मानव विकास देश व कमी मानव विकास असणारे देश यांचे वर्गिकरण सांगून स्थूल देशांतर्गत उत्पन्न, प्रतिव्यक्ती उत्पन्न यांच्याशी मानव विकासाचा संबंध व त्याचा निर्देशांक स्पष्ट केला आहे.

" मोहिरे रामदास ब. 2004"[5]

''या शोध निबंधात मानव साधन व आर्थिक विकास या मधील संबंधाचा अभ्यास करुन आर्थिक विकासातील मानवी भांडवलाचा कार्यभार विशद केला आहे. भारताचा भविष्यातील विकास मानव साधनांच्या प्रभावी उपयोगावर अवलंबून असून त्यावरच वर्तमान पिढीची उत्पादकता व उत्पन्न वाढ अवलंबून आहे. त्याकरीता मानव साधनांच्या विकासावर भर दणे आवश्यक आहे असे सांगून 1) मानव विकासाकरोता आवश्यक वातावरण निर्माण करणे. 2) मानव साधनांची वर्तमान स्थिती. 3) मानव साधनांच्या विकासाची प्रक्रिया. 4) मानव साधन विकासाचे मुलभूत निर्देशांक 5) मानव विकासाचे गुणात्मक घटक 6) मानवावरील गुंतवणूकीचे आर्थिक विश्लेषण मांडले आहे.''

"बाबर प्रवीण गुलाबराव व खटके दादासाहेब भानुदास 2009" [6]

''या संशोधन लेखात मानव विकास म्हणजे, लोकांना उपलब्ध असलेल्या निवड पर्यायांचा विस्तार करण्याची प्रक्रिया होय. हे सांगुन महाराष्ट्राच्या मानवी विकास निर्देशांकाची वस्तूस्थिती

मांडण्याचा प्रयत्न केला आहे. मानव विकास संकल्पना व मानव विकास निर्देशांकाची संकल्पना स्पष्ट करुन निर्देशांकाचे नेमके स्वरुप स्पष्ट करुन सांगितले आहे. व महाराष्ट्रातील मानव विकास निर्देशांक इतर राज्यांच्या तुलनेत वाढवण्यासाठी उपाययोजना या लेखात केल्या आहेत.''

'' कुलकर्णी सर्वोत्तम न. 2008''[7]

''या शोध निबंधात कोणत्याहो विकासाचा केंद्रबिंदू मानव असून भौतिक, आर्थिक, सामाजिक, राजकिय व अध्यात्मिक प्रगतीचा अंतिम लाभार्थी माणूसच आहे. हे सांगून 1995 पासून संयुक्तराष्ट्र संघाच्या मानव विकास अहवालात मानव विकासात लिंग भेदाचे मापन केले जाते. म्हणजे सारांश रुपाने वेगळ्या शब्दात स्त्रीयांचा पुरुष-सापेक्ष, आर्थिक, सामाजिक व राजकिय विकासाची तुलना व मापके विकसित करुन निष्कर्ष काढला जातो. 1995 ला लिंगाधारीत विकास निर्देशांकात 130 देशांमध्ये भारताचा क्रम 99 होता. 2003 मध्ये तो 103 वर गेला. 2006 मध्ये तो 96 वर आला आहे. इतर आशियाई देशांचा विचार केलातर बरेच देश भारताच्या वरच्या क्रमांकावर आहे. असे या निर्देशांकावरुन दिसते. मात्र भारत मागे राहीला. याच्या सर्व बाबींचा विचार करुन भारतात राबवल्या जाणाऱ्या महिला सक्षमीकरण मोहिम व त्याचे मापन करण्याचे निष्कर्ष कोणते आहेत हे यु.नी.डो.च्या रिपोर्टच्या आधारे सांगितले आहे व हा निर्देशांक अधिक वर कसा जाईल याबाबत मत व्यक्त केले आहे.''

'' शहा रुपा 2009''[8]

''या शोध निबंधात महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक दरडोई उत्पन्न, आरोग्य व शिक्षण यांच्या सरासरी आकडेवारीच्या आधारे निर्देशांक निश्चित केला जातो. मात्र त्यात अपंगांच्या स्थितीचा विचार करुन निर्देशांक काढला जात नाही. 2004 मध्ये अमेरिकेत सर्वेक्षण करुन अपंगापैकी 35 % व्यक्ती रोजगारात आहेत व बाकीच्यांना रोजगार नाकारला जातो हे सिध्द झाले. भारतातर प्रत्येक 10 व्यक्तींमध्ये 1 व्यक्ती मानसिक अथवा शारीरोक अपंग असल्याचा अंदाज आहे. नॅशनल सेंटर फॉर प्रमोशन ऑफ एम्प्लॉयमेंट फॉर डिसेबल पीपल या संस्थेने केलेल्या अभ्यासात 7 कोटी लोक अपंगत्वाने पीडित आहेत. शासकिय नोकऱ्यांमध्ये त्यांच्यासाठी 3 % आरक्षण असलेतरी असंख्य लोक या नोकऱ्यांन पासून वंचित आहेत.

खाजगी संस्था व उद्योगामध्ये अपंग व्यक्तींना रोजगारात डावलले जाते. अपंगासाठी आरोग्य सुविधादेखील चिंतेची बाब आहे. त्यामुळे त्यांना उपलब्ध असणाऱ्या संधी अत्यंत कमी आहेत. त्यांची आर्थिक स्थिती त्यामुळे खालावलेली असते. त्यामुळेच महाराष्ट्राचा सामाजिक व आर्थिक विकास अभ्यासताना अपंग आर्थिक विकास प्रक्रियेत जे योगदान देतात ते नाकारण्याची भूमिका घेऊन चालणार नाही. त्यांना माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचा व सुविधा मिळाल्या पाहिजेत व त्यांचा विकासात सहभाग झाला पाहिजे असे मत व्यक्त केले आहे.''

'' घाटगे एल.एन. व वावरे अनिल कृष्णा 2004''[9]

''या शोध निबंधात 1991 ते 2001 या 10 वर्षाच्या काळातील आर्थिक सुधारणांचा जिल्ह्याचा मानवी विकास कशा पध्दतीने होत गेला याचा अभ्यास केला असून लोकसंख्या, आरोग्य, रोजगार संधी इत्यांदी घटकांमध्ये झालेले परिवर्तन अभ्यासले असून सातारा जिल्ह्याचे निष्कर्ष विविध स्वरुपाचे आहेत. विविध रोग व मृत्यू पावणाऱ्या लोकांची संख्या 16892 इतकी असून बालमृत्यूचे प्रमाण 352 इतके आहे. जिल्ह्यात शेती, उद्योग व सेवा क्षेत्रात विकास करण्यासाठी संधी आहे असे मत मांडले आहे.''

'' भोंग जी. एल. पुणे, 2004''[10]

''या शोध निबंधात महाराष्ट्रातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाचा आढावा घेतला असून देशातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रामध्ये शिक्षणाचा प्रसार वेगाने वाढत आहे. नवनवीन शैक्षणिक संस्था निर्माण होत आहेत. सरकारने शिक्षणाचा दर्जा उंचावून मानवी विकास वाढविण्यासाठी शैक्षणिक व्यवस्थापनामध्ये सुध्दा सुधारणा करणे गरजेचे आहे यावर भर दिला आहे.''

''हिक्स नॉरमल एल.व पॉल स्ट्रीटन पी.1979''[11]

''आर्थिक विकासाचे मापन करताना राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न व आर्थिक कल्याण मोजताना अडचणी येतात हे लक्षात घेऊन अर्थतज्ज्ञ हॅजेन, मॉरिस, मायेर या सामाजिक निर्देशांकाची पध्दत सांगितली यामध्ये विकासाची गुणात्मक बाजू विचारात घेतली जाते. लोकांचे आरोग्य, अन्न, तंत्रशिक्षण, साक्षरता,

कपडेलत्ता, निवाऱ्याची सोय, खेळ, सामाजिक सुरक्षितता सोयी इत्यादी निर्देशांकाचा यामध्ये समावेश होतो. ही पध्दत मानवी अंतिम ध्येयाशी संबंधीत असल्याने ती अधिक श्रेष्ठ मानली जाते. आर्थिक धोरणांची कार्यवाही करताना सामाजिक निर्देशांक गाठले गेले तर देशाचा आर्थिक विकास झाला असे म्हणता येईल. यासाठी अर्थतज्ज्ञ हिक्स व स्ट्रीटन यांनी सहा प्रमुख निर्देशांक पुढीलप्रमाणे सुचवले आहेत.''

1. **आरोग्य निर्देशांक** - सरासरी आयुर्मानचा विचार व साथीच्या रोगांची माहिती

2. **शैक्षणिक निर्देशांक** - प्राथमिक शिक्षण, माध्यमिक , तंत्र शिक्षण व साक्षरता यांचा समावेश

3.**अन्न निर्देशांक** - अन्न धान्यामधून मिळणाऱ्या प्रतीव्यक्ती कॅलरिजचा अंतर्भाव होतो.

4. **पाणी पुरवठा निर्देशांक** - स्वच्छ पिण्याच्या पाण्याची उपलब्धता किती लोकांना होतो.

5. **स्वच्छता निर्देशांक** - बालमृत्यूचे आणि स्वच्छतेच्या सोयी उपलब्ध असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण

6. **निवास निर्देशांक** - एकूण लोकसंख्येपैकी बेघरांचे प्रमाण, निवाऱ्याच्या सोयी त्यांचे स्वरूप आदींचा समावेश होतो.

वरील प्रकारे या सिध्दांतात मानवी विकास व त्यातून देशाचा आर्थिक विकास साध्य करणे याला जास्त महत्त्व दिले आहे.

"अमर्त्यसेन 1971"[12]

''अर्थतज्ञ अमर्त्य सेन यांनी अर्थशास्त्रात कल्याणविषयक नवीन सकल्पना सांगून सामाजिक निवड, दारिद्र्याचा निदेशांक, दुष्काळाचे विश्लेषण, सामाजिक कल्याणात शासनाची भूमिका व कल्याणाचे महत्मीकरण याबाबत आपले विचार विविध पुस्तके, लेख व मुलाखती मधून मांडल्या त्यांच्या मते प्रत्येक व्यक्तीस किमान आवश्याक मुलभूत गरजा (अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण) प्राप्त झाल्यास कल्याण साधले जाते. मात्र या मुलभूत गरजांकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष झाल्यास सामाजिक समतोल ढळतो व अर्थव्यवस्थेत कल्याणाच्या विविध समस्या निर्माण होतात. कोणत्याही राष्ट्राची आर्थिक प्रगती ही वैयक्तोक व सामाजिक कल्याणाच्या महत्तम पातळीवर अवलंबून असते. आज तिसऱ्या जगातील राष्ट्रांकडे या दृष्टीने पाहणे योग्य ठरते.

दारिद्र्य व सामाजिक कल्याण यांचा जवळचा संबंध आहे. जेव्हा समाजातील जास्तीत जास्त लोकांच्या किमान मुलभूत गरजा पूर्ण होत नाही तेव्हा दारिद्र्याची निर्मिती होते. कल्याण घटते म्हणून दारिद्र्य निर्मुलन करून सामाजिक कल्याणात वाढ घडवून आणण्याचे महत्त्वाचे कार्य शासन संस्थेने केले पाहिजे. दारीद्र्याचा निर्देशांक हे समाजाच्या उत्पन्न पातळी, उत्पन्न व संपत्तीचे वाटप, मुलभूत सुविधांचा उपलब्धता व समाजात होणारे वितरण यातून स्पष्ट होते. त्यांच्या मते महत्तम सामाजिक कल्याणासाठी दरडोई उत्पन्न हा एकमेव मापदंड मानता येणार नाही तर विविध क्षेत्रात उत्पन्न मिळवण्यासाठी व्यक्तीमध्ये आवश्यक अशी क्षमता निर्माण झाली पाहिजे त्यासाठी आरोग्य व शिक्षण याची पुर्तता ही झाली पाहिजे. तर Poverty and Famines या ग्रथांत विविध देशातील दुष्काळाची अनुभवनिष्ठ विवेचन त्यांनी केले आहे. मानवावर सतत नैसर्गिक आपत्ती येतात त्यावर उपाययोजना केल्या पाहिजेत. दुष्काळ पडला असता अन्नधान्यांचा तुटवडा होतो. लोकांची उपासमार होते. जिवितहानी होते. अमर्त्य सेन म्हणतात अन्नधान्यांच्या टंचाईमुळे उपासमार होत नाही तर दुष्काळाच्या काळात गरीब लोक, मजूर या लोकाचा रोजगार बंद झाल्याने हातातील खरेदी शक्तीत होणारी घट ही उपासमारीला कारणीभुत असते.''

"महेबूब उल हक 1976"[13]

''पाकिस्तान या देशाचे अर्थतज्ज्ञ महेबूब उल हक यांनी मानवी विकासाची सैध्दांतिक मांडणी केली व 1990 मध्ये मानवी विकास ही संकल्पना उदयाला आली. त्याअगोदर देशाच्या विकासाच्या मोजमापनासाठी स्थूल राष्ट्रीय उत्पादन व दरडोई उत्पादन यांच्या मदतीने विकास मोजला जात असे मात्र याचा परिणाम म्हणून देशाच्या विकासात असमतोलपणा जाणवू लागला. दारिद्र्य, बेकारी, नैसर्गिक साधन संपत्तीचा अतिरिक्त वापर, पर्यावरणातील असमतोलपणा, मानवाच्या मुलभूत गरजा पूर्ण न होणे या सर्वांवर वाईट परिणाम झाले. त्यावर उपाय शोधताना महेबूब उल हक यांच्या मते मानवी विकास म्हणजे, लोकांच्या निवडी विस्ताराची प्रक्रिया होय तत्वत:या निवडी अमार्याद व काळानुरुप बदलणाऱ्या आहेत. मात्र विकासाच्या प्रत्येक पातळीवर शिक्षण, आरोग्यदायी दीर्घायुष्य जीवन जगणे व चांगल्या

जीवनमानासाठी चांगले राहणीमान जर या सर्व निवडी उपलब्ध असतील तर मानवी विकासाला चालना मिळून देशाचा विकास घडून येतो. विसाव्या शतकात विकासासाठी सर्वच देशांना मानवी विकास व त्यांचे संशोधन यावर विचार करायला लावणारे लिखान डॉ.हक यांनी विविध ग्रंथामधून मांडले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने डॉ.हक आणि डॉ.सेन यांना मानव विकास निर्देशांकावर आधारीत जागतिक विकास अहवाल तयार करण्यासाठी आमंत्रित केले व विकासाकडे पाहण्याची जगाची संकल्पनाच या निर्देशांक अहवालामुळे बदलून गेली आहे.''

"माथल्स रॉबर्ट थॉमस 1951"[14]

"Principle of political Economy" Newyark Publication 1951.Page No.314

माथल्स यांच्यामते आर्थिक विकासासाठी खास प्रयत्न करावे लागतात. विकासाची प्रक्रिया गतिशिल बनवणे आणि विकासातील सातत्य टिकवून ठेवणे याला महत्व दिले. बचतीचे प्रमाण भांडवल संचयावर परिणाम घडवून आणतो. भांडवल वाढले तर विकासाचा वेग वाढतो.

श्रमाच्या सहाय्याने निर्माण होणारे उत्पादनाचे मुल्य यावर संपत्तीमधील वाढ अवलंबून असते. माथल्सने लोकसंख्या वाढीकडे अधिक वास्तववादी दृष्टीने पाहिले, त्यांच्यामते आर्थिक विकासाकरीता केवळ लोकसंख्या हा घटक पुरेसा नसतो उलट लोकसंख्यावाढ हा आर्थिक विकासाचा परिणाम असतो. कारण संपत्तोमध्ये वाढ होत गेल्यास त्या प्रमाणात लोकसंख्या वाढत जाते. संपत्तोवाढ त्यामुळे भांडवल संचयवाढ परिणामी श्रमीकांच्या मागणीत वाढ होते. त्यामुळे प्रभावी मागणी वाढ्न देशाच्या संपत्तोत वाढ होते. भूमी, भांडवल, श्रम, संयोजक या घटकावर स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीची क्षमता अवलंबून असते. हे सांगून आर्थिक विकासासाठी उपाय सूचविताना संतुलित विकास व प्रभावी मागणी वाढण्यावर भर देऊन शेती क्षेत्रातील गुंतवणूक संधी जेव्हा कमी होतात, तव्हा उद्योगामध्ये गुंतवणूक वाढवून तांत्रिक प्रगती करावी ज्यामुळे जादा लोकांना उद्योगात सामावून घेऊन विकास प्रक्रिया वाढवता येते को मध्यवर्ती कल्पना माल्थसच्या सिध्दांतात मांडली आह.''

"ॲडम स्मिथ"[15]

"स्मिथच्या मते निसर्गत: प्रत्येक व्यक्तीला स्वत:चे हित समजते त्यामुळेच महत्तम हित साधन्याचा व्यक्ती प्रयत्न करते प्रत्येकाला आपले हित समजण्यासाठी जी वृत्ती असते तिलाच ॲडम स्मिथ यांनी निसर्ग नियम किंवा निसर्गवाद म्हटले आहे. व्यक्ती जेव्हा स्वत: चे हित साधण्याचा प्रयत्न करते तेव्हा त्यातून समाजाचेही हित संवर्धन होत असते त्यांच्या मते भाडवल, पैसा, श्रमविभागणी या सारख्या विविध संस्था स्वत: चे हित साधन्याच्या प्रयत्नातूनच विकसीत होत जातात मानवा जवळची निसर्ग शक्ती व पूण स्पर्धा यांच्यामुळे राष्ट्रीय संपत्तोत वाढ होत जाते. स्मिथच्या सिध्दांताला केंद्रबिंदू म्हणजे श्रम विभागणी होय. श्रम विभागणीमुळे श्रमिकाच्या उत्पादक शक्तीत मोठ्या प्रमाणात सुधारणा घडून येते. उच्च तंत्रज्ञानामुळे मानवी विकासाला चालना मिळते श्रमविभागणीमुळे उत्पादकता वाढते बाजारपेठांचा विकास व श्रमविभागणी यांच्या घन संबंध असतो. लोकसंख्या वाढ व वाहतूक सोयीत वाढ झाली तर भांडवलात वाढ होते भांडवल गुंतवले तर नफा वाढतो. आर्थिक संपन्नता वाढत गेली तर भांडवल पुरवठा वाढून त्याचा व्याजावर परिणाम होतो. शेतकरी, उद्योजक व व्यावसायिक हे आर्थिक विकासाचे अभिकर्ते असतात. शेती क्षेत्राच्या विकासामुळे बांधकाम व्यवसाय व व्यापारात वाढ होते, उद्योगाची वाढ होते भांडवल संचय वाढून आर्थिक विकास घडून येतो."

"शुंपीटर जोसेफ के."[16]

"शुंपीटर यांच्यामते नवउपक्रमशिलता व नवप्रवर्तकाची भूमिका आर्थिक विकासाला चालना देणारी असते. नवीन उत्पादन रचना व उत्पादन व्यवस्था स्विकारणे म्हणजे उपक्रमशिलता होय किंवा नव्या वस्तू तयार करणे. नवीन कच्चामाल वापरणे यांना उपक्रमशिलता म्हणतात. तर उपक्रमशिलता व नवप्रवर्तन घडवून आणणाऱ्या उद्योजकाला नवप्रवर्तक असे म्हणतात. संयोजक किंवा उद्योजक सामान्य कुवतीचा नसतो तो भांडवल पुरवत नाही. तर भांडवल योग्य वापराचे संकेत देतो. जुन्या परंपरा मोडून नवीन परंपरा निर्माण करण्यासाठी पयत्न करतो. देशातील सामाजिक व सांस्कृतिक वातावरणाचा परिणाम संयोजकाच्या कार्यावर होत असतो. नफ्याच्या प्रेरणेने संयोजक उपक्रमशिलता दाखवत नफा मिळवण्यासाठी

सतत नवप्रवर्तन व उपक्रमशिलता यामुळे नफा मिळतो तो सतत मिळण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. बँकाच्या पतविस्ताराद्वारे भांडवल पुरवठा होतो. जेव्हा अर्थ व्यवस्थेत पूर्ण रोजगार प्रस्थापित होतो तेव्हा भांडवलाची गरज भासते. म्हणजे मानवी भांडवलाचा विकास झाला तरच नवप्रवर्तक तयार होतात. म्हणजेच अर्थवेवस्थेच्या विकासाला चालना मिळते म्हणून प्रत्येक देशाने धाडसी उद्योजक व संयोजक नवप्रर्वतक घडवावेत असा या सिध्दात अर्थ होय.''

''पॉल स्टीटन''[17]

''पॉल स्टीट न यांच्या मते सत्वयुक्त अन्न आरोग्याच्या सोई शिक्षण इत्यांदी सुविधा पुरवून मानवाची उत्पादकता वाढवणे म्हणजेच मानवी विकास होय. उत्तम आरोग्य, साक्षर, कुशल व जागरुक श्रमपुरवठा म्हणजे एक प्रकारची उत्पादक मालमत्ता होय. म्हणुन शिक्षण, आरोग्यसेवा आणि आहार यामध्ये गुंतवणुक करणे समर्थनीय आहे. नैसर्गिक साधने, भांडवलाची उपलब्धता याबरोबरच मानवी विकास हा घटकसुध्दा आर्थिक प्रगतीमध्ये महत्त्वाची भूमीका बजावतो श्रम, श्रमाची कार्यक्षमता, कौशल्ये या बाबींना आर्थिक विकासात महत्त्व असते. लोकसंख्येचा गुणात्मक दर्जा सुधारण्याचे प्रयत्न करुन त्याद्वारे विकासाची गती वाढविता येते या दृष्टिकोणातून मानवी संसाधनाचा विकास महत्त्वाचा ठरतो असे प्रतिपादन पॉलस्टीटन यांनी केले आहे.''

''कोल ए.जे. व हुवर एडगर एम.1977''[18]

''लोकसंख्या आणि देशाचा विकास यांचा जवळचा संबंध आहे. लोकसंख्या वाढ व त्याचे आकारमान यांचा आर्थिक विकासावर प्रभाव पडतो. लाकसंख्या वाढताना देशाचा विकास होत असतो मात्र लोकसंख्या खूप मोठ्या प्रमाणात वाढली तर विकासावर त्याचा वाईट परिणाम होतो अर्थतज्ज्ञ प्रा.कोले व हुवर यांनी लोकसंख्या वाढीचा आर्थिक विकासावरील परिणाम म्हणजे मृत्यूदर, जन्मदर व लोकांचे स्थलांतर याद्वारे घडून येतो तर फंक नोटेस्टिन, सी.पी.ब्लँकर आणि कार्ल सॅक्स यांनी लोकसंख्या संक्रमण सिध्दांताची मांडणी केली.

लोकसंख्या संक्रमण सिध्दांतात लोकसंख्या वाढ ही प्रामुख्याने जन्मदर आणि मृत्यूदराच्या तफावतीवर अवलंबून असते यामध्ये अंतर कमी अधिक झाल्यास लोकसंख्येची अवस्था बदलते. लोकसंख्या एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत जाते त्याला संक्रमण म्हणतात. या सिध्दांतात लोकसंख्या आणि आर्थिक विकास यांचा जवळचा संबंध गृहीत धरून लोकसंख्येत वाढ चक्रीय स्वरूपात होते. मंद वाढ, जलद दरवाढ, पुन्हा मंदवाढ स्थिर वाढ असे टप्पे असून आर्थिक झाले तर लोकसंख्येतही संक्रमण होते. जेव्हा लोकसंख्या वेगाने वाढते तेव्हा जन्मदरातील वाढीपेक्षा मृत्यूदरातील घट हे कारण जबाबदार असते तर स्थिर लोकसंख्या वाढीची स्थिती निर्मान होताना जन्मदर व मृत्यूदर दोन्ही ही न्यूनतम स्तराला राहतात.

सामान्यपणे लोकसंख्यावाढीचा अनुभव सांगतो की, देशाच्या प्रांरभिक विकास अवस्थेत लोकसंख्या अल्प दराने वाढते. नंतर ती अधिक वेगाने वाढते व शेवटी लोकसंख्या वाढोचा वेग कमी होतो. म्हणजे विकास प्रक्रि येतील टप्प्यांबरोबर लोकसंख्यावाढीचा वेग बदलतो. मागास देशांनी जास्त लोकसंख्या असताना मानवी विकासावर भर दिल्यास देशाचा जलद विकास होतोच शिवाय लोकसंख्येच्या समस्येवर मात करता येते. ”

“ लिला पाटील जुन 2010”[19]

“जगाची लोकसंख्या 623.24.कोटी असून वर्डवॉरच्या लोकसंख्या पाहणीनुसार 2050 मध्ये 153.4 कोटी लोकसंख्येसह भारत सर्वाधीक लोकसंख्येचे राष्ट्र असेल, लोकसख्या प्रभावी नियंत्रणात न ठेवल्याने साधन सामग्रीची टंचाई, 26 कोटी दारिद्र्य रेषेखालील रोगराई, उपासमार, बेरोजगारी, गुन्हेगारी, बेसुमार शहरीकरण या सारख्या समस्यांवर मात करण्यासाठी मनुष्यबळ व्यवस्थापन यांचा जवळचा संबंध येतो त्यामुळे लोकसंख्यावाढ आर्थिक विकास, साक्षरता, लोकसंख्यची घनता, आरोग्य, स्त्री-पुरुष प्रमाण, शहरीकरण, बेरोजगारी, अल्पभूधारक शेतकरी, पर्यावरण संतुलन समस्या, निर्माण होतात त्यावर उपाय म्हणून नोकरी, निवडणूक, रोजगार शासकिय, सवलती शिक्षण परोगामी सबसिडी, कर्जमाफो इत्यादी क्षेत्रात कुंटुंब नियोजन धारकांना सवलत देणारे नवीन लोकसंख्या धोरण स्विकारले तर रेशनकार्ड, बसपास इत्यादीसाठी सवलत देताना कुटुंब नियंत्रण योजना पभावी राबवावी. जागतिकीकरणाचा पुरेपुर लाभ उठवण्यासाठी आपल्या देशात सर्वानी लोकसंख्या नियंत्रण हा युध्द पातळीवरचा असा कार्यक्र म उत्स्फ्र्तपणे हाती घ्यायला हवा हे मत व्यक्त केले.”

"उषा पाटील जुन 2010"[20]

"शिक्षणामुळे आत्मविश्वास निर्माण होतो स्वाभिमानाची जाणीव होत व व्यक्तीमध्ये ही विकसीत होते, परंतु प्राचीन काळापासुन मुलींना शिक्षणाची संधी नव्हती महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाला चालना दिली, त्यामुळे शिक्षण घेऊन आत्मविशवास व स्वाभिमानाने शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या वाढत आहे. आज इंजिनिअर्स, डॉक्टर, प्राध्यापक बँक व्यवस्थापक, पोलीस अधिकारी, अशा अनेक महिलांना वर्चस्व सिध्द केले आहे. मात्र आज ही शिक्षणा पासुन वंचित असणाऱ्या स्त्रियांची संख्याही मोठी आहे."

"व्ही.सी.बेलुरे जून 2010"[21]

"आर्थिक विकास म्हणजे केवळ भौतिक साधनांचा विकास नव्हे तर भौतिक साधनां बरोबर मानवी आर्थिक विकास देखील त्यापेक्षा जास्त महत्वाचा असतो. मानव हा आर्थिक विकासाचे एक महत्वपूर्ण साधन व साध्य आहे. त्यामुळेच आर्थिक विकास मोजण्यासाठी उत्पन्नासारख्या पारंपारिक मापदंड बरोबरच पर्याय म्हणून शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, स्त्रो-विकास इ. मापदंड वापरण्यात येतात. मानव विकास हा यातील एक प्रयत्न होय. UNDP द्वारे 1990 पासून मानव विकास अहवाल प्रसिध्द केला जातो. हे सांगुन निर्देशांकाचे घटक. अ) दीर्घआयुष्य ब) ज्ञान क) राहणीमान निर्देशांकाचे मापन 2009 चा मापन विकास अहवाल मानव विकास निर्देशांकाचे गुण-दोष यांची चर्चा करत आज मानव विकास निर्देशांकावर अनेक बाजूने टीका होत असली तरी राष्ट्रा-राष्ट्रातील वास्तव आर्थिक विकासाची तुलना करण्यासाठी हे एक अत्यंत उपयुक्त साधन ठरेल आहे हे विसरता येणार नाही असा विचार लेखात मांडला आह ."

"मुक्ता जहांगीरदार. नोव्हेंबर 2004"[22]

"डॉ. मुल्ला जहांगीरदार अमरावती यांनी या लेखात महाराष्ट्र हे देशातील एक प्रगत राज्य आहे. तथापि मानवी विकासाच्या घटकांबाबत या राज्याची चांगली प्रगती असली तरी मानवी विकासात तर्क व्यापी विषमता आढळून येत असल्यामुळे ही विषमता मानवी विकास पातळी उंचाव्यातील मुलभूत अडसर आहे. देशाचा मानवी विकास प्रक्रियेत रोजगार निर्मिती हवी व कृषी सेवाचे महत्त्व, ज्ञान व

सुविधांचे सह.अस्तित्व उत्पन्न वृध्दीपेक्षा उत्पन्न वंचन कमी करेल? मानवी विकासाच्या दृष्टीने जास्त महत्त्वाचे असल्याचा अनुभवाच्या प्रभावी नोंदीचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. श्रींमत भांडवलदारी देशांनी सामाजिक सुरक्षिततेद्वारे वंचन प्रमाण नगण्य करुन मानवी विकास साधन समाजवादी देशांनी किमान विनिमय अधिकार प्राप्त होतील. या प्रकारे वेतनदरावर देशातील सर्वांना रोजगार मिळवून ही बाब साध्य केली. परंतु आजच्या जगातिकीकरणाची वैशिष्ट्ये ही मानव विकास उंचावण्याला अनुकूल नाहीत. एका बाजुने सरकारची कार्ये, खर्चात घट, तर दुसऱ्या बाजुने स्पर्धात्मक व्यवस्थेमुळे आधुनिक तंत्राचा वापर अनिवार्य करुन रोजगार वृध्दीद्वारे मानव विकासासाठी अनिवार्य असलेले उत्पन्न वंचन घटवून विनिमय अधिकार प्राप्त करेल.

जागतिक अधिकोष, आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीसारख्या मदत देशाच्या संघटना किंवा विकसित देशातील मदत अभिकरणांकडून विकसनशील जगातील प्रश्नासंबधी मार्गदर्शन केले जाते. तेव्हा बहुधा ते दशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पातळीवर अस्तित्वातील सल्ला संस्थेचे हितसंबध जोपसणारे असते. त्यांचा सल्ला व शिफारशी गुंतागुंतीच्या तांत्रिक अर्थशास्त्रीय पध्दती दर्जेदार अत्याधुनिक संकल्पना आणि विशेष काटेकोर प्रतिमानावर आधारलेला असला तरी विकसनशिल देशांच्या दृष्टीने प्रतिमानावर (False Paroling Model) आधारलेला असतो. त्यामुळे आशा प्रकारचा दोषमुक्त व समुचित नसलेला सल्ला तिसऱ्या जगातील अर्धविकसितपनाचे मुळ कारण आहे. असे प्रतिपादन त्यांनी केले आहे.''

"आर.एस.सोळुंके व जी.बी.गावडे.नोव्हेंबर–2004"[23]

''या लेखात मानवी विकास म्हणजे काय सांगुन शैक्षणिक सोयी-सुविधाची उपलब्धता कामगारांसाठी रात्रशाळा सांगुन महाराष्ट्रातील शिक्षणाच्या हा एक अविभाज्य घटक आहे. शिक्षणाशिवाय मानवी विकासाचा विचार करता येणे अशक्य आहे. महाराष्ट्रात शैक्षणिक क्षेत्रात शाळा महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या व शैक्षणीक संस्थांच्या संख्येत जी वाढ झाली आहे ती खरोखरच शिक्षण क्षेत्राच्या यशाची बाजू आहे. परंतु शिक्षणाच्या गुणात्मक बाजुचा विचार करता विद्यार्थ्यांच्या गळतीच प्रमाण साक्षरते बाबतची वास्तविकता जिल्ह्यांतगत विषमता आणि जागतिकीकरणाच्या संदर्भात तळागाळातील

व्यक्तिना व मध्यमवर्गियांना भविष्यात खऱ्या अर्थाने शिक्षणाच्या संधीची उपलब्धता होणे या सर्व विचार करावयास भाग पाडणाऱ्या बाबी आहेत असा अभ्यास मांडला.''

''कदम सुभाष .ज.व कदम मंदाकिनी .ज. 2004''[24]

''या संशोधनपर लेखात लोकांना मिळणाऱ्या संधीची उपलब्धता वाढविण्याच्या प्रक्रियेला मानवी विकास म्हणतात. असे सांगून मानव संसाधनाची वास्तविकता जाणून घेण्यासाठी आवश्यक शिक्षण व आरोग्य यांची उपलब्धता व विकास यांचा मागोवा घेतला आहे. शिक्षणाच्या बाबतीत 1960 च्या तुलनेत प्राथमिक शिक्षण संस्थाची संख्याची संख्या दुप्पटीने वाढली, पण त्यात शिकत असलेल्या मुलामुलींची संख्या तिप्पटीने वाढली उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थाची संख्या दहापट वाढली तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी विदयार्थीनींची संख्या आठ पट वाढली. शासनाच्या पुढाकारामुळे शिक्षणाची उपलब्धता सुधारलेली आहे. तरी सुध्दा विद्यार्थ्याच्या मागे खर्च होणारी रक्कम राष्ट्रीय सरासरीपेक्षा खूप कमी आहे. शाळा मध्येच सोडणाऱ्यांची संख्याही जास्त आहे. दहावी पेक्षा जास्त शिक्षण घेणाऱ्यांची संख्या 42 % एवढीच राहीली आहे हे सर्व होत असताना शिक्षणाचा दर्जा घसरत आहे.

तर आरोग्याच्या बाबतीत ग्रामीण व शहरी असा फरक असून आरोग्य विषयक समस्या अधिक असून येथे ही प्रादेशीक असमतोल जाणवतो प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा पुरविण्यात सार्वजनिक आरोग्य क्षेत्राची कामगीरी चांगली आहे. मात्र अजूनही सरकारने यावरील खर्च वाढवणे आवश्यक आहे कारण ग्रामीण भागातील उपचारात्मक आरोग्य सेवांमध्ये गुणवत्ता व संख्यात्मक भर घालण्याची गरज आहे. जगातील आरोग्य संघटनेने सागितल्याप्रमाणे खर्च व्हावा असे मत लेखात व्यक्त केले आहे.''

''बाळासाहेब कोंडीबा माने. नोव्हेंबर 2004'' [25]

''या संशोधन लेखात चार जिल्हांचा तुलनात्मक अभ्यास करत पुढील निष्कर्ष काढले आहेत.

1) आरोग्य केंद्रामागील लोकसंख्येचे प्रमाण 1961-2000 या दरम्यान कमी करण्यात कोल्हापूर जिल्ह्यात समाधनकारक परिस्थिती आहे. सोलापूर आणि सांगली यांनी या संदर्भात प्रगती करणे गरजेचे आहे.

2) चारही जिल्ह्यांमध्ये आरोग्य उपकेंद्राची संख्या वाढविणे गरजेचे आहे.

3) कोल्हापूर जिल्ह्यात बालमृत्यू आणि मुलांचे मृत्यू यांचे प्रमाण विसंगत आहे.

4) एड्सचा विळखा महाराष्ट्रात, मुंबई व सांगली जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक जाणवतो.

5) गरोदरपणात, प्रसूती आणि प्रसूती काळात आरोग्य सेवांचा वापर करण्याचे प्रमाण चारही जिल्ह्यांत अतिशय समाधान कारक आहे.

6) मुक्त रोगाच्या लागणीचे प्रमाण चार जिल्ह्यात स्त्री-पुरुषांच्या संदर्भात परस्परांशी व्यस्त सहसंबध दर्शवितो.

7) सोलापूर जिल्ह्यांत माध्य.शाळा व वरिष्ठ महाविद्यालये स्तरावर मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण खूप कमी आहे.

8) प्राथमिक -माध्यमिक आणि वरिष्ठ महाविद्यालय या स्तरावर कार्य पध्दतीन्वये व्यस्त सहसंबंध दर्शवितो.

9) कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात उच्च शिक्षणात अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी दिसते.''

''खंडेवाले वसुधा पुरोहीत, नोव्हेंबर 2004''[26]

''या संशोधनपर लेखात मानव विकासाची संकल्पना आर्थिक वृध्दी आणि मानव विकास, महाराष्ट्र मानव विकास अहवाल 2002 सांगून लिंगाधारीत विकास निर्देशांक सांगितला असून महाराष्ट्र सरकारने महिला विषयक धोरणाचा आढावा घेतला असून या संपूर्ण विवेचनात स्त्रियांचे स्थान हे अपवादात्मक समजले जाते. आज मात्र ते नियमात्मक व लक्षणीय समजले जाते. मानव विकास अहवालातील महिलांच्या वास्तविकतेने हे दर्शविले आहे की महिलांची प्रगती संथगतीने परंतु निश्चित, शाश्वत स्वरूपात हात आहे असे मत व्यक्त केले आहे.''

"भोंग जी.एल नोव्हेंबर 2004"[27]

"या संशोधन पर लेखात 1960 पूर्वीचा महाराष्ट्र व त्यानंतरची प्रगती सांगून महाराष्ट्रातील मानवी विकासातील शिक्षणाची सद्य:स्थिती सांगितली आहे व महाराष्ट्रातील मानवी विकासातील शिक्षण विषयक समस्या सांगितल्या आहेत. त्यामुळे गुंतवणुकीची समस्या व अकार्यक्षमता, कमी पगार विषम प्रमाणात शैक्षणिक प्रसार आर्थिक संकटातील महाविदयालये विनाअनुदान महाविद्यालये यांच्या समस्या असून त्याचा मानवी विकासावर होत आहे. देशातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रामध्ये शिक्षणाचा प्रसार वेगाने वाढत आह. वेगवेगळ्या प्रकाराच्या संस्थांची संख्या दरवर्षी नव्याने वाढत आहे. मात्र शासनाने शिक्षणावरील गुंतवणूक वाढवली पाहिजे, शिक्षकांच्या योग्य नेमणूका, पगार, सामाजिक बांधिलकी, यांचा विचार करुन राज्यात संतुलित शिक्षण प्रसार कसा होईल याचाही प्रयत्न केला पाहिजे असे मत व्यक्त केले आहे.

" नेमाडे शोभा व चौधरी सरला.नोव्हेंबर–2004" [28]

"या लेखात महाराष्ट्रातील मानवी विकास आणि शिक्षण जळगांव जिल्हयाची शैक्षणिक पार्श्वभूमी प्राथमिक, माध्यमिक उच्चमाध्यमिक जळगांव जिल्हयाची तालुका निहाय साक्षरता सांगून 1991 मध्ये राज्यात साक्षरतेच्या प्रमाणात जिल्हा 13 व्या क्रमांकावर होता 2001 मध्ये तो 17 व्या क्रमांकावर गेला व या बरोबरच जिल्हयातील वेगवेगळया तालुक्यात साक्षरतेच्या बाबतीत असलेल्या संधी उपलब्ध झाल्याने मागास व आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांना शैक्षणिक सवलती यामुळे जिल्ह्याचा शैक्षणिक विकास झाला आहे. राज्याच्या तुलनेत जळगांव जिल्ह्याचा साक्षरतेत ग्रामीण भाग विशेषत: आदिवासी भागात साक्षरतेत समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामध्येही पुरुषाच्या तुलनेत स्त्रियांची साक्षरता फारच कमी आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सक्षम मानवी भांडवलाची निर्मिती हे ध्येय शिक्षण क्षेत्राला घ्याव लागणार आहे असा विचार त्यांनी या शोधनिबंधात मांडला आहे."

"खंदारे विलास.नोव्हेंबर 2004"[29]

या संशोधन लेखात विकास हा मानवाचा सुखी जीवनाचा मुलभूत आधार आहे. खरा मानव विकास जाणून घेण्यासाठी मानवी विकास वंचन निर्देशांक महत्त्वाचा ठरतो. या निदेशांकावरुन सुखसुविधांपासून मानव किती वंचित आहे हे लक्षात येते. हा निर्देशांक तयार करण्यासाठी मानवी विकास मापनातील निर्देशांक उपयोगी पडतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर शिक्षण, उत्पन्न आणि आयुर्मान या निर्देशांकाची जी कमाल आणि किमान मर्यादा ठरविण्यात आली या निकषांनुसार महाराष्ट्रातील 2001 चा मानवी विकास वंचन निर्देशांक 0.55 एवढा येतो. शुन्याजवळ जाणारा मानवी विकास वंचन निर्देशांक उच्च मानव विकास दर्शवितो. महाराष्ट्राचा मानवी विकास वंचन निर्देशांक शुन्यापासुन फार दुर (55) अंतरावर आहे.

या मानव विकास निर्देशांकानुसार महाराष्ट्रातील 55 % लोक मानवी विकासापासुन वंचित आहेत. ही महाराष्ट्राच्या मानवी विकासातील वास्तविकता आहे. महाराष्ट्रातील मानव विकास उच्च प्रतिमा ठेण्याकरीता प्रतिव्यक्ती उत्पन्न, आरोग्य, रोजगार इत्यादी घटकातील विषमता दूर करणे अनिवार्य आहे. तसेच केरळ या राज्याप्रमाणे राज्यातील पायाभूत सुविधांवर अधिक लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे.

"भंगाले जयश्री दिलीप.नोव्हेंबर 2004"[30]

"या संशोधनपर लेखात आर्थिक विकास, शिक्षण, व मानवी विकास यांचा धनात्मक सहसंबध शिक्षणाचे अर्थशास्त्र, उदय व विकास ऐतिहासिक आढावा शिक्षणाद्वार गुरूरूपी भांडवालाचे फलन तर गुरूरूपी भांडवल हे शिक्षणाचे फलन होय विकसीत देशांत त्यांची निर्मिती संचय प्रमाण जास्त तर अविकीसत देशांत कमी हे सांगुन जळगांव जिल्हा याचा क्षेत्रीय अभ्यास मांडला असून निष्कार्षमध्ये

1. जळगांव जिल्ह्यात सर्वांसाठी शिक्षण संपूर्ण साक्षरता असून सध्या सोडवलेली नाही.
2. शिक्षणावरील एकूण खर्चाचे प्रमाण दरडोई वाजवी प्रमाणापेक्षा कमी आहे.

3. बेरोजगारी, अपव्यय, अपुरा वावर व विषमतेमुळे शिक्षणावरील सार्वजनिक व्ययाचा मोठा मात्र अनुत्पादक शासकिय अनुदानाचा हेतू असवा.
4. शिक्षणावरील वाढती क्षेत्रिय व वर्गीय विषमता अन्य उत्पन्न गटांतील विद्यार्थी तांत्रिक व्यवसायिक शिक्षणापासुन वंचित विशेषत: तांत्रिक व व्यवसायिक शिक्षणाच्या सोयी सुविधा शहरी भागात केंद्रीत झालेल्या आहेत. मागास व ग्रामीण भागात त्या अपुऱ्या आहेत.
5. शिक्षणाची खालवती गुणवत्ता दिसून येते. या समस्या व निष्कर्ष सांगितलेले आहेत.

"छापेकर शरचद्र जानेवारी 2012"[31]

"या संशोधनपर लेखात आजच्या जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर मानव संसाधन विकासाची उद्दिष्ट्ये साध्य करावयाची असल्यास कालबाह्य पध्दतीचा त्याग करावा लागेल. व्यापक दृष्टीवर आधारित असलेल्या मुल्याधारित आणि वैश्विक मान्यता असलेल्या मानव संसाधन विकास पध्दतीचा अवलंब आजच्या स्थितीत उपयुक्त ठरेल.

1. सांस्कृतिक प्रतिसाद : विविध प्रकारच्या सांस्कृतीक ओळख करून घेण्याचे प्रयत्न.
2. सांस्कृतिक स्वीकार्हता वाढविण्याचे प्रयत्न.
3. आंतर सांस्कृतिक सहकार्याची भावना रूजविण्याचे प्रयत्न.
4. आंतर सांस्कृतिक कर्मचारी संघाची क्षमता वृध्दींगत करण्याचे प्रयत्न.
5. ज्ञानमुक्त कर्मचारी उपलब्ध करून घेणे व त्यांना टिकवण्याचे प्रयत्न.

वैश्विक दृष्टीकोन लाभलेले परंतु स्थानिक पातळ्यावर असणाऱ्या परिस्थीतीशी समायोजन करुन शकणारे मनुष्यबळ निर्माण करणे ही आजची प्राथमिकता आहे यात संदेक नाही आहेत."

"चौधरी मोहन किसनराव.नोव्हेंबर –2004"[32]

"या संशोधन लेखात मानवी विकास ही प्रक्रिया मुलभूत गरजांची पूर्तता करावयाची असते. विकासाच्या निर्देशांक शिक्षण व आरोग्य हे दोन महत्वाचे निर्देशांक आहेत. सध्या मानवी विकासाबाबत

संपूर्ण देशात ते उद्दिष्ट आहे. मात्र महाराष्ट्रातील मानवी विकासात दिसून येते. कारण महाराष्ट्र राज्यामध्ये 9.37% लोकसंख्येपैकी10.6 दशलक्ष लोक झोपडपट्टीत राहतात. मानवी विकास अहवालानुसार एकट्या मुंबईत 49% लोक झोपडपट्टीत राहतात. शिक्षण व साक्षरता यामध्ये ही महाराष्ट्रात किमान व कमाल परिणामांची मोठी तफावत आहे. मुंबईची सरासरी साक्षरता 82.62 % आहेत नंदुरबार या जिल्ह्यात साक्षरता 56.6% आहे महाराष्ट्र मानवी विकास अहवालात साक्षरता, दरडोई उत्पन्न, दारिद्र्य इत्यादी घटक प्रादेशिक विषमता जाणवते. महाराष्ट्राचे चार विभाग आहेत ते खालीलप्रमाणे होत.

1. पश्चिम महाराष्ट्र - औदयोगिक दष्टया प्रगत आहे .
2. विदर्भ हा विभाग शेतीप्रधान आहे.
3. मराठवाडा हा विभाग शेतीप्रधान आहे.
4. खानदेश हा विभाग शेतीप्रधान आहे.

महाराष्ट्रातील मोठी शहरे लोकसंख्येतील संख्यात्मक दृष्ट्या दर्शवितात. परंतु गुणात्मक दृष्ट्या विषमता दर्शवितात.शिक्षण व दारीद्र्यातील विषमता कमी करण्यासाठी शासनाने गेल्या 10 वर्षात विविध उपाय योजले आहेत. त्यामुळे 1960-2000 पर्यत 23.72% पर्यत घरभाडे तर देशाच्या स्थुल राष्ट्रीय उत्पन्नाच्या 6 % एवढा खर्च उच्च शिक्षणावर झाला पाहिजे असे अनेक तज्ज्ञांनी सुचवले आहे. या शिवाय विविध योजना शासनाकडून राबवल्या जात आहे. महाराष्ट्रातील मानवी विकासातील प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी सरकारी यंत्रणा कार्यरत आहे.''

"जाधव तुकाराम .नोव्हेंबर 2002"[33]

2001 मध्ये 173 देशामध्ये केलेल्या सर्व्हेक्षणा प्रमाणे, मानवी विकासा बाबतीत भारताचा कमांक 124 वा होता तर 1999 मध्ये तो 126 वा होता म्हणजे आम्ही प्रत्येक वर्षी जगातिक स्तरातील एक पायरी वर चढत आहोत.

महाराष्ट्राप्रमाणे देशातील इतर राज्येही आपआपला मानव विकास अहवाल तयार करत आहेत त्यामधून लोकांचे दरडोई उत्पन्न लोकसंख्येच्या राहणीबाबतची माहिती इत्यादी गोष्टी समजत

आहेत. अशा अहवालात समाजातील अनुसुचित जाती-जमाती गरीबी रेषेखालील लोक व अल्पसंख्याक समाजाचीही माहिती असते ही चांगली बाब आहे. गेल्या 20-25 वर्षापासून महाराष्ट्रात विभागिय असमतोलचे चित्र समोर येत आहे. हा अनुशेष दूर झाला पाहिजे. सध्या विभागिय अनुशेषा पेक्षा जिल्हया-जिल्ह्यातील विकासातील तफावत व अनुशेष हा अधिक महत्वाचा प्रश्न बनत आहे. तो दुर करण्यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात विकासासाठीच्या खर्चाची पुनर्रचना व पुनर्रबांधणी करावी लागेल. तर दुसऱ्या बाजुला पाश्चात्य देशाप्रमाणे शासनाने मानवी विकाससाठी उपलब्ध केलेल्या सोयी-सुविधा बरोबरच खाजगी क्षेत्राकड्न मिळणाऱ्या सोयी-सुविधांचा विचार करुन खाजगी गुंतवणूक वाढवण्यावर भर दिला पाहिजे.

सारांश रुपाने ज्या-ज्या निकषावर भारतातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र मागे पडला आहे. त्याबाबतीत पुढील 10 वर्षाची स्पष्ट उद्दिष्ट्ये घालून दयावी लागतील व ती साध्य करण्यासाठी समयबद्ध कार्यक्रम राबविला पाहिजे व या धोरणाची चर्चा मानवी विकास अहवालात आली पाहिजे असे मत व्यक्त केले आहे.

"नंदनवार कल्पना.नोव्हेंबर–2004"[34]

"या शोधनिबंधात स्त्रीयांविषयक सामाजिक मतप्रवाह महाराष्ट्रातील स्त्रीयांविषयक वास्तविकता व महिला संसाधनाचा विचार करताना सामाजिक, सांस्कृतीक घटक रुढी, परंपरा, अंधश्रध्दा लिंगभेद, जातीयता, समानसंधिचा अभाव या सारख्या समस्या असून वेगवान प्रगतिच्या क्षितीजावर आंतरराष्ट्रीय बाजारपेठात भारतीय स्त्रायांमध्ये महाराष्ट्रातील महिलांचा अधिका-अधिक सहभाग वाढण्याची गरज निर्माण झाली आहे. समाजातील इतर घटकांबरोबरच शिक्षणाचे स्त्री शक्तीत वाढण्यासाठी महाराष्ट्रातील महिला संसाधनाचा विकास करावा असे मत मांडले."

"पाटील सुभाष .श. जुलै – 2012"[35]

"भारताची सातवी जनगणना देशातील 28 राज्ये 7 केंद्रशासित प्रदेश 640 जिल्हे, 5924 उपजिल्हे आणि 7936 नगरात संपन्न झाली. महाराष्ट्रातील 35 जिल्हे 355 तहसिल, 535 शहरे आणि 43,637 खेड्यांमध्ये ही जनगणना संपन्न झाली. प्रस्तुत लेखातून 2011 च्या अनुषंगाने मानवी संसाधन

विकासाची भारत व महाराष्ट्र यात तुलना केली आहे. त्यामध्ये 2011 च्या जनगणनेनुसार, लोकसंख्या वृध्दीदरात घट पुरुषाच्या तुलनेत स्त्रियांच्या संख्यातील वाढीचा दर जास्त स्त्री-पुरुष प्रमाणात वाढ एकूण साक्षरतेत वाढ पुरुष व महिला साक्षरता प्रमाणतील तफावत कमी या समाधानकारक बाबी आहेत. परंतु 0 ते 6 वर्ष वयोगटातील मुलींच्या संख्येत घट विशिष्ट प्रदेशातच लोकसंख्येच्या घनतेत वाढ या निराशाजनक बाबो आहेत.

मात्र मुलींच्या संख्येत वाढ, महिला साक्षरता प्रमाणात वाढ संतुलित विकास त्या निमिर्तीने लोकसंख्येचे विकेंद्रीकरण ही भावी काळातील मोठी आव्हाने केंद्रसरकार, राज्यसरकार आणि स्थानिक सरकारांसमोर आहेत आणि त्या अनुषंगाने विकासाची धोरणे निश्चित केली जावीत.''

"भारती दीपक . एप्रिल – जून 2010"[36]

''या संशोधनपर लेखात संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकास कार्यक्रमाफत मांडण्यात आलेल्या मानवी विकास संकल्पनेच्या व्याख्या मानव विकास निर्देशांकातील महत्त्वाचे निर्देशांक व मराठवाडा, मराठवाड्यातील जिल्हानिहाय लोकसंख्येची स्थिती, साक्षरता, वृध्दीदर आरोग्य मराठवाडयातील आर्थिक वृध्दी निर्देशांक मानव विकासाचे आढावा पत्रक सांगुन मराठवाडयाने देखील विकासाचे असे प्रारुप स्वीकारले क्रमप्राप्त ठरते की, जे न्याय बुध्दी रोजगार उत्पन्न करणारी वृध्दी व सहभागात्मक वृध्दी यावर अधिकार भर दते.

शेवटी 2007-2008 च्या जागतिक मानवी विकास अहवालाने व्यक्त केलेल्या पर्यावरणीय बदलांच्या धोक्याची भिती लक्षात घेता व त्यांनी जागतिक पर्यावरण विषयक समस्येबाबत अपेक्षा केलेल्या सामुदायिक प्रयत्नांचा विचार करता मानवी विकासा बरोबरच सर्वसमावेशक व निरंतर विकासासाठी देखील सर्व पातळयांवर सामुदायीक प्रयत्न हेच आधार ठरतात.''

"ठोंबरे सर्जेराव .जानेवारी– मार्च –2006"[37]

''या संशोधन लेखात. विकास प्रतिमानामध्ये मिश्र अर्थव्यवस्था ग्रामीण बदलेले स्वरुप नवगांधीवादी प्रतिमान, मनुष्यबळ विकास निसर्ग संसाधने व मनुष्यबळ या संबंधी विचार मांडला असून राष्ट्राची समृध्दी उपलब्ध नैसर्गिक संसाधने व मनुष्यबळ यांच्या निरंतर उत्पन्न क्षमतेवर अवलंबून असते.

भारताला नैसर्गिक संपदा व मनुष्यबळ या दोहोंच्यां बाबतीत तुलनात्मक अनुकूलता आहे. अदयावत आहे ती उपलब्ध असलेल्या तंत्रज्ञानाच्या आधारे मनुष्यबळाची क्षमता वाढ वन् प्रत्यक्ष नैसर्गिक संपदेचे देशव्यापी प्रवाही व समन्वयीत कृषी व इतर जैविक उत्पादन प्रक्रियेस सहाय्यकारी होणारे जोड निर्माण करणाची बुध्दी आणि श्रम यांच्यात फारकत झाल्यामुळे शेती आणि ग्रामीण भारत विकलांग झाला आहे'' ही महात्मा गांधीनी व्यक्त केलेली खंत मी माझ्या क्षमतेप्रमाणे आपल्या पर्यंत पोहोचवली त्यासाठी समग्र व स्थानिय व्यक्तिगत योजनाही सुचवल्या आहेत असे मत व्यक्त केले आहे.''

"व्यवहारे रामचंद्र. एप्रिल – जून 2013"[38]

''या सशोधन लेखात जीवनाला बनविण्यासाठी मानवी विकास आवश्यक आहे. आनंद, सुख, समाधानाची परिस्थिती प्रत्येकाच्या आयुष्यात आली पाहिजे. ते स्वप्न न रहाता वास्तव बनले पाहिजे यासाठी समतोल सर्वागीण शाश्वत मानवी विकासाची गरज असून त्यासाठी सर्वांचा पुढाकार आवश्यक आहे. हे सांगून भारत सरकारचा 2001 मध्ये प्रसिध्द झालेला. महिला मानव विकास अहवाल विविध राज्यांची परिस्थिती दर्शवितो. मानव विकासाची संकल्पना सदोष नाही ही संकल्पना काळानुसार झपाट्याने बदलते आहे. व त्यासाठी राज्यांनी किमान दोन वर्षातून एकदा विकास निर्देशांक तपासणे आवश्यक आहे. त्यासाठी विकास निर्देशांक तक्ता दिला असून मराठवाड्यातील मानव विकासासाठी उपाययोजना सांगितल्या आहेत.''

" जॉन ड्रेज व अमर्त्यसेन "[39]

''भुख आणि सामाजिक कृती ''

''या पुस्तकात भुख कशी निर्माण होते व तिचे निराकरण कसे करता येईल. याची चर्चा असून जगातील विविध देशांत व भारतातील पश्चिम बंगाल येथे पडलेल्या दुष्काळात लाखो लोक अन्ना शिवाय मृत्यू पावले. त्यांच्या मते वरवर पाहिले तर पावसाअभावी पिक न आल्याने दुष्काळ पडतो पण प्रत्यक्षात दुष्काळाच्या काळात धान्यांची साठेबाजी मोठयाप्रमाणात होऊन अन्नधान्याच्या किंमती प्रचंड वाढतात अगोदरच दुष्काळात उत्पन्न घटल्यांने गरिब जनता अन्न खरेदी करू शकली नाही. परिणामी लोक मृत्यू

पावले हे अन्नधान्याचा दुष्काळ पडला म्हणून घडत नसून त्या काळात लोकांच्या जवळ धान्य खरेदीसाठी पैसा नव्हता, जर लोकांची खरेदी शक्ती वाढवली असती तर इतके लोक मृत्यू पावलेच नसते. हे सांगुन दुष्काळासारख्या परिस्थिवर सामाजिक कृती म्हणजे शासकिय व सामाजिक प्रयत्न महत्वाचे असतात असे प्रतिपादन केले आहे.''

''अभय बंग 2011''[40]

'' सामाजिक आरोग्याबाबत त्यांनी दुर्गम आदिवासी भागात कार्य केले खास करून बालकांचे कुपोषण या बाबत महत्वाचे कार्य केले. मानवी विकासाबाबत त्यांनी आपले मत मांडताना असे मत मांडले आहे की सामाजिक जोवनामध्ये कोणत्याही बदलाला एक सारखा वाव मिळत नाही. ग्रामिण भागातील बदलापेक्षा शहरी भागातील बदल गतिमान व लवकर असतात. आपण विकसित भागातील प्रगती व इतर प्रगती सापेक्षपणे पाहू शकतो. अगदी छोटासा भाग हा ''आधुनिक'' होण्याच्या प्रयत्नात असतो सतत पाश्चातीकरणाचा प्रभाव हळ्हळू समाजावर पडत रहातो तसा सामाजिक बदल ही घडून येतो असे मत व्यक्त केले आहे. ''

''**अमर्त्य सेन– 2004**''[41]

''या लेखामध्ये असे नमुद केले आहे को मानव हा विकासाचा प्रतिनिधी लाभार्थी आणि निर्णय कर्ता आहे. पण त्याचबरोबर तो प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे उत्पादनाचे प्राथमिक साधन आहे. मानवाची ही दुहेरी भूमिका नियोजन व धोरण निश्चिती मधील साध्य आणि साधनाकरीता अनुकुल वातावरण पुरवते कोणीही मानवी सुखाची हमी देवू शकत नाहो आणि जे लोक -जी निवड करतात ते त्यांच्या स्वत:शी संबंधीत असते. परंतु विकासाच्या प्रयत्नाने मानवासाठी (व्यक्ती आणि सामुहिक) एक अनुकूल वातावरण निर्माण केले पाहिजे की; ज्यामुळे मानवाला आपल्या क्षमतांचा पूर्ण विकास करता येईल आणि गरजेनुसार व आवडीनुसार उत्पादक आणि क्रियाशिल जीवन जगण्याची संधी मिळेल. अशा प्रकारचा आशावाद व मानव विकास निर्देशांकाची वास्तविकता स्पष्ट केली आहे.**''**

"उत्पल योशपाध्याय जून 2010"[42]

"भारतातील ग्रामिण व शहरी भागातल्या 80% कामगारांकडे विशिष्ट प्रकाराच्या कौशल्याचा अभाव आहे. या कौशल्याच्या कमतरतेमुळे भारताच्या विकासाच्या आशांवर विपरीत परिणाम होवू शकतो. कौशल्य असलेल्या लोकांनी "तमाम भारताचे प्रतिनिधित्व केले नाही तर लोकसंख्यच्या रुपाने मिळलेला बोनस थोड्या काळात निकामी ठरेल. त्यामुळेच अकुशल लोकांचे कुशल मानवी लोकांत रुपांतर करण्यात व्यवसायिक व शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असते. म्हणून सरकारने IT, व ITI सारख्या संस्थांच्या निर्मितीवर भर दिला. 1956 मध्ये केवळ 59 संस्था अशा प्रकाराच्या होत्या 2008 पर्यंत त्याची संख्या 5114 झाल्या तर सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील सहयोगातून 1936 सरकारी ITI चा दर्जा सुधारण्यावर भर दिला आहे. सध्या उद्योग क्षेत्र व सरकारी संस्था यांच्या माध्यमातून बाजारातील गरजा विचारात घेऊन चांगले उत्पादन क्षमता असणारे कुशल कामगार तयार करण्यासाठी ITI मध्ये सुधारित अभ्यासक्रम तयार करणे, प्रशिक्षण इ.मार्गाचा अवलंब केला जात आहे. ज्यामुळे अर्थव्यवस्था उच्च विकास दरावर पोहचेल असे मत या लेखात व्यक्त केले आहे.

"पवार अशोक शंकरराव व चव्हाण अशोक रामराव, जुन–2010"[43]

मजुर किंवा कर्मचारी हाताळणी योग्य पध्दतीने झाली तरच व्यवसाय व उपक्रम यशस्वी होतो परिणामी यावरच देशाच आर्थिक विकास अवलंबून असतो. त्यामुळे मानव संसाधन विकास महत्त्वाचा सांगून मानव संसाधन विकासासाठी पुढील उद्दिष्ट्ये स्पष्ट केली आहेत :-

1) मानवीय संसाधनाचा महत्वपूर्ण उपयोग करणे .

2) मानव संसाधनाच्या योग्यतेमध्ये वाढ करणे.

3) सक्षम कर्मचारी व कामगार वर्ग निर्माण करणे.

4) शेती व्यावसायीकांना प्रेरणा देणे.

5) कार्यक्षम कर्मचाऱ्यांचा पुरवठा वाढवून मानवी संसाधन विकासावर भर देणे महत्वाचे आहे कारण मानवी संसाधनाच्या विकासासाठी पुढील बाबी महत्वाच्या आहेत.

1) नैसर्गिक संसाधनाची उपलब्धता.

2) भांडवल निर्मिती.

3) नैसर्गिक व संसाधनाचा परिणामकारक उपयोग

4) ज्ञानाची उच्च पातळी.

5) कार्यक्षमता व कौशल्याचे संवर्धन.

6) सुयोग्य सवा.

7) योग्य भूमिकेने न्याय देण्याची क्षमता

8) उच्च मनोधैर्य व उच्च दृष्टीकोन सांगून मानव संसाधन नियोजन मांडल आहे त्याच्या व्याख्या व मानव संसाधन नियोजनाची वैशिष्ट्ये व उद्दिष्ट्य सांगून मानवी संसाधन नियोजन प्रक्रिया सांगुन त्याचे निष्कर्ष व मानव संसाधन विकासा संदर्भातील शिफारशी सांगितल्या आहेत .

"मानव विकास अहवाल 1990" [44]

"आर्थिक विकासाचे मोजमापासाठी प्रामुख्याने स्थूल राष्ट्रीय उत्पादन (GNP)या निर्देशांकाचा आधार घेतला जात असे या निर्देशांकाच्या मदतीने विकासाचे वास्तव चित्र दृष्टीक्षेपात येत नव्हते. म्हणून विकासाचे व्यापक असे विस्तारित निर्देशांक तयार करुन आर्थिक विकासाचे मोजमाप करण्याच्या प्रयत्नांनी वेग घेतला. या प्रयत्नामधून "मानव विकास निर्देशांक" ही संकल्पना 1990 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाचा विकास कार्यक्रमां माफत मांडण्यात आली.

या अहवालात मानव विकास म्हणजे लोकांच्या निवडी विस्तारण्याची प्रक्रिया होय तत्वत: या निवडी अमर्याद आणि काळानुरुप बदलणाऱ्या आहेत, पण विकासाच्या प्रत्येक पातळीवर तीन घटक अत्यंत महत्वाचे आहेत त्यामध्ये आरोग्यदायी व दीर्घायुषी जीवन जगणे, ज्ञानप्राप्ती करणे, चांगले जीवनमान जगण्यासाठी लागणाऱ्या संसाधनाची निवड करण्याची सवलत मिळणे, असे नमुद केले आहे. या अहवाला मध्ये मानवी विकासामध्ये आर्थिक वाढ कशी होते किंवा ती कमी असण्याची कारणे काय आहेत याची चर्चा केलो असून मानवी विकासाचे मापन त्याचा अर्थ आणि नवीन निर्देशांकाची चर्चा कलो आहे.

या अहवालात गेल्या तीन दशकातील मानवी विकासाच्या अहवालाचे 14 देशातील विकासाचा अनुभव सारांश रुपाने एकत्रिकरण केले आहे व आंतरराष्ट्रीय स्तरावर अशी आर्थिक परिस्थिती जी मानवी विकासाला पोषक होईल अशी करण्यात यावी असे मार्गदर्शन करणे विकसनशील देशांनी ही त्याच्या जवळ असणाऱ्या स्त्रातांचा वापर विकासाचे ध्येय गाठण्यासाठी केला पाहिजे. प्रत्येक देशाने आपले राष्ट्रोय अंदाजपत्रक तयार करताना आपली क्षमता व परदेशाची गरज मानवी विकासासाठी कशी गरजेची आहे हे नमूद केले आहे. या अहवालात चांगले मानवी विकासाचे ध्येय गाठण्यासाठी उच्च प्रतीचे मानवी स्वातंत्र्य दिले पाहिजे असे सुचित करतो. सर्वात महत्वाची बाब म्हणजे मानवी विकासासाठी होणाऱ्या खर्चाचे गुणोत्तर हे सार्वजनिक खर्चाचे धोरण बनले पाहिजे.

डॉ.महेबुब उल हक व अमर्त्य सेन यांनी मांडलेल्या मानवी विकास निर्देशांकाच्या संकल्पना 1990 च्या अहवालात संयुक्त राष्ट्रसंघाने स्विकारुन जगातील विविध देशांचा निर्देशांक तयार केला व तेव्हा पासून प्रती वर्षी मानव विकास अहवालामध्ये निर्देशांकाचा उल्लेख केला जातो.''

"मानव विकास अहवाल 1991"[45]

''मानव विकास निर्देशांकावरील दुसरा अहवाल होय, पहिल्या अहवाल नंतर जगातील वेगवेगळ्या देशांमध्ये निर्देशांक बद्दल दुर्लक्ष होते त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आर्थिक नसून राजकिय इच्छा शक्तीचा अभाव होय. गरीब व विकसनशिल देशांनी आपल्या राष्ट्रीय बजेट व आंतरराष्ट्रीय मदतीचा मानवी विकासाकरीता उपयोग करुन घेण्यासाठी प्रयत्न याची चर्चा अहवालात केली आहे. देशातील मानवी सपत्तो चांगली कार्यक्षमता विभागणीसाठी आर्थिक वाढीसाठी हा फरक महत्वाचा या अहवालमुळे मानवी विकासामध्ये परिणामकारक घटक हा सार्वजनिक, सामाजिक विकास, खाजगी भूमिका पक्की करण्यासाठी मदतीचा ठरू शकेल व महत्वाचा मुद्दा म्हणजे उपलब्ध असणारा निधी योग्य प्रकारे खर्च कला जातो. मानवी विकास हा आर्थिक वाढीमध्ये कठीणही ठरू शकतो कारण आर्थिक विकास झाला म्हणजे मानवी विकास झाला असे होत नाही या अहवालात उच्च दर्जाचा मानव विकास साधण्यासाठी मानवी स्वातंत्र्याच्या व निवडीच्या संधी त्याला उपलब्ध असणे महत्वाचे आहे त्यासाठी मानवी विकासावर होणारा खर्च व त्याचे

प्रमाण सार्वजनिक खर्चासाठी नियोजनाचा एक मुख्य मार्गदर्शक तत्व म्हणून बनला पाहिजे मानवी विकास करण्यासाठी राजकिय धोरण योग्य असेल तर लोकांच्या गुणवत्ता विकासाला व पर्यायाने मानवी विकासाला चालना मिळते तसेच सर्वच देशांनी या प्रकारे मानवो विकासासाठी प्रयत्न करत राहवे असे मत मांडले आहे.

"मानव विकास अहवाल 1992"[46]

"जगातील विविध देशांमधील विकासातील अंतर व असमानता यावर प्रयत्न टाकून जगातील अत्यंत गरीब लोकांच्या गरजा ते पुरवितात को नाही किंवा त्या पुर्ण करण्यामागे ते अयशस्वी होतात का याची पाहणी या अहवालात मांडली आहे व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत जगातील सर्वच देशांना व देशातील लोकांना अशी एकमेव जागतिक बाजार यंत्रणा व त्याचा वापर आपल्या फायद्यासाठी करून घेणे हा होय. सर्वात महत्वाची बाब या अहवालात जागतिक स्तरावर असमानता किती आहे हे सांगताना एक्ण लोकसंख्येतील20% श्रीमंताना 20% गरीबांच्या उपयोगापेक्षा 150 पट उपलब्धी मिळते बाजार यंत्रणा ही देशाच्या उत्पन्नाची समान विभागणी घडवून आणण्यासाठी पुढील दोन पध्दती सुचविल्या आहेत. (1) मानवी विकासासाठी लोकांच्या मध्ये प्रचंड गुंतवणूक करणे आणि राष्ट्रीय तांत्रिक क्षमता समृध्द बनवल. ज्यामुळे विकसनशिल देशांना आंतराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये स्पर्धा निर्माण करण्या इतपत सशक्त बनविल होय.(2) आंतराष्ट्रीय स्तरावर सुध्दा काही मुलभूत सुधारणा आवश्यक आहेत. ज्यामध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने सामाजिक विकास या विषयावर आतराष्ट्रीय पातळीवर अशी परिषद भरवलो को त्याचा परिणाम जगातील सर्वच राष्ट्रांवर व लोकांच्यावर झाला पाहिजे. हा अहवाल जागतिक पातळी वरील सुधारणा सुचवताना बाजार यंत्रणा हे साधन आहे, व मानवी विकास झाला या पेक्षा ज्ञानाची व कौशल्याची विभागणी ही योग्य प्रकारे होते. जागातिक स्तरावर समानता प्रत्येक देशाच्या कार्यक्षमता कुवत यांच्या नुसार एकत्र येणे गरजेचे आहे व समानता करण्याचा प्रयत्न केला पाहिजे."

"मानव विकास अहवाल 1993"[47]

"या अहवालाने लोकांचा सहभाग देशाचा विकास व मानवी विकासातील बदल यांचा अभ्यास करुन समाजातील देशातील किती वेळ आणि कसे विकासाच्या प्रक्रियेत भाग घेतात. किंवा आपल्या

जीवनात आहार देणाऱ्या अनेक घटक असतात त्यात किती भाग घेतात. अनेक विकसनशील देशांमधील लोकशाहीचे राज्य उध्वस्त होणे, विविध लोकातील साम्राज्यवाद ढासळणे, हुकुमशाहो उलथून टाकणे, जगभर लोक संघटीत होत आहेत. इतिहास काळापासुन हे असेच चाल् आहे. मात्र आजच्या काळात लोकसहभाग हा देशाच्या व मानवी विकासातील अत्यंत महत्वाचा भाग बनत आहेत असे सांगतो.

लोकांचा विकासामध्ये सहभाग मोजण्याच्या पध्दती या अहवालात सांगितल आहेत. त्यामध्ये लोकांच्या उपयोगाचे संबधीत चांगलो बाजार यंत्रणा, सरकारचे निर्णय विकेंद्रीत स्वरुपात घेण्याची यंत्रणा, गैर सरकारी संघटना (N.G.O.) यांचे कार्य शिवाय बेरोजगारांची होणारी भरमसाठ वाढ बेरोजगारांना रोजगार देण्यासाठी भरीव योजना सांगितली आहे. संयुक्त राष्ट्र संघाचा मानव विकास निर्देशांक अहवाल समितीच्या मते वेगाने मानवी विकासासाठी मानवी सुरक्षेच्या नवीन संकल्पना, मानव विकासासाठी लागणाऱ्या शिकाऊ नवीन पध्दती राज्य सरकार आणी बाजार यंत्रणा याच्यात भागीदारी असावी, जागतिक व राष्ट्रीय स्तरावर सहकार्याच्या नवीन पध्दती, व आंतराष्ट्रीय स्तरावर देशा-देशांतील सहकार्याचे नवीन मार्ग शोधले पाहिजेत तरच सर्वच देशातील मानवी विकासातील अडथळे कमी होण्यास मदत मिळते.''

"मानव विकास अहवाल 1994"[48]

"मानवी हक्क व सुरक्षितता ही नवीन संकल्पना या वर्षीच्या मानवी विकास अहवालात मांडलो शासनापेक्षा सामाजिक लोकांना सुरक्षितता व सुरक्षेचे महत्त्व जास्त असे सुचविले आहे. देशा देशांतले शास्त्र व त्यांच्या विकासापेक्षा विकास महत्वाचा आहे या अहवालात जागतिक पातळीवर, देशपातळीवर अशा दोन्ही पातळीवर नेमका मानवी विकास तपासला गेला. कारण मानवाचा शाश्वत विकास महत्वाचा आहे. तो होण्यासाठी शांतता व सुरक्षा महत्वाची आहे. यासाठी जागतिक पातळीवर विकासासाठी शांतता व सहकार्याचा नव्या संकल्पना मांडल्या आहेत. युनोने या अहवालाच्या सहकाऱ्याने सामाजिक विकासाच्या जागतिक सामाजिक सनदेला मान्यता दिलो आहे. सामाजिक विकासासाठी मानवाची वाढती सुरक्षितता साध्य करण्यासाठी मानव विकासामध्ये भरपुर गुंतवणुक केलो पाहिजे सरकारांनी आपले धोरण शांततेसाठी ज्यादा सहभाग देणे संयुक्त राष्ट्र संघाने शाश्वत सुधारणेसाठी सर्व देशांना सांगणे,

विकासाच्या सहकार्याची संकल्पना वाढविणे जेणे करुन त्यामध्ये सातत्य राहील. युनोने फक्त मदत नव्हे तर सर्व देशात मानवी विकासाच्या प्रक्रियेत सातत्य कसे राहील हे पाहणे यासाठी प्रत्येक देशाने 20% राष्ट्रीय बजेट मध्ये आणि 20% परकिय देश युनो, आय.एम.एम.या सारख्या संस्थांच्या मदतीचा वापर मानवी विकासासाठी करणे आर्थिक सुरक्षा परिषद स्थापन करणे या बाबीची चर्चा या अहवालात आहे.''

''मानव विकास अहवाल 1995''[49]

''हा मानव विकास अहवाल प्रकाशित होत असताना विशेष गाजला कारण या अहवालात प्रथमच मानव विकासातील स्त्री-पुरुष विषमतेवर प्रकाश टाकला गेला. 1993 मध्ये व्हिएन्ना येथे झालेल्या मानवी हक्कावरील जागतिक षरिषदेमध्ये 171 देशांनी स्त्री आणि पुरुष यांना समान संधी देणारा जाहिरनामा स्विकारला मात्र सप्टेंबर 1995 सालो चीन बिजींग येथे जागतिक महिला परिषद भरणार होती त्या पार्श्व भूमीवर लिगधारित विकास निर्देशांक मांडण्यास सुरवात झालो या अहवालात मानव विकासातील लिंग भेदाचे मापन करुन निर्देशांक काढला जाऊ लागला. सोप्या शब्दात स्त्रियांच्या-षुरुष-सापेक्ष, आर्थिक, सामाजिक, व राजकिय विकासाची मापके विकसीत करुन असा निष्कर्ष काढला जातो.''जगातील कोणत्या समाजातील स्त्रियांना पुरुषा बरोबरीने अधिकार मिळालेले नाहीत. त्यामुळे लिंगधारीत विकास निर्देशांक GDI ही मानव विकास निर्देशांकापेक्षा वेगळी संकल्पना आहे. तीन भारतीय अर्थतज्ज्ञांनी विकसित केली. अमर्त्य सेन, सुधीर आनंद, मेघनाथ देसाई यांच्या मते जीवनाच्या सर्वच क्षेत्रात जगभरात स्त्रियांना षुरषांच्या तुलनेत विकासाच्या संधी कमीच मिळालेल्या आहेत. या निर्देशांकाने असे स्पष्ट झाले की देश गरीब असो किंवा श्रीमंत असो तेथे स्त्री-पुरुष समानता दिसुन येत नाही.''

''मानव विकास अहवाल 1996''[50]

''या मानवी विकास अहवालात ''आर्थिक वाढ मानवी मानवी विकासाचे साध्य''असे मुलभूत घोषवाक्य घातले आहे. जर मानवी विकास लवकर साध्य करायचा असेल तर आर्थिक वाढ हे एक चांगले माध्यम आहे. असे हा अहवाल सांगतो जर आर्थिक वाढ योग्य प्रकारे झाली नसेल तर,विकास बिनकामाचा व भविष्य नसलेला असा होतो. याचा अर्थ कुठल्याही देशाची आर्थिक वाढ ही योग्य दर्जाची

योग्य आकाराची व मानवी विकासाला पूरक नसेल तर ती मानवी विकासाला बाधा आणत, म्हणून आर्थिक वाढ होताना गरीबी कमी करणे दारिद्र्य कमी होणे व मानवी विकासात सातत्य असणे याला महत्त्व असते त्यामुळेच या अहवालात जगातील विविध देशांच्या मानवी विकासाचा निर्देशांक व त्याचा निष्कर्ष मांडताना असे म्हटले आहे की आर्थिक वाढ आणि मानवी विकास याच्यातील संबंध सातत्याने एका गतीने चालू राहिला पाहिजे व नियमितपणे चांगल्या दर्जाच्या व्यवस्थापनातून हा संबध मजबूत झाला पाहीजे या प्रक्रियेत आर्थिक वाढीत रोजगार वाढला पाहिजे तो गरिबांच्या जीवनापर्यंत पोहोचला पाहिजे त्यासाठी आर्थिक वाढीच्या नवनवीन संकल्पना मार्ग किंवा पॅटर्न विकसित केले पाहिजेत 21 व्याशतका पर्यत आर्थिक क्षेत्रात जागतिक पातळीवर कमकुवत अडथळा ठरणाऱ्या गोष्टी नष्ट करण्याचे तंत्रज्ञान विकसित झाले पाहिजे.''

''या अहवालामध्ये आर्थिक वाढीला प्रोत्साहन दयायचे असेल तर लोकांचे जीवनमान उंचावले पाहिजे व त्या संबधांतील लाकांच्या कारण मिमांसा हा अहवाल करतो. गेल्या 15 वर्षात जगातील काही देशांनी आर्थिक फायदे प्रचंड प्रमाणात मिळवल्याचे दिसुन येते. तर अनपेक्षितरित्या काही देशांचा ऱ्हास झाल्याचे दिसते. आर्थिक कामगिरीत विविध देशांच्या मध्ये प्रचंड तफावत झाली आहे. त्यामुळे गरिब व श्रीमंत देश अशी जगाची विभागणी झाली आहे. परिणामी सर्वच देशांनी अर्थव्यवस्थेची रचना आणि वाढ याकडे लक्ष देण्याची गरज आहे. मानवी अधिक योगदान देण्यासाठी दूरगामी परिणाम करण्याच्या चांगल्या योजना आखण, गरिबी कमी करणे, दारिद्र्य कमी करणे ही आवश्यक आहे प्रत्येक देशात मानव विकासाची प्रगती कमी आधिक वेगाने सुरु आहे पंरतु त्यामध्ये खंड पडून देता नवनवीन दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून रोजगाराच्या सोयी वाढवणे आर्थिक वाढीत लोकांना आधिकाधीक सामावून घेऊन ती शाश्वत बनवणे महत्वाचे आहे. अन्यथा मानवी विकासाशिवाय आर्थिक वाढ ही टिकणारी नसते.

''मानव विकास अहवाल 1997''[51]

''या अहवालात दारिद्र्य निर्मूलनासाठी मानवी विकास हि संकल्पना मांडून विविध देशातील वाढते दारिद्र्य व दारिद्र्याचे निर्मूलन करणे याची चर्चा केली आहे. दारिद्र्याचे आव्हान हे सर्वत्र आहे.परंतु

देशातील सरकारांनी नैतिक कर्तव्याने व आपल्या कृतीतून या आव्हानांचा सामना केला तर दारिद्र्य निर्मूलन होऊ शकते. जगात आर्थिक विकासाचे इतके स्त्रोत आहेत की, दारिद्रय मुक्त जग होऊ शकते. यासाठी योग्य दिशेने धोरणे व कृती केली पाहिजे.या वर्षाच्या मानव विकास अहवालात फक्त दारिद्रयावरच दृष्टिक्षेप टाकला नाही तर मानवी विकासाचा दृष्टिकोन दारिद्र्यातून लोकांना वर आणून जीवन जगता येते. जर उत्पन्नाचे व संपत्तीचे योग्य विभाजन झाले व लिंगाधारित समानता जागतिकी करणाच्या प्रक्रियेत लोकशाहीवादी देशाचा व सरकाराचा विकास या मुद्दयांना महत्त्व प्राप्त होते. दारिद्र्य निमूलन म्हणजे लोकांच्या गरजेप्रमाणे, आवडीप्रमाणे वस्तू न मिळणे आणि त्यामुळे नाइलाजाने दारिद्र्यात जगावे लागते. त्यामुळे गरज व आवडीप्रमाणे जगण्यात येणारे अडथळे बाजुला केले व जागतिक दबावापासुन लोकांना सुरक्षित ठेवले की ज्यामुळे दारिद्र्यात वाढ होणार नाही. हे प्रत्येक देशाने केले पाहीजे. सरकारने गरिबांच्यासाठी ध्येय धोरणे तयार करुन स्त्री-पुरुषांना सबल व आर्थिकदृष्ट्या सशक्त बनवणे. जीवनात निर्णय क्षमतेत सगळ्यांनी सहभाग घेतला तर,फायदा होतो. सरकारने मानवी विकासात गुंतवणूक वाढवणे, दारिद्र्यातील लोकांना शिक्षण देणे, यातून 21 व्या शतकाच्या पहिल्या दशकापर्यंत दारिद्र्याचे संपुर्ण निर्मूलन होऊ शकते. सरकारने नैतिक कर्तव्य समजून दारिद्र्य निर्मूलनावर भर देणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले.''

''मानव विकास अहवाल 1998''[52]

''या मानव विकास अहवालात मानव विकासासाठी उपभोग ही संकल्पना सांगून 20 व्या शतकातील जगातील वाढ व पर्यावरणाचा वापर, प्रमाण व त्यामधील विविधता याची चर्चा असून या शतकातील विकासाचे फायदे अधिकाअधिक लोकांना अन्न, वस्त्र, निवारा मिळला असून जगातील अब्जावधी लोकांचे राहणीमान आतपर्यंत अडलेल्या विकास व वाढीच्या वापरातून उंचावण्यात आले आहे. चांगली घरे, पुरेसे पाणी, वीज रोजगारासाठीची वाहतूक व्यवस्था, रिकामा वेळ, सुख हे सर्व कल्पनेपेक्षा जास्त मिळत आहे. परंतु पर्यावरणाच्या ऱ्हासातून होणाऱ्या प्रदूषणाचा परिणाम यावर अहवाल चर्चा करताना सांगतो को साधन संपत्तोच्या वापराचे फायदे असमान पध्दतीने विभागल्याचे दाखवतो

कारण जगातील श्रेष्ठ व श्रीमंत ग्राहक चांगल्या जीवनमानासाठी प्रचंड प्रदूषण करत आहेत व पर्यावरणाचा ऱ्हास होऊन त्याचा भार व परिणाम गरीबांच्यावर जास्त होत आहे.

पर्यावरणाचा व मानवी विकासाचा अत्यंत जवळचा संबंध आहे. पृथ्वीच्या प्रदुषाणाचा नैसगिक स्त्रोतांनाही धोका पोचत आहे. पर्यावरणाचे सातत्य, मालाचे जागतिकीकरण, आणि त्याचा वापर 21 व्या शतकात मानवाचा आर्थिक विकास व्हावा यासाठी लोकांचा सरकारचा योग्य दृष्टीकोन आहे का? हे अहवालात मांडले आहे. एखादया वस्तुच्या अधिक वापरामुळे वाढणारा दाब हा धोकादायक असतो विविध देशातील दारिद्र्य व असमानता यावर मात करताना दुसऱ्या बाजुला ग्राहक बाजार जगात विस्तारत आहे अनेक नवीन संधी निर्माण होत आहेत. यासाठी पर्यावरणास पुरक नवीन तंत्रज्ञान पध्दती यांचा विकास व वापर केला पाहिजे. यासाठी नागरिक व ग्राहकांचे शिक्षण प्रबोधन झाले पाहिजे पर्यावरणाचे संरक्षण आणि जागतिक परिणाम समजून घेऊन योग्य यंत्रणा उभी करणे, त्यात सातत्य ठेवणे विश्व म्हणून सर्वांनी विचार करुन याबाबत कृती केली पाहिजे सार्वजनिक पातळीवर खाजगी पातळीवर सरकार व जनता यांनी एकत्र उपक्रम राबवले पाहिजेत.''

''मानव विकास अहवाल 1999''[53]

''या अहवालात जागातिकी करणाच्या प्रक्रियेत मानवी चेहऱ्यासह जागातिकीकरण ही संकल्पना मांडली आहे कारण बाजार यंत्रणा जागतिक तत्रंज्ञान, जागतिक संकल्पना या मधून जगातील लोकांचे राहणीमान सुधारू शकते. मात्र सर्वात मोठे आव्हान असते. ते हे फायदे समान पध्दतीने सर्व लोकांमध्ये विभागले पाहिजे जागतिकोकरण ही प्रक्रिया जगाला नविन नाही. मात्र हे जागतिकीकरण बाजारपेठेने चालवले आहे. आणि देशादेशातील शासनाच्या नियंत्रित बाजारपेठा वाढत आहेत. कारण अत्यंत कमी जागा वेळ व कोणत्याच सीमा नसलेले असे हे सध्याचे जागतिकीकरण संधीच्या स्पात सगळयांच्या जवळ येत आहे. तंत्रज्ञानातील प्रगती व मानवाला सापडलेले जैवतंत्रज्ञान लोकांच्या दृष्टीने व हितासाठी वापरले गेल्यास सर्व मानव जातीसाठी प्रगती शक्य होईल बाजारपेठेशी संबधित मानवी विकासासाठी तंत्रज्ञान उपयुक्त ठरेल मात्र अलीकडे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मानवाची असुरक्षितता वाढली आहे.

जागतिकीकरणला नेतृत्वाची गरज आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे जगातील कानाकोपऱ्यातील लोक एकमेकांच्या संपर्कात येत आहेत. कोणात्याही देशातील घडलेली घटना जगभर समजते. 1990 च्या दशकामध्ये लोकांच्या उत्पन्नाचे स्त्रोत आणि संपत्तो याबद्दल जागृती झाली आहे. गरीब देशातील गरीब लोक जगातील व ज्ञानाची मालकी मिळण्यासाठी धडपडत आहेत. जर सरकारने चांगली कृती केली तर गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी कमी करणे व मानव विकास घडवून आणणे शक्य होते देशादेशातील स्पर्धा कमी करणे लोकांच्या निवडींना वाव देणे याला महत्व देणे गरजेचे आहे असे हा अहवाल सांगतो.''

"मानव विकास अहवाल 2000"[54]

"या अहवालात मानवी विकास व मानवी हक्क याबाबत चर्चा केली असून मानव विकासासाठी मानवाच्या हक्कांनाही तेवढेच महत्व आहे.प्रत्येक मनुष्याला सुरक्षित जगण्याचा हक्क, स्वातंत्र्य, समता, व निसर्गाच्या नियमाप्रमाणे मिळणारे हक्क महत्वाचे असतात सर्वच पातळ्यांवर विचार केला तर विकासाचा मुद्दा व मानवी हक्काचा मुद्दा हे समान पातळीवर दिसतात. पुढच्या काळात या अहवालाच्या माध्यमातून मानवी स्वातंत्र्याच्या लढ्याला एक वेगळी शक्ती देणारा विचार मांडला आह. या अहवालात मानवी हक्क आणि सामाजिकन्यायाचे तत्व यामुळे मानवी विकासाची प्रक्रिया कशी घडते हे स्पष्ट होते. मात्र त्यासाठी सर्वच देशातील सर्व लोकांना हक्क मिळाले पाहिजेत यासाठी योग्य कृती आणि दुसऱ्याच्यां हक्कांची जपणूक करणे ही समाजातील सर्वांची भवाना असली पाहिजे. या अहवालात असा निष्कर्ष दिला आहे को 21 व्या शतक्रतील प्रगती ही राजकोय आणि आर्थिक घटकांनी होऊ शकते. संशोधन आणि चिकित्सक पध्दतीने जगातील देशांचा अभ्यास कला तर मानवाच्या स्वातत्र्यांचा मुख्य हेतू व ध्येय म्हणजे मानवी हक्क आणि विकासाचे एकत्रीकरण आहे.

20 व्या शतकात प्रगती ही प्रचंड झाली तेवढेच प्रश्न ही गंभीर निर्माण झाले. 21 व्या शतकाची सुरवात ही मानवी विकासाला नवीन निती व नव्या दृष्टीकोनासह सर्वांनी स्विकारले तर वास्तविक पातळीत मानवी विकास गतिमान होऊ शकतो.

"मानव विकास अहवाल 2001"[55]

"या अहवालात मानवी विकासासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर ही संकल्पना सांगून नवीन तंत्रज्ञानाचे कार्य आणि मानवी विकास, मानवाने निर्माण केलेले तंत्रज्ञान आपले जीवन सुधारणे करीता तंत्रज्ञानाचा लोक कशा प्रकारे वापर करतात. या बद्दलची चर्चा या अहवालात केली आहे. अलिकडच्या काळात माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रचंड क्रांती झाली आहे. संपर्काची साधने आणि जैवतंत्रज्ञान हा मानवी विकासा संदर्भात त्याचा वापर महत्वाचा मानव आहे. नवीन तंत्रज्ञानाने विकसनशील देश आणि गरीब लोक यांच्यावर कशा प्रकारे परिणाम करतील या बद्दल हा अहवाल सांगतो की लोकांना अशी व भिती वाटते को आधुनिक तंत्रज्ञान हे गरीब देशांना फारसे उपयुक्त नसणार प्रत्यक्षात गरीब-श्रीमंत यांच्यातील दरी वाढतच जाईल व गरीब लोकांच्या गरजा या अशाच दुर्लक्षीत राहतील परंतु व्यवस्था चांगली असेल तर फायदा होतो इतिहासाचा संदर्भ पाहिला तर तंत्रज्ञान हे मानवी विकास आणि दारिद्र्य कमी करण्याचे महत्वाचे साधन राहिले आहे.

आजच्या आधुनिक जगात नवीन तंत्रज्ञानाचा वापर चांगले आरोग्य, जीवन, सामाजिक सुधारणा, चांगली आणि गुणात्मक शैली हे घडण्यासाठी झाला पाहिजे. 20 व्या शतकात मानवी व दारिद्र्य निर्मूलनात तंत्रज्ञानाचे योगदान चांगले होते. इंटरनेटच्या काळात ग्रामीण विकासासाठी स्थायीक गरजासाठी धोरण ठरविण्यासाठी जगात विकसीत झालेल्या तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे."

"मानव विकास अहवाल 2002"[56]

"या अहवालात विस्कळीत जगात लोकशाही रुजवणे यावर भर देऊन राजकारण आणि मानवी विकास याची चर्चा केली असून लोकांची राजकीय इच्छा शक्ती व त्यातून उदयाला येणारी शासनसंस्था विशेषत: लोकशाही संस्था औपचारिकरित्या व अनौपचारिकरित्या मानवी विकासास कसा आकार देतात. याला जास्त महत्व दिले आसून राजकरण ही बाब महत्वाची मानली आहे. यातूनच बेबंदशाही विचाराची शासन व्यावस्था उदयाला आली तर लोकशाही मार्गाने विचारविनिमय, चर्चा करुन, प्रश्न सोडवणे लोकांची सुरक्षितता व माणूस की सांभाळण्यासाठी व्यवस्था काम करते जगातील लोकशाही देशांत हे दिसुन येत

आहे. ‘‘लोकांच्या निवडीची मर्यादा विस्तारून कोणी राज्य करावे व कशाप्रकारे चांगले राज्य असावे या दृष्टीने लोकशाही देशात लोकांचा सहभाग, कामकाजाची प्रक्रिया या सर्वांच्या मधून मानवी विकास साध्य करण्यावर भर याची चर्चा अहवालात आहे.’’

लोकशाही पध्दतीने शासन प्रस्थापित करण्यासाठी कशाची आवश्यकता आहे. खास करून ज्या देशांत गरीबी व बेकारी जास्त आहे. त्या देशातोल लोकशाही शासन संस्थेचा फायदा मानवी विकासासाठी सर्व लोकांना होईल. मानवी विकासासाठी राजकारण म्हणजे राजकिय संस्थांनी राजकारणाच्या माध्यमातून लोकांच्या सहभागातून मानवी विकासास चालना देणे, यासाठी देशात लोकशाहीचा विचार रूजला पाहीजे लोकशाही शासनसंस्था विस्तारली पाहीजे. ज्याप्रमाणे मानव विकासासाठी संपत्ती, उत्पन्न वाढणे गरजेचे तसेच मानवी विकासाासाठी प्रत्येक देशात परिणामकारक अशा सार्वजनिक संस्था असणे गरजेचे आहे. या सर्व बाबीची सखोल मांडणी या अहवालात करुन जगातील विविध देशातील मानवी विकासातील दरी कमी करण्यासाठी शासनसंस्था लोकशाही पध्दतीच्या असल्या पाहिजेत तरच गरीब लोकांच्या आर्थिक प्रगतीला हातभार लागतो असा विचार मांडला आहे.’’

‘‘मानव विकास अहवाल 2003’’[57]

‘‘संयुक्त राष्ट्रसंघाने सहस्रकातील विकासाची उद्दिष्टये ठरवलेली आहेत त्याचा उल्लेख या अहवालात करुन मानवी दारिद्रय नष्ट करण्यासाठी राष्ट्रामधील एकजुटीता यावर भर देऊन गरीबी निर्मूलन मानवाला सन्मान व क्षमता जागतिक स्तरावर शांतता पर्यावरण आणि लोकशाही टिकवणे भय व भूक जगाची निर्मीती याबद्दल जगातील सर्व राष्ट्रांनी एकत्र काम करून मानवी विकासासाठी भरीव काम करण्यावर भर दिला आहे. या बाबत चर्चा या विकास अहवालात केली आहे साहजिकच जगातील सर्वच देशांना कमी अधिक प्रमाणात भेडसावणारे प्रश्न त्यामध्ये अपुरे उत्पन्न, सर्वदूर पसरलेली भूकेची समस्या, देशातील लिंगाधारीत असमानता, प्रदुषण, शिक्षणाचे प्रमाण कमी असणे सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता, स्वच्छ पाणोपुरवठा या समस्या सोडवण्यासाठी सर्व विकसित देशांनी ही बांधिलकी मान्य केली असून

विकसनशिल व गरिब देशांना कर्ज कमी करुन मदत वाढविणे, व्यापार आणि तंत्रज्ञान याचे फायदे गरीब देशांना देण्यासाठी कार्यक्रम तयार केले.

या अहवालाच्या माध्यमातून जगामध्ये संयुक्त व आर्थिक सामाजिक, राजकिय स्थैर्य, यासाठी समर्थनाची भावना वाढवून गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी कमी करण्यासाठी व जागतिक प्रगती वाढवण्यासाठी उपाययोजना सांगितल्या आहेत. गरीबांचा विकास झाला नाही त्याची मुळ कारणे समजुन घेऊन गरीबी नेमकी समजून घेणे, जगातील मानव विकासाचे कार्य व त्याचा आवाका किती मोठा आहे. हे काम सहज शक्य नाही काही ठिकाणी ही विकास प्रक्रिया चालू आहे. काही भागात त्यात अडथळे निर्माण झाले आहेत. याची चर्चा सांगितली आहे. शाश्वत मानव विकासामध्ये असणाऱ्या अडथळ्यांची चर्चा करुन आर्थिक सुधारणेसाठी आर्थिक स्थैर्य, सशक्त संस्था व चांगले प्रशासन कायदयाची अमंलबजावणी आणि भ्रष्टचार नियंत्रित ठेवणे, सामाजिकन्यायाची गरज लोकांच्या निर्णय प्रक्रियेने सामावून घेणे या सर्वांचा परिणाम लोकांच्यावर समाजावर आणि देशावर होतो व मानव विकासाची प्रक्रिया गतिमान होते अशी चर्चा या अहवालात आहे.''

"मानव विकास अहवाल 2004"[58]

"या अहवालात आजच्या वैविध्यपूर्ण जगतातील सांस्कृतिक, स्वातंत्र्य ही संकल्पना मांडून लोकांच्या सांस्कृतिक स्वातंत्र्य व जगभरातील त्याचे महत्व व विविधता यामुळे लोकांच्या समाजात राहण्याच्या गरजा धर्म, भाषा, याबद्दलचा त्यांचा सन्मान याला जास्त महत्व असल्याची चर्चा केली आहे. यासाठी सरकारने विविध सांस्कृतिक धोरणावर भर दिला पाहिजे, को जेणे करून लोक त्यांच्या स्वत:च्या धर्मातील आचरण करतील, स्वातंत्र्य व सांस्कृतिकाला आकार देतील, यातुनच त्यांना स्वत:ची जाणीव होईल हा राजकिय व आर्थिक स्वरुपाचा प्रश्न आहे. लोकशाहीत एकत्रीत विकास व वाढीपेक्षा महत्वाचा घटक सांस्कृतिक स्वातंत्र्य असून जेणे करून मानवी हक्कांचे संरक्षण होईल व हे लोकशाही रूजलेल्या देशात करणे शक्य आहे. कारण मानवी विकास हा लोकांना त्यांच्या निवडीप्रमाणे जीवन जगण्याचा

अधिकार देण्याच्या बाजूने आहे. यासाठी त्यांना योग्य संधी उपलब्ध करुन देणे, व साहित्य पुरवठा करणे हे प्रयत्न मानव विकासाचे काम ठरते.

बऱ्याचवेळा चुकीच्या धोरणामुळे काही गोष्टी नाकारल्या जातात व सांस्कृतिक फरकामुळे समाज सामाजिक, आर्थिक व राजकिय संघर्षाकडे वळतो.त्यासाठी सांस्कृतिक हक्क हे राजकिय आणि आर्थिक असले पाहिजेत, मानवी विकासामध्ये राजकिय ओळख आणी संस्कृती ही सहजपणे कशी चालते या अहवालाने सांस्कृतीक आणि सर्व समावेशक समाज बनवणे यासाठी सांस्कृतीक विविधता आणि विविध संस्कृतीची धोरणे स्विकारणारे सांस्कृतीक स्वातंत्र्य असावे. असे मत अहवालात मांडले आहे. कारण हे सर्व मानवी विकासाचा एक महत्वाचा भाग आहेत. सांस्कृतीक स्वातंत्र्य हे लोकांना ते ज्या पध्दतीने जीवनात महत्व देतात त्या प्रकारचे जीवन जगण्यास परवानगी देणे. त्याशिवाय त्यांच्या इतर आवडी निवडी, शिक्षण आरोग्य, किंवा नोकरीच्या संधी, याचा ही त्यात विचार होतो.''

"मानव विकास अहवाल 2005"[59]

" या अहवालात आंतरराष्ट्रीय सहकार्य व्यापार सुरक्षा व जगातील असमानता कमी करण्यासाठी मदत या भर देऊन मानवी विकासाबाबत ठरवलेली लक्ष्ये आणि पुर्ण न झालेली आश्वासने यावर या अहवालात प्रकाश टाकला असुन संयुक्त राष्ट्रसंघाने या सहस्रकातील उद्दिष्ट्ये सांगितलेली आहेत. त्यातील चुकलेली लक्ष्ये अपूर्ण उदिष्ट्य व पूर्ण न झालेली आश्वासाने ही इतकी समस्या निर्माण करणारी आहेत देशांमधील व देशांतर्गत ही मानव विकासातील महत्वाचा अडथळा आहे.

गेले एक दशकभर जगातील सरकारे विकासासाठी आर्थिक स्त्रेातांच्या निवडीला तोंड देत आहेत. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आपल्या क्षमता वापरून गरीबी संपवण्यासाठी आर्थिक स्त्रेाताचा वापर वाढवला पाहिजे अन्यथा मानव विकासाचे ध्येय अयशस्वी होईल. 2000 साली व नंतर सुरु केलेली कार्य आणि आश्वासाने पुर्ण करणे या वेगाने प्रयत्न झाला पाहिजे अन्यथा या अपयशाची किंमत म्हणजे मानवी जीवनात वाढलेली असमानता, मानवी हक्कांचे उल्लंघन आणि शांतता भंग इत्यादी मध्ये दिसेल दारिद्रयाच्या विरोधात लढण्याचे एक महत्वाचे हत्यार म्हणजे आंतरराष्ट्रीय मदत होय.

सध्या मदतीच्या योजनेची पुनर्रचना अणि नूतनीकरण करणे गरजेचे आहे मदतीकडे गुंतवणूक आणि नैतिक अधिकार या दृष्टीने विचार केला पाहिजे. 2005 या हा अहवाल सांगतो की आंतरराष्ट्रीय विकासाच्या मदतीचे सर्व समावेशक पुनर्विलोकन दोन्ही बाजुनी गुणवत्ता आणि संख्या याचा विचार करावा दोहा येथे झालेल्या विकास परिषदेतील प्रगतीच्या चिकित्सात्मक पुनर्विलोकन, व्यापारा बाबतची चर्चा, व्यापारातील नियम कसे असमानता निर्माण करतात आणि मानवी विकासा संदर्भातील हिंसात्मक होणारा संघर्ष आणि हा संघर्ष थांबवण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य व मदत, व्यापार यांचे पुनर्विलोकन आवश्यक आहे असे मत मांडले आहे.''

''मानव विकास अहवाल 2006''[60]

''या अहवालात सत्ता, दारिद्र्य, शक्ती, असमानता व जगातील पाणी संघर्ष या वर अभ्यास केला असुन पाणी हे मानवी जीवनाचे उगमस्थान आहे आणि ते सर्वात महत्वाचे नैसर्गीक स्त्रेात ही आहे ज्यामुळे सर्व सजीवांच्या जीवनात आधार आहे. पण हाच घटक धोकादायक पध्दतीने आरक्षित होत आहे. 21 व्या शतकाच्या सुरवातीला मानवी विकासासाठी वैश्विक संघर्ष सुरु झाला आहे. या चुकीच्या दांभिक कल्पनेचा स्फोट केल्यास संघर्ष हा अभावाने व अपवादानेच दिसतो हा अहवाल या निष्कर्षा प्रत येता की जगातील दारिद्र्य शक्ती आणि असमानता याच समस्या संघर्षाला कारणीभूत आहेत. तसे पाहिले तर जगात प्रचंड व अभूतपूर्व संपत्ती असून ही जवळजवळ 2 दशक मुले दरवर्षी पुरेसे शुध्द पाणी व आरोग्य सुविधा न मिळाल्याने मृत्यूमुखी पडतात. जगातील कोट्यावधी स्त्रियां आणि लहान मुलींना त्यांच्या जीवनातील संधी व निवडीना मुरड घालून तासनतास किंवा दिवसातील बराचवेळ पाणी आणण्यासाठो घालवावे लागतात. व याच पाण्यामुळे होणारे रोग जगातील काही गरीब राष्ट्रांमध्ये दारिदय वाढवण्यास कारणीभुत ठरतात, आर्थिक वाढ रोखतात, घरातल्या इतर कामाशिवाय पाणी ह उत्पादक स्वरूपाच्या स्पर्धेसारखे अतिशय तीव्र होत आहे. याच स्पर्धेमुळे पर्यावरणाशी संबंधीत पाण्याचे व्यवस्थापन कोलमडुन पडते. देशातील नदीचे प्रवाह नाश पावत आहेत आणि जमिनीतील पाणी मोठया प्रमाणावर रिकामे होत आहे, प्रदुषीत होत आहे, पाण्यावरून होणारा संघर्ष अलिकडे तीव्र होत आहे, ग्रामीण भागात पाण्याचे दुर्भिक्ष वाढत आहे.

मानवी विकासामधील पाणी या घटकाच्या संघर्षाची कारणे व परिणाम यावर अहवालात भर दिला आहे. हा संघर्ष जगातील 1.2 अब्ज लोक सुरक्षित पाण्यापासून वंचित आहेत आणि 2.6 अब्ज लोकआरोग्याच्या सवलती पासून वंचित आहेत. हे टाळण्यासाठी स्वच्छ पाणी व चांगले आरोग्य लोकांना मिळण्यासाठी राष्ट्रीय धोरणानुसार सतत मोहीमा चालविणे आणि जागतिकस्तरावर कृती आरखडा तयार करणे, समाजातील ज्या सामाजिकव आर्थिक शक्ती पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण करत आहेत. व गरीबांना सुध्दा शेतीच्या बाबतीत अगदी जेमतेम पाणी मिळते या सर्व बाबींची अहवालात तपासणी करून निष्कर्ष मांडले आहेत. याशिवाय आंतरराष्ट्रीय सहकार्याची गरज प्रतिपादन करून इतर देशातील पाणी व्यवस्थापनाची माहिती घऊन आपल्या देशातील पाणी व्यवस्थापन करून तणाव कमी करण्यावर भर दिला आहे.''

"मानव विकास अहवाल 2007–2008"[61]

'' हा दोन वर्षातील एकत्र अहवाल असून वातावरणातील बदलाशी संघर्ष व त्यासाठी सर्व मानवाचे एकत्र येऊन संपूर्ण विश्वावर व मानव जातीवर होणारे परिणाम कमी करण्याच्या विचारांची या अहवालात चर्चा केली असून विविध भागात दुष्काळाची तीव्रता वाढत आहे. पुर आणि वादळे यामुळे प्रचंड नुकसान होऊन असमानता निर्माण होत आहे. हा वातावरणातील बदलाचा परिणाम आहे. जगाने यापुढच्या काळात तरी शास्त्रीय अहवाल सांगत आहेत की त्याप्रमाणे या बदलाचे परिणाम सजीव सृष्टीवर होत आहेत ते न टाळण्यासारखे आहेत का याचा विचार करावा व्यापार आणि वातावरण हे स्पष्ट दिशेने बदलत आहेत. भविष्यात मानवी जीवनात आपल्या मुलांच्या नातवांच्या इत्यादी मध्ये हा बदल होऊ शकतो तसे पाहिले तर पुढच्या काळात जास्त परिणाम व नुकसान होईल असे वातावरणातील बदल टाळण्यासाठी कमी करण्यासाठी की चांगली व छोटीशी संधी आहे.जगातील सर्व देशांनी एकत्र त्यावर कृ कृती केली अथवा न केली तर भविष्यातील मानवी विकासावर त्याचा परिणाम हा होणार आहेच.

हा अहवाल सांगतो की वातावरणातील बदलाचे परिणाम अनेक पातळयांवर होत आहेत. विभागलेल्या परंतु सृष्टीने एकत्र आसणाऱ्या या जगामध्ये लोकांना हे आव्हान आहे की, एकूणच विविध मार्गानी होणारे वातावरणातील परिणाम कमी करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन कृती व त्याची अंमल बजावणी याला जास्त महत्व आहे असे अहवालात नमुद केल आहे.

"मानव विकास अहवाल 2009"[62]

"या अहवालात अडथळ्यावर मात करुन मानवी गतीशिलता व विकास यावर अभ्यासपूर्ण विवेचन केले असून लोकांचे देशातील व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्थलांतर जागतिक सर्व प्रकारच्या क्षमताचे विस्तारीकरण हे कमालीचे असमान आहे आणि त्यामुळे लोकाच्या हालचालीचे स्थलांतराचे मुख्य कारण ही आहे. स्थलांतरामुळे लोकांना निवडीच्या संधी वाढतात. उत्पन्न वाढवण्याबरोबरच सहभाग व सेवा मिळवण्यासाठी स्थलांतराचा उपयोग होतो. लोकांना संधी उपलब्ध असतात परंतु बऱ्याच लोकांकडे मर्यादीत कौशल्य आणि कामासाठी उपयुक्तता आहे त्यानां जास्त वाव आहे. तर ज्यांच्याकडे कौशल्य नसते व उपयुक्ततेची देणगी ही नसते येथे असमानता दिसते या अहवालात लोकसंख्या शास्त्रानुसार होणारे बदल आणि वाढ व असमानता यातील अंदाज या संदर्भानाने हा अभ्यास आहे.

हा अहवाल सांगतो की मानव विक्सावर स्थलांतराचे सकारत्मक परिणाम होतात याचे अनेक पुरावे असुन कौटुबिंक उत्पन्न वाढवण्याच्या संधी जशा मिळतात तसेच आरोग्य सेवा आणि शिक्षणासाठी मिळणारा वाव महत्वाचा असतो. आणखी संशोधन असे सांगते की स्थलांतरामुळे पारंपारिक फायदा न मिळालेल्याना सशक्त बनवता येते. खास करून स्त्रियाना तर दुसऱ्या बाजुने स्थलांतर ही धमकी व भितीला दिलेली प्रतिक्रिया असते. मानवाच्या आवडींना दिलेला नकार आणि नाईलाजाने झालेली हालचाल होय या घटनेच्या मानवी विकासासाठी धोकाही असतो. त्यामुळेच राष्ट्रीय पातळीवर आणि स्थानिक पातळीवर चांगल्या मानवी विकासासाठी धारणे अतिशय महत्वपुर्ण भूमिका निभावतात दोन्ही प्रकारच्या स्थलांतराला फायदयाचे ठरते. जे लोक आपली परिस्थती सुधारण्यासाठी निघतात व जे दुसऱ्या ठिकाणी स्थायिक झाले आहेत. बऱ्याच वेळा ज्या देशात स्थलांतर होते ते स्थलांतर धोके आणि किंमत ही वाढवू शकतात त्याचप्रमाणे नकारार्थी प्रमाण सुध्दा घडवू शकतात ज्या पध्दतीने मुळच्या नागरिकांचे मतदान, शिक्षण, आरोग्य हे आधिकार त्यांना डावले जातात कारण जे आपला प्रांत सोडून कामासाठी व राहण्यासाठी दुसरीकडे जातात त्यांच्यावरही अधिकार न मिळण्याची वेळ येते. 2009 सालचा मानव विकास अहवाल असा निष्कर्ष मांडतो की मानव विकास हे असे महत्वाचे साधन आहे की स्थलांतराच्या समस्यांना कसे तोंड देता येईल अथवा सामोरे जाता येईल यांची मांडणी करतो."

"मानव विकास अहवाल 2010"[63]

"या अहवालात लोक हेच देशाचो खरी संपत्तो आहेत" या विधानाचा अर्थ विचारात घेतला तर सयुंक्त राष्ट्रसंघाने आजपर्यंत आपल्या मानव विकास अहवालात भरपूर सांख्यिकी संज्ञा आणि विकास मापण्याच्या पध्दती वापरल्या असून मानव विकास अहवालाचा फार मोठा परिणाम संपुर्ण जगातील देशांची धोरणे ठरवताना झाला आहे. 2010 मध्ये समाजातील असमानता विचारात घेऊन नव्याने असमानता समायोजित मानवी निर्देशांक परिगणित करण्यात आला आहे. उत्पन्न, शिक्षण आणि आरोग्य या तीन घटकांमधुन त्यांच्या विषमतेच्या स्थरापासुन प्रत्येक घटकातुन संबंधित सरासरी मुल्य वगळून त्यामध्ये असमानता समायोजित करण्यात येते. यासाठी "अटकिन्सन निर्देशांक" वापरण्यात येतो.

हा अहवाल सांगतो की मानवी विकासासाठी जे जे नविन मार्ग आहेत ते सातत्यपुर्ण टिकणाऱ्या प्रगतीसाठी एकच असे निश्चित सुत्र नाही. या अहवालाने मानव विकासाचे टिकात्मक पध्दतीने सर्वेक्षण ही केले आहे. राजकोय स्वातंत्र्य व शाश्वत विकास चालू ठेवण्यासाठी मानवाची सुरक्षितता संशोधन विषयक कार्यक्रम व येणाऱ्या आव्हांनाना प्रतिसाद देणारे धोरण राबविले पाहीजे. अर्थतज्ज्ञ अमर्थ्य सेन लिहितात की "पहिल्या मानव विकासाच्या अहवालाच्या 20 वर्षानंतर आपण काही तरी मिळवले आहे म्हणून आनंद व्यक्त केला पाहिजे परंतु पुर्वीच्या काही त्रुटीबाबत जागरूक ही राहोले पाहिजे. भविष्यातील नवीन आव्हाने ओळखणे आणि मानवाच्या चांगल्यासाठी काम करणे हे मानव विकासासाठी सकारात्मक आहे" विसाव्या आवृत्तीच्या निमित्ताने त्यांनी समर्पक असे मत मांडले."

"मानव विकास अहवाल 2011"[64]

"या अहवालात शाश्वतता व निपक्षपातीपणा आणि सर्वासाठी अधिक उज्वल भविष्य ही संकल्पना मांडून अहवालात पर्यावरण प्रदुषणाचे नियंत्रण व जागतिक विकासासाठी आर्थिक नियोजनासाठी नवीन संकल्पना व पध्दती शोधण्यावर भर दिला आहे. कारण या दोन्ही गोष्टी जगाच्या भविष्यासाठी महत्वाचा व करता येण्यासारख्या आहेत. बऱ्याच वेळा तात्काळ निर्माण होणारी जागतिक स्वरूपाची आव्हाने आणि उपाययोजनांचे सातत्य हे एकत्रित दिले गेले पाहीजे आणि राष्ट्रीय पातळीवर व

जागतिक पातळीवर धोका ओळखून आंतरराष्ट्रीय स्तरावर ठरवलेली ध्येये गाठण्यासाठी सर्वांनी एकत्रित उपायांना वेग देणे महत्वाचे आहे. सध्याचे चालू मानव विकास हा योग्य असेल तर जगातील सर्वच देशांतील लोकांना व येणाऱ्या भावी पिढ्यांना तो मार्गदर्शक ठरला पाहिजे. या अगोदरच्या अहवालाचा अभ्यास पाहिला तर असे दिसते कि अनेक देशांमध्ये राहणीमानाचा दर्जा उंचावला आहे आणि कित्येक वर्षे तो चालू आहे. परंतु 2011 च्या अहवालाने धोक्याची सूचना दिली आहे, कि "जर पर्यावरणाचा ऱ्हास असाच होत राहिला व सामाजिक असमानता जर होत राहिली तर थोड्याशा विकसीत देशांची प्रगती होत राहील ती सुध्दा 2050 पर्यंत त्यानंतर ही प्रगती थांबेल या अहवालात हा ही निष्कर्ष मांडला आहे कि जगातील फायदा न मिळालेले बहुतेक देश व लोक हे पर्यावरण विषयक ऱ्हासामुळेच त्रासदायक जगत आहेत. प्राप्त परिस्थितीतील पर्यावरणाचा ऱ्हास आणि त्याच्या नियंत्रणासाठी राजकिय इच्छा शक्ती नसते, या सर्वांचा परिणाम म्हणजे सरकारला समाजात आपली धोरणे राबविण्यात अडचणी निर्माण होतील. त्यामुळेच या अहवालात आरोग्यदायी पर्यावरणासाठी प्रयत्न करण्यावर भर देतो आणि सामाजिक एकतेलाही महत्व देतो जेणे करुन पर्यावरण विषयक धोरण ठरवण्यास सोपा होईल अशा प्रकारचा निष्कर्ष व उपाय या अहवालात मांडले आहेत."

"मानव विकास अहवाल 2013"[65]

"या अहवालात " दक्षिण गोलार्धाचा उदय वैविध्यपूर्ण जगातील मानव विकास (The Rise of South : Human Progress in Diverse World) या वर प्रकाश टाकला असून या अहवालात दक्षिण गोलार्धातील म्हणजेच विकसनशील राष्ट्रपैकी 40 राष्ट्रांची उगवती अर्थव्यवस्था व मानवी विकासातील उत्तम सुधारणा असा उल्लेख केला आहे. या राष्ट्रांनी गेल्या काही वर्षात मानव विकास अहवालात उत्तम सुधारणा केल्याचे नमुद केले आहे या अहवालात जागतिक महामंदी 2008-2009 च्या कालावधीत विकसित अर्थशास्त्राने वाढ थांबली तर विकसनशील अर्थशास्त्रने वाढतच राहीले या घटनेची जगाने दखल घेतली आहे. पृथ्वीच्या दक्षिण गोलार्धात असणाऱ्या विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थेचा उदय अभ्यासताना जी.डी.पी. वर प्रकाश टाकुन व्यापार वृध्दी फक्त काहो मोठ्या राष्ट्रात झाली.

दक्षिणेकडील विकसनशील देशांनी मानवी विकासात सातत्यपुर्ण गुंतवणूक आणि पुढील अधिक चांगल्या प्रगतीसाठी जगाला एकत्र येण्याची संधी महत्वाची आहे. ही प्रगती भविष्यात खऱ्या अर्थाने सत्यात उतरावयाची असेल तर माहिती तंत्रज्ञानावर धोरण व लोकांचे अज्ञान दूर करण्यासाठी जागतिक व राष्ट्रीय पातळीवर धोरण आखणे धोरणावर लक्ष केंद्रीत करणे यामध्ये अहवालात पृथ:करण करण्यात आले आहे.''

"मानव विकास अहवाल 2014"[66]

या अहवालात मानव विकासाचे स्थायित्व असुरक्षा कमी करणे आणि स्थितीस्थापकत्व निर्माण करणे. ही संकल्पना मांडली असून आजपर्यंत मानव विकास अहवालामध्ये मानव विकास साध्य कसा करावा हे सांगितले जात होते. या अहवालात आतापर्यंत साध्य झालेला मानवी विकास पुढील काळात टिकवून कसा ठेवता येईल म्हणजे त्याला ''स्थायित्व'' कसे प्राप्त करुन देता येईल यावर अधिक भर दिला आहे''

आजपर्यंत जो विकास झाला आहे तो डळमळीत करु शकणाऱ्या समस्यांवर प्रकाश टाकणे व अशा समस्यामुळे सर्वांत जास्त ''असुरक्षा'' असलेला मानवी समुह काणाता? व त्याच्या स्थिती स्थापकत्वासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील?

या अहवालानुसार, तंत्रज्ञानातील प्रगती, शिक्षणाचा प्रसार, वाढत्या रोजगाराच्या संधी मुळे वाढणारे उत्पादन व पोषणाचा अधिक उत्तम स्तर यामुळे जागतिक स्तरावर मानवी विकासाला चालना मिळाली आहे. हे चांगले आहे मात्र हे यश कायम टिकवून ठेवणे ही महत्वाचे आहे.

या अहवालात असे नमुद केले आहे की, सन 2008 नंतर अनेक धोक्याच्या व अनिश्चित परिस्थिती निर्माण झालेल्या दिसतात.ज्यामुळे लोकाच्या उपजिविका वैयक्तिक तसेच जागतिक सुरक्षितता पर्यावरण आणि जागतिक राजकिय क्षेत्र ह प्रामुख्याने असुरक्षित बनलेले आहे. परिणामी आरोग्य, शिक्षण इत्यादी क्षेत्रातील मानवी विकास हा नैसर्गिक आपत्ती, आर्थिक मंदी इत्यादीमुळे पुन्हा ढासळण्याची भीती निर्माण होत आहे. अशावेळेस भ्रष्टाचार व असंवादी शासन यामुळे अनेक गरजू व्यक्ती समुह पुन्हा दारिद्र्याच्या चक्रामध्ये अडकण्याची भीती आहे अशा अस्थिर परिस्थितीचा परामर्श मानव विकास अहवाल 2014 या लेखात सन 2014 चा जागतिक मानव विकास अहवाल व त्यामध्ये मांडलेले निर्देशांकयांची चर्चा केली आहे.

"केनेथ हार्टजेन व स्टीफन क्लासेन 2010" [67]

"या पेपरमध्ये त्यांनी कटुंबातील मानवी विकास निर्देशांकाची संकल्पना मांडली, त्यांच्यामते मानवी विकास निर्देशांक मोजमापातील प्रमुख दोष म्हणजे तो फक्त सरासरी पगतीचा विचार करतो. परंतु देशातील लोकसंख्येतील वेगवेगळया उपगटांचा विचार करत नाही. आजपर्यंत सर्व मानवी विकास निर्देशांकानी जी असमानता दर्शवली ,त्यामध्ये त्यांनी एक्ूण लोकसंख्येचा विचार केला नाही. असा मुख्य विचार त्यांनी आपल्या पेपरमध्ये मांडला आहे. त्यामध्ये कुटुंबपातळीवर मानवी विकास निर्देशांकांचे मापन कसे करावयाचे या बाबतची पध्दती सांगितली आहे. या पध्दतीने लोकसंख्येतील विविध उपगटांच्या विकासातोल असमानता माजता येते. त्यांनी पंधरा विकसनशील देशांचा अभ्यास केला त्यांच्यामते गरीब देशांमध्ये विशेषत: सबसहारा, आफोकेतील देशांमध्ये मानवी विकास निर्देशांकात मोठ्या प्रमाणात विषमता/असमानता आढळून आली. उत्तम घरे व शिक्षण या घटकामध्ये ही विषमता आढळून आली. तसेच देशांतर्गत मानवी विकास निर्देशांका प्रमाणेच व विविध देशातील मानवी विकास निर्देशांकात असमानता आढळून आली याचे सविस्तर विवेचन या पेपर मध्ये केले आहे."

"केनेथ हार्टजेन व स्टीफन क्लासेन 2011"[68]

"या पेपरमध्ये आपल्या अभ्यासावरुन असा निष्कर्ष काढला आहे की, विकसनशील देशात देशांतर्गत स्थलांतर मोठ्या प्रमाणात घडून आले आहे. या स्थलांतरामुळे लोकांचा मानवी विकास मोठ्या प्रमाणात घडून आला आहे. लेखकांनी स्थलांतरीत लोक व स्थलांतर न केलेल्या लोकांच्या मानवी विकासाचा अभ्यास कला आहे. त्यासाठी त्यांनी कमी उत्पन्न गटातील 16 देश निवडले, त्यांना असे आढळून आले की जर लोक स्थलांतरीत झाले तर त्यांचा मानवी विकास निर्देशांक स्थलांतरीत न झालेल्या लोकांपेक्षा उच्च राहिला. त्याचे कारण म्हणजे स्थलांतरीत लोकांच्या उत्पन्नात झालेली मोठी वाढ होय, त्याच्या शिक्षण व आरोग्य या घटकामध्य फार मोठी असमानता दिसून आली नाही. तर स्थलांतरीत व स्थलांतर न क्लेल्या लोकांच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात विविधता दिसून आली."

"हॉकेन मीची व मेमीथ टोल्या टानेर 2011"[69]

"यांनी आपल्या पेपरमध्ये म्हटले आहे की मानवी विकास मोजण्यासाठी कोणताही निर्देशांक परिपूर्ण नाही तसेच युनायटेड नेशन्सचा ही मानवी विकास निर्देशांक देखील परिपूर्ण नाही त्यामुळे त्यांनी OECD (Organization for Economic Co-operation and development) च्या 30 देशांतील मानवी विकासाचे मोजमाप करण्यासाठी बेरोजगारी निर्देशांक (Unemployment Index) हा चौथा निर्देशांक मानवी विकास मोजण्याचे नवीन मापक आहे त्यामुळे मानवी विकास संकल्पना अधिक व्यापक होते. असे मत मांडले आहे."

"सिध्दीकूल इस्लाम 1995"[70]

"या पेपरमध्ये लेखकांनी उच्च, मध्यम व अल्प मानवी विकास असणाऱ्या देशातील दरडोई वास्तव उत्पन्न व मानवी विकास निर्देशांक या दोहोतील संबंध मोजण्यासाठी प्रतिपगमन पध्दती वापरली त्यांना आसे आढळून आले की अल्प मानवी विकास असणाऱ्या देशातील लोकाच्या दरडोई वास्तव राष्टोय उत्पन्नात अधिक बदल घडून योतात तर मध्यम मानवी विकास निर्देशांक असणाऱ्या देशांत वरील दोन घटकातील संबंध उलट्या यु (U) आकाराचे आढळून आले म्हणजे दरडोई वास्तव राष्ट्रीय उत्पन्न अल्प व उच्च उत्पन्न देशातील बदलापेक्षा वेगळे बदल जाणवले असे मत प्रतिपादन केले आहे."

"नरेंद्र पाटील – लेख 2011"[71]

"राज्यातील ठाणे जिल्ह्यातील 8 तालुक्यांचा मानव विकास निर्देशांक कमी"

"या लेखात महाराष्ट्रातील 125 तालुके कमी निर्देशाांकाचे असून त्यामध्ये ठाणे जिल्ह्यातील 8 तालुक्यांचा समावेश अति कमी निर्देशाांकात आहे.मोखाडा सह अदिवासीची संख्या जास्त असणारे हे तालुके असून ठाणे जिल्ह्यातील मानव विकास निर्देशांक वाढवण्यासाठी शिक्षण, व अरोग्यावर लक्ष कद्रित करण्यात येत आहे.तर लोकांचा आर्थिक स्तर वाढवण्यासाठी उत्पन्न वाढवण्याच्या योजना हाती घेतल्या जाणार आहे, हे जिल्हा नियोजन बैठकोत जिल्हाधिकाऱ्यांनी जाहीर उल्लेख आहे.

या जिल्ह्याचा विकास निदशांक वाढवण्यासाठी मुलींसाठी 12वी पर्यंत शिक्षणासाठी गावापासुन शाळेपर्यंत वाहतूक सुविधा वाढवणे, 10 वी 12 वी नापास मुलामुलींसाठी खास बाब म्हणून शिकवणी वर्ग चालवणे, आदिवासी भागात वीज नसल्याचा मुलांच्या अभ्यासावरील परिणाम कमी करण्यासाठी सोलरलाईट, अभ्यासाचे फर्निचर, पुस्तके पुरवणे, कस्तूरबा गांधी बालिका योजनेची व्याप्ती वाढवणे या बरोबरच आदिवासी लोकांच्या उत्पन्न वाढीसाठी रेशमी किडे संगोपन केंद्र स्थापन करणे, फिरती माती परीक्षण केंद्रे निर्माण करणे, बचत गटांच्या माध्यमातून परसबाग, अंगणात बगीचा व्यवसाय, ग्रामीण भागात मुलांना व्यवसाय प्रशिक्षण देणे या उपाययोजना सुरु करण्याचे बैठकीत ठरल्याच्या बाबी मांडून पुढच्या काळात ठाणे जिल्ह्यातील कमी मानव विकास निर्देशांक दुरुस्त होऊशकेल असे मत मांडले आहे.''

''नरेंद्र एम.अगरवाल – जून 2010''[72]

''भारत जगातील मोठा लोकशाही व्यवस्था असणारा देश असून, त्यात भाषा, धर्म आणि आर्थिक विविधता मोठ्या प्रमाणात आहेत असे असले तरी अर्थव्यवस्थेचे उदारीकरण व जागतिकोकरण वेगाने सुरु आहे. यात उद्योगाच्या यशात मनुष्यबळ विकास व नेतृत्वाचा मोठा वाटा आहे मात्र गावात राहणाऱ्या व शेतीवर आधारित असणाऱ्या 60% मनुष्यबळ विकास करण्याचे मोठे आव्हान आहे. जागतिकी करणाचा लाभ उद्योग क्षत्राला झाला तरी शेतात व ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांनाही हा लाभ होण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत. तर दुसऱ्या बाजूला उपजिविकेसाठी व रोजगारासाठी ग्रामीण भागातून शहरात येणाऱ्यांना शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा इ. संधी मिळण्यासाठी प्रयत्नांची आवश्यकता आहे असे त्यांनी सांगितले आहे. सध्या मध्यम वर्गाचे प्रमाण वाढत असून विकासाचा दर वाढण्यासाठी मनुष्यबळ विकासावर त्यांनी भर दिला आहे.''

''मदन मोहन – जून 2010''[73]

''या लेखात भारतातील उच्च शिक्षणाचा विचार मांडला असून देशात सध्या 504 विद्यापीठे, विद्यापीठ दर्जाच्या संस्था असून 25921 महाविद्यालये आहेत. पंचवार्षिकयोजनामधील उच्च शिक्षणाचा विस्तार, खच, नोंदणी गुणोत्तर, आर्थिक ,राजकिय आणि सामाजिक प्रक्रियेत लोकशाहीकरणाची प्रक्रिया

वाढविणे त्यासाठी सहभाग, समता, समावेशक्ता आणि दर्जा महत्वाचा आहे. सध्या उच्च शिक्षण क्षेत्रात बदल वेगाने होत आहेत. राष्ट्रीय ज्ञान आयोगाच्या शिफारशीची अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. भारत हा तरुणांचा देश आहे. या तरुणांच्या क्षमतेचा पुरेपूर वापर करुन घेण्यासाठी त्यांना उच्च शिक्षण देणे गरजेचे आहे. कारण उच्च दर्जाच्या शिक्षणामुळे खरा ज्ञानाधिष्टीत समाज व परिणामी जागतिक आर्थिक स्तरावर भारताची स्पर्धात्मकता वाढीस लागेल असा विचार त्यांनी मांडला आहे.''

''चोना श्याम व जुनेजा रितू, जुन 2010''[74]

''भारतातील विकलांगाची संख्या एकूण लोकसंख्येच्या 1.9% असल्याचे 1991 च्या पाहणीत दिसून आले. त्यापैकी 75% पेक्षा जास्त विकलांग असल्यामुळे ते शाळा, महाविद्यालयात, जाऊ शकत नाहोत त्यामुळे त्यांना रोजगार मिळत नाही. देशात विकलांगासाठी 1995 मध्ये P.W.D, कायदा करण्यात आला आहे. देशातील कोणताही विकलांग शासकिय योजने पासून वंचित राहू नये यासाठी प्रयत्न करण्यात आलेत.

2009 च्या शिक्षण हक्क कायद्याने विकलांग व इतर मुलांना एकाच ठिकाणी शिक्षण देण्याचा अधिकार दिला गेला. मात्र त्यांच्यासाठी खास तरतुदी आवश्यक आहेत. विकलागांना मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये आणण्यासाठी त्या शाळांमध्ये प्रशिक्षित शिक्षक वर्ग असावा. पायाभूत सुविधा असाव्यात, विशेष अभ्यासक्र म असावा तसेच शाळांना सोयीसुविधा उभारणीसाठी पुरेसा काळ द्यायला हवा. विकलांग मुलांसाठी देत असलेल्या सेवेसाठी अशा शाळांना पाठिंबा मिळणे गरजेचे आहे.''

संशोधन अंतर-(Research Gap)

वरील प्रमाणे संदर्भ साहित्याचा आढावा अभ्यास विषया संदर्भात घेतला आहे, त्यामुळे मला माझ्या संशोधनाची दिशा मिळाली मी निवडलेला विषय सागली व सातारा जिल्ह्यातील मानवी विकासाचा तुलनात्मक अभ्यास (1991ते 2011) हा असून संदर्भ साहित्यामध्ये असा तुलनात्मक अभ्यास कोणीही मांडलेला नाही. त्यामुळे मला हा विषय निवडण्याची प्रेरणा व मार्गदर्शन संदर्भ साहित्याच्या आढाव्यावरून मिळाले.

प्रकरण 4

मानवी विकासाच्या मुलभूत निर्देशांकाचा कल

		पान नं.
४.१	मानवी विकासाच्या मुलभूत निर्देशांकाचा कल	213
४.२	लोकसंख्या	214
४.३	सांगली व सातारा जिल्ह्यातील साक्षरता	217
४.४	सांगली व सातारा जिल्ह्याची स्त्री-पुरुष साक्षरता	219
४.५	सांगली व सातारा जिल्ह्यातील लोकसंख्येची लिंगभेदानुसार रचना	220
४.६	एकूण राष्ट्रीय उत्पन्न राज्य व जिल्हा एकूण उत्पन्न वाढीचा कल	222
४.७	भारत,महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्याची एकूण उत्पन्न वाढ	223
४.८	भारत,महाराष्ट्र राज्य,सांगली व सातारा जिल्ह्याच्या दरडोई उत्पन्न वाढीचा कल	224
४.९	भारत,महाराष्ट्र राज्य, सांगली जिल्हा व सातारा जिल्ह्याचे सरासरी आयुर्मान	227
४.१०	भारत,महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यातील शैक्षणिक घटकांचा कल	229
४.११	सांगली व सातारा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची विविध शैक्षणिकस्तरातील विद्यार्थ्यी पट संख्या (१९९१ ते २०११)	231
४.१२	शहरीकरण व मानवी विकास	235
४.१३	भारत, महाराष्ट्र , सांगली व सातारा जिल्ह्यातील शहरी लोकसंख्येची घनता	239
४.१४	सांगली व सातारा जिल्ह्यातील शिक्षणावरील खर्च	240

प्रकरण 4

मानवी विकासाच्या मुलभूत निर्देशांकाचा कल

4.1 मानवी विकासाच्या मुलभूत निर्देशांकाचा कल:–

लोकसंख्या ही देशाच्या आर्थिक विकासाला मदत करणारी ही असते व ती आर्थिक विकासाला अडथळा देखील ठरते. देशाची लोकसंख्या न्यून असेल तर आर्थिक विकास जलद होतो. याउलट ती आर्थिक विकासाला मारक असते. भारताची सध्याची लोकसंख्या अतिरिक्त असल्यामुळे ती आर्थिक विकासाला सहाय्यभ्त ठरत नाही. नैसर्गिक साधन संपत्तो पेक्षा लोकसंख्या वाढ जास्त असल्यामुळे देशाचा आर्थिक विकास मंदगतीने होत आहे. भारतात शिक्षणाचे कमी प्रमाण, कमी साक्षरता दर, वगैरेमुळे, देशात शिक्षक, तंत्रज्ञ, कशल कामगार, व्यवस्थापक, शास्त्रज्ञ, डॉक्टर, इंजिनिअर वगैरे कुशल कामगारांची संख्या कमी आहे. त्यामुळे भारताची लोकसंख्या अनुत्पादक मानली जाते, म्हणून देशात विविध प्रकारचे शिक्षण व प्रशिक्षणांच्या सोयी उपलब्ध करुन देऊन देशाच्या आर्थिक विकासाला आवश्यक अशी मानवी संसाधन सामग्री निर्माण केली पाहिजे. थोडक्यात मानवी साधन सामग्रीचा विकास घडवून आणल्यास देशाचा जलद आर्थिक विकास घडून येतो.त्यासाठी मानवी विकासाला अलिकडच्या काळात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे.

समाजाच्या राहणीमानचा दर्जा सुधारावा म्हणून यु.एन.डी.पी.ने मानव विकास निर्देशांकानुसार उदा.-शिक्षण, आरोग्य, राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न, मुलभूत सेवा क्षेत्रांचा विकास वगैरे घटकांचा विचार करुन विविध देशांचा मानव विकास अहवाल तयार करण्यात आले आहेत.

जसे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर मानव विकास अहवाल तयार करुन विकासाचे मापन तयार केले जाते, तसेच राज्य, जिल्हा व तालुका पातळीवरील आर्थिक व सामाजिक विकासाचा अभ्यास करण्यासाठी त्या त्या प्रदेशातील मानव विकास तयार केले जातात.

प्रस्तुत अभ्यासात महाराष्ट्र राज्यातील सांगली व सातारा जिल्ह्यातील मानव विकासाचा अभ्यास केला आहे. त्यासाठी सन 1991 ते 2011 हा कालावधी घेतला आहे. त्यासाठी आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवर मान्य झालेले मानवी विकासाच्या निर्देशांकांचा (Indicators) अभ्यास केला आहे.

4.2 लोकसंख्या :- भारत व महाराष्ट्रातील लोकसंख्येत सन 1991 ते 2011 पर्यंत झालेले बदल खालील तक्त्यात दर्शविले आहेत.

तक्ता क्र.4.1

भारत व महाराष्ट्र लोकसंख्या वाढीचा कल

(कोटी)

वर्षे	भारत		महाराष्ट्र	
	लोकसंख्या	वाढीचा दर	लोकसंख्या	वाढीचा दर
1991	84.60	+ 23.9 (2.39)	7.69	+ 22.45 (2.24)
2001	102.9	+ 21.5 (2.15)	9.69	+ 26.00 (2.6)
2011	121.00	+ 17.64 (1.76)	11.23	+ 15.89 (1.58)
वाढीचा दर	+ 43.02	-	+ 46.03	-
सरासरी वार्षिक वाढीचा दर	-	+ 2.10	-	+ 2.14

टीप:- कंसातील आकडे वाढीचा दर दर्शवितात.

स्त्रोत:- भारत व महाराष्ट्राचे आर्थिक सर्व्हेक्षण 1991 ते 2010-11

तक्ता क्र .4.1 सन 1991 ते 2011 या काळातील भारत व महाराष्ट्रातील लोकसंख्या वाढ व लोकसंख्या वाढीचा दर दर्शवितो. सन 1991 ते 2011 या 30 वर्षाच्या काळात भारताची लोकसंख्या 84.6 कोटीवरुन 121 कोटी इतकी वाढली. या काळातील लोकसंख्या वाढीचा दर + 43.02 इतका राहीला. तर याच तीन दशकातील लोकसंख्या वाढीचा दर अनुक्रमे +23.9, +21.5 व +17.64 इतका होता, तर वार्षिक वाढीचा दर अनुक्रमे +2.39, 2.15 व 1.76 इतका राहीला. सरासरी दर अनुक्रमे +2.10 इतका राहील.


सन 1991 ते 2011 या काळात महाराष्ट्राची लोकसंख्या 7.69 कोटीवरून 11.23 कोटी इतको वाढली. या 30 वर्षाच्या काळातील लोकसंख्या वाढीचा दर + 46.03 इतका होता.तर दशवार्षीक वाढीचा

दर अनुक्रमे +20.25, +14.56 व +6.94 इतका राहील तर वार्षिक वाढीचा दर अनुक्रमे +2.02, 1.45, व +0.69 इतका होता तर सरासरी लोकसंख्या वाढीचा दर +1.3 इतका होता.

भारत व महाराष्ट्राचा दशवार्षिक, वार्षिक व सरासरी दराची तुलना करता असे दिसून येते को गेल्या 30 वर्षात 1991 ते 2011 महाराष्ट्रातील लोकसंख्या वाढीचा दर (+46.03) भारताच्या लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा (+43.03) जास्त होता तर महाराष्टाचा लोकसंख्या वाढीचा सरासरी दर (+2.14) भारतातील सरासरी लाकसंख्या वाढीच्या दरापेक्षा (+2.10) जास्त होता.

आकृती 4.1

भारत व महाराष्ट्रातील लोकसंख्या वाढीचा दर (1991–2011)



तक्ता क्र 4.2

सांगली व सातारा जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीचा कल

(हजार)

वर्ष	सांगली जिल्हा		सातारा जिल्हा	
	लोकसंख्या	वाढीचा दर	लोकसंख्या	वाढीचा दर
1991	2209	+ 20.45 (2.04)	2452	+ 20.25 (+2.02)
2001	2584	+ 16.97 (+1.69)	2809	14.56 (+1.45)
2011	2821	+ 9.17 (0.91)	3004	+ 6.94 (+0.69)
वाढीचा दर	+ 27.70	-	+ 22.51	-
सरासरी वार्षिकवाढीचा दर	-	+ 1.5	-	+ 1.3

टिप– कंसातील आकडे दशवार्षिक लोकसंख्या वाढीचा दर दशवितात.

स्त्रोत : सांगली व सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2012

तक्ता क्र. 4.2 सन 1991 ते 2011 काळातील सांगली व सातारा जिल्ह्यातील लोकसंख्या व लोकसंख्या वाढीचा दर दशवितो.

सन 1991 ते 2011 या काळात सांगली जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 2209 हजारावरुन 2821 हजार इतकी वाढली. या 20 वर्षाच्या काळात सांगली जिल्ह्याच्या लोकसंख्या वाढीचा दर + 27.70 इतका राहीला. तर याच काळात लोकसंख्या वाढीचा दशवार्षिक अनुक्रमे +2.04, +1.69 व +0.91 इतका होता. गेल्या 20 वर्षात लोकसंख्या वाढीचा सरासरी दर +1.5 इतका राहीला. 1991 ते 2011 या काळात कमी झाला.


सन 1991 ते 2011 या काळात सातारा जिल्ह्याची 2452 हजारावरुन 3004 हजार इतको वाढली. या काळात लोकसंख्या वाढीचा हा दर 22.51 इतका राहीला. तर याच काळात लोकसंख्या वाढीचा दशवार्षिक दर अनुक्रमे +20.25, +14.56 व +6.94 एवढा होता, तर वार्षिक दर अनुक्रमे +2.02, +1.45 व 0.69 इतका होता. तर सरासरी लोकसंख्या वाढीचा दर +1.3 इतका राहील. म्हणजे सातारा जिल्ह्याच्या लोकसख्या वाढीचा वार्षिक दर + 2.02 वरुन + 0.69 इतका अभ्यास काळात कमी झाला.

सांगली व सातारा जिल्ह्याच्या लोकसंख्या वाढ व वाढीचा दर यांची तुलना करता असे दिसून येते की सन 1991 ते 2011 या कालावधीत दोन्ही जिल्ह्याच्या लोकसंख्या वाढीचा दर घटत गेला आहे. तसेच सांगली व सातारा जिल्ह्यातील सरासरी लोकसंख्या वाढीच्या दराची तुलना करता सातारा जिल्ह्याची (+1.3) लोकसंख्या वाढीचा दर सांगली जिल्ह्याच्या लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा (+1.5)

कमी राहीला. दोन्ही जिल्ह्यातील लोकसंख्येत वाढीच्या दरात घट होत आहे. हे देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने सुचिन्ह आहे.

आकृती 4.2

सांगली व सातारा जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीचा दर (1991–2011)



4.3 सांगली व सातारा जिल्ह्यातील साक्षरता :–

साक्षरता म्हणजे ज्या लोकांना लिहीता वाचता येते अशी लोकसंख्या होय. साक्षरता ही शिक्षणाशी निगडीत असते. शिक्षणाचा प्रसार व प्रचार जास्त असेल तर साक्षरता जास्त असते. शिक्षण व साक्षरता या दोन घटकात 'धन' सहसंबंध असतात. साक्षरतेचे प्रमाण जास्त असल्यास लोकसंख्या उच्च दर्जाची असते, अशी लोकसंख्या देशाच्या आर्थिक विकासाला पोषक असते. साक्षरतेचा अभ्यास करताना एकूण साक्षरता, स्त्री-पुरुष साक्षरता, ग्रामीण व शहरी साक्षरता, प्रौढ साक्षरता वगैरे घटकांचा अभ्यास केला जातो. खालील तक्ता सन 1991 ते 2011 या काळातील सांगली व सातारा जिल्ह्यातील साक्षरतेचा कल दर्शवितो.

तक्ता क्र. 4.3

सांगली व सातारा जिल्ह्यातील साक्षरता

(टक्के)


कालावधी	सांगली	सातारा
1991	62.61	66.67
2001	76.62	78.22
2011	82.62	84.20
वाढीचा दर	+31.96	+26.29

स्त्रोत, सांगली व सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

तक्ता क्र .4.3 सांगली व सातारा जिल्ह्यातील 1991 ते 2011 या काळातील साक्षरतेचे प्रमाण दर्शवितो. सांगली जिल्ह्यातील एकूण साक्षरता 1991 ते 2011 या काळात अनुक्रमे 62.61%, 76.62%, व 82.62% इतकी होत. गेल्या 30 वर्षातील तिच्या वाढीचा दर +31.93 इतका राहीला. याच काळात सातारा जिल्ह्यातील साक्षरता अनुक्रमे 66.67%, 78.22%, व 84.20% इतका होता. सांगली व सातारा या दोन्ही जिल्ह्याची तुलना करता सन 1991 ते 2011 या 30 वर्षाच्या काळात सांगली जिल्ह्यातील साक्षरता प्रमाण वाढीचा दर (+26.29) कमी राहीला.

आकृती 4.3

सांगली व सातारा जिल्ह्याची साक्षरता वाढीचा दर. (1991–2011)



4.4 सांगली व सातारा जिल्ह्याची स्त्री–पुरुष साक्षरता

स्वातंत्र्यानंतर भारत सरकार व महाराष्ट्र राज्य सरकारने स्त्रियांमधील साक्षरता व स्त्रियांच्या शिक्षणाचे प्रमाण वाढवण्यासाठी विविध प्रयत्न करण्यात आले, त्यामुळे आजच्या काळात स्त्रियांच्या साक्षरतेच्या प्रमाणात वाढ होत आहे. खालील तक्ता क्र 4.3 सन 1991 ते 2010-11 या काळातील स्त्रिया व पुरुषांमधील सांगली व सातारा जिल्ह्यातील साक्षरता प्रमाण दर्शवितो.

तक्ता क्र.4.4

सांगली व सातारा जिल्ह्यातील स्त्री–पुरुष साक्षरता प्रमाण

(टक्के)

कालावधी	सांगली		सातारा	
	पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया
1991	74.83	49.94	86.61	53.65
2001	86.26	66.73	88.20	68.38
2011	90.40	74.66	92.09	76.29
वाढीचा दर	+20.81	+49.50	+6.33	+42.20

स्त्रोत तक्ता क्र.4.2 प्रमाणे


सांगली जिल्ह्यातील परुष साक्षरतेचे प्रमाण 1991 ते 2011 या काळात अनुक्रमे 74.83% 86.26% व 90.40% इतके होते. या 30 वर्षात प्रमाण पुरूष साक्षरता प्रमाण वाढीचा दर +20.81 इतका होता. याच काळात स्त्री साक्षरता प्रमाण अनुक्रमे 49.94%, 66.73% व 74.66% इतकी होती या काळातील स्त्री साक्षरता प्रमाण वाढीचा दर + 49.50 इतका राहील.

सातारा जिल्ह्यातील याच काळातील पुरुष साक्षरता प्रमाण दर अनुक्रमे 86.61%, 88.20% व 92.09% इतके होते तर या 30 वर्षाच्या काळातील त्याच्या वाढीचा दर + 6.33% होता. तसेच 1991 ते 2011 या काळातील स्त्री साक्षरता प्रमाण 53.65%, 68.38% व 76.29% होते. या काळातील स्त्री साक्षरता वाढीचा दर + 42.20 होता.

सांगली व सातारा जिल्ह्यातील स्त्री-पुरुष साक्षरता वाढीच्या दराचा तुलनात्मक अभ्यास करता असे दिसून येते की अभ्यास काळात सांगली जिल्हयाचा पुरुष व स्त्रियांचा साक्षरता दर (अनुक्रमे +20.81 व +49.50) सातारा जिल्ह्यातील दरापेक्षा (+6.33 व +42.20) जास्त राहीला. खालील आकृती सांगली जिल्ह्यातील पुरुष व स्त्रियांचा साक्षरता दर दर्शवितो.

आकृती क्र.4.4

सांगली व सातारा जिल्ह्यातील स्त्री–पुरुष साक्षरता दर (1991 ते 2011)



4.5 सांगली व सातारा जिल्ह्यातील लोकसंख्येची लिंगभेदानुसार रचना:–

सांगली व सातारा जिल्ह्यातील लोक संख्येची लिंगभेदानुसार रचना म्हणजे एकण लोकसंख्येत असणारे स्त्री-पुरुषांचे प्रमाण होय. लोकसख्येतील स्त्री पुरुषांच्या प्रमाणावरुन त्या देशातील लाकसंख्येतील स्त्री-पुरुष समानता व स्त्रियांना दिला जाणारा दर्जा समजतो. तसेच लिंग विषमता निर्देशांक (Gender inequality Index) समजतो. खालील तक्ता भारत, महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यातील स्त्री-पुरुष प्रमाण दर्शवितो.

तक्ता क्र.4.5

भारत, महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यातील स्त्री–पुरुष प्रमाण (1991 ते 2011)

कालावधी	भारत		महाराष्ट्र		सांगली जिल्हा		सातारा जिल्हा	
	पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया
1991	1000	921	1000	934	1000	958	1000	1029
2001	1000	933	1000	921	1000	957	1000	995
2011	1000	940	1000	925	1000	964	1000	986
वाढ/घट	-	+2.06	-	-0.96	-	0.63	-	-4.18

स्त्रोत : 1) महाराष्ट्राचा आर्थिक सर्व्हे – 2011

2) सांगली व सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

तक्ता क्र .4.4 सन 1991 ते 2011 या काळातील भारत, महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यातील एकूण प्रमाण दर्शवितो.

सन 1991 ते 2011 या काळात भारतात दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण अनुक्रमे 921, 933 व 940 असे वाढत गेल्याचे दिसत होते. स्त्रियांचे प्रमाणातील वाढीचा हा दर 30 वर्षाच्या काळात +2.06 इतका राहीला हे देशाच्या दृष्टीने सूचिन्ह आहे.

महाराष्ट्रात याच काळात दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण अनुक्रमे वाढीचा दर 934, 921 व 925 असे होता. स्त्रियांच्या प्रमाणातील वाढीचा दर-0.96 असा राहीला, हे महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीने चांगले नाही.


सन 1991 ते 2011 या काळातील दरहजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण अनुक्रमे 958, 957, 964 असे वाढले, या वाढीचा दर उपरोकत कालावधीत + 0.63 इतका राहीला.

सातारा जिल्ह्यातील स्त्री-पुरुष प्रमाण याच काळात अनुक्रमे 102, 955 व 986 असे घटत गेल्याचे दिसून येते, या घटीचा दर 4.18 इतका होता. अशा रितीने राष्ट्र, राज्य व जिल्हा पातळीवरील दरहजारी पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण वाढीचा दर भारताचा (+2.06) सर्वात जास्त राहील तर सातारा जिल्ह्याचा हा दर सर्वात कमी -4.18 राहीला.

महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्याचा विचार करता अभ्यास काळात सांगली जिल्ह्याचा स्त्री-प्रमाण दर वाढला तर महाराष्ट्र राज्य (-0.96) व सातारा जिल्ह्यातील हा दर (-4.18) उणे असल्याचे दिसून येते. म्हणून राज्य व सातारा जिल्ह्याने दर हजारी स्त्रियांचे प्रमाण वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत.

आकृती 4.5

1991 ते 2011 या काळातील भारत, महाराष्ट्र राज्य व सांगली व सातारा जिल्ह्यातील स्त्री–पुरुष प्रमाण वाढीचा दर दर्शवितो.



4.6 एकूण राष्ट्रीय उत्पन्न राज्य व जिल्हा एकूण उत्पन्न वाढीचा कल:–

देशाच्या आर्थिक विकास हा एकूण राष्ट्रीय उत्पन्न वाढीच्या विकासावर अवलंबून असतो. एकूण राष्ट्रीय उत्पन्न हा आर्थिक विकास दोहोंत धन सहसंबंध असतात. एकूण राष्ट्रीय उत्पन्न वाढ झाल्यास उत्पन्न हा आर्थिक विकासाचा निर्देशांक असतो एकूण राष्ट्रीय उत्पन्न व आर्थिक विकास दोहोत सहसंबंध असतात. एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाल्यास आर्थिक विकास देखील वाढतो, याउलट एकूण राष्ट्रीय उत्पन्नात घट झाल्यास आर्थिक विकास देखील कमी होतो. आर्थिक विकास राष्ट्रीय उत्पन्न व मानवी विकासात धन सहसंबंध असतात आर्थिक विकास जास्त असल्यास ढोबळमानाने मानवी विकास

देखील मोठया प्रमाणात घडून येतो.त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न, आर्थिक विकास व मानवी विकासातील संबंध अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. सुप्रसिध्द अर्थतज्ज्ञ "महेबूब उल हक" यांनी युनोच्या 1990 च्या मानवी विकास निर्देशांक तयार करण्यासाठी एकूण राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई राष्ट्रीय उत्पन्न हे घटक सांगितले आहेत. देशातील लोकांच्या राहणीमानचा दर्जा ठरविण्यासाठी दरडोई देशांर्तगत उत्पादन अमेरिकन डॉलरच्या संदर्भात सांगितले आहे. त्यासाठी उत्पन्न मर्यादा कमाल 40,000 व किमान 100 अमेरिकन डॉलर सांगून त्यावरुन उच्च, मध्यम व कनिष्ट मानव निर्देशांक मोजला जातो.

4.7 भारत, महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्याची एकण उत्पन्न वाढ :–

खालील तक्ता भारत, महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्हा यांच्या एकण उत्पन्न वाढीचा 1991 ते 2011 या काळतील कल दर्शवितो.

तक्ता क्र.4.6

भारत, महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील एकण उत्पन्न वाढीचा कल:–

(को.रु.चालु किंमतीनुसार)

कालावधी	भारत एकूण उत्पन्न	महाराष्ट्र राज्य एकूण उत्पन्न	सांगली एकूण जिल्हा उत्पन्न	सातारा एकूण जिल्हा उत्पन्न
1991	531814	68861	2400.75	2214.30
2001	191982	243584	5733.36	5714.13
2011	7266967	1068327	22137	22414.00
वाढीचा दर	+1266.44	+ 1451.42	+ 822.08	+ 912.23
सरासरी वार्षिकवाढ	+ 42.21	+ 48.38	+ 27.40	+ 30.40

टिप– हे आकडे सन 1993–94 वर्षाचे आहेत.स्त्रोत:– 1) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी –2003–04

2) इकॉनॉमिक सर्व्हे ऑफ इंडिया 2012–13 3) महाराष्ट्र,मानव विकास निर्देशांक – 2002

तक्ता क्र 4.5 दर्शवितो की 1991 ते 2011 या काळात भारताचे राष्ट्रीय उत्पन्न 53181को. रु.7266 को.रु.इतके वाढले त्याच्या उत्पन्न वाढीचा दर +1266.4 इतका होता तर वार्षिक सरासरी उत्पन्न वाढीचा दर +42.21 इतका राहीला .

सन 1991 ते 2011 या काळात महाराष्ट्र राज्याचे उत्पन्न वाढीचा दर +145.42 इतका राहीला तर वार्षिक सरासरी उत्पन्न वाढीचा दर +48.38 इतका होता.

सांगली जिल्ह्याचे एक़ण जिल्हा उत्पन्न वाढीचा दर +822.08 होता तर या 30 वर्षात सांगली जिल्ह्याचे एक़ण उत्पन्न दरवर्षा सरासरी +27.40 या दराने वाढले.

सातारा जिल्ह्याचे एकूण उत्पन्न 1991 ते 2011 या काळात 2214.30 को.रु.22414.को. रु.इतके वाढले. या उत्पन्न वाढीचा दर +912.23 इतका वाढला, तर वार्षिक सरासरी दर +30.40 एवढा होता.

भारत व महाराष्ट्र राज्याच्या 1991ते 2011 या काळातील एकूण उत्पन्न वाढीचा दराची तुलना करता महाराष्ट्राच्या उत्पन्न वाढीचा दर (+1451.42) भारताच्या एकूण उत्पन्न वाढीच्या दरापेक्षा (+1266.44) जास्त राहीला तर वार्षिक सरासरी वाढीचा दर देखील महाराष्ट्राचा (+ 48.38) भारतापेक्षा (+ 42.21) जास्त होता.

महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्याच्या एक़ण उत्पन्न वाढीचा दर 1991 ते 2011 या काळात राज्याच्या उत्पन्न वाढीच्या दरापेक्षा (1451.42) सांगली व सातारा जिल्ह्याचे वाढीचे दर (+822.08 व 912.23) कमी राहीले तसेच सरासरी वार्षिक वाढीचे दर देखील महाराष्ट्र राज्य +48.38, सांगली जिल्हा-(27.40) व सातारा जिल्हा +30.40) अभ्यास काळात कमी राहीले.

सांगली व सातारा जिल्ह्याच्या एक़ण राष्ट्रीय वाढीच्या दराची तुलना करता 1991 ते 2011 या काळात सातारा जिल्ह्याच्या एक़ण वाढीचे दरापेक्षा (+822.08) जास्त होता, तसेच वार्षिक सरासरी उत्पन्न वाढीचा दर देखील सातारा जिल्ह्याचा (+30.40) सांगली पेक्षा (+27.40) जास्त होता.

4.8 भारत, महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्याच्या दरडोई उत्पन्न वाढीचा कल :–

एकूण राष्ट्रीय वाढीवरुन देशातील मानवी विकासाची खरी कल्पना येत नाही. कारण एक़ण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होऊन देखील जर देशातील राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप समान झाल नाही तर देशात मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता निर्माण होते. त्यामुळे देशात दारिद्र्य, बेकारी, कनिष्ठ राहणीमान यासारख्या समस्या निर्माण होतात व त्यांचा प्रतिकुल परिणाम मानवी विकासावर घडून येतो. म्हणून महेबूब उल हक

म्हणतात एक़ण राष्ट्रीय उत्पन्ना ऐवजी दरडोई उत्पन्नात किती वाढ झाली आहे हे पाहणे महत्त्वाचे ठरते. त्यामुळे मानवी विकासाचे मापन करण्याचा दरडोई उत्पन्न हा निकष अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. त्यामुळे देशातील राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाटपाची कल्पना येते. दरडोई उत्पन्न व लोकांचे राहणीमान दोहोंत धन सहसंबंध असतात. दरडोई उत्पन्न जास्त, तर लोकांचे राहणीमान जास्त असते. याउलट दरडोई उत्पन्न कमी असल्यास राहणीमानचा दर्जा कमी राहून मानवी विकास देखील कमी आसतो.

खालील तक्ता क्र.4.7 भारत, महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील सन 1991 ते 2011 या काळातील दरडाई उत्पन्नात झालेली वाढ दर्शवितो.

तक्ता क्र .4.7

भारत, महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्याच्या दरडोई उत्पन्न वाढीचा कल (1991 ते 2011)

(रुपये)

कालावधी	भारत	महाराष्ट्र राज्य	सांगली जिल्हा	सातारा जिल्हा
1991	5603	8242	10381	8632
2001	17947	28540	22038	20165
2011	54151	83395	71196	67134
साधा वाढीचा दर (SGR)	+866.46	+911.70	+585.76	677.60
चक्रवाढ दर (CGR)	+ 7.77	+ 7.94	+ 7.18	+ 7.66

टिप:– ही आकडेवारी 1993 – 94 ची आहे.

स्त्रोत:- **1) ESM-2003-04, 2012-13.2) सांगली व सातारा जिल्ह्याचे सामाजिक व आर्थिक समालोचन 2012**

तक्ता क्र.4.7 सन 1991 ते 2011 या काळातील भारत, महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न वाढीचा कल दर्शवितो.

सन 1991 ते 2011 या काळात भारताचे दरडोई उत्पन्न 5603 रुपयावरुन 54151 रु. इतके वाढले. या कालावधीतील दरडोई उत्पन्न वाढीचा साधा दर + 866.46 इतका राहीला. तर दरडोई उत्पन्न

वाढीचा चक्रवाढ दर +7.77 इतका होता. म्हणजे गेल्या 30 वर्षात भारताचे दरडोई उत्पन्न 866.40% ने वाढले, तर प्रतीवषी ते सरासरी +7.77% दराने वाढले.

महाराष्ट्र राज्याचे दरडोई उत्पन्न याच कालावधीत 8242 रुपयावरुन 83395 रु. इतके वाढले ही वाढ +912.70 या दराने झाली म्हणजे गेल्या 30 वर्षात महाराष्ट्र राज्याचे दरडोई उत्पन्न वाढ 911.70% पेक्षा जास्त झाली तर प्रतीवर्षी दरडोई उत्पन्न वाढीचा दर +7.94 इतका होता.

सांगली जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न 1991 ते 2011 या काळात 10381 रुपयावरुन 71196 रु. इतके वाढले. या काळात दरडोई उत्पन्नात +585.76 या दराने वाढ झाली, तर दरवर्षी उत्पन्न वाढीचा दर +7.18 इतका राहीला.


सातारा जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न 1991 ते 2011 या काळात 8632 रुपयावरुन 67134 रु. असे वाढले. या दरडोई उत्पन्न वाढीचा दर +677.60 इतका राहीला. तर प्रतीवर्षी दरडोई उत्पन्न वाढीचा दर +7.66 इतका होता.

भारत, महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न वाढीचा दराची तुलना करता महाराष्ट्र राज्याचा 30 वर्षातील दरडोई उत्पन्न वाढीच्या दर सर्वात जास्त +911.70 राहिला तर सांगली जिल्ह्याचा हा दर सर्वात कमी +585.76 राहिला, भारताचा दुसऱ्या स्थानो + 866.40 व सातारा जिल्ह्याचा हा वाढीचा दर तिसऱ्या स्थानावर राहिला. याच काळातील (1991-2011) दरवर्षी दरडोई उत्पन्न वाढ आणि चक्रवाढी दर महाराष्ट्राचा सर्वात जास्त +7.94 आहे व भारत दुसऱ्या स्थानी +7.77, सातारा तिसऱ्या स्थानी 67.66 सांगली चौथ्या स्थानावर (+7.18) राहिला.

सन 1991 ते 2011 या काळातील सांगली व सातारा जिल्ह्यांच्या दरडोई उत्पन्नतील वाढ राष्ट्रीय पातळी व राज्य पातळीपेक्षा कमी राहिली. तसेच सांगली व सातारा या दोन्ही जिल्ह्यांच्या दरडोई उत्पन्न वाढीची तुलना करता सातारा जिल्ह्याच्या दरडोई उत्पन्नात सांगली जिल्ह्यापेक्षा जास्त दराने वाढले.

आकृती क्र 4.6

भारत,महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न वाढीचा कल (1991 ते 2011)



4.9 भारत,महाराष्ट्र राज्य, सांगली जिल्हा व सातारा जिल्ह्याचे सरासरी आयुर्मान

सन 1990 मध्ये युनोने जो मानवी विकास अहवाल तयार केला तेव्हा देशाचे सरासरी आयुर्मान (जन्मावेळी) हा एक घटक वापरला आहे. त्यामुळे लोकांच्या दीर्घ व निरोगी जीवनाची कल्पना येते सरासरी आयुर्मानाची आकडेवारी राष्ट्रीय स्तर व राज्य स्तरांवर उपलब्ध असते, परंतु जिल्हास्तरावर ती उपलब्ध नसते. म्हणून महाराष्ट्र सराकारने सन 2002 मध्ये मानव विकास अहवाल तयार करताना प्रत्येक जिल्ह्यातील सरासरी आयुर्मान या घटका ऐवजी अर्भक मृत्यूदर (Infant Mortality Rate –IMR) हा घटक वापरला. त्यामुळे सांगली व सातारा जिल्ह्यांचा आयुर्मान निर्देशांक काढण्यासाठी आम्ही महाराष्ट्र राज्याचे सरासरी आयुर्मान गृहीत धरले आहे. कारण राज्याचे सरासरी आयुर्मान ही राज्यातील जिल्ह्याच्या आयुर्मानाची सरासरी असते. त्याबरोबर अर्भक मृत्यूदर देखील गृहीत धरला आहे.

खालील तक्ता भारत व महाराष्ट्र राज्यातील लोकांचे 1991 ते 2011 या काळातील सरासरी आयुर्मान दर्शवितो.

तक्ता क्र.4.8

भारत व महाराष्ट्रतील लोकांचे सरासरी आयुर्मान

कालावधी	भारत	महाराष्ट्र राज्य	सांगली जिल्हा	सातारा जिल्हा
1991	60.30	64.80	N.A	N.A
2001	65.30	69.63	73.35	73.90
2011	66.10	69.90	N.A	N.A
वाढीचा दर	+ 9.62	+7.87	–	–

स्त्रोत:– 1) ESM–**2002–032) महाराष्ट्र मानव विकास अहवाल 2002 3)** ESI–**2012–13**


तक्ता क्र. 4.8 सन 1991 ते 2011 या काळातील भारत व महाराष्ट्र राज्यातील सरासरी आयुर्मानातील वाढीचा कल दर्शवितो. भारतातील लोकांचे सरासरी आयुर्मान 1991 ते 2011 या काळात अनुक्रमे 60.30 ,65.30 व 66.10 वर्षे इतक होते. गेल्या 30 वर्षात भारतीय लोकसंख्येच्या आयुर्मान वाढीचा दर +9.62 इतका राहीला. महाराष्ट्र राज्यातील लोकांचे सरासरी आयुर्मान अनुक्रमे 64.80, 69.63, व 69.90 वर्षे इतके होते. या काळातील महाराष्ट्रातील लोकांच्या सरासरी आयुर्मान वाढीचा दर +7.87 इतका होता.

सन 1991 ते 2011 या तीन दशकातील प्रत्येक दशकात महाराष्ट्रातील लोकांचे सरासरी आयुर्मान भारतातील सरासरी आयुर्मानापेक्षा जास्त राहील्याचे दिसून येते.

खालील आकृती भारत व महाराष्ट्र राज्यातील सरासरी आयुर्मानाची तौलोनिक स्थिती दर्शविते.

आकृती 4.7

भारत व महाराष्ट्र राज्यातील सरासरी आयुर्मान



4.10 भारत, महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यातील शैक्षणिक घटकांचा कल

सन 1990 मध्ये मानव निर्देशांक तयार करण्यासाठी UNDP ने शिक्षण हा घटक महत्त्वाचा मानला आहे. शिक्षण या घटकापासून मानव विकास निर्देशांक तयार करण्यासाठी त्यांनी प्रौढ साक्षरता दर आणि प्राथमिक, माध्यमिक, व उच्च शिक्षणातील पटावरील नोंद असलेली विद्यार्थ्यी संख्या शैक्षणिक निर्देशांक तयार करताना प्रौढ साक्षरता दर या चल घटकाला 2/3 भार दिला व पटावरील विद्यार्थ्यीच्या नोंदीच्या गुणोत्तराला 1/3 भार दिला. खालील तक्ता भारत, महाराष्ट्र सांगली व सातारा जिल्ह्यातील प्रौढ साक्षरता दर दर्शवितो.

तक्ता क्र. 4.9

भारत, महाराष्ट्र सांगली व सातारा जिल्ह्यातील प्रौढ साक्षरता दर

टक्के

कालावधी	भारत	महाराष्ट्र राज्य	सांगली जिल्हा	सातारा जिल्हा
1991	52.2	64.87	62.61	66.67
2001	64.83	77.33	76.62	78.22
2011	74.04	82.90	82.62	84.20
वाढीचा दर	+41.84	+27.79	+31.96	+26.29

स्त्रोत:-1) ESM-2012-13 2) सांगली व सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 3) ESI-2003-12

तक्ता क्र. 4.9 सन 1991 ते 2011 या काळातील भारत, महाराष्ट्र सांगली व सातारा जिल्ह्यातील साक्षरता प्रमाण दर्शवितो.

सन 1991 ते 2011 या काळात भारतातील राष्ट्रीय पातळीवरील साक्षरता अनुक्रमे 52.20%, 64.83 व 74.04% होती. या कालावधीत देशातील साक्षरता वाढीचा दर +41.84 इतका राहील. याच कालावधीतील महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण 64.87%, 77.30% व 82.90% इतके होते.

सन 1991 त 2011या काळात सांगली जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण 62.61%, 76.62% व 82.62% होते तर साक्षरता वाढीचा दर +31.96 इतका होता. याच काळात सातारा जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण 66.67%, 78.22% व 84.20% असे होते. साक्षरता वाढीचा सातारा जिल्ह्याचा दर +26.29 % इतका होता.

भारत व महाराष्ट्र यांची साक्षरता वाढ दराची तुलना करता दिसून येते की तिन्ही दशकात महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण राष्ट्रीय पातळीपेक्षा (भारत) जास्त राहीले. परंतु या काळातील साक्षरता वाढीच्या दराची तुलना करता भारताचा साक्षरता दर(+41.84) महाराष्ट्रापेक्षा (+27.79) जास्त होता.

सांगली व सातारा जिल्ह्यातील साक्षरतेची तुलना करता तिन्ही दशकात सातारा जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण जास्त राहीले परंतु साक्षरता वाढीचा दर हा सांगली (+31.96) सातारा जिल्ह्यापेक्षा (+26.29) जास्त राहील.

भारत, महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील साक्षरतेची तुलना करता असे दिसून येते को, तिन्ही दशकात सातारा जिल्ह्याची साक्षरता राष्ट्रीय पातळीपेक्षा (भारत), राज्य पातळी (महाराष्ट्र) व सांगली जिल्ह्यापेक्षा जास्त राहीली. दुसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र राज्य सांगली जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर तर भारत (राष्ट्रीय पातळी) चौथ्या क्रमांकावर असल्याचे दिसून येते.

अभ्यास काळात सांगली जिल्ह्याची साक्षरता राज्य पातळीपेक्षा कमी व राष्ट्रीय पातळीपेक्षा जास्त होती, तर सातारा जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण राज्य व राष्ट्रीय पातळीपेक्षा जास्त होता.

साक्षरता वाढीच्या दराचा विचार करता भारताचा क्रमांक पहिला (+41.84),सांगली जिल्ह्याचा दसरा(+31.96), महाराष्ट्र राज्य तिसरा (+27.29), तर सातारा जिल्ह्याचा चौथा क्रमांक (+27.79) लागतो. याचा अर्थ असा होतो की जेथे साक्षरतेचे प्रमाण कमी होते तेथे साक्षरता वाढीचा दर जास्त राहीला व जेथे ते जास्त हाते तेथे साक्षरता वाढीचा दर कमी राहील्याचे दिसून येते.

4.11 सांगली व सातारा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची विविध शैक्षणिक स्तरातील विद्यार्थ्यी पट संख्या (1991 ते 2011)

जिल्हा स्तरावर शैक्षणिक निर्देशांक तयार करण्यासाठी प्राथमिक, माध्यामिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन स्तरावरील विद्याथी संख्या विचारात घेतली जाते व त्यास 1/3 भारांक देऊन शैक्षणिक निर्देशांक तयार करतात खालील तक्ता क्र.4.11 सांगली व सातारा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची पटसंख्या व त्यामधील बदल दर्शवितो.

तक्ता क्र 4.10

सांगली व सातारा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची विविध स्तरातील विद्यार्थ्यी पटसंख्या

कालावधी	सांगली जिल्हा					सातारा जिल्हा				
	प्राथमिक	माध्यमिक	उच्च माध्यमिक	महाविद्यालये	सरासरी	प्राथमिक	माध्यमिक	उच्च माध्यमिक	महाविद्यालये	सरासरी
1990	313157 (100)	107283 (34.25)	52415 (16.74)	26755 (8.54)	39.88	33054 (100)	131057 (39.64)	73318 (22.18)	32657 (9.88)	42.92
2000	318070 (100	128227 (40.31)	109121 (34.3)	36702 (11.54)	46.53	324463 (100)	159667 (49.21)	112548 (34.69)	47103 (14.52)	49.6
2011	251250 (100)	123272 (49)	140050 (55.74	39242 (5.68)	5.68	277353 (100)	274508 (98.97)	79594 (28.7)	39465 (14.23)	52.2
सरासरी वाढीचा दर	-19.77	+14.90	+167.19	+46.67		-16.10	+109.45	+8.56	+20.85	

टीप:- कंसातील आकडे विद्यार्थ्यी संख्येचा निर्देशांक दर्शवितात सदर निर्देशांक प्राथमिक शाळेतील पटावरील विद्यार्थ्यी संख्येस 100 भार देऊन त्यावरुन इतर वर्गातील विद्यार्थी संख्येचा भार काढला आहे.

स्त्रोत:- 1) महाराष्ट्र मानव विकास अहवाल 2002 2) सांगली व सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2011-2012

तक्ता क्र .4.10 सांगली व सातारा जिल्ह्यातील सन 1990 ते 2011 काळातील प्राथमिक पटावरील संख्या दर्शवितो. सन 1990 ते 2011 या काळात सांगली जिल्ह्यात प्राथमिक शाळेच्या पटावर 313157 विद्यार्थी संख्या होती, ती 2011 मध्ये 251250 इतको झाली. प्राथमिक शाळेच्या पटावरील विद्यार्थी संख्येच्या वाढीचा दर -61.90 असा होता. म्हणजे तो घटल्याचे दिसून येते. याच काळात माध्यामिक व उच्च माध्यामिक शाळामधील पटावरील विद्यार्थी संख्या अनुक्रमे +14.90 व +167.19 इतका होता. तर महाविद्यालयातील पटावरील विद्यार्थी संख्या 1990 ते 2011 या काळात 26755 वरुन 39242 अशी वाढली हा वाढीचा दर +46.47 इतका होता.

सातारा जिल्ह्यातील सन 1990 ते 2011 काळातील प्राथमिक शाळेतील पटावरील विद्यार्थी संख्या 330594 वरुन 277353 इतकी झाली. या विद्यार्थी संख्येच्या वाढीचा दर-16.10 एवढा होता, म्हणजे तो घटल्याचे दिसून येते. माध्यामिक व उच्च माध्यामिक शाळामधील पटावरील विद्यार्थी संख्या अनुक्रमे 131057 वरुन 274508 व 73318 वरुन 79594 अशी वाढली या वाढीचा दर अनुक्रमे +109.45 व +8.56 इतका राहीला तर याच काळातील महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या 32657 वरुन 39465 अशी वाढली. या विद्यार्थी संख्या वाढीचा दर +20.85 इतका होता.

सन 1990 ते 2011 काळातील सांगली व सातारा जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यामिक शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी संख्येच्या वाढीचा तुलनात्मक अभ्यास दर्शवितो को, सन 1991 ते 2011 काळात सांगली व सातारा जिल्ह्यातील सख्या घट (-61.90 व -16.10), परंतु सांगली जिल्ह्यातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थी संख्येचा घटीचा दर सातारा जिल्ह्यातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थी संख्येतील घटीपेक्षा जास्त होता.

सांगली व सातारा दोन्ही जिल्ह्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळातील विद्यार्थी संख्या वाढली ही वाढ अनुक्रमे +14.90 व +167.19 आणि +109.45 व +8.56 अशी होती.

याच काळात सांगली व सातारा जिल्ह्यातील महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या देखील 1990 ते 2011 या काळात वाढली, या वाढीचा दर अनुक्रमे +14.67 व 20.85 इतका राहीला.

4.11 शहरीकरण व मानवी विकास

आर्थिक विकास हा शहरीकरणाशी निगडीत असतो शहरीकरण जास्त आर्थिक विकास जास्त असतो तसेच शहरीकरण व मानवी विकासाचा धन, सहसंबध असतो शहरीकरणामुळे मानवी विकास घडून येतो.कारण शहरीकरण मोठ्याप्रमाणात घडून आल्यास औद्योगिकरणाला चालना मिळून विविध प्रकारच्या उद्योगांचा विकास होतो, त्यामुळे कामगारांना रोजगार मिळतो, त्याच्या उत्पन्नात वाढ घडून येते, दरडोई उत्पन्न वाढते. त्यांचे राहणीमान वाढते, शिक्षणात वाढ होते, घरांच्या सोयी, उच्च प्रतीचा आहार त्यांना उपलब्ध होतो. दारिद्र्याचे प्रमाण घटते व मानवी विकास घडून येतो. त्यामुळे शहरीकरण व मानवी विकासात जवळचा संबंध असतो. शहरीकरण म्हणजे एकूण लोकसंख्येत शहरी लोकसंख्येच्या प्रमाणात वाढ होत जाणे होय, शहरी भागातील औद्योगिकरणामुळे व इतर कारणामुळे ग्रामीण भागातून शहरी भागात लोकांचे स्थलांतरण होते, त्यामुळे शहरी लोकसंख्येत वाढ होत जाते शहरांची संख्या वाढते.

'विश्वजित गुहा' यांनी UNDP ची पध्दती वापरुन HDI_1, HDI_2, HDI_3 व HDI_4 मानवी विकास निर्देशांक तयार केले. के निर्देशांक तयार करताना त्यांनी UNDP ने वापरलेल्या आयुर्मान, दरडोई उत्पन्न व साक्षरता या निर्देशांक बरोबरच नवीन दोन निर्देशांक वापरले.1)दारिद्र्य निमूलन व 2)शहरीकरण दारिदय निर्मूलनासाठी त्यांनी दारिद्र्यरेषेच्या वर असलेली लोकसंख्या हा निकष वापरला.

शहरीकरण म्हणजे काय? हे अभ्यासण्यासाठी पुढील व्याख्या दिली जाते ''शहरी भाग म्हणजे असे क्षेत्र की,अ) जेथे नगरपालिका, महानगरपालिका, कॅन्टोनमेंटबोर्ड किंवा नागरी क्षेत्र कमिटी अस्तित्वात असते. ब) त्या क्षेत्राची लोकसंख्या किमान 5000 असली पाहिजे क) किमान 75% लोकसंख्या(पुरुष) बिगरशेती क्षेत्रात काम करणारीअसावीआणि ड) त्या क्षेत्रातील लोकसंख्येची घनता किमान 400 व्यक्ती प्रतो कि.मी.असली पाहिजे.''वरील निकष पूर्ण कारणारे क्षेत्र नागरी/शहरी भाग म्हणून ओळखला जातो.

खालील तक्ता भारत, महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यातील एकूण शहरी लोकसंख्या दर्शवितो.

तक्ता क्र. 4.11

भारत, महाराष्ट्र ,सांगली व सातारा जिल्ह्यातील एकूण शहरी लोकसंख्या वाढोचा कल

कालावधी	भारत (कोटी)			महाराष्ट्र (कोटी)			सांगली (कोटी)			सातारा (कोटी)		
	एकूण	ग्रामीण	शहरी	एकूण	ग्रामीण	शहरी	एकूग	ग्रामीण	शहरी	एकूग	ग्रामीण	शहरी
1991	84.43 (100)	62.71 (74.3)	21.72 (25.7)	7.83 (100)	4.83 (61.26)	3.05 (38.64)	22.9 (100)	17.07 (77.27)	5.02 (22.73)	24.52 (100)	21.36 (87.12)	3.15 (12.88)
2001	102.70 (100)	74.20 (72.2)	28.50 (27.8)	.68 (100)	5.57 (57.60)	4.11 (42.40)	25.83 (100)	19.50 (75.49)	6.33 (24.51)	28.09 (100)	24.11 (85.83)	3.98 (14.17)
2011	121.02 (100)	83.31 (68.8)	37.71 (31.2)	11.23 (100)	6.15 (57.7)	5.08 (45.3)	28.20 (100)	21.01 (74.4)	7.19 (25.5)	30.04 (100)	24.37 (81.0)	5.70 (18.9)
वाढीचा दर	+43.33	+32.84	+73.62	+42.33	+27.33	+66.55	+27.66	+23.08	+43.23	+22.51	+13.95	+80.37

टीप:– कंसातील आकडेवारी प्रमाण 1 टक्केवारी दर्शविते.

स्त्रोत:– 1) ESI-2011-12, 2)ESM-2011- 2) सांगली व सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2011–2012

सन 1991 ते 2011 या काळात भारताची एकूण लोकसंख्या 84.43 कोटीवरुन 121.02 कोटी इतकी वाढली तिच्या वाढीचा दर गेल्या 30 वर्षात +43.33 इतका राहीला. याच कालावधीत भारतातील ग्रामीण व शहरी लोकसख्या अनुक्रमे 62.71 कोटीवरुन 83.31 कोटी व 21.72 कोटीवरुन 37.71 कोटी अशी वाढली. या लोकसंख्या वाढीचा दर अनुक्रमे +32.81 व +73.62 इतका होता.

महाराष्ट्रातील लोकसंख्या 1991 ते 2011 या काळात एकूण लोकसंख्या 7.89 कोटीवरुन 11.2 कोटी, ग्रामीण लोकसंख्या 4.83 कोटी वरुन 6.15 कोटी तर शहरी लोकसंख्या 3.05 कोटीवरुन 5.08 कोटी अशी वाढली महाराष्ट्रातील एक़ण लोकसंख्या, ग्रामीण व शहरी लोकसंख्या वाढीचा दर अनुक्रमे + 42.33, +27.33, व 66.55 इतका राहीला.

सागली जिल्ह्यातील लोकसंख्या याच कालावधीत एक़ण लोकसंख्या 22.0 लाखावरुन 28.20 लाख, ग्रामीण लोकसंख्या 17.07 लाखावरुन 21.01 तर शहरी लोकसंख्या 5.02 लाखावरुन 7.19 लक्ष इतकी वाढली. या लोकसंख्या वाढीचा दर एकूण लोकसंख्या +27.66, ग्रामीण लोकसंख्या +23.08 व शहरी लोकसंख्या +43.23 इतका होता.

सातारा जिल्ह्यातील लोकसंख्या उपरोक्त कालावधीत 24.52 लाखावरुन 30.04 लाख, ग्रामीण लोकसंख्या 21.36 लाखावरुन 24.36 लाख तर शहरी लोकसंख्या 3.16 लाखावरुन 5.70 लक्ष अशी वाढली. सन 1991 ते 2011 या काळात सातारा जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीचा दर +13.95 व शहरी लोकसंख्या वाढीचा दर +80.37 इतका राहीला.

भारत, महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील 1991 ते 2011 या काळातील लोकसंख्या वाढीचा विचार करता असे दिसून येते.

एक़ण लोकसंख्यावाढ (भारत)राष्ट्रोय पातळीवर +43.33 सर्वात जास्त झाली तर सर्वात कमी एकूण लोकसंख्या वाढीच्या सातारा जिल्ह्याचा +22.51 इतका राहीला.

याच कालावधीत ग्रामीण लोकसंख्या वाढीचा दर सर्वात जास्त राष्ट्रीय पातळीवर (भारत) +32.84 तर सर्वात कमीदर सातारा जिल्ह्याचा +13.95 राहीला.


सन 1991 ते 2011 कालावधीत शहरी लोकसंख्या वाढोचा दर सर्वात जास्त सातारा जिल्ह्यात +80.37 तर सर्वात कमी दर सर्वात जास्त सांगली जिल्ह्याचा + 43.23 इतका राहीला. भारत व, महाराष्ट्र राज्यातील शहरी करणाचा दर अनुक्रमे +73.62 व +66.55 इतका राहिला.

याचा अर्थ असा होतो को, 1991 ते 2011 या काळात राष्ट्रोयपातळीवर (भारत), राज्य पातळी (महाराष्ट्र) व सांगली व सातारा जिल्हा शहरीकरणाच्या बाबतीत सातारा जिल्हा पहिल्या क्रमांकावर, भारत दुसऱ्या क्रमांकावर, महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर, तर सांगली जिल्हा चौथ्या क्रमांकावर असल्याचे दिसून येते.

खालील आकृती राष्ट्रीय पातळीवर, राज्य पातळी व जिल्हा पातळीवर शहरीकरणाची वाढ दर्शविते.

आकृती 4.8

सन 1991 ते 2011 कालावधीत शहरीकरणाचा कल



4.12 भारत, महाराष्ट्र , सांगली व सातारा जिल्ह्यातील शहरी लोकसंख्येची घनता

लोकसंख्येची घनता म्हणजे दर चौ.कि.मीटर मध्ये राहणारी लोकसंख्या होय.जस जसे शहरीकरण वाढत जाते, तसतशी शहरी लोकसंख्येची घनता देखील वाढत जाते, सन 1951 च्या लोकसंख्या जनगणनेनुसार ज्या भागाची लोकसंख्येची घनता दर किलामीटरला 400 पेक्षा जास्त असते. त्यास शहरी विभाग म्हणून ओळखले जाते. लोकसंख्येच्या घनता हा एक शहरीकरणाचा निकष आहे. लाकसंख्येच्या घनतेतील वाढीवरुन शहरीकरणाची पातळी किंवा शहरीकरणाचा जास्त व लोकसंख्येच्या असतो. असा वाढीचा दर कमी असेल तर शहरीणाची पातळी देखील कमी आसते.

खालील तक्ता राष्ट्रीय पातळीवर (भारत), राज्यपातळी (महाराष्ट्र) व सांगली व सातारा जिल्ह्यातील शहरी लोकसंख्येची घनता दर्शवितो.

तक्ता क्र 4.12

सांगली व सातारा जिल्हयातील शहरी लोकसंख्येची घनता

(दर चौ.कि मी)

कालावधी	सांगली जिल्हा		सातारा जिल्हा	
	एकूण घनता	शहरी घनता	एकूण घनता	शहरी घनता
1991	257	1627*	268	1503
2001	301	1999	268	1656
2011	329	2371	287	1872
वाढीचा दर	+28.01	+45.72	+7.08	+24.55

टीप:– * Estimated

स्त्रोत:– 1) ESI-2011-12, 2)ESM-2011-12


2) सांगली व सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2012

तक्ता क्र 4.12 सांगली व सातारा जिल्ह्यातील शहरी लोकसंख्येच्या घनतेत 1991 ते 2011 या काळात झालेली वाढ दर्शवितो. सन 1991 ते 2011 या काळात सांगली जिल्ह्याची शहरी घनता अनुक्रमे 1627.1999 व 2371 होती, तर सातारा जिल्ह्याची शहरी घनता 1503, 1656 व 1872 इतको होती.

सन 1991 ते 2011 या काळात सांगली जिल्ह्यातील लोकसंख्येची शहरी घनतेच्या वाढीचा दर +45.72 इतका होता, तर सातारा जिल्ह्यातील शहरी लोकसंख्येची घनता वाढीचा दर +24.55 इतका होता. म्हणजे अभ्यास काळात सातारा जिल्ह्यापेक्षा सांगली जिल्ह्यातील शहरी लोकसंख्येची घनता वाढीचा दर जास्त होता. खालील आकृती सांगली व सातारा शहरी लोकसंख्येची घनता वाढीचा दर्शवितो.

आकृती 4.9

सांगली व सातारा शहरी जिल्ह्यातील शहरी लोकसंख्या घनता वाढीचा दर



4.13 सांगली व सातारा जिल्ह्यातील शिक्षणावरील खर्च

सन 2006-07 ते 2011-12 या पाच वर्षाच्या काळात सांगली व सातारा जिल्हापरिषदाने शिक्षणावर केलला खर्च तक्ता क्र 4.11 मध्ये दर्शविला आहे, त्यावरुन या जिल्ह्यातील शिक्षणावर झालेल्या खर्चचा कल समजतो.

तक्ता क्र.4.13

सांगली व सातारा जिल्ह्यातील शिक्षणावरील खर्च

(लक्ष रुपये)

वर्ष	सांगली जिल्हा	सातारा जिल्हा
2006-07	114.20	307.09
2011-12	627.07	735.19
वाढ	5.49पट	2.39 पट

स्त्रोत– सांगली व सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2006–07 व 2012–12

तक्ता क्र.4.13 अभ्यास काळात सांगली व सातारा जिल्ह्यातील शिक्षणावरील खर्च दर्शवितो. सन 2006-07 ते 2011-12 या काळात सांगली जिल्ह्यातील शिक्षणावरील खर्च 114.20 लक्ष रुपयावरुन 627.07 लक्ष रु. इतका वाढला, तर सातारा जिल्ह्यातील शिक्षणावरील खर्च 307.09 लक्ष रु. इतका झाला.

अभ्यास काळातील 2006-07 ते 2011-12 या कालावधीत सांगली जिल्ह्यातील शिक्षणावरील खर्च 5.49 पटीने वाढला तर सातारा जिल्ह्यातील हा खर्च 2.39 पटीने वाढला. अभ्यास काळातील सहा वर्षात शिक्षणावरील खर्च सांगली जिल्ह्यात सातारा जिल्ह्यापेक्षा जास्त वाढल्याचे दिसून येते.

****

पकरण 5

सांगली व सातारा जिल्ह्यातील आरोग्य विषयक सोयींची उपलब्धता

अ.नं.	तपशील	पान नं.
5.1	सांगली व सातारा जिल्हयातील आरोग्य विषयक सोयींची उपलब्धता	242
5.2	आरोग्य विषयक सोयींची उपलब्धता	242
5.3	सांगली व सातारा जिल्ह्यातील जन्मदर व मृत्यूदर	246
5.4	भारत, महाराष्ट्र, सांगलो व सातारा जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदराचे प्रमाण	248
5.5	सांगली व सातारा जिल्ह्यातील मातांचा मृत्यूदर	251
5.6	सांगली व सातारा जिल्ह्यातील कुपोषित बालकांचे प्रमाण	252
5.7	सांगली व सातारा जिल्ह्यातील आरोग्य सेवांवर झालेला खर्च	255
5.8	सांगली व सातारा जिल्ह्यांचा मानवी विकास निर्देशांक	259
5.9	सांगली व सातारा जिल्ह्यांचा शैक्षणिक निर्देशांक	261
5.10	सांगली जिल्ह्यांचा शैक्षणिक निर्देशांक 1991, 2001 या 2011	261
5.11	विद्यार्थी पटसंख्येवरुन शैक्षणिक निर्देशांक	262
5.12	सांगली जिल्ह्याचा शैक्षणिकनिर्देशांकसाक्षरता निदेशांक+विद्यार्थी पटसंख्या निर्देशांक	262
5.13	सातारा जिल्ह्याचा शैक्षणिक निर्देशांक	263
5.14	सातारा जिल्ह्याचा शैक्षणिक निर्देशांक-1991,2001 व 2011	264
5.15	सांगली व सातारा जिल्ह्याचा शैक्षणिक निर्देशांक 1991, 2001 व 2011 शैक्षणिक निर्देशांक	265
5. 16	सांगली जिल्ह्याचा उत्पन्न निर्देशांक	266
5.17	सातारा जिल्ह्याचा उत्पन्न निर्देशांक 1991, 2001 व 2011	268

5.18	सांगली व सातारा जिल्ह्याचा उत्पन्न निर्देशांक 1991,2001 व 2011	269
5.19	सांगली व सातारा जिल्ह्याचा आयुर्मान निर्देशांक1991,2001 व 2011	270
5.20	सांगली जिल्ह्याचा आयुर्मान निर्देशांक 1991, 2001 व 2011	271
5.21	सातारा जिल्ह्याचा आयुर्मान निर्देशांक 1991, 2001 व 2011	272
5.22	सांगली व सातारा जिल्ह्याचा आयुर्मान निर्देशांक 1991, 2001 व 2011	273
5.23	सांगली व सातारा जिल्हयाचा मानव विकास निर्देशांक1991,2001 व 2011	274
5.24	सांगली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक 1991,2001 व 2011	274
5.25	सन 1991, 2001 व 2011 चा सांगली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक	275
5.26	सातारा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक 1991, 2001 व 2011	276
5.27	सन1991, 2001 व 2011 चा सातारा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक	276
5.28	सांगली व सातारा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांकाची तुलना 1991 ते 2011	277
5.29	आर्थिक विकास व मानवी विकासातील सहसंबध	279

पकरण 5

सांगली व सातारा जिल्ह्यातील आरोग्य विषयक सोयींची उपलब्धता

5.1 सांगली व सातारा जिल्ह्यातील आरोग्य विषयक सोयींची उपलब्धता :–

मानवी आरोग्य फक्त त्याच्या उत्पन्नावरच अवलंबून नसते. तर त्याचा आहार, पोषण दर्जा, त्याला उपलब्ध असणाऱ्या आरोग्यविषयक सोई इत्यादी घटकावर देखील अवलंबून असतो. लोकांना आरोग्य विषयक सोई सहज व किफायतशीर दरात उपलब्ध होतात को नाही, आरोग्यविषयक सोई व सुविधांचा दर्जा, शहरी व ग्रामीण भागात या सोई व सुविधा सहज उपलब्ध होतात किंवा नाही लोकांची राहण्याची सोय, त्याचा दर्जा, जीवनशैली वगैरे घटकांवर लोकांचे आरोग्य व स्वास्थ अवलंबून असते. सरकार, स्थानिक सरकारे आरोग्या विषयक सुविधावर किती खर्च करतात त्यावर समाजाचे स्वास्थ अवलंबून असते. या आरोग्य विषयक सोयीवर मृत्यूदर, बालमृत्यूदर, अर्भकमृत्यूदर, मातांचा मृत्यूदर सरासरी आयुर्मान हे आरोग्य निर्देशांक तयार केला जातो.

5.2 आरोग्य विषयक सोयींची उपलब्धता:–

मानव विकास निर्देशांक तयार करताना लोकांचा आरोग्य निर्देशांक देखील काढला जातो. कारण आरोग्य निर्देशांक हा मानव विकास निर्देशांकाचा एक घटक असतो. आरोग्य निर्देशांकात सरासरी आयुर्मान जन्मदर, मृत्यूदर, आरोग्य विषयक सोयींची उपलब्धता, बालमृत्यूदर, अर्भकमृत्यूदर, मातांच्या मृत्यूचे प्रमाण वगैरे घटक विचारात घेतले जातात. दीर्घायुष्य, शिक्षण व राहणीमानाचा दर्जा या तीन घटकावरुन मानव विकास निर्देशांक तयार केला जातो. त्यामध्ये चांगले आरोग्य पुरेसा व सकस आहार विचारत घेतला जातो. दीर्घायुष्य व आरोग्यदायी जीवनसाठी पुन्हा तीन घटक विचारत घेतले जातात. i) मृत्यूदर ii) बालमृत्यूदर (1-वर्षाखालील बालके) व iii) 5-वर्षाखालील बालकांचा मृत्यूदर तसेच आरोग्य

सोयींच्या उपलब्धतेमुळे विविध रोगांचे नियंत्रण करता येते. या घटकांवर दीर्घ व आरोग्यदायी जीवन अवलंबून आहे. आरोग्य निर्देशांक तयार करण्यासाठी खालील सुत्र वापरले जाते.

$$\text{आरोग्य निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष सरासरी आयुर्मान - किमान आयुर्मान}}{\text{कमाल आयुर्मान - किमान आयर्मान}}$$

त्यासाठी, कमाल आयुर्मान 85 वर्षे व किमान आयुर्मान 25 वर्षे गृहीत धरुन आरोग्य निर्देशांक काढला जातो.

खालील तक्ता सांगली व सातारा जिल्ह्यातील आरोग्य सोई व सुविधांची उपलब्धता दर्शवितो.

तक्ता क्र.5.1

सांगली व सातारा जिल्ह्यातील आरोग्य सोई व सुविधांची उपलब्धता (1991 ते 2011)

तपशील	सांगली जिल्हा				सातारा जिल्हा			
	1991	2001	2011	वाढीचा दर	1991	2001	2011-12	वाढीचा दर
1) प्रशासकिय रुग्णालये	4	17	20	+400	20	23	18	-10
2) दवाखाने	64	70	27	-57.81	57	22	19	-66.66
3) प्रसुती गृहे	-	0.4*	05	-	-	-	01	-
4) प्राथमिक आरोग्य केंद्रे	53	59	59	+11.32	69	71	71	+2.89
5) प्राथमिक उपआरोग्य केंद्रे	270	270	320	+18.52	309	309	400	+29.45
6) डॉक्टरांची संख्या	-	380*	415	-9.21	-	255*	239**	-
7) परिचारिकांची संख्या	-	1063*	1008	-5.17	-	808*	833	-
8) खाटांची संख्या	1058	2044	1454	+37.43	980	1046	1262	+28.77
9) प्रतिलाख लोकसंख्येत खाटा	75	65	52	-30.66	40	36	42	05

टिप – ** 2000 ची आकडेवारी आहे. * 2007 ची आकडेवारी आहे. स्त्रात–1) महाराष्ट्रा,मानव विकास अहवाल – 2002 2) सांगली व सातारा जिल्हा सामाजिकव आर्थिक समालोचन 2006–07 व 2012

तक्ता क्र 5.1 सांगली व सातारा जिल्ह्यातील आरोग्य सोई व सुविधांची उपलब्धता दर्शवितो. सन 1991 ते 2011 या काळात सांगली जिल्ह्यात शासकिय रुग्णालयाची संख्या 4 होती ती 2011 मध्ये 20 इतको झाली. त्याच्या वाढीचा दर +400 इतका होता म्हणजे वार्षिक वाढीचा दर +13.33 इतका राहीला. सरकारी दवाखान्याची संख्या याच काळात 64 होती ती 27 इतको कमी झाली. या वाढीचा दर -57.81 इतका राहीला. प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या 53 वरुन 59 इतको वाढली. या वाढीचा दर +11.32 इतका होता.तर वार्षिक वाढीचा दर 0.38 इतका होता. प्राथमिक उपआरोग्य केंद्रांची संख्या 270 वरुन 320 इतको झाली. या 30 वर्षाच्या काळात प्राथमिक उपआरोग्य केंद्रांच्या वाढीचा दर +18.52 म्हणजे वार्षिक दर 0.62 इतका अल्प राहीला. सांगली जिल्ह्यातील सरकारी दवाखान्यातील खाटांची संख्या 1991 ते 2011 या काळात 1058 वरुन 1454 इतको झाली. गेल्या 30 वर्षात खाटांच्या वाढीचा दर +37.43 इतका होता. तर वार्षिक वाढीचा दर +1.25 इतका होता. सांगली जिल्ह्यातील प्रती लाख लोकसंख्येमागे उपलब्ध असणाऱ्या खाटांची संख्या 75 वरुन 52 अशी कमी झाली. या 30 वर्षात खाटांच्या वाढीचा दर -30.66 इतका होता.म्हणजे तो घटल्याचे दिसून येते.

सातारा जिल्ह्यातील सन 1991 ते 2011 या काळात सरकारी रुग्णालयाची संख्या 20 वरुन 18 अशी कमी झाली. त्याच्या वाढीचा दर -10 इतका राहीला म्हणजे तो घटला असल्याचे दिसून येते सरकारी दवाखान्यांची संख्या 57 वरुन 19 अशी 2001 ते 2011 या काळात वाढली. हा वाढीचा दर -66.66 इतका होता, म्हणजे प्रती वर्षी तो -2.22 ने वाढला प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या 1991 ते 2011 या काळात 69 वरुन 71 इतको झाली. या 30 वर्षात त्यांच्या वाढीचा दर 2.89 इतका होता, म्हणजे प्रतीवर्षी तो +0.09 ने वाढला. ही वाढ नगण्य असल्याचे दिसून येते. तर प्राथमिक उपकेंद्रांची संख्या या कालावधीत 309 वरुन 400 इतको झाली. या वाढीचा दर +29.45 इतका होता, तर वार्षिक दर+0.98 होता. सातारा जिल्ह्यातील सरकारी दवाखान्यातील खाटांची संख्या 980 वरुन 1262 इतको झाली. त्यांच्या वाढीचा या कालावधीतील दर +28.77 इतका होता. तर वार्षिक वाढीचा दर +0.96

इतका राहीला. प्रति लाख लोकसंख्येमध्ये सातारा जिल्ह्यात खाटांची उपलब्धता 1991 ते 2011 या काळात 40 वरुन 42 इतको झाली. त्यांच्या वाढीचा दर +5 इतका होता तर वार्षिक वाढीचा दर +0.17 इतका नगण्य होता.

अशा रितीने सांगली व सातारा जिल्ह्यातील आरोग्य विषयक चलांचा विचार करता असे दिसून येते की सांगली जिल्ह्यात सरकारी रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे आणि खाटांची संख्या यांच्या वाढीचा दर अभ्यास काळात अनुक्रमे +400, +11.32, +18.52 व +37.43 इतका होता. परंतु वार्षिक वाढीच्या दराचा विचार करता सरकारी रुग्णालये (+13.33) सोडून इतर घटकांचा वार्षिक दर अनुक्रमे +0.38, +0.62, +1.25 इतके नगण्य होते.

तसेच सरकारी दवाखाने व प्रतीलाख लोकसंख्येला उपलब्ध खाटांचे प्रमाण यांचा 30 वर्षातील वाढीचा दर अनुक्रमे -57.81 व -30.66 असा होता म्हणजे तो घटला.

सातारा जिल्ह्यातील आरोग्यविषयक चलांचा विचार करता असे दिसून येते की सरकारी दवाखाने, प्राथमिक आरोग्य केंद्रे, प्राथमिक आरोग्य उपकेंद खाटांची संख्या व प्रतीलाख लोकसंख्येत खाटा या चलांच्या वाढीचा दर अभ्यास काळात अनुक्रमे +11.76, +2.89, +29.45, +28.77 व +05 इतका होता, या चलघटकांचा वार्षिक वाढीचा दर अनुक्रमे +0.39, +0.096, +0.98, +0.96 व +0.16 इतका नगण्य होता. तर सातारा जिल्ह्यातील सरकारो रुग्णालयाची संख्या या चलघटकांच्या वाढीचा दर -10 इतका होता. याचा अर्थ 1991 ते 2011 या काळात सरकारी रुग्णालयांची संख्या कमी झाली.

5.3 सांगली व सातारा जिल्ह्यातील जन्मदर व मृत्यूदर :–

देशाच्या लोकसंख्येची वाढ ही देशातील जन्मदर व मृत्यूदर या दोहोवर अवलंबून असते. जन्मदर जास्त व मृत्यूदर कमी असेल तर देशाची लोकसंख्या वेगाने वाढते, याउलट जन्मदर कमी व मृत्यूदर जास्त असेल तर देशाच्या लोकसंख्येची वाढ कमी आसते. भारत हा अतिरिक्त लोकसंख्या असणारा देश आहे.

इतर विकसनशील देशांप्रमाणेच विकसित देशांच्या तुलनेत जन्मदर व मृत्यूदर दोन्ही जास्त आहेत. परंतु देशाचा विचार करता जन्मदर जास्त मृत्यूदर कमी असल्यामुळे देशाची लोकसंख्या वेगाने वाढत आहे. स्वातंत्र्यानंतर जन्मदर व मृत्यूदरातील तफावतीमुळे भारताची लोकसंख्या वेगाने वाढली. सन 1951 ते 1981 या काळात देशाची लोकसंख्या सरासरी 2.15%, 1981 ते 1991 मध्ये 2.11%, 1991 ते 2001 मध्ये 1.93% व 2001 ते 2011 या कालावधीत 1.64% या दराने वाढली.सन 1981 नंतर भारतीय लोकसंख्या वाढीचा दर घटत गेला असला तरी लोकसंख्येचे आकारमान इतके मोठे आहे को दरवर्षी भारताच्या लोकसंख्येत अंदाजे 2 कोटी लोकांची भर पडते याला भारतातील जन्मदर व मृत्यूदर कारणीभूत आहेत.

खालील तक्ता भारत, महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यातील 1991 ते 2011काळातील जन्मदर व मृत्यूदर दर्शवितो.

तक्ता क्र 5.2

जन्मदर व मृत्यूदर 1991 ते 2011

(दर हजारी)

कालावधी	भारत		महाराष्ट्र		सांगली जिल्हा		सातारा जिल्हा	
	जन्मदर	मृत्यूदर	जन्मदर	मृत्यूदर	जन्मदर	मृत्यूदर	जन्मदर	मृत्यूदर
1991	30.2	9.7	26.2	8.2	24.51**	8.51**	24.48**	8.25**
2001	25.5	8.4	20.7	7.5	21.17*	7.69*	19.92*	6.77*
2011	21.8	7.1	16.7	6.3	18.78	7.31	16.66	6.24
घटीचा दर	-27.81	-26.88	-36.26	-23.17	-23.38	-14.10	-31.94	-24.36

टीप– * ही आकडेवारी 2003 –04 या वर्षाची आहे.

**** ही आकडेवारी** Estimated **या वर्षाची आहे.**

स्त्रोत– i) **महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2011–12** ii) **सांगली व सातारा जिल्हा सामाजिकव आर्थिक समालोचन**

सन 1991 ते 2011 या काळात भारतातील जन्मदर अनुक्रमे 30.2.25.5, व 21.8 इतका होता, या कालावधीत तो -27.81 टक्क्याने घटला. तर मृत्यूदर अनुक्रमे 9.7, 8.4 व 7.1 इतका होता. या काळात तो -26.88 ने घटला.

महाराष्ट्र राज्यात सन 1991 ते 2011 या काळात जन्मदर अनुक्रमे 26.2, 20.7 व 16.7 इतका होता. तर मृत्यूदर अनुक्रमे 8.2,7.5 व 6.3 इतका होता या काळात महाराष्ट्रातील जन्मदर व मृत्यूदरात अनुक्रमे -36.26 व -23.17 टक्केघट झाली.

सांगली जिल्ह्यात 1991 ते 2011 या काळात जन्मदर व मृत्यूदर अनुक्रमे 24.51, 21.17 व 18.78 व 8.51,7.69 आणि 7.31 इतका होता. या काळात सांगली जिल्ह्यातील जन्मदर व मृत्यूदर अनुक्रमे -23.38 व -14.10 टक्केघट झाली.

सातारा जिल्ह्यातील जन्मदर व मृत्यूदर अनुक्रमे 24.48, 19.92 व 16.66 व 8.25, 6.77 व 6.24 इतके होते. या काळात जन्मदर व मृत्यूदर अनुक्रमे -31.94 व -24.36, टक्क्याने घटले.

सन 1991 ते 2011 या काळातील जन्मदर व मृत्यूदराचा अभ्यास करता असे दिसून येते को, भारत, महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यात जन्म व मृत्यूदरातील घट झाली आहे. सर्वच ठिकाणी जन्मदरातील घट ही मृत्यूदरातील घटीपेक्षा जास्त आहे.

महाराष्ट्र राज्यातील जन्मदर (-36.26) सर्वात जास्त घटला तर सांगली जिल्ह्यातील जन्मदर तुलनेने कमी (-23.38) घटला.

मृत्यूदराचा तुलनात्मक अभ्यास दर्शवितो की राष्ट्रीय पातळी (भारत) मृत्यूदरातील घट सर्वात जास्त (-26.88) राहिली, तर सांगली जिल्ह्यातील मृत्यूदरातील घट सर्वात कमी (-14.10) राहिली.

5.4 भारत, महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदराचे प्रमाण :–

मानव निर्देशांक तयार करण्यासाठी आयुर्मान निर्देशांक तयार केला जातो. त्यासाठी लोकांच्या सरासरी आयुर्मानाची आकडेवारी विचारत घेतली जाते. ही आकडेवारी फक्त राष्ट्रोय स्तर, राज्य स्तरावर

उपलब्ध असते. परंतु जिल्हा स्तरावर सरासरी आयुर्मानाची आकडेवारी उपलब्ध नसते. म्हणून महाराष्ट्र सरकारने सन 2002 चा मानव विकास अहवाल तयार करताना यु.एन.डी.पी.चीच आकडेवारी वापरली परंतु जिल्हास्तरावरील मानव निदेशांक तयार करताना सरासरी आयुर्मानाची आकडेवारी ऐवजी अर्भक मृत्यूदराची आकडेवारी वापरली. अर्भक मृत्यूदर म्हणजे जन्मास आलेल्या 1 वर्षाच्या आतील दर हजार अर्भकांमध्ये मृत्यू पावणाऱ्या अर्भकांचे प्रमाण होय.

खालील तक्ता क्र 4.3 देश, राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील 1991 ते 2011 या काळातील अर्भक मृत्यूदर दर्शवितो.

तक्ता क्र 5.3

भारत, महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदर

(दर हजारी)

कालावधी	भारत	महाराष्ट्र	सांगली	सातारा
1991	80	60	41	51
2001	68	45	32	32
2011	44	25	16	16
प्रतिशतघट (%)	-45	-58.33	-60.97	-68.62

स्त्रोत– 1) ESI 2012-13

2) ESM 2012-13

3) Indian Economy – Datta & Sundhram.

4) Maharashtra Human Development Report -2012

5) सांगली व सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१२.

तक्ता क्र.5.3 सन 1991 ते 2011 या काळातील भारत, महाराष्ट्र, सागली व सातारा जिल्ह्यातील अर्भकमृत्यूदर कल दर्शवितो. सन 1991 ते 2011 या काळात भारतातील राष्ट्रीय पातळीवर अर्भक मृत्यूदर अनुक्रमे 80,68 व 44 असा होता. या कालावधीतील त्याच्या घटीचा दर -45% ने कमी झाला. याच काळातील महाराष्ट्र राज्य पातळीवरील अर्भक मृत्यूदर अनुक्रमे 60, 45 व 25 इतका होता. राज्य पातळीवरील अर्भक मृत्यूदर या काळात -58.33% ने कमी झाला.

सांगली जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदर अभ्यास काळात अनुक्रमे 41, 32 व 16 असा घटला. या घटीचा दर -60.97% इतका होता.

सातारा जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदर अभ्यास काळात अनुक्रमे 51,32 व 16 असा होता. हा अर्भक मृत्यूदर अभ्यास काळात -68.62% ने घटला.


राष्ट्रीय पातळी, राज्य पातळी, सांगली व सातारा जिल्हा पातळीवरील अभ्यास काळातील अर्भक मृत्यूदराचा तौलोनिक अभ्यास स्पष्ट करतो. की सातारा जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदर सर्वात जास्त प्रमाणात (-68.62%) घटला तर भारतातील राष्ट्रीय पातळीवरील अर्भकमृत्यूदर तुलनेने कमी(-45%) प्रमाणात घटला.

महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदराचा 1991 ते 2011 या काळातील तौलोनिक अभ्यास असे दर्शवितो को अर्भक मृत्यूदरातील घटीबाबत सातारा जिल्हा पहिल्या क्रमांकावर सांगली दुसऱ्या व महाराष्ट्र राज्य तिसऱ्या क्रमांकावर आहे. सांगली व सातारा दोन्ही जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदरातील घट महाराष्ट्र राज्य पातळीवरील घटीपेक्षा जास्त राहिल्याचे दिसून येते.

सांगली व सातारा जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदराचा विचार करता सातारा जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदर (-68.62%) सांगली जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदरापेक्षा (-60.97%) जास्त प्रमाणात घटला.

खालील आकृती भारत, महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदरातील घट दर्शवितो.

आकृती क्र 5.1



5.5 सांगली व सातारा जिल्ह्यातील मातांचा मृत्यूदर:–

मानवी विकास निर्देशांकतयार करण्यासाठी आरोग्य निर्देशांक तयार केला जातो. त्याचे जे विविध चलघटक आहेत, त्यापैकी मातांचा मृत्यूदर हा एक आरोग्य निर्देशांकाचा चलघटकआहे. खालील तक्ता सांगली व सातारा जिल्ह्यातील मातांचा मृत्यूदर दर्शवितो.

तक्ता क्र 5.4

सांगली व सातारा जिल्ह्यातील मातांचा मृत्यूदर (दर हजारी)

वर्ष	महाराष्ट्रराज्य	सांगली जिल्हा	सातारा जिल्हा
2009	104	117	51.3
2010	104	84	66.5
2011	87	69	34.0
2012	87	69	42.1
2013	87	69	85.7
चक्रवाढ दर	-3.5	-10.02	+10.81

स्त्रोत– सांगली व सातारा जिल्हा परिषद अहवाल, आरोग्य विभाग (2012–13)

सन 2009 ते 2013 या 5 वर्षाच्या काळात महाराष्ट्र राज्य सांगली व सातारा जिल्ह्यातील मातांचा मृत्यूचा दर दर्शविला आहे. सन 2009 ते 2013 या काळात महाराष्ट्रातील मातांचा मृत्यूदर 104 वरुन 87 इतका कमी झाला, त्याच्या घटीचा दर 3.5% इतका राहीला. याच काळात सांगली जिल्ह्यातील मातांचा मृत्यूदर 117 वरुन 69 इतका कमी झाला, त्याच्या घटीचा दर -10.02 इतका होता. सातारा जिल्ह्यातील माता मृत्यूदर या 5 वर्षात 51.3 वरुन 85.7 असा वाढला, त्याच्या वाढीचा दर +10.81 इतका होता. सन 2009 ते 2013 या 5 वर्षाच्या काळात महाराष्ट्र राज्य व सांगली जिल्ह्यातील माता मृत्यूदर कमी झाला तो अनुक्रमे -3.5 व -10.02 इतका होता तर सातारा जिल्ह्यातील माता मृत्यूदर मात्र वाढल्याचे दिसून येते. तो -10.81 इतका होता.

5.6 सागली व सातारा जिल्ह्यातील कुपोषित बालकांचे प्रमाण:–

लोकांचे आरोग्य त्याच्या उत्पन्नाबरोबरच त्यांचा आहार व राहणीमान यावर देखील अवलंबून असते. लोकांना त्याच्या आहारात मिळणारी प्रथिने, उष्मांक, जीवनसत्वे व जिल्ह्यातील लोकांचे आरोग्य कसे आहे, ते बालमृत्यू दर, त्यांचा पोषणदर्जा, आयुमर्यादा वगैर घटकांवर अवलंबून असते. कुपोषित बालकांचे वर्गिकरण त्याच्या वयानुसार वजन व उंचीवरुन दोन प्रकारात केले जाते. कुपोषण देखील दोन प्रकाराचे आहे. 1) मध्यम कमी वजनाची बालके 2) तिव्र कमी वजनाची बालके हे कुपोषण त्यांना मिळणाऱ्या आहारावरुन ठरते. खालील तक्ता सांगली व सातारा जिल्ह्यातील वयानुसार वजन क मी असलेल्या बालकांचे प्रमाण दर्शवितो.

तक्ता क्र 5.5

सांगली व सातारा जिल्ह्यातील कुपोषित बालकांचे प्रमाण (दर हजारी)

वर्षे	सांगली जिल्हा	सातारा जिल्हा
1996-97	13.4	15.3
2011-12	6.71	8.91
घटीचा दर	-49.92	-41.76


स्त्रोत – 1)महाराष्ट्र ,मानव विकास अहवाल 2002 (2) सांगली व सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन.

सन 1997 ते 2012 या काळात सांगली जिल्ह्यात कुपोषित बालकांचे प्रमाण 13.4 टक्क्यावरुन 6.71 टक्के असे कमी झाले. या कुपोषण घटीचा दर 49.92 इतका होता. याच काळात सातारा जिल्ह्यातोल कुपोषित बालकांचे प्रमाण 15.3 टक्क्यावरुन 8.91 टक्के असे कमी झाले. त्याच्या घटीचा दर -41.76 इतका होता. सन 1997 ते 2012 या काळातील सांगली व सातारा जिल्ह्यातील कुपोषित बालकांच्या प्रमाणाच्या दरातील घट सातारा जिल्ह्यापेक्षा सांगली जिल्ह्यात जास्त होती.

खालील आकृती सांगली व सातारा जिल्ह्यातील बालकांच्या कुपोषण दरातील घट दर्शविते.

आकृती 5.2

सांगली व सातारा जिल्ह्यातील कुपोषण दरातील प्रत्यक्ष घट



खालील तक्ता सांगली व सातारा जिल्ह्यातील आरोग्य विषयक सोयींची उपलब्धता दर्शवितो.

तक्ता क्र 5.6

सांगली व सातारा जिल्ह्यातील आरोग्य विषयक सोयींची उपलब्धता

कालावधी	प्रती लाख लोकसंख्ये मागे खाटांची उपलब्धता		प्रती लाख लोकसंख्येमागे आरोग्य केंद्रांची उपलब्धता	
	सांगली	सातारा	सांगली	सातारा
1991	55	42	3.3	3.2
2001	65	40	3.0	2.8
2011	52	42	2.9	2.3
वाढीचा दर	-5.5	00.00	-12.12	-28.12

स्त्रोत– १) महाराष्ट्र:मानव विकास अहवाल २००२ २) सांगली व सातारा जिल्हा सामाजिकव आर्थिकसर्वेक्षण

तक्ता क्र. 5.6 सन 1991 ते 2011 या काळातील सांगली व सातारा जिल्ह्यातील प्रती लाख लोकसंख्येमागे खाटांची उपलब्धता व आरोग्य केंद्रांची उपलब्धता दशवितो. अभ्यास काळात सांगली जिल्ह्यातील प्रतीलाख लोकसंख्येमागे खाटांची उपलब्धता अनक्रमे 55,65 व 52 अशी होती, तर सातारा जिल्ह्यात ती अनुक्रमे 42,40 व 42 अशी होती.

सन 1991 ते 2011 या कालावधीत दर लाख लोकसंख्येमागे खाटांची उपलब्धता सांगली जिल्ह्यात घटली (-5.5) तर सातारा जिल्ह्यात पूर्वी इतकीच कायम (00) राहिली.


सन 1991 ते 2011 या काळात सांगली जिल्ह्यात प्रती लाख लोकसंख्येमागे आरोग्य केंद्रांची संख्या अनुक्रमे 3.3, 3.0 व 2.9 इतको होती. तर सातारा जिल्ह्यात अनुक्रमे 3.2, 2.8 व 2.3 अशी होती. दोन्ही जिल्हात प्रती लाख लोकसंख्येमागे प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या घटल्याचे दिसून येते.

सन1991 ते 2011 या काळात सांगली व सातारा जिल्ह्यात प्रती लाख लोकसंख्येमागे प्राथमिक आरोग्य केंद्रांची अनुक्रमे 12.12% व 28.12% अशी घटत गेल्याचे दिसून येते.

खालील आकृती सांगली व सातारा जिल्ह्यात प्रती लाख लोकसंख्येमागे खाटा व प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या घटीचा दर दर्शविते.

आकृती 5.3

सांगली व सातारा जिल्ह्यातील प्रती लाख लोकसंख्येमागील खाटा व आरोग्य केंद्रांची उपलब्धता



5.7 सांगली व सातारा जिल्ह्यातील आरोग्य सेवांवर झालेला खर्च:–

तक्ता क्र.5 .7 सांगली व सातारा जिल्ह्यात जिल्हा पातळीवर आरोग्य सेवांवर झालेला खच दर्शवितो.

तक्ता क्र.5.7

सांगली व सातारा जिल्ह्यात आरोग्य सेवांवर वरील खर्च

(लक्ष रुपये)

वर्ष	सांगली जिल्हा	सातारा जिल्हा
2006-07	**227.21**	**567.88**
2011-12	**395.23**	**638.92**
वाढीचा दर	**+73.95**	**+12.50**

स्त्रोत-१) सांगली व सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

सन 2006-07 ते 2011-12 या काळात सांगली जिल्ह्यात आरोग्य सेवांवरील खर्च 227.21 लक्ष रुपयावरुन 395.23 लक्ष रु.इतका वाढला ही वाढ +73.95% होती,तर सातारा जिल्ह्यातील आरोग्य सेवांवरील खर्च याच काळात 567.88 लक्षावरुन 638.92 लक्ष रु. असा वाढला. ही वाढ +12.50% इतको होती.

अभ्यास काळात सांगली व सातारा आरोग्य सेवेवरील खर्चाचा विचार करता अभ्यास काळात सांगली जिल्ह्याच्या आरोग्य खर्चाच्या वाढीचा दर (+73.95) सातारा जिल्ह्याच्या आरोग्य खर्चापेक्षा (+12.50) जास्त राहीला.

खालील तक्ता सांगली व सातारा जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता दशवितो.

तक्ता क्र.5.8

सांगली व सातारा जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता (2011-12)

तपशील	सांगली जिल्हा			सातारा जिल्हा		
	पिण्याच्या पाण्याची उपलब्धता असणारी	पिण्याच्या पाण्याची टंचाईग्रस्त	एकूण	पिण्याच्या पाण्याची उपलब्धता असणारी	पिण्याच्या पाण्याची टंचाईग्रस्त	एकूण
गांवे	612 (84.53)	112 (15.47)	724 (100)	1020 (59.44)	696 (40.56)	1716 (100)
वाडया व वस्त्या	3612 (78.47)	991 (21.53)	4603 (100)	1449 (63.14)	846 (36.86)	2295 (100)
एकूण	4224 (79.30)	1103 (20.70)	5327 (20.70)	2469 (61.56)	1542 (38.44)	4011 (100)

टिप- कंसातील आकडे टक्केवारी दर्शवितात.

स्त्रोत- सांगली व सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2012

तक्ता क्र 5.8 सन 2011-12 या वर्षात सांगली व सातारा जिल्ह्यातील पिण्याचे पाणी उपलब्ध असणारी व नसणारी टंचाईग्रस्त गावे, वाड्या व वस्त्यांचे प्रमाण दर्शवितो.

सन 2011-12 या वर्षात सांगली जिल्ह्यातील पिण्याचे पाणी उपलब्ध असणाऱ्या गावांची संख्या 612 तर वाड्या वस्त्यांची संख्या 3612 होती त्यांचे प्रमाण अनुक्रमे 84.53% व 78.47%इतके होते. तर एकूण गांवे, वाड्या व वस्त्यांचे प्रमाण 79.30% होते.

सन 2011-12 या वर्षात सांगली जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई असणारी गांवे, वाड्या व वस्त्यांचे संख्या अनुक्रमे 112 व 991 होती. त्याचे प्रमाण अनुक्रमे 15.47% व 21.53% होते. तर एकूण गांवे व वाड्या व वस्त्यांचे प्रमाण 20.70% इतके होते याचा अर्थ सागली जिल्ह्यातील 20.70% गांवाना,वाडया, वस्त्यांना पाण्याची टंचाई जाणवते.

सातारा जिल्ह्यामध्ये 2011-12 या वर्षात पिण्याचे पाणी उपलब्ध असणाऱ्या गावांची संख्या 1020 तर वाड्या वस्त्यांची संख्या 1449 इतको होती. त्यांचे प्रमाण अनुक्रमे 59.44% व 63.14% इतके होते, तर एकूण प्रमाण 61.56% इतके होते. म्हणजे सातारा जिल्ह्यात पिण्याचे पाणी उपलब्ध असणाऱ्या गांवे व वाड्यांची व वस्त्यांचे प्रमाण 61.56% होते.


सन 2011-12 या वर्षात सातारा जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई असणारी गांवे व वाड्या व वस्त्यांची संख्या अनुक्रमे 696 व 846 इतको होती, त्याचे प्रमाण अनुक्रमे 40.56% व 36.86% इतके होते. तर एकूण टंचाईग्रस्त गांवे, वाड्या व वस्त्यांचे प्रमाण 38.44% होते. म्हणजे 2011-12 या वर्षात सातारा जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई असणारी एकूण गांवे व वाड्याचे प्रमाण 38.44% होते.

सन 2011-12 या वर्षात पिण्याच्या पाण्याची उपलब्धता असणाऱ्या गावांचे प्रमाण सांगली जिल्ह्यात (79.30%) सातारा जिल्ह्यापेक्षा (61.56%) जास्त होते. तर पिण्याच्या पाण्याची टंचाई असणाऱ्या गावांचे प्रमाण सातारा जिल्ह्यात (38.44%) सांगली जिल्ह्यापेक्षा (20.70) जास्त होते.

खालील आकृत्या सांगली व सातारा जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता व टंचाईग्रस्त गावांचे प्रमाण दर्शीविते.

आकृती 5.4

पिण्याच्या पाण्याची उपलब्धता असणारी गांवे वाड्या व वस्त्या



5.8 सांगली व सातारा जिल्ह्यांचा मानवी विकास निर्देशांक:–

यु.एन.डी.पी च्या सन 1997 च्या मानवी विकास अहवालत मानवी विकासाची संकल्पना पुढीलप्रमाणे सांगितली आहे. मानवी विकास म्हणजे जनतेच्या कल्याणाचा उच्चस्तर साध्य करून, त्यांच्या निवडीच्या प्रक्रिया विस्तारीत करणे होय. हा मानवी विकास संकल्पनेचा गाभा आहे. त्यापैकी जनतेला अत्यावश्यक असणाऱ्या निवडी म्हणजे, दीर्घ व निरोगी जीवन ज्ञानाची उपलब्धता व उत्तम जीवनमान जगण्यासाठी आवश्यक असणारे उत्पन्न होय मानवी विकासामध्ये राजकोय, आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्याची संकल्पनाही समाविष्ट आहे. तसेच व्यक्तीला उद्याजक व उत्पादक होण्याच्या संधीही उपलब्ध असाव्यात व त्याला स्वाभिमानाने जगता येऊन त्याच्या मानवी हक्काची हमी मिळाली पाहिजे.

मानवी विकास निर्देशांक तयार करण्यासाठी यु.एन.डी.पी ने तीन चलांचा समावेश केला ते चलघटक पुढील होत.

1) जन्मवेळी सरासरी आयुर्मान 2) दरडोई उत्पन्न 3) शिक्षण

आयुर्मान निर्देशांक काढण्यासाठी जन्मवेळे पासुनचे कमाल आयुर्मान 85 वर्षे व किमान आयुर्मान 25 वर्षे गृहीत धरले आहे. शैक्षणिक निर्देशांक काढण्यासाठी दोन चलांचा वापर करण्यात आला.

1) प्रौढ साक्षरता दर व 2) हजेरी पटावरील विद्यार्थी संख्या

शैक्षणिक निर्देशांक काढण्यासाठी प्रौढ साक्षरता दराला 2/3 भारांक (Weightage) देऊन त्याचे कमाल मूल्य 100 व किमान मूल्य 0 (शून्य) गृहीत धरण्यात आले. तसेच विद्यार्थ्यीच्या हजेरी पटावरील संख्या 1/3 भारांक(Weightage) देऊन त्याचे कमाल मूल्य 100 व किमान मूल्य 0 (शून्य) गृहीत धरले.

तसेच उत्पन्न निर्देशांक काढण्यासाठी दरडोई उत्पन्न हा घटक विचारात घेतला व त्याचे कमाल मुल्य 40,000 अमेरिकन डॉलर व किमान मूल्य 100 अमेरिकन डॉलर गृहीत धरले. या तिन्ही निर्देशांकांची बेरीज करुन, त्याला 3 ने भागून सरासरी काढली जाते. ही सरासरी म्हणजे मानवी विकास निर्देशांक होय. हे निर्देशांक तयार करण्यासाठी पुढील सूत्र वापरले जाते.

$$\text{चलघटक निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य} \quad \text{किमान मूल्य}}{\text{कमाल मूल्य-किमान मूल्य}}$$

$$\text{1) आयुर्मान निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष सरासरी आयुर्मान-25 वर्षे}}{\text{85 वर्षे - 25 वर्षे}}$$

2) शैक्षणिक निर्देशांक

$$\text{(1)} \quad \frac{2}{3}\ x = \frac{\text{प्रत्यक्ष प्रौढ साक्षरता दर - 0}}{\text{100 - 0}}$$

$$\text{(2)} \quad \frac{1}{3}\ x = \frac{\text{प्रत्यक्ष स्थूल पटावरील विद्यार्थ्याचे प्रमाण - 0}}{\text{100 - 0}}$$

$$\text{3) उत्पन्न निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष दरडोइ किमान उत्पन्न - दरडोई उत्पन्न}}{\text{कमाल दरडोई - किमान दरडोई}}$$

५.९ सांगली व सातारा जिल्ह्यांचा शैक्षणिक निर्देशांक:–

शैक्षणिक निर्देशांक= साक्षरता निर्देशांक + विद्यार्थी पटसंख्या निर्देशांक

(1) साक्षरता निर्देशांक $= \frac{2}{3} \text{X} \frac{\text{प्रत्यक्ष प्रौढ साक्षरता दर -0}}{100 - 0}$

(2) विद्यार्था पटसंख्या निर्देशांक $= \frac{1}{3} \text{ X} \frac{\text{प्रत्यक्ष स्थूल पटावरील विद्यार्थ्याचे प्रमाण - 0}}{100-0}$

5.10 सांगली जिल्हयाचा शैक्षणिक निर्देशांक 1991,2001 या 2011:–

I) साक्षरता निर्देशांक:–

सन 1991 चा सांगली जिल्हयाचा साक्षरता निर्देशांक

साक्षरता निर्देशांक $= \frac{2}{3} \text{ X } \frac{62.61 - 0}{100 - 0}$

$= \frac{2}{3} \text{ X } \frac{62.61}{100}$

$= \frac{2}{3} \text{ X } 0.626$

$= 0.417$

सन 2001 चा साक्षरता निर्देशांक $= \frac{2}{3} \text{ X } \frac{72.62- 0}{100 - 0}$

$= \frac{2}{3} \text{ X } \frac{72.62}{100}$

$= \frac{2}{3} \text{ X } 0.726$

$= 0.484$

सन 2011 चा साक्षरता निर्देशांक $= \frac{2}{3} \text{ X } \frac{82.62- 0}{100 - 0}$

$= \frac{2}{3} \text{X } \frac{82.62}{100}$

$= \frac{2}{3} \text{ X } 0.826$

$= 0.550$

5.11 विद्यार्थी पटसंख्येवरुन शैक्षणिक निर्देशांक:–

विद्यार्थी पटसंख्या $= \frac{1}{3} \times \frac{\text{प्रत्यक्ष पटसंख्या सरासरी प्रमाण - 0}}{100 \quad 0}$

सन 1991 चा पटसंख्या निर्देशांक $= \frac{1}{3} \times \frac{39.88 - 0}{100 - 0}$

$= \frac{1}{3} \times \frac{39.88}{100}$

$= \frac{1}{3} \times 0.399$

$= 0.133$

सन 2001 चा पटसंख्या निर्देशाक $= \frac{1}{3} \times \frac{46.53 - 0}{100 - 0}$

$= \frac{1}{3} \times \frac{46.53}{100}$

$= \frac{1}{3} \times 0.465$

$= 0.155$

सन 2011 चा पटसंख्या निर्देशांक $= \frac{1}{3} \times \frac{52.60 - 0}{100 - 0}$

$= \frac{1}{3} \times \frac{52.60}{100}$

$= \frac{1}{3} \times 0.526$

$= 0.175$

5.12सांगली जिल्हयाचा शैक्षणिक निर्देशांक साक्षरता निर्देशांक+विद्यार्थी पटसंख्या निर्देशांक

1) सन 1991 चा शैक्षेणिक निर्देशांक $= 0.417 + 0.133$

$= 0.550$

2) सन 2001 चा शैक्षणिक निर्देशांक $= 0.484 + 0.155$

$= 0.639$

1) सन 2011 चा शैक्षणिक निर्देशांक = 0.550 + 0.175

= 0.725

5.13 सातारा जिल्हयाचा शैक्षणिक निर्देशांक:–

I) **साक्षरता निर्देशांक**

सन 1991 चा सातारा जिल्हयाचा साक्षरता निर्देशांक $= \frac{2}{3} \times \frac{66.67 - 0}{100 - 0}$

$= \frac{2}{3} \times \frac{66.67}{100}$

$= \frac{2}{3} \times 0.667$

$= 0.444$

सन 2001 चा सातारा जिल्हयाचा साक्षरता निर्देशांक $= \frac{2}{3} \times \frac{78.22 - 0}{100 - 0}$

$= \frac{2}{3} \times \frac{78.22}{100}$

$= \frac{2}{3} \times 0.782$

$= 0.521$

सन 2011 चा सातारा जिल्ह्याचा साक्षरता निर्देशांक $= \frac{2}{3} \times \frac{84.20 - 0}{100 - 0}$

$= \frac{2}{3} \times \frac{84.20}{100}$

$= \frac{2}{3} \times 0.842$

$= 0.561$

II) **विद्यार्थी पटसंख्या निर्देशांक**

III) विद्यार्थी पटसंख्या $= \frac{1}{3} \times \frac{\text{प्रत्यक्ष पटसंख्या सरासरी प्रमाण} \quad 0}{100 - 0}$

सन 1991 चा सातारा जिल्ह्याचा विद्यार्थी पटसंख्या निर्देशांक $= \frac{1}{3} \times \frac{42.92 - 0}{100 - 0}$

$= \frac{1}{3} \times \frac{42.92}{100}$

$= \frac{1}{3} \times 0.429$

$= 0.143$

सन 2001 चा सातारा जिल्ह्याचा विद्यार्थी पटसंख्या निर्देशांक $= \frac{1}{3} \times \frac{49.60 - 0}{100 - 0}$

$= \frac{1}{3} \times \frac{49.60}{100}$

$= \frac{1}{3} \times 0.496$

$= 0.165$

सन 2011 चा सातारा जिल्ह्याचा विद्यार्थी पटसंख्या निर्देशांक $= \frac{1}{3} \times \frac{60.47 - 0}{100 - 0}$

$= \frac{1}{3} \times \frac{60.47}{100}$

$= \frac{1}{3} \times 0.604$

$= 0.201$

5.14सातारा जिल्ह्याचा शैक्षणिक निर्देशांक:–1991,2001 व 2011

शैक्षेणिक निर्देशांक= साक्षरता निर्देशांक+विद्यार्थी पटसंख्या निर्देशांक

1) सन 1991 चा शैक्षणिकनिर्देशांक = 0.444 + 0.143

= 0.587

2) सन 2001 चा शैक्षणिकनिर्देशांक = 0.521 + 0.165

= 0.686

3) सन 2011 चा शैक्षणिकनिर्देशांक = 0.561 + 0.201

= 0.762

5.15 सांगली व सातारा जिल्ह्याचा शैक्षणिक निर्देशांक 1991,2001 व 2011 शैक्षणिक निर्देशांक

तक्ता 5.9

सांगली व सातारा जिल्ह्याचा शैक्षणिक निर्देशांक

कालावधी	सांगली जिल्हा	सातारा जिल्हा
1991	0.550	0.587
2001	0.639	0.686
2011	0.725	0.762
वाढीचा दर	+31.82	+29.81

स्त्रोत : **Calculated**


तक्ता क्र. 5.9 सांगली व सातारा जिल्ह्यांचा शैक्षेणिक निर्देशाक सन 1991, 2001 व 2011 या काळातील दर्शवितो. सन 1991, 2001 व 2011 या काळात सांगली जिल्ह्यांचा शैक्षणिक निर्देशांक अनुक्रमे 0.550, 0.639 व 0.725 इतका होता. तर या काळातील सातारा जिल्ह्याचा शैक्षणिक निर्देशांक अनुक्रमे 0.587, 0.686 व 0.762 इतका होता. म्हणज अभ्यास काळातील सर्व वर्षात सातारा जिल्ह्याचा शैक्षणिक निर्देशांक सांगली जिल्ह्यापेक्षा जास्त होता.

सन 1991 ते 2011 या काळात सांगली जिल्ह्यातील शैक्षणिक निर्देशांक वाढीचा दर +31.82 तर सातारा जिल्ह्यातील शैक्षणिक निर्देशांक वाढीचा दर +29.81 इतका होता. म्हणजे अभ्यास काळात सांगली जिल्ह्याचा शैक्षणिक निर्देशांक वाढीचा दर +2.01 ने जास्त राहीला.

खालील आकृती सांगली व सातारा जिल्ह्यातील शैक्षणिक निर्देशांकाची तुलनात्मक स्थिती दर्शविते.

आकृती क्र 5.5

सांगली व सातारा जिल्ह्यांच्या शैक्षणिक निर्देशांक तुलनात्मक स्थिती



5.16 सांगली जिल्ह्याचा उत्पन्न निर्देशांक

UNDP ने एखादया विभागाचा/प्रदेशाचा उत्पन्न निर्देशांक काढण्यासाठी खालील सूत्र दिले आहे.

$$\text{उत्पन्न निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष दरडोई उत्पन्न - किमान दरडोई उत्पन्न}}{\text{कमाल दरडोई उत्पन्न - किमान दरडोई उत्पन्न}}$$

सांगली जिल्ह्याचा 1991, 2001 व 2011 या कालावधीचा उत्पन्न निर्देशांक:–

$$\text{सन 1991 सांगली जिल्ह्याचा उत्पन्न निर्देशांक} = \frac{10381 - 100}{40000 - 100}$$

उत्पन्न निर्देशांक काढण्यासाठी अमेरिकन डॉलरमधील उत्पन्न प्रमाण मानल्यामुळे अमेरिकेतील खरेदी शक्ती समतेमध्ये रुपयाचे मूल्य रुपांतरीत केले पाहिजे. त्यासाठी अमेरिकेची 2001 ची खरेदीशक्ती

समता (Per Capita income for India in 2001 2840 ppp US$) गृहीत धरुन सांगली जिल्ह्याच्या दरडोई उत्पन्नाला 2840/10754 ने गुणले जाते. म्हणून वरील सूत्र पुढीलप्रमाणे मांडले जाते.

सन 1991 चा सांगली जिल्ह्याचा उत्पन्न निर्देशांक $= 10381 \text{ X } \frac{\frac{2840}{10754}}{4000 - 100} - 100$

$= \frac{2741 - 100}{40000 - 100}$

$= \frac{\text{1og } 2641 \text{ - log- } 100}{\text{1og } 40000 \text{- log- } 100}$

$= \frac{3.43 - 2.00}{4.60 - 2.00}$

$= \frac{1.43}{2.60}$

$= 0.550$

सन 2001 चा सांगली जिल्ह्याचा उत्पन्न निर्देशांक $= 22038 \text{ X } \frac{\frac{2840}{10754}}{4000 - 100} - 100$

$= \frac{5820 - 100}{40000 - 100}$

$= \frac{\text{1og } 5820 \text{ - log- } 100}{\text{1og } 40000 \text{- log- } 100}$

$= \frac{3.76 - 2.00}{4.60 - 2.00}$

$= \frac{1.76}{2.60}$

$= 0.677$

सन 2011 चा सांगली जिल्ह्याचा उत्पन्न निर्देशांक $= 71196 \text{ X } \frac{\frac{2840}{10754}}{4000 - 100} - 100$

$= \frac{18802 - 100}{40000 - 100}$

$= \frac{\text{1og } 18802 \text{ - log- } 100}{\text{1og } 40000 \text{- log- } 100}$

$= \frac{4.27 - 2.00}{4.60 - 2.00}$

$= \frac{2.27}{2.60}$

$= 0.873$

5.17 सातारा जिल्ह्याचा उत्पन्न निर्देशांक 1991, 2001 व 2011:–

सन 1991 चा सातारा जिल्ह्याचा उत्पन्न निर्देशांक $= \frac{8632 - 100}{40000 - 100}$

$= 8632 \text{ X } \frac{\frac{2840}{10754} - 100}{4000 - 100}$

$= \frac{2280 - 100}{40000 - 100}$

$= \frac{1\text{og } 2280 - \text{log- } 100}{1\text{og } 40000 - \text{log- } 100}$

$= \frac{3.3579 - 2.00}{4.60 - 2.00}$

$= \frac{1.35}{2.60}$

$= 0.51$

सन 2001चा सातारा जिल्ह्याचा उत्पन्न निर्देशांक $= \frac{20165 - 100}{40000 - 100}$

$= 20165 \text{ X} \frac{\frac{2840}{10754} - 100}{4000 - 100}$

$= \frac{5325 - 100}{40000 - 100}$

$= \frac{1\text{og } 5325 - \text{log- } 100}{1\text{og } 40000 - \text{log- } 100}$

$= \frac{3.7262 - 2.00}{4.60 - 2.00}$

$= \frac{1.72}{2.60}$

$= 0.661$

सन 2011 सातारा जिल्ह्याचा उत्पन्न निर्देशांक $= \frac{67134 - 100}{40000 - 100}$

$= 67134 \text{ X} \frac{\frac{2840}{10754} - 100}{4000 - 100}$

$= \frac{17729 - 100}{40000 - 100}$

$= \frac{1\text{og } 17729 - \text{log- } 100}{1\text{og } 40000 - \text{log- } 100}$

$= \frac{42480 - 2.00}{4.60 - 2.00}$

$= \frac{2.24}{2.60}$

$= 0.861$

5.18 सांगली व सातारा जिल्ह्याचा उत्पन्न निर्देशांक1991,2001 व 2011 :-

खालील तक्ता क्र 5.10 सांगली व सातारा जिल्ह्यांचा सन 1991, 2001 व 2011 चा उत्पन्न निर्देशांक दर्शवितो.

तक्ता क्र.5.10

सांगली व सातारा जिल्ह्याचा उत्पन्न निर्देशांक

कालावधी	सांगली जिल्हा	सातारा जिल्हा
1991	0.550	0.519
2001	0.677	0.661
2011	0.873	0.861
वाढीचा दर	+58.72	+65.89

स्त्रोत : **Calculated**


तक्ता क्र 5.10 सांगली व सातारा जिल्ह्यांचा उत्पन्न निर्देशांक दर्शवितो. सन 1991 ते 2011 या काळात सांगली जिल्ह्याचा उत्पन्न निर्देशांक अनुक्रमे 0.550,0.677 व 0.873 इतका होता. तर याच काळात सातारा जिल्ह्यात उत्पन्न निर्देशांक अनुक्रमे 0.519, 0.661 व 0.861 इतका राहीला. सन 1991 ते 2011 या तिन्ही दशकात सांगली जिल्ह्याचा उत्पन्न निर्देशांक सातारा जिल्ह्यापेक्षा जास्त राहिल्याचे दिसून येते.

सन 1991 ते 2011या काळातील सातारा व सांगली जिल्ह्यांच्या उत्पन्न निर्देशांकाच्या वाढीचा दर अभ्यासता असे दिसून येते की सातारा जिल्ह्याच्या उत्पन्न निर्देशांकाच्या वाढीचा दर (+65.89) सांगली जिल्ह्यापेक्षा (+58.72) जास्त असल्याचे दिसून येते.

खालील आकृती सांगली व सातारा जिल्ह्यांमधील उत्पन्न निर्देशांकांची तुलनात्मक स्थिती दर्शवितो.

आकृती क्र.5.6

सांगली व सातारा जिल्ह्याचा उत्पन्न निर्देशांक



5.19 सांगली व सातारा जिल्ह्याचा आयुर्मान निर्देशांक1991, 2001 व 2011:–

महाराष्ट्र सरकारने 2002 चा महाराष्ट्राचा मानव निर्देशांक तयार करताना यु.एन.डी.पी.चे निकष व पध्दतीच वापरली परंतु त्यामध्ये थोडा फरक केला जिल्हास्तरावर लोकांच्या सरासरी आयुर्मानाची आकडवारी उपलब्ध नसल्यामुळे त्याऐवजी प्रत्येक जिल्ह्याचा अर्भक मृत्यूदर (Infant Mortality Rate IMR) हा चलघटक वापरला व त्यांची कमाल व किमान मूल्य गृहीत धरली. आम्ही देखील सांगली व सातारा जिल्ह्यांचा आयुर्मान निर्देशांक काढण्यासाठी सांगली व सातारा जिल्ह्यातील 1991 ते 2011 या काळातील अर्भक मुत्यूदर हा चलघटक गृहीत धरला आहे. त्यासाठी खालील सुत्र वापरले आहे.

$$\text{आयुर्मान निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य - मूल्य}}{\text{कमाल मूल्य - किमान मूल्य}}$$

अर्भक मृत्यूदर दर हजारी (1000 अर्भकात होणारे मृत्यू) असल्यामुळे त्याचे कमाल मुल्य 1000 व मूल्य किमान 0 (शुन्य) गृहीत धरले आहे.

5.20 सांगली जिल्ह्याचा आयुर्मान निर्देशांक 1991,2001 व 2011:–

$$\text{सांगली जिल्ह्याचा आयुर्मान निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष अर्भक मृत्यूदर दर - किमान अर्भक मृत्यूदर दर}}{\text{कमाल अर्भक मृत्यूदर दर - किमान अर्भक मृत्यूदर}}$$

सन 1991 चा सांगली जिल्ह्याचा आयुर्मान निर्देशांक $= \frac{41 - 0}{1000 - 0}$

$= \frac{41}{1000}$

निर्देशांक शेकडा पटीत (100) काढला जात असल्यामुळे 0.041 ला 10 ने गुणून

$= 0.041 \times 10 = 0.410$

$= 0.410$

सन 2001 चा सांगली जिल्ह्याचा आयुर्मान निर्देशांक $= \frac{32. - 0}{1000 - 0}$

$= \frac{32}{100}$

$= 0.032$

0.02 हा आक्डा दर हजारी आहे, त्यामुळे तो निर्देशांक्मंत बदलण्यासाठी तो 100 च्या पटीत काढण्यासाठी 0.02 ला 10 ने गुणून.

$= 0.032 \times 10$

$= 0.32$

सन 2011चा सांगली जिल्ह्याचा आयुर्मान निर्देशांक $= \frac{16 - 0}{1000 - 0}$

$= \frac{16}{100}$

$= 0.016$

0.016 हा आकडा दर हजारी आहे, त्यामुळे तो निर्देशांकांत बदलण्यासाठी त्याला 10 ने गुणून.

$= 0.016 \times 10$

$= 0.160$

5.21 सातारा जिल्ह्याचा आयुर्मान निर्देशांक 1991,2001 व 2011:–

$$\text{सातारा जिल्ह्याचा आयुर्मान निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष अर्भक मृत्यूदर दर - किमान अर्भक मृत्यूदर दर}}{\text{कमाल अर्भक मृत्यूदर दर - किमान अर्भक मृत्यूदर}}$$

सन 1991चा सातारा जिल्ह्याचा आयुर्मान निर्देशांक

$$\text{आयुर्मान निर्देशांक} = \frac{51 - 0}{1000 - 0}$$

$$= \frac{51}{1000}$$

$= 0.051$

निर्देशांक शंभराच्या पटीत काढण्यासाठी 0.051X 10 ने गुणून

$= 0.510$

सन 2001 चा सातारा जिल्ह्याचा आयुर्मान निर्देशांक

$$\text{आयुर्मान निर्देशांक} = \frac{32 - 0}{1000 - 0}$$

$$= \frac{32}{100}$$

$= 0.032$

निर्देशांक100 पटीत च्या पटीत काढला जात असल्याने 0.025 ला 10 ने गुणून.

$= 0.032 \times 10$

$= 0.320$

सन 2011 चा सातारा जिल्हयाचा आयुर्मान निर्देशांक

$$\text{आयुर्मान निर्देशांक} = \frac{16 - 0}{1000 - 0}$$

$$= \frac{16}{100}$$

$= 0.016$

निर्देशांक100 पटीत काढला जातो म्हणून 0.016 या संख्येला 10 ने गुणून

$= 0.016 \times 10$

$= 0.160$

5.22 सांगली व सातारा जिल्ह्याचा आयुर्मान निर्देशांक1991,2001 व 2011:–

खालील तक्ता सन 1991, 2001 व 2011 चा सांगली व सातारा जिल्ह्यांचा आयुर्मान निर्देशांक दर्शवितो.

तक्ता क्र.5.11

सांगली व सातारा जिल्ह्याचा आयुर्मान निर्देशांक

कालावधी	सांगली जिल्हा	सातारा जिल्हा
1991	0.410	0.510
2001	0.320	0.320
2011	0.160	0.160
घटीचा दर	-60.97	-68.62

स्त्रोत- **Calculate**

तक्ता क्र 5.11 दर्शवितो को सांगली जिल्ह्याचा आयुर्मान निर्देशांक सन 1991 ते 2011 या काळात अनुक्रमे 0.410,0.320 व 0.160 इतका होता. त्याच्या घटीचा दर 60.97 इतका होता, तर याच काळात सातारा जिल्ह्यात आयुर्मान निर्देशांक अनुक्रमे0.510,0.320 व 0.160 इतका होता. त्याच्या घटीचा दर -68.62 इतका होता.

सांगली व सातारा जिल्ह्यातील आयुर्मान निर्देशांकाची तुलना करता असे दिसून येते की सांगली जिल्ह्याच्या आयुर्मान निर्देशांका पेक्षा (-60.97) सातारा जिल्ह्याचा आयर्मान निर्देशांक (-68.62) जास्त प्रमाणात घटला.

5.23 सांगली व सातारा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक1991,2001 व 2011 :–

मानव विकास निर्देशांक काढण्यासाठी UNDP ने आरोग्य निर्देशांक, शैक्षणिक निर्देशांक व उत्पन्न निर्देशांक या तीन निर्देशांकाची बेरीज करुन त्याला 3 ने भागून सरासरी काढली जाते. ही सरासरी म्हणजेच मानव विकास निर्देशांक होय.

$$\text{मानव विकास निर्देशांक} = \frac{\text{शैक्षेणिक निर्देशांक} + \text{आयुर्मान निर्देशांक} + \text{उत्पन्न निर्देशांक}}{3}$$

2.24 सांगली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक 1991,2001 व 2011:–

1) सन 1991 चा सांगली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक

$$= \frac{0.550 + 0.410 + 0.550}{3}$$
$$= \frac{1.51}{3}$$
$$= 0.503$$

2) सन 2001चा सांगली जिल्हयाचा मानव विकास निर्देशांक

$$= \frac{0.639 + 0.320 + 0.677}{3}$$
$$= \frac{1.636}{3}$$
$$= 0.545$$

3) सन 2011 चा सांगली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक

$$= \frac{0.725 + 0.160 + 0.873}{3}$$
$$= \frac{1.758}{3}$$
$$= 0.58$$

5.25 सन1991, 2001 व 2011 चा सांगली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक :–

तक्ता क्र.5.12

सांगली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक


कालावधी	मानव विकास निर्देशांक
1991	0.503
2001	0.545
2011	0.586
वाढीचा दर	+16.50

स्त्रोत- **Calculated**

तक्ता क्र 5.12 सन 1991 ते 2011 या काळात सांगली जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक दर्शवितो, या काळात तो अनुक्रमे 0.503, 0.545 व 0.586 इतका होता. सन 1991 ते 2011 या काळात तो +16.50 ने वाढला. खालील आकृती क5.7 सांगली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक दर्शविते

आकृती क्र.5.7

सांगली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक



5.26 सातारा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक 1991,2001 व 2011:–

$$\text{मानव विकास निर्देशांक} = \frac{\text{शैक्षणिक निर्देशांक} + \text{आयुर्मान निर्देशांक} + \text{उत्पन्न निर्देशांक} \text{अर्भक मृत्यूदर दर}}{3}$$

1) सन 1991चा सातारा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक $= \frac{0.587 + 0.510 + 0.519}{3}$

$= \frac{1.27}{3}$

$= 0.539$

2) सन 2001चा सातारा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक $= \frac{0.686 + 0.320 + 0.661}{3}$

$= \frac{1.667}{3}$

$= 0.555$

3) सन 2011 चा सातारा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक $= \frac{0.762 + 0.861 + 0.160}{3}$

$= \frac{1.783}{3}$

$= 0.594$

5.27 सन 1991,2001 व 2011 चा सातारा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक :–

तक्ता क्र.5.13

सातारा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक

कालावधी	मानव विकास निर्देशांक
1991	0.539
2001	0.555
2011	0.594
वाढीचा दर	+10.20


स्त्रोत- Calculated

तक्ता क्र 5.13 सन 1991 ते 2011 या काळात सातारा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक दर्शवितो, सन 1991 ते 2011 या काळात सातारा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक अनुक्रम 0.539, 0.555 व 0.594 इतका होता. या काळात त्याच्या वाढीचा दर +10.20 इतका होता.

खालील आकृती क 5.8 सातारा जिल्ह्याचा अभ्यास काळातील मानव विकास निर्देशांकदर्शविते.

आकृती क्र.5.8

सातारा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक दर्शविते



5.28 सांगली व सातारा जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांकाची तुलना 1991 ते 2011:-

तक्ता क्र.5.14

सांगली व सातारा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक तुलना 1991 ते 2011

कालावधी	सांगली जिल्हा	सातारा जिल्हा
1991	0.503–M	0.539– M
2001	0.545– M	0.555– M
2011	0.586– M	0.594– M
वाढीचा दर	+16.50	+10.20
S. D	38.66	28.13
C. V	7.27	5.07

टिप-*M= **मध्यम मानव विकास निर्देशांक** स्त्रोत- Calculated

तक्ता क्र 5.14 सन 1991 ते 2011 या काळातील सांगली व सातारा जिल्ह्यातील मानव विकास निर्देशांकाची तुलनात्मक स्थिती दर्शवितो. सन 1991 ते 2011 या काळात सांगली व सातारा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक 16.50 या दराने वाढला तर सातारा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक 10.20 या दराने वाढला याचा अर्थ सांगली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक तुलानात्मक दृष्ट्या सातारा जिल्ह्यापेक्षा अधिक वाढला.


सन 1991 ते 2011 या काळातील सांगली जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांकाचे प्रमाण विचलन (S.D) 38.66 तर सातारा जिल्ह्याचे मानव विकास निर्देशांकाचे प्रमाण विचलन 28.13 इतके होते. म्हणजे अभ्यास काळातील तीन दशकातील मानव विकासामध्ये सांगली जिल्ह्यात जास्त फरक होता तर सातारा जिल्ह्याच्या मानव विकासात तुलनेने कमी फरक आढळून आला.

सन 1991 ते 2011 या काळातील मानव विकास निर्देशांकाचा विचरण गुणांक 7.27 टक्के होता.तर सातारा जिल्ह्याचा विचलन गुणाक 5.07% होता म्हणजे सातारा जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांकापेक्षा सांगली जिल्हयाचा तुलनेने जास्त फरक होता. सन 1991 ते 2011 या काळातील सांगली व सातारा जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांकाचे मूल्य अनुक्रमे 0.503 ते 0.586 व 0.539 ते 0.594 यामध्ये राहिले आहे, त्यामुळे दोन्ही जिल्हे मध्यम मानव विकास निर्देशांकामध्ये आहेत. याचा अर्थ दोन्ही जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांकमध्यम प्रतीचा अभ्यास काळात राहीला.

खालील आकृती सांगली व सातारा जिल्ह्यातील मानव विकास निर्देशांकाची तुलनात्मक स्थिती दर्शवितो.

आकृती क्र.5.9

सांगली व सातारा जिल्ह्यांच्या मानव विकासाची तुलना



5.29 आर्थिक विकास व मानवी विकासातील सहसंबंध :-

आर्थिक विकास व मानवी विकास दोहोंत धन सहसंबध आसतात. आर्थिक विकास जस जसा होत जातो तस तसा मानवी विकास देखील होत जातो आर्थिक विकास जास्त तर मानवी विकास देखील जास्त असतो, याउलट आर्थिक विकास कमी असेल तर मानवी विकास देखील कमी असतो.

खालील तक्ता महाराष्ट्र राज्य, सांगलो व सातारा जिल्ह्यातील आर्थिक विकास व मानवी विकास दोहोंतील संबध दर्शवितो.

तक्ता क्र.5.15

महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील आर्थिक विकास व मानवी विकास

वर्षे	महाराष्ट्र राज्य			सांगली जिल्हा			सातारा जिल्हा		
	एकूण राज्य उत्पन्न (को.रु)	मानवी विकास निर्देशांक	दरडोई उत्पन्न	एकूण राज्य उत्पन्न (को.रु)	मानवी विकास निर्देशांक	दरडोई उत्पन्न	एकूण राज्य उत्पन्न (को.रु)	मानवी विकास निर्देशांक	दरडोई उत्पन्न
1991	68861	0.492	8242	2400.75	0.503	10381	2214	0.539	8632
2001	243584	0.523	28540	5733.36	0.545	22038	5714.13	0.555	20165
2011	1068327	0.572	83395	22137	0.586	71196	22414	0.594	67134
सहसंबध	r =+0.94	-	r =+0.98	r =+0.83	-	r =+0.85	r =+0.99	-	r =+0.99

स्त्रोत– 1) सांगली व सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

2) **ESM-2012**

तक्ता क्र 5.16 सन 1991 ते 2011 या काळातील महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्याचा आर्थिक विकास व मानवी विकासातील सहसंबध दर्शवितो. महाराष्ट्र राज्याचे राज्य उत्पन्न व मानवी विकास या दोन चलातील सहसंबध r=+0.94, तसेच दरडोई उत्पन्न व मानवी विकास या दोन चलातील सहसंबध r=+0.98 इतकेआले. सांगली जिल्ह्याचे जिल्हा उत्पन्न व दरडोई उत्पन्न आणि मानवी विक्रास यामधील सहसंबध r =+0.83 व r =+0.85 इतके आले.

सातारा जिल्ह्याचे जिल्हा उत्पन्न व दरडोई उत्पन्न आणि मानवी विकास यामधील सहसंबध अनुक्रम r =+0.99 व r =+0.99 असे आढळून आले.

याचा अर्थ असा होतो को सन 1991 ते 2011 या काळात महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्याचा आर्थिक विकास व मानवी विकास यामध्ये धन सहसंबध आढळून आले.

****

प्रकरण 6

दारिद्र्य निर्देशांक व वंचन निर्देशांक

अ.नं.	तपशील	पान नं.
6.1 अ)	अ) मानवी वंचन निर्देशांक (Human Deprivation Index-HDI)	281
6.2	शिक्षण वंचन प्रमाण.	283
6.3	सांगली व सातारा जिल्ह्यातील शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण.	286
6.4	सांगली व सातारा जिल्ह्यात विविध वर्गात शिकणाऱ्या मुला-मुलींचे प्रमाण.	289
6.5	कुपोषित बालकांचे प्रमाण :(वयानुसार कमी वजन असणाऱ्या मुलांचे प्रमाण)	291
6.6	अर्भक मृत्यूदर प्रमाण.	292
6.7	घरे नसणारी लोकसंख्या.	293
6.8	सांगली व सातारा जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याच्या सोयीपासून वंचित असणारी लोकसंख्या.	294
6.9	सांगली व सातारा जिल्ह्यात घरामध्ये शौचाह्याची सोय असणारी कुटुंबे.	296
6.10 ब)	भारत महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यातील मानवी विकास निर्देशांकाचा कल व तुलना.	297
6.11	गृहितकांची पडताळणी. (Testing of the Hypothesis)	301
	1) आर्थिक विकास व मानव विकासात धन सहसंबंध असतात.	301
	2) सांगलो व सातारा जिल्हयातील मानवी विकासात तफावत आढळून येते	301
	3) सांगली व सातारा जिल्ह्यातील लोकसंख्येशी संबंधीत घटकात (साक्षरता, स्त्री-पुरुष प्रमाण, आयुर्मान, बालमृत्यूदर) वगैरे तफावत आढळून येते.	302
	4) महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील मानवी विकासात फरक आढळून येतो.	302

प्रकरण 6

दारिद्र्य निर्देशांक व वंचन निर्देशांक

6.1 अ) मानवी वंचन निर्देशांक (Human Deprivation Index-HDI) :-

देशातील मानव विकासाचे चित्र अधिक स्पष्ट होण्यासाठी निर्देशांकाच्या वंचनाचा विचार करुन ''वंचन निर्देशांक ''तयार केला जातो.वंचन निर्देशांक म्हणजे मानवी विकासाला आवश्यक असणाऱ्या घटकांची कमतरता विचाराता घेऊन लोकांना कोणकोणत्या गोष्टी उपलब्ध होत नाहीत त्याचा निर्देशांक होय.म्हणजे लोकांना उच्च राहणीमान, जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या घटकांपासून किती प्रमाणात लोक वंचित राहतात उदा. सकस आहार, पिण्याचे पाणी, घरांच्यासोयी आवश्यक उत्पादन वगैरे सोयींची कमतरता अथवा वंचन विचारात घेतले जाते. वंचन निर्देशांक तयार करताना आरोग्य वंचन, शिक्षण वंचन, व उत्पन्न वंचन या तीन घटकांचा विचार केला जातो. वंचन निर्देशांक वरील सोयी व सुविधापासून देशातील लोक किती जवळ अथवा दूर आहेत ते स्पष्ट करतो. वंचन निर्देशांक जेवढा शुन्याच्या (0) अधिक जवळ असेल, तेवढी लोकांना उपलब्ध असणाऱ्या शिक्षण, आरोग्य व उत्पन्न विषयक सोईची वाईट स्थिती दर्शवितो. तर वंचन निर्देशांक जेवढा अधिक एकच्या (1) जवळ असेल, तेवढी तो मानवी विकासाची चांगली पातळी दर्शवितो.

वंचन निर्देशांक हा दारिद्र्य निर्देशांका सारखाच आहे. कारण दारिद्र्य निर्देशांक देखील दीर्घायुष्य शिक्षण व उच्च राहणीमान या तीन घटकांचे वंचन दर्शवितो. दारिद्र्य निर्देशांक पुढील निकष विचारात घेतो. वयाच्या 40 व्या वषापर्यंत मृत्यू पावणाऱ्या लोकांचे प्रमाण, प्रोढ निरक्षरता प्रमाण, आरोग्य सेवांची उपलब्धता, शुध्द पिण्याच्या पाण्याची उपलब्धता व 5 वर्षाखालील कुपोषित बालकांचे प्रमाण वगैरे तसेच वंचन निर्देशांक लिंग विषमता चित्र देखील दर्शवितो, त्यामुळे वंचन निर्देशांक दारिद्र्य व लिंगभेद विषमता चित्र हे सर्व या प्रकरणामध्ये समाविष्ठ केले आहे.

खालील तक्ता क्र 6.1 महाराष्ट्र सांगली व सातारा जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या दर्शवितो.

तक्ता क्र 6.1

महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या

वर्षे	महाराष्ट्र राज्य			सांगली जिल्हा			सातारा जिल्हा		
	एकूण कुटुंबे	दारिद्रय रेषखालील कुटुंबे	प्रमाण	एकूण कुटुंबे	दारिद्रय रेषेखालील कुटुंबे	प्रमाण	एकूण कुटुंबे	दारिद्रय रेषेखालील कुटुंबे	प्रमाण
1997-98	11053145	3819012	34.55	362854	51386	14.60	467166	75817	16.23
2009-10	1123.73*	270.73*	24.02	532187	87317	16.40	568012	94540	16.64
वाढीचा दर	-	-	-30.48	-	-	+12.33	-	-	+2.53

टिप–* ही आकडेवारी प्रत्यक्ष लोकसंख्या दर्शविते. स्त्रोत– 1) **सांगली व सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन** 2) **महाराष्ट्र मानव विकास अहवाल –** 1990

तक्ता क्र .6.1 महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील असणारी लोक संख्या दर्शवितो. महाराष्ट्र राज्यात सन 1997-98 मध्ये 34.55 टक्के लोक दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत होते, तर 2009-10 मध्ये ते 24.02% पर्यंत घटले. महाराष्ट्रातील दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या गेल्या 12 वर्षात -30.48 या दराने घटली.

सांगली जिल्ह्यात दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण याच काळात 14.60 टक्क्यावरुन 16.40% इतकेवाढले, या वाढीचा दर +12.33 इतका होता.

सातारा जिल्ह्यात 1997-98 ते 2009-10 या काळात दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण 16.23 टक्क्यावरुन 16.64% असे वाढले, हा वाढीचा दर +2.53 इतका राहीला. सन 1997-98 ते 2009-10 या काळात महाराष्ट्र राज्यातील दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण -30.48 या दराने घटले, तर सांगली व सातारा जिल्ह्यामध्ये मात्र दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण अनुकुमे +12.33 व +2.53 या दराने वाढल्याचे दिसून येते.

6.2 शिक्षण वंचन प्रमाण :–

वंचन निर्देशांक काढण्यासाठी शिक्षण हा एक घटक विचारात घेतला जातो, त्यामध्ये निरक्षर लोकाचे प्रमाण, शिक्षणापासून वंचित असलेल्या मुलांचे प्रमाण, (Drop-out-ratio) स्त्री-पुरुषांमधील शैक्षणिक असमानता शाळा पट संख्येतील मुला-मुलींचे प्रमाण वगैरे घटक विचारात घेतले जातात. खालील तक्ता महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील प्रौढ निरक्षरता दर्शवितो.

तक्ता क्र 6.2

महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील प्रौढ निरक्षरता

(टक्के)

वर्षे	महाराष्ट्र राज्य			सांगली जिल्हा			सातारा जिल्हा		
	साक्षरता	निरक्षरता	एकूण	साक्षरता	निरक्षरता	एकूण	साक्षरता	निरक्षरता	एकूण
1991	64.90	35.10	100	62.61	37.39	100	66.67	33.33	100
2001	76.90	23.10	100	76.62	23.38	100	78.22	21.78	100
2011	82.90	17.10	100	82.62	17.38	100	84.20	15.80	100
वाडीचा दर	-	-51.28	-	-	-53.52	-	-	-52.59	-

स्त्रोत– 1) ESM-2012-13 2) **सांगली व सातारा जिल्हा सामाजिकव आर्थिक समालोचन** – 2012

तक्ता क्र .6.2 सन 1991 ते 2011 या काळातील महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील निरक्षरता दर्शवितो. सन 1991 ते 2011 या काळात महाराष्ट्र राज्यात, निरक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे 35.10, 23.10 व 17.10 असे होते. त्यामध्ये घट झाल्याचे दिसून येते. निरक्षरतेच्या घटीचा दर या काळात -51.28 इतका होता.


सन 1991 ते 2011 या काळात सांगली जिल्ह्यातील निरक्षरतेचे प्रमाण 37.39,23.28 व 17.38 टक्के असे कमी झाल्याचे दिसून येते. हा निरक्षरता घटीचा दर-53.52 टक्के होता.

याच काळात सातारा जिल्ह्यातील निरक्षरता अनुक्रमे 33.33, 21.78 व 15.80 टक्के अशी क मी झाली. हा निरक्षरता घटीचा दर-52.59 टक्के इतका कमी झाला याचा अर्थ महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील निरक्षरता घटली.

महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील निरक्षरता दरातील घटीचा विचार करता सांगली जिल्ह्यातील निरक्षरता घटीचा दर(-53.52 टक्के) सातारा (-52.59 टक्के) व महाराष्ट्र राज्य (-51.28 टक्के) पेक्षा जास्त राहीला, तर महाराष्ट्र राज्यातील निरक्षरता घटीचा दर सर्वात कमी राहीला.

आकृती क्र.6.1

महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील प्रौढ निरक्षरता (1991 ते 2011)



तक्ता क्र 6.3

महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील स्त्री–पुरुष निरक्षरता (1991 ते 2011)

(प्रमाण)

वर्षे	महाराष्ट्र राज्य		सांगली जिल्हा		सातारा जिल्हा	
	पुरुष	स्त्री	पुरुष	स्त्री	पुरुष	स्त्री
1991	23.40	47.70	25.17	50.06	13.39	46.35
गुणोत्तर	(1:2.04)		(1:0.99)		(1:3.46)	
2001	14.00	33.00	13.74	33.27	11.80	31.62
गुणोत्तर	(1:2.36)		(1:2.42)		(1:2.68)	
2011	10.18	24.42	09.60	25.34	7.91	23.71
गुणोत्तर	(1:2.40)		(1:2.64)		(1:2.99)	
घटीचा दर	-56.49	-48.80	-61.86	-49.38	-40.92	-52.22
सरासरी गुणोत्तर	1:2.27		1:2.02		1:3.04	

टिप– कंसातील आकडे गुणोत्तर दर्शवितात.

स्त्रोत– 1) ESM- **2001, 2012–13**

तक्ता क्र 6.3 महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील स्त्री-पुरुष निरक्षरता दर्शवितो.

सन 1991 ते 2011 या काळात महाराष्ट्र राज्यात पुरुष निरक्षरता 23.40%,14% व 10.18 टक्के अशी घटत गेली, या घटीचा दर -56.49 इतका होता, तर स्त्रियांमधील निरक्षरता प्रमाण 47.70%, 33% व 24.42% असे घटत गेले. या निरक्षरता घटीचा दर -48.80 टक्केइतका होता.

सांगली जिल्ह्यातील याच काळातील पुरुष व स्त्रियांमधील निरक्षरता अनुक्रमे 25.17% 13.74% व 9.60 टक्के व 50.06 ,33.27 व 25.34 टक्केहोती, दोहोंत या काळात घट झाल्याचे दिसून येते, हा घटीचा दर अनुक्रम -61.86 व -49.38 इतका होता.

सातारा जिल्ह्यातील पुरुष-स्त्री निरक्षरता प्रमाण अनुक्रमे 13.39, 11.80 व 7.91 आणि 46.35, 31.62 व 23.71 टक्के होते, दोन्ही निरक्षरता प्रमाणात घट झाल्याचे दिसून येते, त्याच्या घटीचा दर-40.92 व -52.22 इतका होता.

महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यात पुरुष स्त्रियांमधील निरक्षरता प्रमाण अभ्यास काळात घटत गेले. महाराष्ट्र व सांगली जिल्ह्यात पुरुषांमधील निरक्षरता घटीचा दर स्त्रियांमधील निरक्षरता घटीपेक्षा जास्त राहिला, तर सातारा जिल्ह्यात मात्र या काळात स्त्रियांमधील निरक्षरता घटीचा दर पुरुष निरक्षरता घटीच्या दरापेक्षा जास्त राहीला.

सांगली जिल्ह्यात पुरुष निरक्षरता घटीचा दर (-61.86) महाराष्ट्र व सातारा जिल्ह्यापेक्षा जास्त राहिला, तर स्त्रियांमधील निरक्षरता घटीचा दर सांगली जिल्हा व महाराष्ट्र राज्यापेक्षा जास्त (-52.22) राहिला.

सन 1991ते 2011 या काळात महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील परुष-स्त्री निरक्षरतेचे सरासरी गुणोत्तर अनुक्रमे 1:2.27, 1:2.02 व 1:3.04 असे राहिले. याचा अर्थ महाराष्ट्रात 1 पुरुषामागे सरासरी 2 पेक्षा जास्त स्त्रिया निरक्षर होत्या, सांगली जिल्ह्यात 1 निरक्षर पुरुषामागे 2 निरक्षर स्त्रिया तर सातारा जिल्ह्यात 1 निरक्षर पुरुषामागे 3 निरक्षर स्त्रिया असे प्रमाण होते. सातारा जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य व सांगली जिल्ह्यांशी तुलना करता स्त्रियांच्या निरक्षरतेचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत जास्त होते.

6.3 सांगली व सातारा जिल्ह्यातील शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण :–

विविध वर्गातील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण हे शिक्षण वंचन दर्शविते. शाळा किंवा उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण जास्त असल्यास मोठ्या लोकसंख्येला शिक्षणापासून वंचित राहवे लागते, त्याचा प्रतिकूल परिणाम मानवी विकासावर घडून येतो. म्हणून विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण कमी केले पाहिजे.

खालील तक्ता सांगली व सातारा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण दर्शवितो.

तक्ता क्र6.4

सांगली व सातारा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण (2011–12)

वर्ग	सांगली जिल्हा					सातारा जिल्हा				
	मुले	गळतीचे प्रमाण	मुली	गळतीचे प्रमाण	एकूण गळतीचे प्रमाण	मुले	गळतीचे प्रमाण	मुली	गळतीचे प्रमाण	एकूण गळतीचे प्रमाण
1 ली	25001	-	21834	-	-	24964	-	21960	-	-
2 री	24251	03	21222	2.80	2.9	25009	0	21944	0.07	0.07
3 री	26409	0	22478	0	0	26189	0	23406	0	0
4 थी	26575	0	22540	0	0	26387	0	22581	3.52	3.52
5 वी	27499	0	22379	0.71	0.71	26588	0	22505	0.34	0.34
6 वी	27655	0	23358	0	0	26894	0	22693	0	0
7 वी	27431	0.81	22927	1.84	1.33	27499	0	22994	0	0
8 वी	25460	7.18	21007	8.37	7.77	26486	3.68	22146	3.69	3.68
9 वी	26605	0	21366	0	0	37030	0	23585	0	0
10 वी	23073	13.25	19201	10.13	11.69	36506	1.41	23965	0	1.41
11 वी	8806	62	9641	50	56	30780	15.68	18509	23	19.5
12 वी	8671	1.53	9173	5	3.26	18382	40.80	11963	35	38
सरासरी गळती	-	14.63	-	11.26	11.95	-	15.39	-	10.93	9.50

स्त्रोत– जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2012

तक्ता क्र 6.4 सन 2011-12 या वर्षातील सांगली व सातारा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या विविध वर्गातील गळतीचे प्रमाण दर्शवितो, त्यावरुन शिक्षण वंचनाची कल्पना येते.

सन 2011-12 या वर्षात सांगली जिल्ह्यात मुलांमध्ये 1 ली ते दुसरी या वर्गात शेकडा 3 विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण दिसून आले. त्यानंतर 6 वी ते 7 वी व 7 वी ते आठवी या वर्गात अनुक्रमे 0.81 व 7.18, 10 वी, 11 वी व 12 वी या वर्गात गळतीचे प्रमाण अनुक्रमे 13.25, 62 व 1.53 इतके होते, तर सरासरी गळतीचे प्रमाण 14.63 म्हणजे शेकडा जवळ जवळ 15 मुले इतके होते.

तसेच 2011-12 या वर्षात सांगली जिल्ह्यात मुलींच्या गळतीचे प्रमाण 1 ली ते 2 री या वर्गात शेकडा 2.80 होते, 4 थी ते 5 वी या वर्गात ते 0.71 इतके होते. 6 वी ते 7 वी मध्ये 1.84, 7 वी ते 8 वी या वर्गात 8.37, 9 वी ते 10 वो मध्ये 10.13, 10 वी ते 11 वी व 11 ते 12 वी या वर्गात अनुक्रमे 50 व 5 इतके होते. तर मुलींच्या सरासरी गळतीचे प्रमाण 11.26 म्हणजे शेकडा 11 इतके होते.

सांगली जिल्ह्यात मुले व मुलींच्या एकण गळतीचे प्रमाण याच वर्षात 1 ली ते 2 री या वर्गात 2.9, 4 थी ते 5 वी मध्ये 0.71, 6 वी ते 7 मध्य 1.33, 7 वी ते 8 वी मध्ये 7.77, 9 वी ते 10 वी या वर्गात 11.69, 10 वी ते 11 मध्ये 56 व 11 वी ते 12 या वर्गात 3.26 इतके होते. तर एकूण गळतीचे सरासरी प्रमाण 11.95 म्हणजे शेकडा 12 विद्यार्थी होते.

सन 2011 - 12 या वर्षात सातारा जिल्ह्यातील मुलांच्या गळतीचे प्रमाण 7 वी ते 8 वी या वर्गात 3.68, 9 वी ते 10 वी मध्ये 1.41, 10वी ते 11 वी मध्ये 15.68 व 11 वी ते 12 मध्ये 40.80 इतके होते, तर मुलांच्या सरासरी गळतीचे प्रमाण 15.39 इतके होते.

सातारा जिल्ह्यात मुलींच्या गळतीचे प्रमाण 1 ली ते 2 री 0.07 होते, 2 री ते 3 री मध्ये 3.52 इतके होते, 4 थी ते 5 वी 0.34 इतके होते. 7 वी ते 8 या वर्गात ते 3.69, 10 वी ते 11 वी मध्ये 23 व 11वी ते 12 वी मध्ये 35 इतके होते, तर सरासरी गळतीचे प्रमाण 10.93 इतके होते.

सातारा जिल्ह्यात एकूण गळतीचे प्रमाण 1 ली ते 2 री मध्ये 0.07 होते, 3 री ते 4 थी मध्ये 3.52, 4 थी ते 5 मध्ये 0.34, 7 वी ते 8 वी या वर्गात 3.68,9 वी ते 10 मध्ये 1.41, तर 10 वी ते 11 वी व 11 वी ते 12 वी या वर्गात अनुक्रमे 19.5, व 38 इतके होते, तर एकूण गळतीचे सरासरी प्रमाण 9.50 इतके होते.

वरील विश्लेषणावरुन असे दिसून येते को सांगली व सातारा दोन्ही जिल्ह्यात 7 वी ते 8 वी या वर्गात तसेच 10 वी ते 11 वी व 11 वी ते 12 वी या वर्गात मुला-मुलींच्या गळतीचे प्रमाण मोठे होते.

सांगली व सातारा जिल्ह्यात मुलांच्या गळतीचे प्रमाण अनुक्रमे 14.63 व 15.39 मुलींच्या गळतीच्या प्रमाणापेक्षा अनुक्रमे 11.26 व 10.93 जास्त होते.

सांगली व सातारा जिल्ह्यातील मुला-मुलींच्या एकूण गळतीच्या प्रमाणाचा विचार करता असे दिसून येते को, सांगली जिल्ह्यातील एकूण गळतीचे प्रमाण (11.95) सातारा जिल्ह्यापेक्षा (10.93) जास्त होते.

6.4 सांगली व सातारा जिल्ह्यात विविध वर्गात शिकणाऱ्या मुला–मुलींचे प्रमाण :–

लिंगभेद निर्देशांक स्त्रिया व पुरुष, मुली व मुले यांना मिळणाऱ्या विविध सोयी व सुविधा किंवा संधी यामधील तफावत दर्शवितो. त्यामुळे 1 ली ते 12वी या वर्गात शिकणाऱ्या मुली व मुलांच्या संख्येत क्ती तफावत आहे, ते अभ्यासणे महत्त्वाचे ठरते, ही तफावत जास्त असेल तर लिंगभेद विषमता मोठी असते, याउलट ती कमी असेल तर लिंगंभेद विषमता कमी असते त्यावर आधारित लिंग निर्देशांक (Gender Index) तयार केला जातो.

खालील तक्ता सांगली व सातारा जिल्ह्यातील विविध वर्गातील शिक्णाऱ्या मुलांमुलींचे गुणोत्तर दर्शवितो.

तक्ता क्र6.5

सांगली व सातारा जिल्ह्यातील विविध वर्गातील मुला–मुलींचे गुणोत्तर (2011–12)

वर्ग	सांगली जिल्हा			सातारा जिल्हा		
	मुले	मुली	गुणोत्तर	मुले	मुली	गुणोत्तर
	25001	21834	1:0.87	24964	21960	1:0.88
2 री	24251	21222	1:0.87	25009	21944	1:0.88
3 री	26409	22478	1:0.85	26189	23406	1:0.89
4 थी	26575	22540	1:0.85	26387	22581	1:0.85
5 वी	27499	22379	1:0.81	26588	22505	1:0.85
6 वी	27655	23358	1:0.84	26894	22693	1:0.84
7 वी	27431	22927	1:0.83	27499	22994	1:0.84
8 वी	25460	21007	1:0.82	26486	22146	1:0.84
9 वी	26605	21366	1:0.80	37030	23585	1:0.64
10 वी	23073	19201	1:0.83	36506	23965	1:0.66
11 वी	8806	9641	1:1.09	30780	18509	1:0.60
12 वी	8671	9173	1:1.06	18382	11963	1:0.65
सरासरी गुणोत्तर	-	-	1:0.87	-	-	1:0.78

आधार-जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2012

तक्ता क्र 6.5 सांगलो व सातारा जिल्ह्यातील इयत्ता 1 ली ते 12 वी या वर्गातील मुलां-मुलींचे गुणोत्तर दर्शवितो.

सांगली जिल्ह्यात हे गुणोत्तर 1:0.87 तर सातारा जिल्ह्यात 1:0.78 होते. याचा अर्थ दोन्ही जिल्ह्यात विविध वर्गात शिकणाऱ्या मुलींचे मुलांच्या संख्येशी असणारे प्रमाण कमी होते. सांगली जिल्ह्यांत दर 100 मुलांशी मुलींचे प्रमाण 87 इतके होते. तर सातारा जिल्ह्यात 100 मुलांशी मुलींचे प्रमाण 78 इतके होते. म्हणजे विविध वर्गात शिकणाऱ्या मुलांच्या प्रमाणापेक्षा मुलींचे प्रमाण दोन्ही जिल्ह्यात कमी असल्याचे दिसून येते.

6.5 कुपोषीत बालकांचे प्रमाण :(वयानुसार कमी वजन असणाऱ्या मुलांचे प्रमाण)–

वंचन निर्देशाक उच्च राहाणीमान व सकस आहारापासून वंचित राहिल्यामुळे कटुंबातील माता व मुलांना सकस आहार मिळत नाही, त्यापासून ते वंचित राहतात. मानवी आरोग्यासाठी आवश्यकव्हिटॅमिन्स, प्रोटीन्स, जीवनसत्वे, उष्मांकयांची कमतरता निर्माण होते व अर्भकेव लहान मुलांमध्ये कुपोषणाची समस्या उद्‌भवते. खालील तक्ता महाराष्ट राज्य सांगली व सातारा जिल्ह्यातील कुपोषित बालकांचे प्रमाण दर्शवितो.

तक्ता क्र.6.6

महाराष्ट्र राज्य सांगलीव सातारा जिल्ह्यातील कुपोषित बालकांचे प्रमाण

(प्रमाण)

कालावधी	महाराष्ट्र राज्य	सांगली जिल्हा	सातारा जिल्हा
1996-97	15.9	13.4	15.3
2011-12	18.8	6.71	8.91
सरासरी	17.35	10.05	12.10

स्त्रोत: 1) **ESM- 2012-13**

2) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2012

सन 1996-97 ते 2011-12 या 15 वर्षात सरासरी कुपोषित बालकांचे प्रमाण महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यात अनुक्रमे 17.35, 10.05 व 12.10% इतके होते. म्हणजे महाराष्ट्रात दर हजारी 17, सांगली व सातारा जिल्ह्यात अनुक्रमे दर हजारी 10 व12 बालके कुपोषित होती.

अभ्यास काळात दोन्ही जिल्ह्यात कुपोषित बालकांचे प्रमाण महाराष्ट्र राज्य सरासरी पेक्षा कमी होते. तर सांगली जिल्ह्यात ते सर्वात कमी होती.

6.6 अर्भक मृत्यूदर प्रमाण:–

अर्भक मृत्यूदर म्हणजे जन्मास आल्यापासून 1 वर्षाच्या आतील दर हजार अर्भका मध्ये मृत्यू पावणाऱ्या अर्भकांचे प्रमाण अर्भक मृत्यूदर जास्त असेल तर आरोग्य विषयकच्या सुविधा कमी आरोग्य निर्देशांका सरासरी आयुर्मान, जन्मदर, मृत्यूदर आरोग्य विषयक सोयींची उपलब्धता बालमुत्यूदर, अर्भक मृत्यूदर, मातांचा मृत्यूदर वगैरे घटक विचारात घेतात तर वंचन निर्देशांकात हे दर अधिक असतील तर आरोग्य विषयकच्या सुविधा पासून लोक वंचित आहेत असा अर्थ होतो.

खालील तक्ता महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यातील अर्भक मृत्यूचे प्रमाण दर्शवितो

तक्ता क्र. 6.7

सांगली व सातारा जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदर

(दर हजारी)

कालावधी	महाराष्ट्र राज्य	सांगली जिल्हा	सातारा जिल्हा
1991	60	41	51
2001	45	32	32
2011	25	16	16
सरासरी	43.33	29.66	33

स्त्रोत: 1) महाराष्ट्राचे आर्थिक सर्व्हेक्षण 2012–13

2) महाराष्ट्र मानव विकास अहवाल 2012

3) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2012

तक्ता क्र 6.7 सन 1991ते 2011या काळातील कुपोषणामुळे महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यातील अर्भक मृत्यूचे प्रमाण दर्शवितो.

1991ते 2011या काळातील महाराष्ट्रातील सरासरी अर्भक मृत्यूदर दर हजारी 43 बालके, सांगली जिल्ह्यात सुमारे 30 तर सातारा जिल्ह्यात 33 बालके असे होते. याचा अर्थ महाराष्ट् राज्य सरासरी पक्षा सांगली व सातारा जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदर कमी होता.तर सांगली जिल्ह्यात तो (29.66) सातारा जिल्ह्यापेक्षा (33) अर्भक मृत्यूदराचे प्रमाण कमी होते.

6.7 घरे नसणारी लोकसंख्या :–

वंचन निर्देशांक अल्प दरडोई उत्पन्न अथवा दारिद्र्यामुळे लोकांना आपल्या जीवनावश्यक गरजा देखिल पूर्ण करता येत नाहीत. दारिद्र्यामुळे लोकांना स्वत:चे घर नसते, घरांच्या सोयी पासून लाक वंचित राहतात, त्यामुळे झोपडपट्टी, अस्वच्छता पिण्याचे पाणी उपलब्ध नसणे, वगैरे सोयीपासून लाक वंचित राहतात. वंचन निर्देशाक जास्त तर मानवी विकास कमी याउलट वंचन निर्देशाक कमी तर मानवी विकास जास्त असतो.

खालील तक्ता सांगली व सातारा जिल्ह्यातील घरे नसणारे लोकांचे प्रमाण दर्शवितो.

तक्ता क्र.6.8

सांगली व सातारा जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील बेघर कुटुंबे (2012)

तपशील	एकूण कुटुंबे	बेघर कुटुंबे	बेघर कुटुंबाचे प्रमाण
सांगली जिल्हा	68207	44239	64.86
सातारा जिल्हा	83016	37266	44.89

स्त्रोत: 1) सांगली व सातारा जिल्हा सामाजिकव आर्थिक समालोचन

तक्ता क्र .6.8 सन 2012 मध्ये सांगली व सातारा जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील असणाऱ्या बेघर कटुंबाची संख्या दर्शवितो.


सन 2012 या वर्षात सांगली जिल्ह्यात दारिद्र्य रेषेखालील असणाऱ्या कुटुंबांची संख्या 68207 होती, त्यापैको 44239 कुटुंबांना घरे नव्हती. हे बेघर कुटुंबाचे एकूण दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांशी आसणारे प्रमाण 64.86 टक्केइतके होते.

सातारा जिल्ह्यातील याच वर्षातील दारिद्र्य रेषेखालील एकूण कटुंबाची संख्या 83016 इतको होतो तर त्यापैकी 37266 कटुंबे बेघर होती, त्यांचे एकूण कटुंबाशी प्रमाण 44.89% इतके होते.

सांगली व सातारा जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील बेघर कुटुंबाची तुलना करता सांगली जिल्ह्यात बेघर कटुंबाचे प्रमाण (64.86%) सातारा जिल्ह्यापेक्षा (44.89%) जास्त होते.

आकृती क्र 6.2

सांगली व सातारा जिल्ह्यातील बेघर कुटुंबाचे प्रमाण



6.8 सांगली व सातारा जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याच्या सोयीपासून वंचित असणारी लोकसंख्या:–

वंचन निर्देशांकामध्ये पिण्याच्या पाण्यापासून वंचित असणाऱ्या लोकांचा देखील समावेश होतो चांगल्या आरोग्यासाठी शुध्द पिण्याच्या पाण्याची उपलब्धता लोकाना असली पाहिजे.

खालील तक्ता सन 2012 या वर्षात सांगली व सातारा जिल्ह्याती लोकांना पिण्याच्या पाण्याच्या सोयी उपलब्ध नसणाऱ्या गावे व वाड्यांची संख्या व प्रमाण दर्शवितो.

तक्ता क्र.6.9

पिण्याच्या पाण्याच्या सोयीपासून वंचित (लाकसंख्या)गावे व वाड्या (2011-12)

(टक्के)

तपशील	सांगली जिल्हा	सातारा जिल्हा
एकूण गावे व वाड्या	5327	4011
पाण्याची टंचाई ग्रस्त गावे व वाड्या	1103	1542
पाणी टंचाईग्रस्त गावे व वाड्यांचे प्रमाण (टक्के)	20.70	38.44

स्त्रोत: **1) सांगली व सातारा जिल्हा**
2) सामाजिकव आर्थिक समालोचन

सन 2011-12 मध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाईग्रस्त गावे व वाड्यांची एकूण संख्या सांगली व सातारा जिल्ह्यात अनुक्रमे 1103 व 1542 इतको होती.


सांगली जिल्ह्यातील टंचाईग्रस्त गावाचे एकूण गावे व वाड्यांशी 20.70% प्रमाण होते तर सातारा जिल्ह्यातील पाणी टंचाई असणाऱ्या गावे व वाड्यांचे प्रमाण 38.44 टक्के होते.

सातारा जिल्ह्यातील पाण्याची टंचाई असणाऱ्या गावे व वाड्यांचे प्रमाण (38.44 टक्के)सांगलो जिल्हयापेक्षा (20.70 टक्के)जास्त आसल्याचे दिसून येते.

खालील आकृती सांगली व सातारा जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाईग्रस्त गावे व वाड्यांची तुलनात्मक स्थिती दर्शविते.

आकृती क्र. 6.3

सांगली व सातारा जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाईग्रस्त गावे व वाड्यांची तौलनिकस्थिती



6.9 सांगली व सातारा जिल्ह्यात घरामध्ये शौचालयाची सोय असणारी कुटुंब :–

राहणीमान निर्देशांकामध्ये स्वच्छता हा एक घटक समाविष्ठ असतो. किती लोकांना स्वच्छता विषयक सोई उपलब्ध आहेत, त्यावरून राहणीमान निर्देशांक तयार केला जातो. ज्या लोकांना या सोई उपलब्ध नसतात, त्यावरून वंचन निर्देशांक काढला जातो. खालील तक्ता सन 2011-12 मध्ये सांगली व सातारा जिल्ह्यातील कटुंबांना शौचालयाची उपलब्ध नसल्याचे दर्शवितो.

तक्ता क्र 6.10

सांगली व सातारा जिल्ह्यातील ग्रामीण भागात शौचालयाची सोय नसलेली कुटुंबे

(टक्के)

तपशील	एकूण कुटुंबे	शौचालये नसलेली कुटुंबे	शौचालये नसलेली कुटुंबाचे प्रमाण
सांगली जिल्हा	348725	32530	9.33
सातारा जिल्हा	479183	479183	00.00

स्त्रोत: 1) सांगली व सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2012

सन 2011-12 या वर्षात सांगली जिल्ह्यातील ग्रामीण भागात राहणाऱ्या एक्ण कुटुंबाची संख्या 348725 इतकी होती, त्यापैकी 32530 कुटुंबांकडे शौचालयाचो सोय नव्हती म्हणजे 9.33% कुटुंबांकडे शौचालये नव्हती, या सोयी पासून ते वंचित होते. याच वर्षात सातारा जिल्ह्यातील ग्रामीण कुटुंबाची संख्या 479183 इतकी होती, तर सर्व कुटुंबांकडे शौचालयाची सोय उपलब्ध होती. या सोयीबाबत सांगली जिल्हा सातारा जिल्ह्यापेक्षा मागे असल्याचे दिसून येते.

6.10 ब) भारत, महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यातील मानवी विकास निर्देशांकाचा कल व तुलना :–

या भागात राष्ट्रोय पातळी, राज्य पातळी, सांगली व सातारा जिल्ह्यातील मानवी विकासाचा कल व तुलना केली आहे. गेल्या 21 वर्षात कोणत्या पातळीवर मानव विकास निर्देशांक जास्त राहिला व कोणत्या पातळीवर तो कमी राहिला ते समजते.

खालील तक्ता भारत, महाराष्ट राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील मानवी विकासाचा कल दर्शावितो.

तक्ता क्र 6.11

भारत, महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील मानव विकासाचा कल.

कालावधी	भारत	महाराष्ट्र राज्य	सांगली जिल्हा	सातारा जिल्हा
1991	0.381-अल्प	0.492- अल्प	0.503-मध्यम	0.539-मध्यम
2001	0.472-अल्प	0.523-मध्यम	0.545-मध्यम	0.555-मध्यम
2011	0.551-मध्यम	0.572-मध्यम	0.586-मध्यम	0.594-मध्यम
वाढीचा दर	+44.62	+16.26	+16.50	+10.20

स्त्रोत: 1) National human development report 2001

2)HDR-2013, IHDR-2012

सन 1991 ते 2011या काळात भारताचा मानव विकास निर्देशांक अनुक्रमे 0 .381, 0.472 व 0.551 इतका होता. या कालावधीत मानव विकास निर्देशांकाच्या वाढीचा दर + 44.62 इतका होता.

महाराष्ट्र राज्याचा मानव विकास निर्देशांक अनुक्रमे 0.492, 0.523 व 0.572 असा झाला त्याच्या वाढीचा दर +16.26 इतका राहिला.

सांगली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक 1991 ते 2011 या काळात अनक्रमे 0.503, 0.545 व 0.586 इतक ा होता. त्याच्या वाढीचा दर +16.50 इतका होता. तर सातारा जिल्ह्याचा याच काळातील मानव विकास निर्देशांक अनुक्रमे 0.539, 0.555 व 0.594 इतका होता, त्याच्या वाढीचा दर +10.20 इतका होता.

सन 1991ते 2011 या काळात भारताच्या मानव विकास वाढीचा दर सर्वात जास्त (+44.62) राहिला तर सातारा जिल्ह्याच्या मानव विकास वाढीचा दर सर्वात कमी (+10.20) राहिला.

भारत, महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यांच्या मानव विकास गुणोत्तरावरुन सन 1991 ते 2011 या काळात देशाचा, राज्याचा की सांगली अथवा सातारा जिल्ह्याचा मानव विकास जास्त आहे ते समजते.

खालील तक्ता. भारत, महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्हा यांच्या मानव विकासाचे गुणोत्तर दर्शवितो.

तक्ता क्र 6.12

महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यांच्या मानव विकासाचे भारताच्या मानव विकासाशी गुणोत्तर

(प्रमाण)

कालावधी	भारत	महाराष्ट्र राज्य	सांगली जिल्हा	सातारा जिल्हा
1991	1:1	1:1.29	1:1.32	1:1.41
2001	1:1	1:1.11	1:1.15	1:1.17
2011	1:1	1:1.04	1:1.06	1:1.08
सरासरी गुणोत्तर	1:1	1:1.15	1:1.18	1:1.22

स्त्रोत: 1) सांगली व सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2012

भारत, महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यांच्या मानवी विकासाच्या गुणोत्तराचा तुलनात्मक अभ्यास दर्शवितो को भारताच्या मानव विकास गुणात्तराशी महाराष्ट्र राज्याचे सरासरी मानव विकास गुणोत्तर 1:1.15 इतकेहोते, म्हणजे अभ्यास काळात देशापेक्षा महाराष्ट्र राज्याचे मानव विकास गुणोत्तर15 टक्क्याने जास्त होते .

सांगलो व सातारा जिल्ह्यांचे मानव विकास गुणोत्तर भारताशी तुलना करता ते अनुक्रमे 1:1.18 व 1:1.22 इतके होते म्हणजे सांगली जिल्ह्याचे मानव विकास गुणोत्मर राष्ट्रोय पातळी पेक्षा 18 टक्क्याने तर सातारा जिल्हयाचे 22 टक्क्याने जास्त होते .

तक्ता क्र 6.13 महाराष्ट्र राज्याच्या मानव विकासाशी सांगली व सातारा जिल्ह्यांच्या मानव विकासाचे गुणोत्तर दर्शविता

तक्ता क्र 6.13

महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यांच्या मानव विकासाची तुलना. (प्रमाण)

कालावधी	महाराष्ट्र राज्य	सांगली जिल्हा	सातारा जिल्हा
1991	1:1	1:1.02	1:1.09
2001	1:1	1:1.04	1:1.06
2011	1:1	1:1.02	1:1.04
सरासरी	1:1	1:1.03	1:1.06

स्त्रोत: 1) सांगली व सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2012

सन 1991ते2011या काळात महाराष्ट्र राज्याच्या मानव विकास गुणोत्तराशी सांगली व सातारा जिल्ह्यांच्या मानव विकासाशी तुलना करता सांगली जिल्ह्याच्या मानव विकासाचे सरासरी गुणोत्तर 1:1.03 व सातारा जिल्ह्याचे 1:1.06 असे होते म्हणजे महाराष्ट्राच्या मानव विकासापेक्षा सांगली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक सरासरी 3 टक्क्याने तर सातारा जिल्ह्याचा विकास निर्देशांक सरासरी 6 टक्क्याने जास्त होता. म्हणजे सांगली व सातारा या दोन्ही जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक महाराष्ट्र

राज्याच्या मानव विकास निर्देशांकापेक्षा जास्त होता. सांगली व सातारा जिल्ह्याच्या मानव विकासाचा तौलनिक अभ्यासावरुन कोणत्या जिल्ह्याचा मानवी विकास जास्त राहीला आहे ते समजते. तक्ता क्र. 6.14 सांगलो व सातारा जिल्ह्यांच्या मानव विकासाचे गुणोत्तर दर्शवितो.

तक्ता क्र 6.14

सांगली व सातारा जिल्ह्यांच्या मानव विकासाची तौलनिक स्थिती

कालावधी	सांगली जिल्हा	सातारा जिल्हा
1991	1:1	1:1.07
2001	1:1	1:1.02
2011	1:1	1:1.01
सरासरी	1:1	1:1.03

स्त्रोत: 1) सांगली व सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालेाचन 2012

सन 1991 ते 2011 या काळातील सांगली व सातारा जिल्ह्यांच्या मानव विकासाच्या गुणोत्तराशी तुलना करता असे दिसून येते.

सांगली जिल्ह्याच्या मानव विकासाशी सातारा जिल्ह्याचे मानव विकास गुणोत्तर 1:1.07, 1:1.02 व 1:1.03 असे होत, तर सरासरी गुणोत्तर 1:1.03 असे होते म्हणजे सांगली जिल्ह्यापेक्षा ते 3 टक्क्याने जास्त होते.


वरील मानव विकास निर्देशांकांची तुलना करता असे दिसून येते को मानव विकासात सातारा जिल्हा भारत, महाराष्ट्र राज्य व सांगली जिल्ह्यापेक्षा पुढे होता. तर सांगली व सातारा दोन्ही जिल्हे भारत व महाराष्ट्र राज्याच्या पुढे होते महाराष्ट्र राज्य व देशपातळीवरील मानव विकासाची तुलना करता महाराष्ट्र राज्य भारतापेक्षा अग्रेसर आहे.

तसेच निर्देशांकावरुन मानव विकासाची पातळी ठरविताना दिसून येते की, भारत, महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्हा सर्व मानवी विकासाच्या मध्यम पातळीवर (0.5 ते 0.8) आहेत.

खालील आकृती भारत, महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील सन 1991 ते 2011 या काळातील मानव विकासाची तौलनिक स्थिती दर्शविते.

आकृती क्र 6.4

भारत, महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यांचा मानव विकासाची तौलनिक स्थिती



6.11 गृहितकांची पडताळणी (Testing of the Hypothesis)

1) "आर्थिक विकास व मानव विकासात धन सहसंबंध असतात":-

या गहितकांची पडताळणी गोळा केलेल्या माहितीच्या आधारावर केली आहे.

राष्ट्रोय उत्पन्न व दरडाई उत्पन्न हे आर्थिक विकासाची प्रमख मापके होत जस जसे राष्ट्रीय उत्पन्न व दरडाई उत्पन्न भारत, महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यात वाढत गेला, तस तसा मानव विकास निर्देशांक देखील वाढत गेल्याचे आढळून आले. हे तक्ता क्र 4.6 व 4.7, 4.8, 4.9, 4.11 तसेच आकृती क्र4.7, 4.8 आणि तक्ता क्र 5.14, 5.6 व आकृती क्र 5.9 व 5.6 आर्थिक विकास व मानवी विकासात 'धन' सहसंबंध असल्याचे दर्शवितात. आर्थिक विकास झाला को मानवी विकास होतो हे त्यावरुन सिध्द होते, त्यामुळे वरील गृहीतक सिध्द झाले आहे.

2) "सांगली व सातारा जिल्ह्यातील मानवी विकासात तफावत आढळून येते" :-

हे गृहीतक देखील गोळा केलेल्या माहितीच्या आधारे सिध्द झाले आहे. तक्ता क्र 5.14 आकृती क्र 5.19 सांगली व सातारा जिल्ह्यांच्या 1991 ते 2011 या काळातील मानवी विकासात

फरक (तफावत) दर्शविते. सन 1991 ते 2011 या काळात सांगली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक अनुक्रमे मे 0.503, 0.545 व 0.586 तर सातारा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक अनुक्रमे 0.539, 0.555, व 0.594 होता. म्हणजे दोन्ही जिल्ह्यांच्या मानव विकासात तफावत आढळून आली.

3) "सांगली व सातारा जिल्ह्यातील लोकसंख्येशी संबंधित घटकात (साक्षरता, स्त्री-पुरुष प्रमाण, आयुर्मान, बालमृत्यूदर) वगैरे तफावत आढळून येते":-

हे गृहीतक देखील गोळा केलेल्या आकडेवारीवरुन सिध्द झाले आहे. सांगली व सातारा जिल्ह्यातील प्रोढ साक्षरता प्रमाण, स्त्री-पुरुष प्रमाण बालमृत्यूदर वगैरे घटकात फरक आहे. हे तक्ता क्र. 4.2, 4.3, 4.4, 4.5, 4.8, 5.3, 5.4, 5.5 आणि आकृतो क्र 4.3, 4.4, 4.5, 4.7, 5.1 व 5.2 वरुन दिसून येते. त्यामुळे हे गृहीतक देखील सिध्द झाले आहे.

4)"महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील मानवी विकासात फरक आढळून येतो":-

हे गृहीतक देखील गोळा केलेल्या माहितीच्या विश्लेषणावरुन सिध्द झाले आहे. महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील मानवी विकासातील फरक तक्ता क्र. 6.10, 6.11, 6.12, 6.13 व आकृती क .6.4 वरुन दिसून येतो सन 1991 ते 2011 या काळात महाराष्ट्र राज्याचा मानव विकास निर्देशांक अनुक्रमे 0.492, 0.523 व 0.572 होता, तर सांगली व सातारा जिल्ह्याचा अनुक्रमे 0.503, 0.545, व 0.586 आणि 0.539, 0.555 व 0.594 होता. त्यामुळे वरील गृहीतक देखील सिध्द झाले आहे.

****

प्रकरण 7

निष्कर्ष व शिफारशी (Findings & Recommendations)

निष्कर्ष:–

1) भारत व महाराष्ट्राचा दशवार्षिक, वार्षिक व सरासरी दराची तुलना करता असे दिसून येते की, गेल्या 20 वर्षात 1991 ते 2011 महाराष्ट्रातील लोकसंख्या वाढीचा दर (+46.03) भारताच्या लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा (+43.03) जास्त होता तर महाराष्ट्राचा लोकसंख्या वाढीचा सरासरी दर (+2.14) हा भारतातील सरासरी लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा (+2.10) जास्त होता. (तक्ता क्र4.2 प्रमाणे)

2) सन 1991 ते 2011 या काळात सांगली जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 2209 हजारावरुन 2821 हजार इतको वाढली. या काळात म्हणजे गेल्या 20 वर्षाच्या काळात सांगली जिल्ह्याच्या लोक संख्या वाढीचा दर +27.70 इतका राहीला. (तक्ता क्र4.2 प्रमाणे)

3) सन 1991 ते 2011 या काळात लोकसंख्या वाढीचा दशवार्षिक अनुक्रमे +20.45, +16.17 व +9.17 इतका राहीला तर वार्षिक वृध्दीदर अनुक्रमे +20.04,+1.69 व +0.91 इतका होता. (तक्ता क्र.4.2)

4) सन 1991 ते 2011 या वर्षात लोकसंख्या वाढीचा सरासरी दर +1.5 इतका राहीला म्हणजेच सांगली जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीचा वार्षिकदर +2.04 वरुन +0.91 इतका झाला. (तक्ता क्र4.2 प्रमाणे)

5) सांगली व सातारा जिल्ह्याच्या लोकसंख्या वाढ व वाढीचा दर यांची तुलना करता असे दिसून येते की सन 1991 ते 2011 या कालावधीत दोन्ही जिल्ह्याच्या लोकसंख्या वाढीचा दर घटत गेला आहे. (तक्ता क्र4.2 प्रमाणे)

6) सांगली व सातारा जिल्ह्यांतील सरासरी लोकसंख्या वाढीच्या दराची तुलना करता सातारा जिल्ह्याचा लोकसंख्या वाढीचा दर (+1.3) सांगली जिल्ह्याच्या लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा (+1.5) कमी राहीला. (तक्ता क्र4.2 प्रमाणे)

7) सांगली व सातारा दोन्ही जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीच्या दरात घट होत आहे. हे देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने सुचिन्ह आहे. (तक्ता क्र. 4.2 प्रमाणे)

8) भारत, महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्हयातील आकडेवारीवरुण राष्ट्र, राज्य व जिल्हा पातळी वरील दरहजारी पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण वाढीचा दर भारताचा (+2.06) सर्वात जास्त राहीला तर सातारा जिल्ह्याचा हा दर सर्वात कमी -4.18 राहीला. (तक्ता क्र4.5 प्रमाणे)

9) महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्याचा विचार करता अभ्यास काळात सांगली जिल्ह्याचा स्त्रो प्रमाण दर वाढला तर महाराष्ट्र राज्य (-0.96) व सातारा जिल्ह्यातील हा दर (-4.18) उणे असल्याचे दिसून येते. म्हणून राज्य व सातारा जिल्ह्याने दर हजारी स्त्रियांचे प्रमाण वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत. (तक्ता क्र. 4.5 प्रमाणे)

10) भारत व महाराष्ट्र राज्याच्य1991 ते 2011 या काळातील एकूण उत्पन्न वाढीच्या दराची तुलना करता महाराष्ट्राच्या उत्पन्न वाढीचा दर(+1451.42) भारताच्या एकूण उत्पन्न वाढीच्या दरापेक्षा (+1266.44) जास्त राहीला तर वार्षिक सरासरी वाढीचा दर देखील महाराष्ट्राचा (+48.38) भारतापेक्षा (+42.21) जास्त होता. (तक्ता क्र. 4.6 प्रमाणे)

11) महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्याच्या एकूण उत्पन्न वाढीचा दर 1991 ते 2011 या काळात राज्याच्या उत्पन्न वाढीच्या दरापेक्षा (1451.42) सांगली व सातारा जिल्ह्यांचे वाढीचे दर (+822.08 व 912.23) कमी राहीले तसेच सरासरी वार्षिक वाढीचे दर देखील महाराष्ट्र राज्य +48.38, सांगली जिल्हा (+27.40) व सातारा जिल्हा (+30.40) अभ्यास काळात कमी राहीला. (तक्ता क्र4.6 प्रमाण)

12) सांगली व सातारा जिल्ह्यांच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्न वाढीच्या दराची तुलना करता 1991 ते 2011 या काळात सातारा जिल्ह्याच्या एकूण उत्पन्न वाढीचे दरापेक्षा (+822.08) जास्त होता, तसेच वार्षिक सरासरी उत्पन्न वाढीचा दर देखील सातारा जिल्ह्याचा (+30.40) सांगली पेक्षा (+27.40) जास्त होता. (तक्ता क्र4.6 प्रमाणे)

13) भारत, महाराष्ट्र राज्य, सांगलो व सातारा जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न वाढीचा दराची तुलना करता महाराष्ट्र राज्याचा 30 वर्षातील दरडोई उत्पन्न वाढीचा दर सर्वात जास्त +911.70 राहिला तर सांगली जिल्ह्याचा हा दर सर्वात कमी +585.76 राहिला, भारताचा दुसऱ्या स्थानी +866.40 व सातारा जिल्ह्याचा हा वाढीचा दर तिसऱ्या स्थानावर राहिला. (तक्ता क्र. 4.7 प्रमाणे)

14) सन 1991-2011 या काळातील दरवर्षीक दरडोई उत्पन्न वाढीचा दर आणि चक्रवाढी दर महाराष्ट्राचा सर्वात जास्त +7.94 आहे व भारत दुसऱ्या स्थानी (+7.77), सातारा तिसऱ्या स्थानी 67.66 सांगली चौथ्या स्थानावर (+7.18) राहिला (तक्ता क्र. 4.7 प्रमाणे)

15) सन 1991 ते 2011 या काळातील सांगली व सातारा जिल्ह्यांच्या दरडोई उत्पन्न वाढीचा विचार करता दोन्ही जिल्ह्यांच्या दरडोई उत्पन्नातील वाढ राष्ट्रीय पातळी व राज्य पातळीपेक्षा कमी राहिली. (तक्ता क्र. 4.7 प्रमाणे)

16) सांगली, सातारा या दोन्ही जिल्ह्यांच्या दरडोई उत्पन्न वाढीची तुलना करता सातारा जिल्ह्याच्या दरडोई उत्पन्नात सांगली जिल्ह्यापेक्षा जास्त दराने वाढ झाली. (तक्ता क्र. 4.7 प्रमाणे)

17) सन 1991 ते 2011 या दोन दशकातील प्रत्येक दशकात महाराष्ट्रातील लोकांचे सरासरी आयुर्मान भारतातील सरासरी आयुर्मानापेक्षा जास्त होते. परंतु गेल्या 30 वर्षातील सरासरी आयुर्मान वाढीचा दर महाराष्ट्रापेक्षा भारतीय पातळीवर जास्त राहिल्याचे दिसून येते. (तक्ता क्र. 4.8 प्रमाणे)

18) भारत व महाराष्ट्र यांची साक्षरता वाढ दराची तुलना करता दिसून येते की तिन्ही दशकात महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण राष्ट्रीय पातळीपेक्षा (भारत) जास्त राहीले. परंतु या काळातील साक्षरता वाढीच्या

दराची तुलना करता भारताचा साक्षरता दर (+41.84) महाराष्ट्रापेक्षा (+27.79) जास्त होता. (तक्ता क्र. 4.9 प्रमाणे)

19) सांगली व सातारा जिल्ह्यातील साक्षरतेची तुलना करत तिन्ही दशकात सातारा जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण जास्त राहीले परंतु साक्षरता वाढीचा दर हा सांगली (+31.96) सातारा जिल्ह्यापेक्षा (+26.29) जास्त होता. (तक्ता क्र. 4.9 प्रमाणे)

20) भारत, महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्हा यांच्या साक्षरतेची तुलना करता असे दिसून येते की, तिन्ही दशकात सातारा जिल्ह्याची साक्षरता राष्ट्रीय पातळीपेक्षा (भारत), राज्य पातळी (महाराष्ट्र) व सांगली जिल्ह्यापेक्षा जास्त राहीली. दुसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्र राज्य, सांगली जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर तर भारत (राष्ट्रीय पातळी) चौथ्या क्रमांकावर असल्याचे दिसून येते.

(तक्ता क्र. 4.9 प्रमाणे)

21) सन 1991 ते 2011 या काळात सांगली जिल्ह्याची साक्षरता राज्य पातळीपेक्षा कमी व राष्ट्रीय पातळीपेक्षा जास्त होती, तर सातारा जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण राज्य व राष्ट्रीय पातळीपेक्षा जास्त होत. (तक्ता क्र. 4.9 प्रमाणे)

22) साक्षरता वाढीच्या दराचा विचार करता भारताचा क्रमांक पहिला (+41.84), सांगली जिल्ह्याचा दुसरा(+31.96),महाराष्ट्र राज्य तिसरा(+27.79), तर सातारा जिल्ह्याचा चौथा क्रमांक (+26.29) लागतो. याचा अर्थ असा होतो को जेथे साक्षरतेचे प्रमाण कमी होते तेथे साक्षरता वाढीचा दर जास्त राहीला व जेथे ते जास्त हाते तेथे साक्षरता वाढीचा दर कमी राहील्याच दिसून येते.

(तक्ता क्र. 4.9 प्रमाणे)

23) सन1991 ते 2011 काळात सांगली व सातारा जिल्ह्यातील विद्याथी संख्या घटली -61.90 व -16.10, परंतु सांगली जिल्ह्यातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थी संख्येचा घटीचा दर सातारा जिल्ह्यातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थी संख्येतील घटीपेक्षा जास्त होता.(तक्ता क्र4.10 प्रमाणे)

24) एकूण लोकसंख्या वाढीचा दर (भारत) राष्ट्रोय पातळीवर +43.33 सर्वात जास्त होता तर सर्वात कमी एकूण लोकसंख्या वाढीचा दर सातारा जिल्ह्याचा +22.51 इतका राहीला.

(तक्ता क्र. 4.11 प्रमाणे)

25) सन 1991 ते 2011 या कालावधीत ग्रामीण लोकसख्या वाढीचा दर सर्वात जास्त राष्ट्रीय पातळीवर (भारत) +32.84 तर सर्वात कमीदर सातारा जिल्ह्याचा +13.95 राहील.

(तक्ता क्र. 4.11 प्रमाणे)

26) सन 1991 ते 2011 कालावधीत शहरी लोकसंख्या वाढोचा दर सर्वात जास्त सातारा जिल्ह्यात +80.37 तर सर्वात कमी दर सर्वात जास्त सांगली जिल्ह्याचा +43.23 इतका राहीला. भारत व महाराष्ट्र राज्यातील शहरी करणाचा दर अनुक्रमे +73.62 व +66.55 इतका राहिला.

(तक्ता क्र.4.11 प्रमाणे)

27) सन 1991 ते 2011 या काळात राष्ट्रोय पातळीवर (भारत), राज्यपातळीवर (महाराष्ट्र) व सांगली व सातारा जिल्हा शहरीकरणाच्या बाबतीत सातारा जिल्हा पहिल्या क्र मांकावर, भारत दुसऱ्या क्रमांकावर, महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर, तर सांगली जिल्हा चौथ्या क्रमांकावर असल्याचे दिसून येते. (तक्ता क्र. 4.11 प्रमाणे)

28) सांगली व सातारा जिल्ह्यातील आरोग्य विषयक चलांचा विचार करता असे दिसून येते को सागली जिल्ह्यात सरकारी रुग्णालये, प्राथमिकआरोग्य केंद्रे व उपकेंद्रे आणि खाटांची संख्या यांच्या वाढीचा दर अभ्यास काळात अनुक्रमे +400, +11.32, +18.52 व +37.43 इतका होता. परंतु वार्षिक वाढीच्या दराचा विचार करता सरकारी रुग्णालये (+13.33) सोडून इतर घटकांचा वार्षिक दर अनुक्रमे +0.38, +0.62, +1.25, इतके नगण्य होते.(तक्ता क्र5.1 प्रमाणे)

29) सांगली व सातारा जिल्ह्यातील सरकारी दवाखाने, व प्रतीलाख लोकसख्येला उपलब्ध खाटांचे प्रमाण यांचा 30 वर्षातील वाढीचा दर अनुक्रमे -57.81 व -30.66 असा होता म्हणजे तो घटला आहे. (तक्ता क्र. 5.1 प्रमाणे)

30) सातारा जिल्ह्यातील आरोग्यविषयक चलांचा विचार करता असे दिसून येते की सरकारी दवाखाने, प्राथमिक आरोग्य केंद्रे, प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे खाटांची संख्या व प्रतीलाख लोकसंख्येत खाटा या चलांचा दर अभ्यास काळात अनुक्रमे +11.76, +2.89, +29.45, +28.77 व +05 इतका होता, या चलघटकांचा वार्षिक वाढीचा दर अनुक्रमे +0.39, 0.096, +0.98, +0.96 व +0.16 इतका नगण्य होता. तर सातारा जिल्ह्यातील सरकारी रुग्णालयाची संख्या या चल घटकांच्या वाढीचा दर -10 इतका होता. याचा अर्थ 1991 ते 2011 या काळात सरकारी रुग्णालयांची संख्या कमी झाली. (तक्ता क्र. 5.1 प्रमाणे)

31) सन 1991 ते 2011 या काळातील जन्मदर व मृत्यूदराचा अभ्यास करता असे दिसून येते को, भारत, महाराष्ट्र, सांगली व सातारा जिल्ह्यात जन्म व मृत्यूदरातील घट झाली आहे. सर्वच ठिकाणी जन्मदरातील घट ही मृत्यूदरातील घटीपेक्षा जास्त आहे. (तक्ता क्र.5.2 प्रमाणे)

32) महाराष्ट्र राज्यातील जन्मदर (-36.26) सर्वात जास्त घटला तर सांगली जिल्ह्यातील जन्मदर तुलनेने कमी (-23.38) घटला. (तक्ता क्र.5.2 प्रमाणे)

33) मृत्यूदराचा तुलनात्मक अभ्यास दर्शवितो की राष्ट्रीय पातळीवर (भारत) मृत्यूदरातील घट सर्वात जास्त (-26.88) राहिला, तर सांगली जिल्ह्यातील मृत्यूदरातील घट सर्वात कमी (-14.10) राहिला. (तक्ता क्र.5.2 प्रमाणे)

34) राष्ट्रीय पातळी, राज्य पातळी, सांगली व सातारा जिल्हा पातळीवरील अभ्यास काळातील अर्भक मृत्यूदर तौलनिक अभ्यास स्पष्ट करतो. को सातारा जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदर सर्वात जास्त प्रमाणात (-68.62%) घटला तर भारतातील राष्ट्रीय पातळीवरील अर्भक मृत्यूदर तुलनेने कमी (-45%) प्रमाणात घटला. (तक्ता क्र. 5.3 प्रमाणे)

35) महाराष्ट्रराज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदराचा 1991 ते 2011 या काळातील तौलनिक अभ्यास असे दर्शवितो को अर्भक मृत्यूदरातील घटीबाबत सातारा जिल्हा पहिल्या क्रमांक

ावर सांगली दुसऱ्या व महाराष्ट्र राज्य तिसऱ्या क्रमांकावर आहे. सांगली व सातारा दोन्ही जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदरातील महाराष्ट्र राज्य पातळीवरील घटीपेक्षा जास्त राहिल्याचे दिसून येते.(तक्ता क्र. 5.3 प्रमाणे)

36) सांगली व सातारा जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदराचा विचार करता सातारा जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदर (-68.62%) सांगली जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदरापेक्षा (-60.97%) जास्त प्रमाणात घटला. (तक्ता क्र. 5.3 प्रमाणे)

37) सन 2009 ते 2013 या 5 वर्षाच्या काळात महाराष्ट्र राज्य व सांगली जिल्ह्यातील माता मृत्यूदर कमो झाला तो अनुक्रमे -3.5 व -10.02 इतका होता तर सातारा जिल्ह्यातील माता मृत्यूदर मात्र वाढल्याचे दिसून येते. तो -10.81 इतका होता. (तक्ता क्र. 5.4प्रमाणे)

38) सन 1997 ते 2012 या काळात सांगली जिल्ह्यात कुपोषित बालकांचे प्रमाण 13.4 टक्क्यावरुन 6.71 टक्के असे कमी झाल. या कुपोषण घटीचा दर 49.92 इतका होता. (तक्ता क्र.5.5 प्रमाणे)

39) सन 1997 ते 2012 या काळात सातारा जिल्ह्यातील कुपोषित बालकांचे प्रमाण 15.3 टक्क्यावरुन 8.91 टक्के असे कमी झाले. त्याच्या घटीचा दर 41.76 इतका होता. (तक्ता क्र.5.5 प्रमाणे)

40) सन 1997 ते 2012 या काळातील सांगली व सातारा जिल्ह्यातील कुपोषित बालकांच्या प्रमाणाच्या दरातील घट सातारा जिल्हयापेक्षा सांगली जिल्हयात जास्त होती. (तक्ता क्र.5.5 प्रमाणे)

41) सन 1991 ते 2011 या काळात सांगली व सातारा जिल्ह्यात प्रती लाख लोकसंख्येमागे प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या अनक्रमे 12.12% व 28.12% अशी घटत गेल्याचे दिसून येते.
(तक्ता क्र5.6 प्रमाणे)

42) सन 1991 ते 2011 या काळात सांगली व सातारा आरोग्य सेवेवरील खर्चाचा विचार करता अभ्यास काळात सांगली जिल्ह्याच्या आरोग्य खर्चाच्या वाढीचा दर (+73.95) सातारा जिल्ह्याच्या आरोग्य खर्चापेक्षा (+12.50) जास्त राहीला. (तक्ता क्र. 5.7 प्रमाणे)

43) सन 2011-12 या वर्षात सांगली पिण्याचे पाणी उपलब्ध असणाऱ्या गावांची संख्या 612 तर वाड्या वस्त्यांची संख्या 3612 होती त्यांचे प्रमाण अनुक्रमे 84.53% व 78.47% इतके होते. तर एकूण गांवे व वाड्या व वस्त्यांचे प्रमाण 79.30% होते. (तक्ता क्र. 5.8 प्रमाणे)

44) सन 2011-12 या वर्षात सांगली जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई असणारी गांवे व वाड्या व वस्त्यांचे संख्या अनुक्रमे 112 व 991 होती. त्याचे प्रमाण अनुक्रमे 15.47% व 21.53% होते. तर एकूण गांवे वाड्या व वस्त्यांचे प्रमाण 20.70% होते याचा अर्थ सांगली जिल्ह्यातील 20.70% गांवाना, वाड्या, वस्त्यांना पाण्याची टंचाई जाणवते. (तक्ता क्र. 5.8 प्रमाणे)

45) सातारा जिल्ह्यामध्ये 2011-12 या वर्षात पिण्याचे पाणी उपलब्ध असणाऱ्या गावांची संख्या 1020 तर वाड्या वस्त्यांची संख्या 1449 इतकी होती. त्यांचे प्रमाण अनुक्रमे 59.44% व 63.14% इतके होते, तर एकूण प्रमाण 61.56% इतके होते. म्हणजे सातारा जिल्ह्यात पिण्याचे पाणी उपलब्ध असणाऱ्या गांवे व वाड्यांची व वस्त्यांचे प्रमाण 61.56% होते.

(तक्ता क्र. 5.8 प्रमाणे)

46) सन 2011-12 या वर्षात सातारा जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई असणारी गांवे व वाड्या व वस्त्यांचे संख्या अनुक्रमे 996 व 846 इतको होती, त्याचे प्रमाण अनुक्रमे 40.56% व 36.86% इतके होते. तर एकूण टंचाईग्रस्त गांवे व वाड्या व वस्त्यांचे प्रमाण 38.44% होते. म्हणजे 2011-12 या वर्षात सातारा जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई असणारी एकूण गांवे व वाड्यांचे प्रमाण 38.44% होते. (तक्ता क्र. 5.8 प्रमाणे)

47) सन 2011-12 या वर्षात पिण्याच्या पाण्याची उपलब्ध असणाऱ्या गावांचे प्रमाण सांगली जिल्ह्यात (79.38%) सातारा जिल्ह्यापेक्षा (61.56%) जास्त होते. तर पिण्याच्या पाण्याची टंचाई असणाऱ्या गावांचे प्रमाण सातारा जिल्ह्यात (38.44%) सांगली जिल्ह्यापेक्षा (20.70) जास्त होते. (तक्ता क्र. 5.8 प्रमाणे)

48) सन 1991, 2001 व 2011 या काळात सांगली जिल्ह्याचा शैक्षणिक निर्देशांक अनुक्रम 0.550, 0.639 व 0.725 इतका होता. तर या काळातील सातारा जिल्ह्याचा शैक्षणिक निर्देशांक अनुक्रमे 0.587, 0.686 व 0.762 इतका होता. म्हणजे अभ्यास काळातील सर्व वर्षात सातारा जिल्ह्याचा शैक्षणिक निर्देशांक सांगली पेक्षा जास्त होता. (तक्ता क्र. 5.9 प्रमाणे)

49) सन 1991 ते 2011 या काळात सांगली जिल्ह्यातील शैक्षणिक निर्देशांक वाढीचा दर +31.82 तर सातारा जिल्ह्यातील शैक्षणिक निर्देशांक वाढीचा दर +29.81 इतका होता. म्हणजे अभ्यास क ाळात सांगली जिल्ह्याचा शैक्षणिक निर्देशांक वाढीचा दर +2.01 ने जास्त राहीला.
(तक्ता क्र. 5.9 प्रमाणे)

50) सन 1991 ते 2011 या काळात सांगली जिल्ह्यात उत्पन्न निर्देशांक अनुक्रमे 0.550, 0.677 व 0.873 इतका होता. तर याच काळात सातारा जिल्ह्यात उत्पन्न निर्देशांक अनुक्रमे 0.519, 0.661 व 0.861 इतका राहीला. (तक्ता क्र. 5.10 प्रमाणे)

51) सन 1991 ते 2011 या तिन्ही दशकात सांगली जिल्ह्याचा उत्पन्न निर्देशांक सातारा जिल्ह्या पेक्षा जास्त राहिल्याचा दिसून येते. (तक्ता क्र. 5.10 प्रमाणे)

52) सांगली आयुर्मान निर्देशांक सन 1991 ते 2011 या काळात अनुक्रमे 0.410, 0.200 व 0.160 इतका होता. त्याच्या घटीचा दर 60.97 इतका होता तर याच काळात सातारा जिल्ह्यात आयुर्मान निर्देशांक अनुक्रमे 0.510, 0.320 व 0.160 इतका होता. त्याच्या घटीचा दर 68.62 इतका होता. (तक्ता क्र. 5.11 प्रमाणे)

53) सागली व सातारा जिल्ह्यातील आयुर्मान निर्देशांकाची तुलना करता असे दिसून येते को, सांगली जिल्ह्याच्या आयुर्मान निर्देशांकापेक्षा (60.97) सातारा जिल्हयाचा आयुर्मान निर्देशांक (68.62) जास्त प्रमाणात घटला.(तक्ता क्र. 5.11 प्रमाणे)

54) सन 1991 ते 2011 या काळात सातारा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक दर्शवितो, या क ाळात सातारा जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक अनुक्रमे 0.539, 0.532 व 0.594 इतका होता. या काळात त्याच्या वाढीचा दर +10.20 इतका होता.(तक्ता क्र. 5.13 प्रमाणे)

55) सन 1991 ते 2011 या काळातील सांगली व सातारा जिल्ह्यातील मानव विकास निर्देशांक 16.50 या दराने वाढला तर सातारा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक 10.20 या दराने वाढला याचा अर्थ सांगली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक तुलानात्मक दृष्ट्या सातारा जिल्ह्यापेक्षा जास्त आधिक वाढला.(तक्ता क्र. 5.14 प्रमाणे)

56) सन 1991 ते 2011 या काळातील सांगली जिल्ह्याच्या मानव विक्रास निर्देशांकाचे प्रमाण विचलन 28.13 इतके होते. म्हणजे अभ्यास काळातील तीन दशकातील मानव विकासामध्ये सांगली जिल्ह्यात जास्त फरक होता तर सातारा जिल्ह्याच्या मानव विकासात तुलनेने कमी फरक आढळून आला. (तक्ता क्र. 5.14 प्रमाणे)

57) सन 1991 ते 2011 या काळातील मानव विकास निर्देशांकाचा विचरण गुणांक 7.27 टक्के होता तर सातारा जिल्ह्याचा विचरण गुणांक 5.07% म्हणजे सातारा जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांक ापेक्षा सांगली जिल्ह्याच्या मानव विकासात तुलनेने जास्त फरक होता.
(तक्ता क्र. 5.14 प्रमाणे)

58) सन 1991 ते 2011 या काळातील सांगली व सातारा जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांकाचे मूल्य अनुक्रमे 0.503 ते 0.586 व 0.539 ते 0.594 यामध्ये राहिले आहे, त्यामुळे दोन्ही मध्यम मानव विकास निर्देशांकामध्ये आहेत. याचा अर्थ दोन्ही जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक मध्यम प्रतीचा अभ्यास काळात राहीला.(तक्ता क्र. 5.14 प्रमाणे)

59) सन 2006-07 ते 2011-12 या कालावधीत सांगली जिल्ह्यातील शिक्षणावरील खर्च 5.49 पटीने वाढला. तर सातारा जिल्ह्यातील हा खर्च 2.39 पटीने वाढला. अभ्यास काळातील 6 वर्षात शिक्षणावरील खर्च सांगली जिल्ह्यात सातारा जिल्ह्यापक्षा जास्त वाढल्याचे दिसून येते. (तक्ता क्र. 5.15 प्रमाणे)

60) सन 1991 ते 2011 या काळात महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्याचा आर्थिक विकास व मानवी विकास यामध्ये धन सहसंबध आढळून आले. (तक्ता क्र.5.16 प्रमाणे)

61) सन 1997-98 ते 2009-10 या काळात महाराष्ट्र राज्यातील दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण -30.48 या दराने घटले, तर सांगली व सातारा जिल्ह्यामध्ये मात्र दारिद्र्य रेषेखालील लाक संख्येचे प्रमाण अनुक्रमे +12.33 व +2.53 या दराने वाढल्याचे दिसून येते.
(तक्ता क्र. 6.1 प्रमाणे)

62) महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील निरक्षरता दरातील घटीचा विचार करता सांगली जिल्ह्यातील निरक्षरता घटीचा दर(-53.52टक्के) सातारा (-52.59 टक्के) व महाराष्ट्र राज्य (-51.28 टक्के) पेक्षा जास्त राहीला, तर महाराष्ट्र राज्यातील निरक्षरता घटीचा दर सर्वात कमी राहीला. (तक्ता क्र.6.2 प्रमाणे)

63) महाराष्ट राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यात पुरुष स्त्रियांमधील निरक्षरता प्रमाण अभ्यास काळात घटत गेले. महाराष्ट्र व सांगली जिल्ह्यात पुरुषांमधील निरक्षरता घटीचा दर स्त्रियांमधील निरक्षरता घटीपेक्षा जास्त राहिला, तर सातारा जिल्ह्यात मात्र या काळात स्त्रियांमधील निरक्षरता घटीच्या दरापेक्षा जास्त राहीला. (तक्ता क्र. 6.3 प्रमाणे)

64) सांगली जिल्ह्यात पुरुष निरक्षरता घटीचा दर (-61.86) महाराष्ट्र व सातारा जिल्ह्यापेक्षा जास्त राहिला, तर स्त्रियांमधील निरक्षरता घटीचा दर सांगली जिल्हा व महाराष्ट्र राज्यापेक्षा जास्त (-52.22) राहिला. (तक्ता क्र.6.3 प्रमाणे)

65) सन 1991ते 2011 या काळात महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्ह्यातील परुष-स्त्री निरक्षरतेचे सरासरी गुणोत्तर अनुक्रमे 1:2.27, 1:2.02 व 1:3.04 असे राहिले. याचा अर्थ महाराष्ट्रात 1 पुरुषामागे सरासरी 2 पेक्षा जास्त स्त्रिया निरक्षर होत्या, सांगली जिल्ह्यात 1 निरक्षर पुरुषामागे 2 निरक्षर स्त्रिया तर सातारा जिल्ह्यात 1 निरक्षर पुरुषामागे 3 निरक्षर स्त्रिया असे प्रमाण होते. सातारा जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य व सांगली जिल्ह्यांशी तुलना करता स्त्रियांच्या निरक्षरतेचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत जास्त होते. (तक्ता क्र.6.3 प्रमाणे)

66) सांगली व सातारा दोन्ही जिल्ह्यात 7 वी ते 8 वी या वर्गात तसेच 10 वी ते 11 वी व 11 वी ते 12 वी या वर्गात मुला-मुलींच्या गळतीचे प्रमाण मोठे होते. (तक्ता क्र. 6.4 प्रमाणे)

67) सांगली व सातारा जिल्ह्यात मुलांच्या गळतीचे प्रमाण अनुक्रमे 14.63 व 15.39 मुलींच्या गळतीच्या प्रमाणापेक्षा अनुक्रमे 11.26 व 10.93 जास्त होते. (तक्ता क्र. 6.4 प्रमाणे)

68) सांगली व सातारा जिल्ह्यातील मुला-मुलींच्या एकण गळतीच्या प्रमाणाचा विचार करता असे दिसून येते को, सांगली जिल्ह्यातील एकूण गळतीचे प्रमाण (11.95) सातारा जिल्ह्यापेक्षा (10.93) जास्त होते. (तक्ता क्र. 6.4 प्रमाणे)

69) सांगली जिल्ह्यात हे गुणोत्तर 1:0.87 तर सातारा जिल्ह्यात 1:0.78 होते. याचा अर्थ दोन्ही जिल्ह्यात विविध वर्गात शिकणाऱ्या मुलींचे मुलांच्या संख्येशी असणारे प्रमाण कमी होते. सांगली जिल्ह्यात दर 100 मुलांशी मुलींचे प्रमाण 87 इतके होते. तर सातारा जिल्हयात 100 मुलांशी मुलींचे प्रमाण 78 इतके होते. म्हणजे विविध वर्गात शिकणाऱ्या मुलांच्या प्रमाणापेक्षा मुलींचे प्रमाण दोन्ही जिल्ह्यात कमी असल्याचे दिसून येते. (तक्ता क्र.6.5 प्रमाणे)

70) अभ्यास काळात दोन्ही जिल्ह्यात कुपोषित बालकांचे प्रमाण महाराष्ट राज्य सरासरी पेक्षा कमी होते. तर सांगली जिल्हयात ते सर्वात कमी होते. (तक्ता क्र.6.6 प्रमाणे)

71) सांगली व सातारा जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील बेघर कटुंबाची तुलना करता सांगली जिल्ह्यात बेघर कुटुंबाचे प्रमाण (64.86%) सातारा जिल्ह्यापेक्षा (44.89%) जास्त होते. (तक्ता क्र. 6.8 प्रमाणे)

72) सातारा जिल्ह्यातील पाण्याची टंचाई असणाऱ्या गावे व वाड्यांचे प्रमाण (38.44 टक्के) सांगली जिल्ह्यापेक्षा (20.70 टक्के) जास्त आसल्याचे दिसून येते. (तक्ता क्र.6.9 प्रमाणे)

73) सन 1991ते 2011 या काळात भारताच्या मानव विकास वाढीचा दर सर्वात जास्त (+44.62) राहिला तर सातारा जिल्ह्याच्या मानव विकास वाढीचा दर सर्वात कमी (+10.20) राहिला. (तक्ता क्र.6.11 प्रमाणे)

74) भारताच्या मानव विकास गुणोत्तराशी महाराष्ट् राज्याचे सरासरी मानव विकास गुणोत्तर 1:1.15 इतके होते, म्हणजे अभ्यास काळात देशापेक्षा महाराष्ट राज्याचे मानव विकास गुणोत्तर 15 टक्क्याने जास्त होते. (तक्ता क्र. 6.12 प्रमाणे)

75) सांगली व सातारा जिल्ह्यांचे मानव विकास गुणोत्तर भारताशी तुलना करता ते अनुक्रमे 1:1.18 व 1:1.22 इतके होते म्हणजे सांगली जिल्ह्याचे मानव विकास गुणोत्तर राष्ट्रोय पातळी पेक्षा 18 टक्क्याने तर सातारा जिल्ह्याचे 22 टक्क्याने जास्त होते . (तक्ता क्र.6.12 प्रमाणे)

76) सन 1991 ते 2011 या काळात महाराष्ट् राज्याच्या मानव विकास गुणोत्तराशी सांगली व सातारा जिल्ह्यांच्या मानव विक्सासाशी तुलना करता सांगली जिल्ह्याच्या मानव विक्सासाचे सरासरी गुणोत्तर 1:1.03 व सातारा जिल्ह्याचे 1:1.06 असे होते. (तक्ता क्र.6.13 प्रमाणे)

77) महाराष्टाच्या मानव विकासापेक्षा सांगली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक सरासरी 3 टक्क्याने तर सातारा जिल्ह्याचा विकास निर्देशांक सरासरी 6 टक्क्याने जास्त होता. म्हणजे सांगली व सातारा या दोन्ही जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक महाराष्ट् राज्याच्या मानव विकास निर्देशांकापेक्षा जास्त होता. (तक्ता क्र.6.13 प्रमाणे)

78) सांगली जिल्ह्याच्या मानव विकासाशी सातारा जिल्ह्याचे मानव विकास गुणोत्तर 1:1.07, 1:1.02 व 1:1.03 असे होत, तर सरासरी गुणोत्तर 1:1.03 असे होते म्हणजे सांगली जिल्ह्यापेक्षा ते 3 टक्क्याने जास्त होते. (तक्ता क्र.14 प्रमाणे)

79) मानव विकास निर्देशांक्याची तुलना करता असे दिसून येते को मानव विक्सात सातारा जिल्हा भारत, महाराष्ट्र राज्य व सांगली जिल्ह्यापेक्षा पुढे होता. (तक्ता क्र.6.14 प्रमाणे)

80) सांगली व सातारा दोन्ही जिल्हे भारत व महाराष्ट्र राज्याच्या पुढे होते महाराष्ट्र राज्य व देशपातळीवरील मानव विकासाची तुलना करता महाराष्ट्र राज्य भारतापेक्षा अग्रेसर आहे. (तक्ता क्र.6.14 प्रमाणे)

81) सन 1991 ते 2011 या काळातील मानव विकास निर्देशांक्यावरुन मानव विकास पातळी ठरविताना दिसून येते को भारत, महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा जिल्हा सर्व मानवी विकासाच्या मध्यम पातळीवर (0.5 ते 0.8) आहेत.(तक्ता क्र.6.14 प्रमाणे)

शिफारशी :-

1) महाराष्ट्रातील लोकसंख्या वाढीचा दर कमी करण्यासाठी कार्यक्रम उपाय योजनांची अंमलबजावणी करावी.

2) महाराष्ट्र राज्य व सातारा जिल्ह्यातील स्त्री-पुरुष प्रमाण दर तुलनेने कमी असल्यामुळे तो वाढवण्यासाठी सातारा जिल्ह्यात सरकाराने विशेष प्रयत्न करावेत.

3) सांगली व सातारा जिल्ह्यांच्या एकूण उत्पन्न व दरडोई उत्पन्नवाढीचा दर महाराष्ट्र राज्यपातळी दरा एवढा वाढविण्यासाठी शेती, कारखानदारी व सेवा क्षेत्राच्या विकासाला चालना द्यावी.

4) सांगली व सातारा जिल्ह्यांतील प्राथमिक शाळेतील विद्यार्थी संख्या घटली, ती वाढविण्यासाठी दोन्ही जिल्ह्यांत प्रयत्न केले पाहिजेत.

5) सांगली व सातारा दोन्ही जिल्ह्यात आरोग्य विषयकसोयीत वाढ व सुधारणा करावी, दरडोई खाटा व दवाखाने, आरोग्य केंद्रे वगैरेत वाढ केली पाहिजे.

6) सांगली व सातारा दोन्ही जिल्ह्यांतील अर्भक मृत्यूदर व मातांचा मृत्यूदर घटला असला तरी तो शून्याच्या जवळपास कसा राहील, यासाठी सरकार व प्रशासन व्यवस्थेने प्रयत्न करावेत.

7) सांगली व सातारा दोन्ही जिल्ह्यांतील कुपोषित बालकांचे प्रमाण कमी झाले, असले तरी ते आणखी कमी होण्यासाठी उपाययोजना हाती घ्याव्यात, सकस आहार आरोग्य विषयकसोयींची उपलब्धता, रोजगार वाढ, दारिद्र्य निर्मूलन वगैरे उपाय योजना हाती घ्याव्यात.

8) सांगली व सातारा दोन्ही जिल्ह्यांतील अनुक्रमे 20.70% व 38.44% लोकांना पिण्याचे पाणी उपलब्ध नाही. त्यासाठी ग्रामपंचायती, जिल्हा परिषद व राज्य सरकारने पिण्याचे स्वच्छ पाणी

उपलब्ध करुन देण्यासाठी योजना आखून त्याच्या खर्चाची तरतूद अंदाजपत्रकात केली पाहिजे. या सोयींसाठी सातारा जिल्ह्यात विशेष प्रयत्न करण्याचे गरजेचे आहे.

9) सातारा जिल्ह्यात मानव विकास निर्देशांकात सुधारणा करण्यासाठी जास्त प्रयत्नांची आवश्यकता आहे. त्यासाठी आयुर्मान. उत्पन्न व शिक्षण निर्देशांकात सुधारणा करणे आवश्यकआहे.

10) सांगली व सातारा दोन्ही जिल्ह्यांचा अभ्यास काळातील मानव विकास निर्देशांक मध्यम प्रतीचा राहिला, तो उच्च प्रतीचा होण्यासाठी आवश्यक त्या उपाय योजना केल्या पाहिजेत.

11) सातारा जिल्ह्यात शिक्षणावरील खर्च वाढवावा.

12) अभ्यास काळात सांगली व सातारा दोन्ही जिल्ह्यात दारिद्र्य प्रमाण वाढले आहे. त्यासाठी दोन्ही जिल्ह्यात दारिद्र्य निर्मूलन योजनांची कार्यक्षमतेने अमंलबजावणी करावी, तसेच दारिद्र्य निर्मुलनासाठी नव्या योजना सुरु करव्यात.

13) महाराष्ट्र राज्य, सांगली व सातारा दोन्ही जिल्ह्यांतील निरक्षरता कमी करण्यासाठी स्त्री शिक्षणावर विशेष भर द्यावा. ग्रामीण, गरीब व होतकरु मुलींना शिक्षणात प्राधान्य व विविध सवलती द्याव्यात.

14) सांगली व सातारा दोन्ही जिल्ह्यात विविध स्तरावरील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण 10% पेक्षा जास्त आहे, ते कमी केले पाहिजे.

15) सांगली व सातारा या दोन्ही जिल्ह्यात बेघर कुटुंबाचे प्रमाण मोठे आहे, ते कमी केले पाहिजे, त्यासाठी गृहकर्जे कमो व्याजदराने लोकांना उपलब्ध करुन द्यावीत.

****

संदर्भ :–

1. मानव विकास अहवाल महाराष्ट्र 2002 महाराष्ट्र शासन, मुंबई 2002
2. क्षीरसागर व्ही.एस. व पाटील व्ही.बी. 2009 के सागर पब्लीकेशन पुणे-द्वितीय आवृत्ती 2011 '' मानवसंसाधन विकास'' पान 11 व 12
3. तायडे पुष्पा 2006 संपादक -देशपांडे विनायक श्रीधर.''महाराष्ट्रातील मानवी विकासासंबंध काही मुद्दे''अर्थसंवाद ऑक्टोबर, डिसेंबर 2006 खंड- 30 अंक -3 पान 275 ते 78
4. झिंगन एम.एल.2004 वृदां पब्लीकेशन नवी दिल्ली, प्रथम अवृत्ती 1972, 13 वी अवृत्ती पुनर्मुद्रित 2004 ''विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन'' पान नं. 9/2 ते 9/7
5. मोहिरे रामदास ब.2004 मराठी अर्थशास्त्रपरिषद 28 अधिवेशन, स्मरणीका, संपादक -प्राचार्य अनिलगोविंदराव ''मानवसाधन आणि आर्थिक विकास'' पान नं. 93 ते 100
6. बाबर प्रवीण गुलाबराव व खटके दादासाहेब भानुदास 2009 ''शिवार्थ'' शि.वि.कोल्हापूर, अर्थशास्त्र असोशियेशन 19 वे वार्षिक अधिवेशन 2009 संपादक -डॉ.पाटील डी.के.''महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक स्वरुप व समस्या'' पान 98 ते 103
7. कुलकर्णी सर्वोत्तम न.2008 अर्थसंवाद संपादक -पाटील जगन्नाथ शामराव, सातारा. ''जागतिक मानव विकासअहवाल 2006 भारता पुढील आव्हाने'' पान नं. 93 ते 99
8. शहा रुपा 2009 ''शिवार्थ'' शि.वि.कोल्हापूर, अर्थशास्त्रअसोशियेशन 19 वे वार्षिक अधिवेशन 2009 संपादक -पाटील डी. के .''मानव विकास, आर्थिक विकास आणि अपंग'' पान 148 ते 151
9. घाटगे एल.एन. व वावरे अनिल कृष्णा 2004 मराठी अर्थशास्त्र परिषद 28 अधिवेशन, स्मरणीका, संपादक -प्राचाय अनिल गोविंदराव''कोल्हापूर, सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यातील आरोग्य पोषण आणि शिक्षण तुलानात्मक अध्ययन '' पान नं. 146 ते 154
10. भोंग जी.एल.पुणे, 2004 मराठी अर्थशास्त्र परिषद 28 अधिवेशन, स्मरणीका, संपादक -प्राचार्य अनिल गोविंदराव''महाराष्ट्र राज्यातील मानवी विकासामध्ये शिक्षणाचे योगदान '' पान नं. 162 ते 166
11. हिक्स नॉरमल एल.व पॉल स्ट्रीटन पी.1979 ''इंडीकेटर्स ऑफ डेव्हलपमेंट : द सर्च टू ऐ बेसीक निड्स'' Yardstick World Development Vol.7,1979
12. डॉ. अमर्त्यसेन 1971 Collective choice and social welfare- 1971" & Poverty and Femines-1981

13. महबूब उल हक 1976 "The Poverty Curtin: Choice for the third world- 1976 कोलंबिया युनिव्हरसिटी प्रेस पान नं.71 व "Moheebub-Ul-Haq" wikipedia the fre encyclopedia
14. माथल्स रॉबर्ट थॉमस "Principle of political Economy" Newyark Publication 1951.Page No.314
15. ॲडम स्मिथ The wealth of Notion राष्ट्राची संपत्ती Newark Random Hour 1973 Page-260 Adam Smith An Enquiry in to the Nature and causes of the wealth of Nation edition cannon Page-7
16. शुंपीटर जोसेफ के. The theory of economic development reprint Newark Oxford University Press. 1969 Page -15
17. पॉल स्टीटन Streeten Paul P.A.Hicks Norman 1979 indicators of Development The Search for a Basic Needs yardstick World Development Repress 1979 V.No,7
18. कोल ए.जे. व हुवर एडगर एम.1977 Population Growth and Economic development in low in came countries. Princeton University Press 1977 Page No.10
19. लिला पाटील जून 2010 योजना मासिक मुख्य संपादक सोनम थोरगो अंक 11 वा पानं 22 मे 25 मनुष्यबळ व्यवस्थापन आणि लोकसंख्या नियंत्रण
20. उषा पाटील जून 2010 योजना मासिक मुख्य संपादक - सोनाम थोरगो पान. 35 ते 37 ''शिक्षण आणि महिला सबलीकरण ''
21. व्ही.सी.बेलरे जून 2010 योजना मासिक मुख्य संपादक - सोनम थारगो पान 46 ते 48 ''मानव विकास संकल्पना आणि मापन'' अंक 11 वा
22. मुक्ता जहागीरदार. नोव्हेंबर 2004 मराठी अर्थशास्त्र परिषद 28 वे अधिवेशन स्मरणीय संपादक - प्राचार्य अनिल गोविंदराव-"महाराष्ट्रातील मानव विकासःपरामर्थ उपाय योजना" पान 101 ते 109
23. आर.एस.सोळुंके, जी.बी.गावडे नोव्हेंबर 2004 मराठी अर्थशास्त्र परिषद 28 वे अधिवेशन स्मरणीक संपादक प्राचार्य अनिल गोविंदराव ''महाराष्ट्रातील मानव विकास शिक्षण व शिक्षण विषयक सोयी सुविधा'' पान.110 ते 115
24. सुभाष ज.कदम, सौ.मंदाकिनी.ज.कदम 2004 मराठी अर्थशास्त्र परिषद 28 वे अधिवेशन स्मरणीक संपादक प्राचार्य अनिल गोविदराव ''महाराष्ट्राच्या मानव संसाधन विकासातिल पैलु'' पान 116 ते 126

25. बाळासाहेब कोंडोबा माने. नोव्हेंबर 2004 मराठी अर्थशास्त्र परिषद 20 वे अधिवेशन स्मरणीका संपादक - प्राचार्य अनिल गोविंदराव ''कोल्हापूर, सांगली, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांमधील आरोग्य व पोषण आणि शिक्षण तुलनात्मक अध्ययन'' 146 ते 154

26. जी.वसुधा पुरोहीत खंडेवाले, नोव्हेंबर 2004 मराठो अर्थशास्त्र परिषद 28 वे अधिवेशन स्मरणीका संपादक -प्राचार्य अनिल गोविंदराव ''महाराष्ट्र राज्यातील मानवी (महिला) विकासाची वास्तविकता'' पान.नं. 155 ते 161

27. डॉ.जी.एल भोंग नोव्हेंबर 2004 मराठी अर्थशास्त्र परिषद 28 वे अधिवेशन स्मरणीका संपादक - प्राचार्य अनिल गोविंदराव ''महाराष्ट्र राज्यातील मानवी विकासामध्ये शिक्षणाचे योगदान'' पान.नं. 162 ते 166

28. शोभा नेमाडे, सौ.सरला चौधरी.नोंव्हेबर-2004 मराठी अर्थशास्त्र परिषद 28 वे अधिवेशन स्मरणीका संपादक - प्राचार्य अनिल गोविंदराव ''मानवी विकास आणि शिक्षण जळगांव जिल्हा विशेष अध्यायन'' पान.नं. 176 त 182

29. खंदारे विलास.नोव्हेंबर 2004 मराठी अर्थशास्त्र परिषद 28 वे अधिवेशन स्मरणीका संपादक - प्राचार्य अनिल गोविंदराव ''महाराष्ट्रातील मानवी व मानव विकास वंचन'' पान.नं. 176 ते 182

30. जयश्री दिलीप भंगाले.नोव्हेंबर 2004 मराठी अर्थशास्त्र परिषद 28 वे अधिवेशन स्मरणीका संपादक - प्राचार्य अनिल गोविंदराव ''शिक्षणाद्वारे मानवी विकास एक क्षेत्रीय अभ्यास '' पान.नं. 202

31. शरचंद्र छापेकर जानेवारी 2012 अर्थसंवाद मासिक खंड 35 अंक ''मानव संसाधन विकासातील आधुनिक प्रवाह '' पान.नं. 339 ते 343

32. मोहन किसनराव चौधरी .नोव्हेंबर -2004 मराठी अर्थशास्त्र परिषद 28 व अधिवेशन स्मरणीका संपादक -प्राचार्य अनिल गोविंदराव '' महाराष्ट्रातील मानवी विकासातील प्रादेशिक विषमता '' पान.नं. 204

33. तुकाराम जाधव नोव्हे 2002 जनरल नॉलेज स्पर्धा परिक्षा नोकरी संदर्भ अंक 11 वा पानं 48

34. कल्पना नंदनवार.नोव्हेंबर-2004 मराठी अर्थशास्त्र परिषद 28 वे अधिवेशन स्मरणीका संपादक- प्राचार्य अनिल गोविंदराव महाराष्ट्रातील महिला संसाधाच्या विकासाची वास्तविकता पान.नं.208

35. सुभाष श.पाटील जुलै- 2012 प्रमुख संपादकजे.एस.पाटील अर्थसवांद मासिकखंड 45 भारतातील जनगणना विश्लेषण पानं नं 210 अंक 3

36. दीपक भारती-एप्रिल-जून 2010 प्रमुख संपादक -जगन्नाथ शामराव पाटील अर्थसंवाद मासिक खंड 34, अंक 7 ''मराठवाडयाच्या मानवी विकासाचा आढावा ''

37. सर्जेराव ठोंबरे जानेवारी मार्च-2006 प्रमुख संपादक विनायक श्रीधर देशपांडे अर्थ संवाद मासिक खंड 29अंक 4"ग्रामीण विकास-मानवी व नैसर्गीक संसाधनाधिष्ठीत विकास प्रतिमान"289

38. रामचंद्र व्यवहारे.एप्रिल - जून 2013 "आर्थिक विकास म्हणजे मानसिक विकास नव्हे" प्रमुख संपादक -बबन जोगदंड "यशमथंन" मासिक अंक 2210 पान नं. 7

39. जॉन ड्रेज व अमर्त्यसेन 1989 "भुक आणि सामाजिक कृती "1989 प्रमुख संपादक -ऑक्सफ र्ड युनीव्हरसिटी

40. अभय बंग 2011 दै.लोकसत्ता पुणे आवृत्तो दि 13 डिसेबंर 2010 - सामाजिक कार्याकर्ता

41. अमर्त्य सेन- 2004 "Devlopment and Capblity expation"

42. उत्पल योशपाध्याय जून 2010 योजना मुख्यसंपादक सोनम थोरगे अंक 11
पानं नं 10 ते 13 "कौशल्य विकासात नवीन पुरस्कार "अनवाद जयश्री पाटणकर

43.अशोक शंकराव पवार व अशोक रामराव चव्हाण, जून-2010 योजना मासिक मुख्यासंपादक सोनम थोरगे अंक 11 वा पानं 14 ते 21 "मानव संसाधन विकास आणि नियोजन प्रक्रियेचे विश्लेषण".

44. मानव विकास अहवाल 1990 - युनायटेड नेशन डेव्हल्पमेंट प्रोग्रॅम.संपादक ऑक्सफर्ड युनिर्व्हसीटी प्रेस न्यूयार्क-1990

45. मानव विकास अहवाल 1991 -»-

46. मानव विकास अहवाल 1992 -»-

47. मानव विकास अहवाल 1993 -»-

48. मानव विकास अहवाल 1994 -»-

49. मानव विकास अहवाल 1995 -»-

50. मानव विकास अहवाल 1996 -»-

51. मानव विकास अहवाल 1997 -»-

52. मानव विकास अहवाल 1998 -»-

53. मानव विकास अहवाल 1999 -»-

54. मानव विकास अहवाल 2000 -»-

55. मानव विकास अहवाल 2001 -»-

56. मानव विकास अहवाल 2002 -»-

57. मानव विकास अहवाल 2003 -»-

58. मानव विकास अहवाल 2004 -»-

59. मानव विकास अहवाल 2005 -»-

60. मानव विकास अहवाल 2006 -»-

61. मानव विकास अहवाल 2007-2008 -»-

62. मानव विकास अहवाल 2009 -»-

63. मानव विकास अहवाल 2010 -»-

64. मानव विकास अहवाल 2011 -»-

65. मानव विकास अहवाल 2013 -»-

66. मानव विकास अहवाल 2014

67. केनेथ हार्ट जेन व स्टीफन क्लासेन 2010 ए हाऊस होल्ड बेसड् ह्युमन डेव्हलपमेंट इंडेक्स 2010 पेपर संपादक :- जर्मन डेव्हलपमेंट इकॉनामिक्स कॉन्फरन्स हॅनोव्हर-2010

68. केनेथ हार्टजेन व स्टीफन क्लासेन " ए हयुमन डेव्हलपमेंट इंडेक्स बाय इंटरनल मायग्रेशन स्टेट् 2010 पेपर" संपादक -ए जर्नल ऑफ ह्युमन डेव्हलपमेंट ॲन्ड कपॅसीटीज व्हॉल्युम वर्ष-12, 2011

69. हॉकेन मीची व मेमीथ टोल्या टानेर 2011 ॲन अल्टरनेटिव्ह हयुमन डेव्हलपमेंट इंडेक्स कन्सडीरींग अन एम्प्लॉयमट - आरटीकल साऊथ इस्ट जरनल ऑफ इकॉनॉमीक ॲन्ड बिझनेस व्हॉल्युम -6

70. सिध्दीकूल इस्लाम 1995 दि ह्युमन डेव्हलपमेंट इंडेक्स ॲन्ड परकॅपीटा जी.डी.पी. संपादक - टेलर आणि फान्सीस "जनरल अपलाईड इकॉनॉमीक्स " व्हॉल्युम-2-1995

71. नरेंद्र पाटील पालघर- लेख 2011 "राज्यातील ठाणे जिल्ह्यातील 8 तालुक्याचा मानव विकास निर्देशांक कमी" महाराष्ट टाईम्स -09/08/2011 पुणे आवृत्तो पानं 5

72. नरेंद्र एम अगरवाल जून 2010 योजना मासिक, संपादक सोनम थोरगे- अंक 11वा " मुक्त आणि जागतिक भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील मनुष्य बळाची अव्हाने " पान नं. 2 ते 4

73. मदन मोहन जून 2010 योजना मासिक , संपादक सोनम थोरगे-अंक 11 वा "उच्च शिक्षण विद्यमान परिस्थिती आणि भविष्यातील अव्हाने" पान नं. 5 ते 7

74. श्याम चोना व रितू जुनेजा, जून 2010 योजना मासिक , संपादक सोनम थोरगे-अंक 11 वा "विकलांगानाही सर्व सामन्य शाळामध्ये संधी" पान नं. 18 ते 22

संदर्भग्रंथ सुची – (BIBLIOGRAPHY)

I) References of Books

Malthus Robert Thomas "Principle of Political Economy
Newyark Publication 1951.

Adam Smith (1976) The Wealth of Nation New Yark Randam Hour,

Adam Smith An Enquiry in to the Nature and causes of the wealth of
Nation edi cannon (ed)

Schumpeter Joseph K.(1911) The Theory of Economic Development
reprint New Yark Oxford University Press 1969

Agrawal A.N.(1997) "Indian Economy" Vishwa Prakashan. New Dehli

Schultz T.W. (1990) "Capital Formation by Education JPE December

Panchmukhi P.R.(1965) "Educational Capital in India IJE-JAN-March

Ahuja, Ram (1998), Violence against Women, Rawat Publications, New Delhi.

Arya, S. and A. Roy (2006) Poverty, Gender and Migration, New
Delhi, Sage Publications.

Basu K. Choice (1999): Welfare and Development, Oxford University, Delhi.

Breman, J. (2007).Poverty Regime in Village India, New Delhi,
Oxford University Press.

Cassen, R. and V. Joshi (1995). India: The Future of Economic Reform,
New Delhi, Oxford University Press.

Dandekar, V. M. (1996). Indian Economy Population Poverty and Employment
New Delhi, Sage Publications.

Desai, M. J. (1991). 'Human Development: Concepts and Measurements'
European Economic Review.

Dreze, Jean and Amartya Sen (1995), India: Economic Development and

Social Opportunity, Oxford University Press, NewDelhi.

Jean Dreze, Amartya Sen (1995): Indian Economic Development and Social Opportunity, oxford University Press, New Delhi.

Jhingan M. L. (1993): The Economics of Development and planning 26th Revised Edition, Konark Publication Pvt. Ltd.

Jhingan M. L. (2006): History of Economics Thoughts, Vrinda Publication Pvt. Ltd.

Paw Streetren's (1996) forward to Mahbub Ul Haq, Reflection on Human Development, Delhi.

Mahbub Ul Haq (1976) The Poverty Curtin: Choice for the Third World- 1976 Colombia University Press.

Phadke, Y. D. (1992). Visavya Shatakatil Maharashtra, Volume IV, Planning Division, Government of Maharashtra,

'Maharashtra's Population Problem Study Committee's Report, 1992, Mumbai.

Raut H. S., Panda P. K. (2009): Human Development Dimensions and Strategies, New century Publications, New Delhi, India,

Shariff, A. and M. Krishnaraj (eds) (2007). State, Markets and Inequalities Human Development in Rural India. New Delhi, Oxford University Press.

Thakur Devendra (2008): Research Methodology in Social Sciences, Deep and Publications, New Delhi.

Hikes Norman L.& Poll Stritan P.1979 "Indicators of Development the Search to a basic needs. Yardstick World Development Vol.7.1979

अमर्त्य सेन, भारत : ''विकास कि दिशाए'' राजपाल एण्ड सन्स प्रकाशन, दिल्ली, २००१

अमर्त्य सेन, ''आर्थिक विषमताएँ'' राजपाल एण्ड सन्स प्रकाशन, दिल्ली, २००१

अमर्त्य सेन, ''गरिबी और अकाल'' राजपाल एण्ड सन्स प्रकाशन, दिल्ली, १९९९

इंगळे व. न., ''नोबेल भूषण अमर्त्य सेन'' साकेत प्रकाशन, पुण, २०१०

भांडारकर पु. ल., ''सामाजिक संशोधन पद्धती'' तिसरी आवृत्ती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, १९८७

भोगे कृष्णा,''महाराष्ट्र व मराठवाड्याचा मानव विकास निर्देशांक'' (एक चिकित्सक व भविष्य दिशा), महाराष्ट्र राज्य सुवर्ण होत्सव सिंहावलोकन परिषद व संशोधन प्रकल्प, जुलै,२०१०

देसाई, सौ. भालेराव, ''भारतीय अर्थव्यवस्था'' निराली प्रकाशन, पुणे १९९८

देशपांडे श्रीधर, देशपांडे विनायक ''भारतीय अर्थव्यवस्था'' (संक्रमण आणि विकास), हिमालय पब्लिशिंग हाऊस, मुंबई २००४

देशपांडे श्री. आ., ''भारताची आर्थिक समस्या व नियोजन'' विद्या प्रकाशन, नागपूर १९८७

क्षीरसागर के.प्रा.पाटील व्ही.बी (२०११): ''मानव संसाधन विकास'' २०११ केसागर पब्लीकेशन,पुणे २०११

अमोल लक्ष्मण घोडके(२०१३): ''भारतातील मानव संसाधन विकास'' २०१३ प्रकाशक तुकाराम जाधव द युनिक ॲकडमी, पुणे.

जहागीरदार दि. व्य., महाराष्ट्र : ''५० वर्षातील आर्थिक विकासाचा धांडोळा'' सेंटर फॉर इकॉनॉमिक अँड सोशल स्टडीज, अमरावती प्रकाशन,२०१२

जे.एफ.पाटील (१९९९) ''अमर्त्य सेन कल्याणाचा कारगीर'' प्रकाशकप्रबोधन प्रकाशन ज्योती इचलकंरजी

मनोज पाटील.(२००८) जनरल नॉलेज नागरिकांसाठी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना.

''सांगली जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन'' अर्थ व सांख्यिकी संचालनायल, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०००-०१ ते २०१२-१३

देशपांडे विनायक श्रीधर.''महाराष्ट्रातीलमानवी विकासासंबंधीकाही मुद्दे''अर्थसंवादऑक्टोबर, डिसेंबर २००६ खंड- ३० अंक -३

बाबर प्रवीण गुलाबराव व खटके दादासाहेब भानुदास २००९''शिवार्थ'' शि.वि.कोल्हापूर, अर्थशास्त्र असोशियेशन १९ वे वार्षिक अधिवेशन २००९

कुलकर्णी सर्वोत्तम न. २००८ अर्थ संवाद संपादक - पाटील जगन्नाथ शामराव, सातारा.

''जागतिक मानव विकास अहवाल २००६ भारता पुढीलआव्हाने''

संपादक-पाटील डी. के.''महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक स्वरुप व समस्या''

घाटगे एल.एन. व वावरे अनिल कृष्णा २००४ मराठी अर्थशास्त्र परिषद २८ अधिवेशन, स्मरणीका संपादक-अनिल गोविंदराव ''आर्थिक सुधारणा काळातील सातारा जिल्ह्याचा मानवी विकास''

सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, अर्थ व सांख्यिकी संचालनायल,

महाराष्ट्र शासन, मुंबई, २०००-०१ ते २०१२-१३

विजय कविमंडन, ''विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन'' श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २०११

के. सागर, ''अस्सा हा महाराष्ट्र'' के. सागर पब्लिकेशन, पुणे, २००१,२००५,२०१०,२०११

कायंदे पाटील जी. व्ही., ''संशोधन पद्धती'' चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक, २००९-१०

मराठवाडा अर्थशास्त्र परिषद २८ वे वार्षिक अधिवेशन शोधनिबंध संग्रह, २०११

महाराष्ट्राची ''आर्थिक पहाणी'' अर्थ व सांख्यिकी संचालनायल, नियोजन विभाग,

महाराष्ट्र शासन, मुंबई, २०००-०१ ते २०१२-१३

लांजेवार मो.म., कद्रेकर अ.क.''सांख्यकी'' संगम प्रकशन, नागपूर, १९७८

पाटील एकनाथ, ''PSI/STI/ASST पूर्व परीक्षा मार्गदर्शक'' अकरावी आवृत्ती, कोल्हापूर,२०१२

सवदी ए. बी. ''द मेगा स्टेट महाराष्ट्र'' निराली प्रकाशन, पुणे, २००६

स्वामी व्ही. एन., ''विद्याभारती जनरल नॉलेज'' विद्याभारती प्रकाशन, आवृत्ती २००९

शर्मा के. के., ''संदर्भ महाराष्ट्र राज्य व जिल्हे एक दृष्टिक्षेप'' संच-२००८

तुकाराम जाधव (२०१३) ''२१ व्या शतकासाठी साक्षरता'' संपादकयुनिकबुलेटिन दिवाळी अंक, नोव्हेंबर २०१३

जे.एफ.पाटील (संपादक)1999 अमर्त्यसेन ''कल्याणाचा कारागीर'' प्रकाशन-प्रबोधन प्रकाशन ज्याती इचलकंरजी ऑक्टोबर, नोव्हेबंर -1999

मनोज पाटील 2008-नागरीकांसाठी ''केंद्र व राज्य शासनाच्या विकास योजना'' चौधरी लॉ पब्लीशर्स जळगांव

डॉ.व्ही.बी.घुगे- ''महाराष्ट्रातील मानवी विकासाची वास्तविकता'' अर्थसंवाद जानेवारी, मार्च 2004 खंड 27 अंक 4

II) REPORTS

District Human Development Report of Sangli district 2001-12

District Human Development Report of Satara 2001-12.

Economic Survey of Maharashtra 2002-12.

Human Development Report Maharashtra 2002,2012

UNDP Human Development Report (1990 to 2012).

III) Ph. D./M. PHIL. THESIS

Choudhari V. C. (2008): "A level of Human Development" Particular Analysis of Buldhana District, Unpublished Dissertation submitted for M. Phil Degree, Dr Babasashaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad.

Elizabeth Anne Stanton (Feb-2007) "Inequality and the human development index, PhD Dissertation.

Gadbade G. B. (2009):" A level of Human Development" A comparison Study of Maharashtra and Kerala State. Unpublished Dissertation submitted for M. Phil. Degree, Dr Babasashaheb Ambedkar Marathwada University,Aurangabad.

Kamdar, Sangita (2001), Economic Growth and Human Development: A

Study of Maharashtra, Dissertation submitted for Ph.D.
Degree, Department of Economics, University of Mumbai.
The Hindu Volume 16- Issue 26, 1999.

IV) JOURNALS

Journal of Indian School of Political Economy, Vol. 10, Deshpande, R.S. (1998), 'Land Reforms and Agrarian Structure in Maharashtra.
Journal of Econometrics, Vol. 4, Diewert, Erwin (1976), 'Exact and Superlative Index.
Radical Journal of Health, II (2 and 3), Nandraj, S. and R. Duggal(1996), 'Physical Standards in Private Health Care Sector.
The Journal of and Wealth, Vol. 18, No. 1, Santappa, V. (1996), 'Estimates of District Income in Karnataka.
Journal of Human Development, Vol. 1, No. 1, 2000 Anand, Sudhir and
Amartya Sen (2000). The Income Component of the Human Development Index.
Sen, A.K.(1991) Development as Freedom, Oxford, Oxford University Press
Journal of Human Resources, 26 Thomas, D., J. Strauss, & M. H.
Henriques (1991). How does mother's education affect child height?
The Journal of Economic Perspectives, Vol. 7, Anand, Sudhir and Martin
Ravallion (1993). Human Development in Poor Countries: On the Role of Private Incomes and Public Services.

V) RESEARCH PAPERS AND ARTICLES

Ahluwalia, M.S. (2000), 'Economic Performance of States in Post- Reforms Period', Economic and Political Weekly, Vol. XXXV, No. 19.
Banerji, Rukmini (2000), 'Poverty and Primary Schooling, Field Studies from Mumbai and Delhi', Economic and Political Weekly, 4–10 March.

Bhaskaram Reshmi P. (2008): A Baseline Survey of Minority concentration district of India – Hingoli.

Chogule D.G. (2003): National Seminar, Dept of Economics, Shivaji University, Kolhapur.

Kamdar Sangita, Ashok Basak (2003): Beyond the Human Development Index Preliminary Notes on Deprivation and Inequality. Working Paper.

K. Seeta Prabhu P. C. Sarker A. Radha (1996) Economic and Political Weekly, Vol. 31, No. 43 (Oct. 26, 1996), pp. WS72- WS79.

Madhusaudan Ghosh (2006) ECONOMIC GROWTH AND HUMAN DEVELOPMENT IN INDIAN STATES' Economic and political Weekly July 29, 2006 page no 3321.

R.Dholakia (2009) "Trends in regional disparity in human and social development in India, Indian Journal of Human Development, Vol. 3 No. 1, January-June 2009.

Ravikiran R.Garje "Indian Economic Reforms: Evaluation of NREGS in Nanded and Hingoli District of Marathawada in Maharashtra state " Ravikiran R.Gajare HOD Economics, K. C. College, Mumbai.

Pathak (2011) "NEED OF EDUCATIONAL INCLUSION OF FEMALES IN INDI" Ref: Two day National Seminar a Accounting the Social sector Development on 1st & 2nd Feb 2011 Organized by Shivaji University Kolhapur Dept of Economics and Centre for the study of social exclusive policy.

Prankrishna Pal (2011) LEVELS OF EDUCATION AND DROP-OUTS OF SC AND ST STUDENTS: A STUDY OF REGIONAL DISPARITY IN INDIA." By: Prankrishna Pal, Associate professor & former Head, Dept. of Economics, Rabindra Bharati University, Kolkata. (Ref: Two Day National Seminar on Accounting the Social sector Development on 1st &2nd Feb 2011 Organized by Shivaji University Kolhapur.

Sarkar Sandip, Sunil Mishra, Harishwar Dayal and Dev Nathan (2006)
Economic and Political Weekly November 18, 2006.

Selim Jahan: measurement of Human Development: Seven Question Oxford; 13 Sept. 2003.

Subhash A.Jadhav and Mr.Ranjot A.Todkar (2011 SOCIAL SECTOR EXPENDITURE AND HUMAN DEVELOPMENT INDEX RANKING OF STATES IN INDIA'

Two day National Seminar on Accounting the Social sector Development on 1st & 2nd Feb 2011 Organized by Shivaji University Kolhapur Dept of Economics and Centre for the study of social exclusive policy.

Vyasalu and Vani (1997) "Development and Deprivation in Karnataka: A District level study' EPW, Nov. 15.

VI) INTERNET WEBSITES

www.maharashtra.gov

www.southasia.oneworld.net

www.hdr.undp.org

www.wbplan.gov.in

www.censusindia.net

www.wateraid.org

www.Shod ganga .Com

www. Directors economic Statistical Maharashtra

****